


शब्द रुची ४०

अक्षर पर्यटन विशेषांक

डिसेंबर २०१४ • मूल्य १० रुपये


# अक्षरांच्या वाटा... गावेही अक्षर




Sandcastles unlimited
Sriwardhan
With 720 km of coastal line, the majestic blue sea and the white sands, this is what you would call nature's art. With unlimited reasons like these, it's only fair to say one trip is just not enough.
HARIHARESHWAR
ARAVALI
TARKARLI
MAHARASHTRA
unlimited
www.maharashtratourism.gov.in | Toll Free No: 1800 - 229930

# निमित्त चाळिशीचे, योग भेटींचे यंदा 'ग्रंथाली'चे पाच ठिकाणी वाचकदिन

॥ग्रंथाली॥

रूपारेल कॉलेजच्या सहकार्याने

वाचकदिन

## वाचकदिन गुरुवार, २५ डिसेंबर २०१४

**स्थळ : रूपारेल कॉलेज, माटुंगा रोड स्टेशनसमोर (पश्चिम), मुंबई-१६**

**सकाळी ११ ते २** (निमंत्रितांसाठीच)

वाचनसंस्कृती चर्चा

सहभाग - **अरुण साधू,** पेपर वाचन : **अरुण जाखडे**

दुपारी ४.३० ते ५.३०

पुस्तक प्रकाशन : हस्ते **रामदास भटकळ, डॉ. तुषार देसाई**

१. **लांबा उगवे आगरीं** - म. सु. पाटील (आत्मकथन), २. **मुस्लिम स्थापत्यकला** - डॉ. दाऊद दळवी,
३. **आत्मकथन** - डॉ. दाऊद दळवी , ४. **चाला, पळा, धावा** - डॉ. पी.एस. रामाणी
५. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१४** - नंदिनी/सुधीर थत्ते

**सायंकाळी ५.३० ते ७.४५**

**जाहीर चर्चा - विषय : जाहिरात हाच धर्म**

**विविध क्षेत्रांतील दिग्गज**

**रात्री ७.४५ ते ८.४५**

प्रख्यात गायक **संजीव चिम्मलगी** यांचे **'स्वरमंथन'**

**आमीरबाई कर्नाटकी : जीवनचरित्र प्रकाशन** मूळ कन्नड : रहमत तरीकेरे, अनुवाद : प्रशांत कुलकर्णी

---

कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने

## वाचकदिन शनिवार, १० जानेवारी २०१५

**स्थळ : कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक**

**वेळ : दुपारी ४.३० ते ५.३०**

प्रकाशन समारंभ : हस्ते **विनायकदादा पाटील**

१. **निवडक कथा : अरुण साधू,** संपादन : मीना गोखले, २. **बॉम्बे स्कूल आठवणीतले, अनुभवलेले** - सुहास बहुळकर
३. **काळा तुकतुकीत उजेड** - किशोर पाठक, ४. **थांबवू शकत नाही कविता लिहिणं** - सायमन मार्टिन,
५. **भाषाग्रहण आणि भाषाशिक्षण** - रमेश पानसे

**सायंकाळी ५.३० ते ७.३०**

परिसंवाद

**जागतिकीकरण, भाषा आणि साहित्य**

अध्यक्ष : विनायकदादा पाटील

सहभाग - **अरुण साधू, सुहास बहुळकर, रमेश पानसे, कौशल इनामदार, दीपक घारे**

सूत्रसंचालन : **वीणा सानेकर**

**'शब्द रुची'च्या 'भाषा आणि साहित्य' या अंकाचे प्रकाशन**

**कार्यक्रम सांगता**

**सायंकाळी ७.३० ते ८.३०**

कविसंमेलन - **किशोर पाठक, सायमन मार्टिन, अरुण शेवते, मंदाकिनी पाटील, सुलभा कोरे**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

डिसेंबर २०१४, वर्ष दुसरे
अंक आठवा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अतिथी संपादक : आल्हाद गोडबोले
सहसंपादक : सविता अमर
मुखपृष्ठ : पुंडलिक वझे

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com
शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी १५० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.



# अक्षरांच्या वाटा... गावेही अक्षर

ग्रंथाली चाळीस वर्षांची होत असल्याच्या निमित्ताने एक विशेषांक संपादित करण्याचा प्रस्ताव सुदेश हिंगलासपूरकर यांनी दिला. त्याला पर्यटन, भटकंतीचे सूत्र असावे, असेही सुचवले. पण संकल्पित विशेषांक एखाद्या टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्सप्रमाणे रिसॉर्टस किंवा बीचेसची सहल सुचविणारा असू नये, असे वाटले. त्यातून अंक 'शब्द रुची'चा, वाचक साहित्यप्रेमी नि चोखंदळ. अर्थात भटकंती म्हटल्यावर समुद्रकिनारे, गडकिल्ले, नद्या, तलाव, जंगले, अभयारण्ये, स्मारके वगैरे डोळ्यांपुढे आलेच. पण मला आठवू लागले ते – विंदांना खानोलकर नावाचा अवलिया कवी जिथे सापडला तो रत्नागिरीचा समुद्र, वि. स. खांडेकर यांच्या चिंतनाला आणि बोरकरांसारख्या कवींनी चांदण्या रात्री रंगवलेल्या मैफलींना साक्षीदार असलेली शिरोड्याची पुळण, विजय तेंडुलकरांनी पाहिलेला पहिला गड पन्हाळा, वसंतराव कानेटकरांनी नाटक लिहिण्यापूर्वी प्रत्यक्ष भेट दिली तो रायगड, वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी प्रतिभेच्या देणगीबद्दल जिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली ती गोदावरी नदी, आचार्य अत्र्यांना 'पाणी'दार बनविणारी कऱ्हा, यशवंतराव चव्हाण यांच्यातील साहित्यिक जिच्या काठावर विसावला ती कृष्णा, बाबासाहेब आंबेडकरांनी 'चवदार' केलेले महाडचे तळे, सुनीता देशपांडे यांच्या वैचारिक मंथनाच्या तळाशी दडलेला धामापूरचा तलाव, मालगुंड येथील केशवसुतांचे स्मारक, मनमाड–भुसावळ लोहमार्गावरील भादली स्टेशनावरील बालकवींचा स्मृतिफलक, अनेक कलावंत – साहित्यिकांचे माहेरघर असलेले औंध, त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या 'बखरी'मुळे लक्ष वेधून घेतलेले अक्कलकोट संस्थान, आटपाडीजवळचे खुले कारागृह आणि साने गुरुजींनी 'धडपडणारी मुले'



कागदावर आणली तो तुरुंग, मारुती चितमपल्ली यांच्या सहवासात आलमेलकर यांच्यातील चित्रकाराच्या प्रतिभेला बहर आला ते जंगल, गणेश देवी यांना बेचैन करणारा हिरड्या-बेहड्याविना उरलेला भोरचा भवताल, नारायण सुर्वे यांच्या जन्मभूमीच्या रकान्यातली 'कोरी जागा', आपल्या पार्थिवावर अंतिम संस्कार आणि अस्थिविसर्जनही व्हावे ही बोरकरांची अंतिम इच्छा पुरी न झालेली गोव्याची जन्मभूमी आणि याउलट इंडॉलॉजीचा महान जर्मन संशोधक गुंथर सोन्थायमर यांच्या अस्थी बाळगणारी खंडोबाची जेजुरी, विलास मनोहर यांच्याच मातुःश्रीनी म्हटल्याप्रमाणे ते जिथे 'प्राण्यांच्या सहवासात माणसाळले' ते हेमलकसा येथील 'अनाथालय', रा. चिं. ढेरे यांनी उजेडात आणलेली मंदिरे-शिलालेख, रॉय किणीकर रात्र-रात्र भणंगासारखे भटकले ते एस. टी. स्टँड, मानववंशशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी पायपीट करताना इरावती कर्वे यांच्या हाती आलेला 'महाराष्ट्र', तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आडगावात राहून मराठी माणसाला कोशाच्या रूपात 'विश्वदर्शन' घडविले ती वाई आणि मी-तूपणा गळून जावा अशी विनोबा भावे यांची 'सब भूमी गोपालकी'...

काय-काय आठवावे?

नुसत्या आठवणींतून मराठीचे होणारे हे विश्वदर्शन ज्या पुस्तकांमधून ते घडते, ते ग्रंथ आणि ते ज्यांच्यामुळे घडते ते साहित्यिक, यांची कितपत आठवण महाराष्ट्रात फिरताना आपल्याला होत असते, असा विचार मनात येऊन गेला.

त्यातूनच मनात आली, 'अक्षरांच्या वाटा गावेही अक्षर' ही कल्पना.

पर्यटक म्हणून महाराष्ट्रात फिरताना, एखादे गाव मागे टाकून पुढच्या स्थळाकडे जाण्यापूर्वी, अशा काही निवडक अक्षर-वाटा आणि अक्षर-गावे यांची आठवण मराठी वाचकाला, रसिकाला, भटक्याला व्हावी; करून द्यावी, या माफक हेतूने 'रुची'च्या अक्षर-पर्यटन विशेषांकाचा हा घाट घातला. त्यासाठी माझ्या संग्रहातील पुस्तके शोधताना मात्र छाती दडपून गेली. ग्रंथालीच्या 'चाळिशी'निमित्ताने मोजकी चाळीस 'अक्षर-पर्यटन स्थळे' निवडणे हे तर खूपच कठीण झाले. तेवढी 'नीरक्षीरविवेकबुद्धी' आपल्याकडे नसल्याची जाणीवही झाली. पण 'चाळीस'पलीकडच्या चारशेच नव्हे, तर असंख्य सारस्वतांची आणि अनेक स्थळांची माफी मागून एक्केचाळीस दुर्वांची जुडी बांधायचे ठरवले. हीच ती एक्केचाळीस अक्षर-वाटांवरील अक्षर-गावे.

एका अर्थाने इथे जन्मलेल्या, वाढलेल्या नि अनुभवांच्या शिदोरीवर अविस्मरणीय साहित्याची देणगी देऊन मराठीला समृद्ध केलेल्या काही साहित्यिकांना ग्रंथालीच्या वतीने केलेला हा एक मुजराच.

पुस्तके धुंडाळताना जया दडकरांचे 'एक लेखक आणि एक खेडे' हातात आले आणि सुमारे पंचवीस वर्षांपूर्वीची एक घटना आठवली.

ज्ञानपीठ हा साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा सन्मान. हा पुरस्कार लाभलेले पहिले मराठी साहित्यिक म्हणून वि. स. खांडेकर लोकप्रिय झाले; निदान प्रसिद्धीस पावले. त्याआधी मराठीचा अभ्यास करताना 'ययाती'बरोबरच कांचनमृग, उल्का, दोन ध्रुव, अमृतवेल आदी कादंबऱ्या, कथाही वाचल्या होत्या आणि खांडेकरांच्या साहित्याने त्यावेळच्या तमाम मराठी संस्कारक्षम मानसावर ध्येयवादाचे, आदर्शवादाचे असेच गारुड पसरलेले असेल, अशा भ्रमात पत्रकारितेत आलो होतो. 'एक लेखक आणि एक खेडे' वाचल्यापासून शिरोडे - आरवली ही गावे पाहण्याची ओढ लागली होती. कोकणातील याच शिरोडे गावातील अठरा वर्षांच्या वास्तव्यात खांडेकरांना लेखक म्हणून मान्यता मिळवून देणारे बहुतांशी वाङ्मय अक्षररूप झालेले होते. दरम्यान खांडेकर



जर्मन संशोधक गुंथर सोन्थायमर यांच्या अस्थी बाळगणारी खंडोबाची जेजुरी, हेमलकसा येथील 'अनाथालय', रा. चिं. ढेरे यांनी उजेडात आणलेली मंदिरे-शिलालेख, रॉय किणीकर रात्र-रात्र भणंगासारखे भटकले ते एस. टी. स्टँड, इरावती कर्वे यांच्या हाती आलेला 'महाराष्ट्र', तर्कतीर्थांनी 'विश्वदर्शन' घडविले ती वाई आणि मी-तूपणा गळून जावा अशी विनोबा भावे यांची 'सब भूमी गोपालकी'... मराठीचे होणारे हे विश्वदर्शन ज्या पुस्तकांमधून ते घडते, ते ग्रंथ आणि ते ज्यांच्यामुळे घडते ते साहित्यिक, यांची कितपत आठवण महाराष्ट्रात फिरताना आपल्याला होत असते, असा विचार मनात येऊन गेला. त्यातूनच मनात आली, 'अक्षरांच्या वाटा गावेही अक्षर' ही कल्पना.





विरंगुळा म्हणून बीच-रिसॉर्टस किंवा लॉग हाऊस असावेत; नको असे मुळीच नाही. पण तिथे विसावल्यावर मराठी साहित्याला श्रीमंती दिलेल्या, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाला साज चढविलेल्या साहित्यिकांची निदान आठवण व्हावी. शक्य झाल्यास त्यांच्या घराला, जन्मभूमी-कर्मभूमीला भेट द्यावी. तिथे कुणी नीलफलक/ स्मृतिफलक लावला असेल तर फारच चांगले. अन्यथा आपले काही क्षण ज्यांच्या अक्षरांनी उजळले, त्यांच्याबद्दल मनोमन कृतज्ञता व्यक्त करून ऋणमुक्त व्हावे.



गेले. आता तरी शिरोडे पाहायलाच हवे, असे वाटू लागले. तरी काही वर्षे गेलीच आणि रजा मिळाल्यावर कोकणाची ट्रिप आखली.

मालवण, वेंगुर्ले पाहून शिरोड्याला गेलो. पण गावात प्रवेश करताना चारजणांना ‘खांडेकरांचे घर’ विचारत ज्या ठिकाणी आलो, ते होते, गावात पूजा वगैरे सांगणाऱ्या खांडेकर गुरुजींचे घर! दोष माझाच होता. वि. स. खांडेकर १९३८ मध्येच शिरोडे सोडून गेले होते आणि १९७१ मध्ये गावकऱ्यांनी खांडेकरांना अगदी मिरवणुकीने आणले असले तरी त्यानंतर एक पिढी उलटून गेली होती. वर्तमानपत्रे विकणाऱ्या किंवा दुकान चालवणाऱ्या पोराला महान साहित्यिक वि. स. खांडेकर माहित असले पाहिजेत, हे गृहीत धरणे चुकीचे होते.

आपले नशीब चांगले म्हणून ज्ञानेश्वर, तुकारामांच्या नेवासा, आळंदी, देहू येथील पाऊलखुणा आपल्याला पाहता येतात. मधु मंगेश कर्णिक यांच्या पुढाकारामुळे केशवसुतांचे स्मारक उभे राहते. विजया राजाध्यक्ष यांच्यामुळे बा. सी. मर्ढेकरांकडे, त्यांच्या मर्ढे गावाकडे लक्ष वेधले जाते. पण लोणार तळ्याला जाणाऱ्या पर्यटकाला ‘रानारानांत शीळ’ पोचवणाऱ्या ना. घ. देशपांडे यांच्या मेहेकर गावाची आणि जवळच्या कंचनी महालाचीही गाठ घालून द्यावी, असे कोणाला वाटत नाही.

‘डॅफोडिल’ लिहिलेल्या विल्यम वर्ड्सवर्थचे लेक डिस्ट्रिक्ट किंवा शेक्सपिअरचे स्मारक पाहून परतल्यावर इंग्लंडचे गोडवे गाणारे आपण आपल्या कवी-कादंबरीकार-नाटककारांना मात्र विसरतो. विरंगुळा म्हणून बीच-रिसॉर्टस किंवा लॉग हाऊस असावेत; नको असे मुळीच नाही. पण तिथे विसावल्यावर मराठी साहित्याला श्रीमंती दिलेल्या, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाला साज चढविलेल्या साहित्यिकांची निदान आठवण व्हावी. शक्य झाल्यास त्यांच्या घराला, जन्मभूमी-कर्मभूमीला भेट द्यावी. तिथे कुणी नीलफलक/ स्मृतिफलक लावला असेल तर फारच चांगले. अन्यथा आपले काही क्षण ज्यांच्या अक्षरांनी उजळले, त्यांच्याबद्दल मनोमन कृतज्ञता व्यक्त करून ऋणमुक्त व्हावे.

औंध असो वा अक्कलकोट, पंढरपूर असो वा जेजुरी, अजंठा-वेरूळ असो वा लोणार, आनंदवन असो वा पवनार आणि नेरळ असो वा एखादे बसस्थानक; त्या-त्या ठिकाणचे माहात्म्य पर्यटकाच्या नजरेने जरूर अनुभवावे. त्याचबरोबर आसपासचा साहित्यिक भवतालही उत्सुकतेने न्याहाळावा.

आपण असे करतो का?

फॉरेस्ट हाऊस किंवा रिसॉर्टजवळच्या साहित्यिक खुणांची चौकशी तरी करतो का?

उत्तर ज्याने – त्यानेच शोधावे.

महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची यादी पाहून मात्र असे वाटत नाही.

पण असेच होत राहिले तर आपल्या महाराष्ट्रात फक्त समुद्रकिनारे, पुळणी, नद्या, तलाव, डोंगर, अभयारण्ये अशा भौगोलिक खुणा आणि निसर्गच फक्त उरेल काही काळानंतर! गड-किल्ले, पुरातन वास्तू यांची पडझड, विल्हेवाट आपण उघड्या डोळ्यांनी पाहतोच. त्यात ही उपेक्षा. म्हणूनच पुढच्या पिढीला निदान सांगायला हवे की, या सगळ्या ठिकाणांना केवळ गावाचे नाव एवढी माफक ओळख नसून इथे मराठीला साज चढविणारे साहित्य जन्माला आले होते, अनेक साहित्यिकांनी आपल्या अनुभवांचे संचित – हिऱ्याला पैलू पाडावेत तेवढ्याच सफाईने – इथे कागदावर उतरवले होते, आपल्याला काहीतरी चांगले वाचायला मिळते त्यामागे हा गाव / परिसर / इथली माणसे, त्यांचे जगणे होते आणि ते कमालीच्या संवेदनशील क्षमतेने टिपणारे कुणीतरी इथे होते.

आपली कथा-कादंबरी-नाटक वगैरे ‘संपूर्णपणे काल्पनिक’ असल्याचे त्या-त्या पुस्तकाच्या सुरुवातीला सांगितले जात असले तरीही!



'या कादंबरीतील/नाटकातील सर्व पात्रे वा प्रसंग सर्वस्वी काल्पनिक असून त्यात वास्तवतेशी साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा' असा इशारा बहुतांशी साहित्यकृतीच्या सुरुवातीला दिलेला असतो. १९८१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'रारंग ढांग' या आगळ्यावेगळ्या कादंबरीने प्रभाकर पेंढारकर यांना विलक्षण लोकप्रियता मिळाली. त्याआधी दहा वर्षे, म्हणजे १९७१ मध्ये, त्यांची 'अरे संसार संसार' नावाची कादंबरी प्रकाशित झाली होती. सामान्य माणसाचा 'सर्व्हायव्हल'चा झगडा आणि गर्भपातासारख्या नाजुक प्रश्नाने होणारी त्याची होरपळ पेंढारकर यांनी या कादंबरीतून अतिशय समर्थपपणाने मांडली होती. त्यानंतर साधारण असेच कथाबीज असलेली ह. मो. मराठे यांची 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' नावाची कादंबरी पुढच्याच वर्षी प्रसिद्ध झाली आणि ती विलक्षण गाजली. त्या तुलनेत पेंढारकरांची संयत कथनशैली उपेक्षित का राहावी, हा वेगळा चर्चेचा मुद्दा आहे. पण पेंढारकरांची ही कादंबरी लक्षात राहण्याचे कारण आहे ते तिच्या प्रास्ताविकात! 'योगायोगा'चा 'वैधानिक इशारा' देण्याची त्याआधीच्या अनेक दशकांची रूढ परंपरा त्यांनी अर्धी का होईना, मोडली होती. 'केवळ योगायोग समजावा, असे या कादंबरीबाबत म्हणणे अर्धसत्य ठरेल' असे लिहून त्यांनी घरा-घराला, माणसा-माणसाला छळणाऱ्या समस्यांचे प्रातिनिधिक रूप या साहित्यकृतीतून मांडले जात असल्याचे स्वच्छपणाने लिहिले.

जगप्रसिद्ध रशियन कादंबरीकार डोस्टोवस्की (किंवा दस्तायवस्की) याला त्याच्या एका चाहत्याने आत्मचरित्र लिहिण्याची शिफारस केली. त्यावर क्षणार्धात त्याने प्रतिप्रश्न केला, 'मग इतकी वर्षे मी काय लिहितोय?'

याचा अर्थ कादंबरी, काव्य असो अथवा नाट्य - प्रत्येक साहित्यकृती हे त्या-त्या लेखकाचे आत्मचरित्रच असेल अथवा असतेच असे नाही. पण हे दोन दाखले अशासाठी दिले की, साहित्यिक कितीही श्रेष्ठ असला तरी त्याच्या साहित्यकृतीचा परीघ त्याच्या अनुभवविश्वावर, त्यावर कल्पनेचे कलम करण्याच्या त्याच्या प्रतिभाशक्तीवर विस्तारलेला असतो आणि प्रत्येक लेखक अशी प्रामाणिक कबुली देत नसेल, पण कोणताही लेखक ते सहसा नाकारीतही नाही.

जन्मभूमी आणि कर्मभूमी यांच्या दरम्यान एक अगम्य, अज्ञात प्रवास असतो. ही वाट उत्कंठावर्धक असते, संघर्षाची असते, आनंदाचीही असते. तिच्या दुसऱ्या टोकाला यश, प्रतिष्ठा, श्रेय, लौकिक लाभेल अथवा नाही याची काहीच शाश्वती या प्रवासात नसते. पण कृतार्थतेच्या किंवा कदाचित असंतोष-असमाधानाच्या टप्प्यावर या प्रवासाची, त्यातील अनुभवांची, संस्कारांची, त्यातील सहप्रवाशांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. हे सारे संचित प्रत्येक माणूस कागदावर उतरवेलच असे नाही; तेवढी प्रतिभा प्रत्येकाकडे असेलच असेही नाही. कवी, लेखक, कादंबरीकार मात्र याबाबतीत नशीबवान असतो.

'आपण कुठले?' असे कुणी विचारले तरी, आपण जन्मभूमी किंवा कर्मभूमीचाच उल्लेख करतो. परगावात, मुलाखतीत, सेवानिवृत्तीच्या, किंवा सत्कार अथवा निरोप समारंभातही माणूस आवर्जून उल्लेख करतो, तो बहुतांशी याच दोन भूमींचा. कारण त्यांनी त्याला घडविलेले असते; 'ओळख' दिलेली असते. त्याची जडण-घडण या मातीत झालेली असते. माणूस कारकून असो, शिपाई, व्यवस्थापक, पुढारी, उद्योगपती, कलावंत अथवा गृहकृत्यदक्ष महिला असो, प्रत्येकाचा जन्मभूमी ते कर्मभूमी या दोहोंदरम्यानचा जीवनप्रवास इतरांना सांगण्यासारखा असतोच. पण त्याला निदान काही काळापुरते अविस्मरणीय अक्षररूप देण्याची



जन्मभूमी आणि कर्मभूमी यांच्या दरम्यान एक अगम्य, अज्ञात प्रवास असतो. ही वाट उत्कंठावर्धक असते, संघर्षाची असते, आनंदाचीही असते. तिच्या दुसऱ्या टोकाला यश, प्रतिष्ठा, श्रेय, लौकिक लाभेल अथवा नाही याची काहीच शाश्वती या प्रवासात नसते. पण कृतार्थतेच्या टप्प्यावर या प्रवासाची, त्यातील अनुभवांची, संस्कारांची, त्यातील सहप्रवाशांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

परगावात, मुलाखतीत, सेवानिवृत्तीच्या, किंवा सत्कार अथवा निरोप समारंभातही माणूस आवर्जून उल्लेख करतो, तो बहुतांशी याच दोन भूमींचा. कारण त्यांनी त्याला घडविलेले असते; 'ओळख' दिलेली असते. त्याची जडण-घडण या मातीत झालेली असते.





क्षमता मात्र प्रत्येकाकडे नसते. आतून उचंबळून येणारे तेवढ्याच उत्कटतेने कागदावर उतरवून ते अजरामर करून ठेवणारी, प्रतिभेची देणगी तर मोजक्या सारस्वतांना लाभलेली असते.

चाळीस वर्षांपूर्वी नक्षलवादाची मुळे असंतोषाच्या भूमीत रुजत असताना अनिल बर्वे नावाचा एक नवथर लेखक 'थँक यू मिस्टर ग्लाड' नावाचे नाटक घेऊन आला, तेव्हा नाट्यगृहातून बाहेर पडणाऱ्या प्रेक्षकांतही किती 'मिस्टर ग्लाड' असतील, असा विचार मनात चमकून गेला होता, तसेच त्याची 'डोंगर म्हातारा झाला' ही कादंबरी वाचल्यापासून माथेरानशी त्याचा धागा जो जुळला तो आजतागायत. माथेरानला डझनभर वेळा तरी गेलो, पण तेथील पर्यटनस्थळांपेक्षा 'म्हातारा कमराद' शोधण्याची ऊर्मी काही कमी झालेली नाही.

ग. दि. माडगुळकर माणदेशातील माडगूळचे. पंतप्रतिनिधींच्या औंध संस्थानातील हे गाव. तसेच 'दो आँखे बारह हाथ' या व्ही. शांताराम यांच्या गाजलेल्या चित्रपटातील स्वतंत्रपूरसुद्धा याच औंध संस्थानातील. 'मुक्त कारागृहा'ची ही क्रांतिकारक कल्पना ग. दि. मां.च्या पटकथेच्या माध्यमातून पडद्यावर आली. त्यांचे बंधू व्यंकटेश माडगुळकर यांच्या 'माणदेशी माणसे' या व्यक्तिचित्रसंग्रहाने 'तात्यां'ना आणि माणदेशाला, दोघांनाही उजेडात आणले आणि 'बनगरवाडी' प्रत्यक्षात जिथे घडली, त्या निंबवडे गावाबद्दल तर वाचकांचेच कुतूहल इतके वाढत गेले की, तात्यांनी 'प्रवास एका लेखकाचा'मध्ये 'चरित्र एका कादंबरीचं' लिहूनच त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

स्वामी समर्थांमुळे प्रसिद्धीस पावलेल्या अक्कलकोटला कधी भाविक म्हणून गेलो नाही, पण त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या 'बखर एका राजाची' या कादंबरीच्या कुळकथेचे बीज अक्कलकोट संस्थानांत असल्याचे दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत वाचल्यापासून अक्कलकोटची ओढ वाढत गेली.

नदीसारखी नदी गावा-गावात असते. महाराष्ट्रातील नद्या आणि त्यांच्या खोऱ्यातील मराठी साहित्याचे उगम हा एक वेधक विषय आहे. महाबळेश्वरला गेल्यावर कृष्णेचे उगमस्थान असलेल्या कुंडाला पर्यटक भेट देतात, तसेच गोदावरीच्या त्र्यम्बकेश्वराला. याच गोदावरीने कुसुमाग्रज नावाचा महान कवी महाराष्ट्राला दिला आहे. आपल्या 'कवितेच्या उगमा'च्या शोधात केलेल्या आत्मकथनात्मक लिखाणात ते याच गोदावरीच्या खोऱ्यातील शिरवाडे गावाकाठच्या शिवडी आणि पाराशरी नदीकिनारी पोचतात.

गो. नी. दांडेकर यांची 'कुणा एकाची भ्रमणगाथा' वाचल्यावर नर्मदा परिक्रमेची ओढ वाटू लागलेले वाचक आजही भेटतात आणि विलास मनोहर यांचे 'नेगल' वाचल्यापासून गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसाला जाऊन आलेल्यांची संख्या तर हजारांत असेल.

कोकणात फिरायला गेल्यावर मालगुंडला जाऊन केशवसुतांचे स्मारक पाहावेसे वाटते तसे, मनमाड-भुसावळ रेल्वे प्रवासात भादली स्टेशनवर न थांबता धावणारी गाडी असली तरी बालकवींची आठवण देणारी फलाटावरची पाटी वाचण्यासाठी काही क्षण दारात येउन उभे राहण्याची इच्छा होतेच.

सागरकिनारे मनाला शांती देतात, अंतर्मुख बनवतात, अस्वस्थही करतात. वि. स. खांडेकरांची आठवण झाली की, शिरोड्याच्या पुळणीवर तासनतास चिंतनात मग्न होणारे खांडेकर डोळ्यांपुढे येतात. तसेच रत्नागिरीच्या किनाऱ्यावर खानोलकर नावाचा हिरा विंदांना सापडल्याची आठवणही जागी होते. एकदा बाहेर पडले की, विंदांना वेळेचे भान कसे नसायचे, हे सांगताना सुमा करंदीकर यांनी 'रास' या आत्मकथनात ही आठवण सांगितली आहे. हाच पोरगा पुढे आरती प्रभू या नावाने मराठी रसिकांना 'नक्षत्रांचे देणे' देऊन गेला. आजही

गोदावरीने कुसुमाग्रज नावाचा महान कवी महाराष्ट्राला दिला आहे. आपल्या 'कवितेच्या उगमा'च्या शोधात केलेल्या आत्मकथनात्मक लिखाणात ते याच गोदावरीच्या खोऱ्यातील शिरवाडे गावाकाठच्या शिवडी आणि पाराशरी नदीकिनारी पोचतात.
खांडेकरांची आठवण झाली की, शिरोड्याच्या पुळणीवर तासनतास चिंतनात मग्न होणारे खांडेकर डोळ्यांपुढे येतात. तसेच रत्नागिरीच्या किनाऱ्यावर खानोलकर नावाचा हिरा विंदांना सापडल्याची आठवणही जागी होते.





रत्नागिरीच्या पुळणीवर गेलो तर कवितेच्या सागराला वाळूच्या ढिगाऱ्यातून चमकणारा खडा काढून देणाऱ्या त्या किनाऱ्याला  मनोमन वंदन करण्याची इच्छा होतेच. कधीकधी मनात येते, असे कितीतरी 'अपघात' महाराष्ट्राच्या महासागरात जागोजागी झाले असतील. कुणी ते लिहून ठेवत असतील; कुणी नाही. पण ज्या स्थळांना असा इतिहास आहे, तसेच तो ज्ञात असेल, वाचकांपर्यंत पोचू शकला असेल, तिथे आपण पोचतो का?

या अंकाची तयारी करताना असे काही–काही आठवत राहिले. त्याची यादी करीत गेलो. पुस्तके शोधली. त्यातून हेच चाळीस का निवडले, याचे कितपत समाधानकारक उत्तर देता येईल, सांगता येत नाही. ज्ञानेश्वर – तुकाराम, दादासाहेब फाळके – भालजी पेंढारकर, गोडसे गुरुजी – बाबासाहेब पुरंदरे, अगदी विनोबा भावे – बाबा आमटे आणि  यशवंतराव चव्हाण – बाबासाहेब आंबेडकर आदींना बाजूला ठेवणेही समर्थनीय नाही. पण त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अपुरा कालावधी, वैयक्तिक संदर्भाच्या आणि स्वतःच्या आकलनाच्या मर्यादा. दुसरे म्हणजे, जी ठिकाणे प्रसिद्ध आहेतच, त्याची उजळणी करावी, असे वाटले नाही. तिसरे म्हणजे शक्यतो कादंबरी–कविता–नाटक एवढेच साहित्य आणि तेही मागील शतकातील एवढाच परीघ ठेवला. चौथे म्हणजे हे लेखक–कवी–नाटककार साधारणतः माहितीतील / वाचनातील असावेत; अगदी अज्ञात नसावेत. अन्याय म्हणावा तर तो शहरी आणि दलित साहित्यिकांवर केला गेला आहे. त्याचे कारण म्हणजे, आपण फिरायला बाहेर पडतो, ते मुंबई–पुणे–औरंगाबाद–नागपूर अशा महानगरांतून. या शहरांत पाहण्यासारखे बरेच असते. 'साहित्यिक पर्यटन'सुद्धा वेगवेगळ्या निमित्ताने, मार्गाने उपलब्ध असते. दलित साहित्यिकांनी तर मराठी वाचकाला गेल्या अर्धशतकात खडबडून जागेच केले आहे. पण मुद्दा हा की, शहरी आणि दलित साहित्य पर्यटन हा स्वतंत्र विषय व्हावा, एवढा व्यापक वाटला, म्हणून बाजूला ठेवला.

चवदार तळे किंवा आनंदवन आणि शाहिरी किंवा लोकवाङ्मय, राजकीय किंवा सामाजिक महत्त्वाची अशी अनेक स्थळे आणि त्यांची वर्गवारी होऊ शकते. करायचे ठरवले तर हे खूप मोठे काम आहे. मराठी वाङ्मयावर मनस्वी प्रेम करणारे आणि प्रसंगी पदराला खार लावून चाकोरीबाहेरचे मराठी साहित्य प्रकाशित करणारे 'पद्मगंधा'चे अरुण जाखडे किंवा 'ऋतुरंग'चे अरुण शेवते यांच्यासारखे धडपडे असा एखादा प्रकल्प राबवूही शकतात.

शिवाय साहित्याची मुळे किंवा उगमाची स्थाने पाहिली तर, ती बहुतांशी काळ्या मातीत, खेडोपाडी, राना–वनांत, सामान्य ग्रामीण माणसाच्या जगण्यांत अधिक प्रमाणात दिसतात (किंवा मी सोयीसाठी तशी शोधली, असे म्हणता येईल). पण वि. स. खांडेकर, र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, त्र्यं. वि. सरदेशमुख, व्यंकटेश माडगुळकर, रंगनाथ पठारे, भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, विश्वास पाटील, राजन गवस, सदानंद देशमुख आदींच्या कादंबऱ्या ही काही उदाहरणे मला या विधानास पूरक वाटतात. थोडे अजून पुढे जाऊन धाडसी विधान करायचे तर, आज प्रस्थापित, नामांकित मानले जाणारे बरेच साहित्यिक गावाकडच्या जगण्यावर, तिथल्या अनुभवांवर साहित्य अकादमीसारख्या पुरस्काराच्या सन्मानापर्यंतची वाटचाल करू शकले आहेत. भालचंद्र नेमाडे यांना जिच्यामुळे 'कोसलाकार' म्हटले जाते, ती कादंबरी शहरी मानायची का ? विश्वास पाटील 'पानिपतकार' असले तरी त्यांना प्रतिष्ठा मिळाली ती 'झाडाझडती'मुळे आणि ती तर धरणग्रस्तांच्या व्यथा मांडते. अरूण साधू 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन''मुळे लोकप्रिय झाले, पण त्यांची प्रतिभा दिसते ती 'शोधयात्रा' किंवा




प्रस्थापित, नामांकित मानले जाणारे बरेच साहित्यिक गावाकडच्या जगण्यावर, तिथल्या अनुभवांवर साहित्य अकादमीसारख्या पुरस्काराच्या सन्मानापर्यंतची वाटचाल करू शकले आहेत. भालचंद्र नेमाडे यांना जिच्यामुळे 'कोसलाकार' म्हटले जाते, ती कादंबरी शहरी मानायची का ? विश्वास पाटील 'पानिपतकार' असले तरी त्यांना प्रतिष्ठा मिळाली ती 'झाडाझडती'मुळे आणि अरूण साधू 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन''मुळे लोकप्रिय झाले, पण त्यांची प्रतिभा दिसते ती 'शोधयात्रा' किंवा 'मुखवटा'मध्ये. मुखवटा काहीशी उपेक्षित राहिली असेल, पण त्यातील इलिचपूर, सातपाटी आणि विदर्भ म्हणजे अरूण साधूंच्या जन्मभूमी ते कर्मभूमी प्रवासाचाच पट आहे.



विंदा करंदीकर यांचा जन्म कोकणात, शिक्षण कोल्हापुरात, अध्यापन मनमाड, तासगाव, बागलकोट, रत्नागिरी, कागल, बेळगाव आदी ठिकाणी आणि कवी म्हणून मान्यता मिळाल्यानंतर कर्मभूमी मुंबई. असा प्रदीर्घ प्रवास केलेला हा महाकवी. त्यांना खरे तर धालवलचा किंवा मुंबईचा असे म्हणणे संकुचितपणाचे ठरेल.



महाराष्ट्रात आता चारच महानगरे राहिली नसून ती संख्याही चाळिशी गाठण्याच्या रोखाने जाईल, एवढ्या वेगाने शहरीकरण वाढते आहे. मराठी साहित्य ज्या समृद्ध मातीतून आले, ती 'काळी' आक्रसत जाते आहे आणि 'पांढरी' वाढते आहे.
या स्थित्यंतरात अक्षरांच्या वाटा आणि अक्षरांची गावेही लेण्या-मंदिरांप्रमाणे हळूहळू नाहीशी होत इतिहासजमा होणार काय?

'मुखवटा'मध्ये. मुखवटा काहीशी उपेक्षित राहिली असेल, पण त्यातील इलिचपूर, सप्तपाटी आणि विदर्भ म्हणजे अरूण साधूंच्या जन्मभूमी ते कर्मभूमी प्रवासाचाच पट आहे, असे मला वाटते. अशी उदाहरणे अनेक देता येतील.

इरावती कर्वे, साने गुरुजी, रा. चिं. ढेरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गणेश देवी यांच्यासारख्या प्रतिभावंतांना 'पांढरी'पेक्षा 'राना-वना'ने अधिक जोपासले आणि बालकवी, आरती प्रभू, गदिमा, ना. घ. देशपांडे, ना. धों. महानोर यांच्या काव्याला बहर आला तो निसर्गाच्या सान्निध्यात. कुसुमाग्रज नाशिककर म्हणून ओळखले गेले तरी त्यांच्या कवितेच्या वटवृक्षाची मुळे शिरवाडे गावाकाठच्या नदीत आणि पिंपळगावांत सापडतात तर दुसरे ज्ञानपीठविजेते विंदा करंदीकर यांचा जन्म कोकणात, शिक्षण कोल्हापुरात, अध्यापन मनमाड, तासगाव, बागलकोट, रत्नागिरी, कागल, बेळगाव आदी ठिकाणी आणि कवी म्हणून मान्यता मिळाल्यानंतर कर्मभूमी मुंबई. असा प्रदीर्घ प्रवास केलेला हा महाकवी. त्यांना खरे तर धालवलचा किंवा मुंबईचा असे म्हणणे संकुचितपणाचे ठरेल.

मराठीत 'मैलाचा दगड' ठरलेल्या कथा-कविता-नाटक-कादंबरी-संशोधनादी साहित्याची मुळे महाराष्ट्राच्या मातीत कुठे-कुठे रुजलेली असतील. ती शोधण्यासाठी पुन्हा साहित्याचा, आत्मकथनांचा, यार्दी-वडेर यांनी जीएंच्या कथा-परिसराचा घेतला तसा अभ्यास करावा लागेल आणि डोळसपणाने भटकावे लागेल. पण तूर्त एका मर्यादित वर्तुळात केलेली ही भ्रमंती आहे, हे मान्य करायला हवे. असो.

या निवडीला आणखी एक निमित्त घडले ते साने गुरुजींच्या विचारांचे. साने गुरुजींची 'शामची आई' म्हणजे 'तुरुंगात लिहिलेल्या पंचवीस रात्री'चे अक्षर-रूप आहे, हे समजल्यावर सावरकरांच्या अंदमानच्या कोठडीप्रमाणेच तो तुरुंग पाहायचीही इच्छा व्हावी. साने गुरुजींना साहित्यिक म्हणावे की नाही, त्यांची 'शामची आई' कादंबरी आहे का, वगैरे प्रश्न समीक्षकांनी सोडवावेत. सामान्य माणसाने त्यांचे लिखाण वाचावे, त्यातून काहीतरी घ्यावे, त्यांच्या दापोलीने त्यांना काय दिले, ते त्यांच्या लिखाणातून समजावून घ्यावे. साने गुरुजींना लिओ टॉल्स्टॉय यांचे आकर्षण वाटले आणि त्यांनी 'What is Art' या ग्रंथाचा अनुवाद केला. त्याच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'गेल्या शंभर-पाऊणशे वर्षांतील कोणते पुस्तक खेड्यापाड्यापर्यंत पोचले आहे? बहुजनसमाज जे वाचतो, ते खरे राष्ट्रीय ग्रंथ. खेड्यापाड्यातील जनता हाच खरा महाराष्ट्र आहे. दहावीस शहरे म्हणजे महाराष्ट्र नव्हे. महाराष्ट्राचे आवडते याचा अर्थ चार सुशिक्षितांचे आवडते यापेक्षा अधिक नाही.'

साने गुरुजींनी हे ऐंशी वर्षांपूर्वी लिहून ठेवले होते. मराठी साहित्याची अक्षर-यात्रा करताना हे संचित सापडले आणि आपली निवड फार चुकलेली नाही, असे वाटून गेले. असो. नाव-गाव नसलेल्या नारायण सुर्व्यांच्या नेरळच्या वास्तव्यापासून सीमेपलीकडच्या जी. ए. कुलकर्णींच्या धारवाडपर्यंत आणि रॉय किणीकरांच्या एस.टी. स्टॅण्डपासून इरावती कर्व्यांच्या 'महाराष्ट्रा'पर्यंत ही भटकंती करण्याचा योग ज्या ग्रंथालीच्या 'शब्द रुची'मुळे आला, त्या ग्रंथालीची जन्मकथाही यानिमित्ताने आठवली. इचलकरंजीच्या साहित्य संमेलनात एका वाचकाने प्रश्न विचारला होता, 'सध्या मुंबई दिनांक आणि विश्रब्ध शारदा ही पुस्तकं गेली दोन वर्षे गाजताहेत. आम्ही ते ऐकतो, त्याबद्दल वाचतो. पण ती दिसतात कशी?' आणि गांगलांच्या मनात ग्रंथालीचा जन्म झाला !

या घटनेलाही चाळीस वर्षे लोटली. 'कवी तो दिसतो कसा आननी?'ऐवजी असा सवाल उपस्थित करणाऱ्या वाचकांनी आपली भूमीच बदलायचा घाट घातला. महाराष्ट्रात आता चारच महानगरे राहिली नसून ती संख्याही चाळिशी गाठण्याच्या रोखाने जाईल, एवढ्या वेगाने शहरीकरण वाढते आहे. मराठी साहित्य ज्या समृद्ध मातीतून आले, ती 'काळी' आक्रसत जाते आहे आणि 'पांढरी' वाढते आहे.

या स्थित्यंतरात अक्षरांच्या वाटा आणि अक्षरांची गावेही लेण्या-मंदिरांप्रमाणे हळूहळू नाहीशी होत इतिहासजमा होणार काय?

**– आल्हाद गोडबोले**

**(भ्रमणध्वनी – ९५९४५४४८८८)**

## सारस्वत आणि साहित्याची भूमी


| | | |
|---|---|---|
| नारायण सुर्वे | १२ | गिरणगाव/नेरळ |
| दिनकर गांगल | १६ | रोहा |
| वसंत कानेटकर | १८ | रायगड |
| श्री.ना.पेंडसे | २० | गारंबी, ऐनी, तुंबाड |
| सानेगुरुजी | २२ | पालगड, दापोली |
| गो.नी.दांडेकर | २४ | गुडघे, दाभोळ, परतवाडा |
| केशवसुत | २८ | मालगुंड, गणपतीपुळे |
| विंदा करंदीकर | ३० | धालवल, रत्नागिरी |
| सुनीता देशपांडे | ३४ | धामापूर, मालवण |
| आरती प्रभू | ३८ | कुडाळ |
| वि.स.खांडेकर | ४२ | शिरोडे, सावंतवाडी |
| बा.भ.बोरकर | ४६ | कुडचडे, बोरी, गोवा |
| पी.एस.रामाणी | ४८ | वाडी, गोवा |
| जी.ए.कुलकर्णी | ५० | धारवाड, म्हसवड |
| रणजित देसाई | ६० | कोवाड, कोल्हापूर |
| विजय तेंडुलकर | ६२ | पन्हाळा, कोल्हापूर |
| प्रकाश नारायण संत | ६० | कराड |
| बा.सी.मर्ढेकर | ६६ | मर्ढे |
| तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | ७२ | वाई |
| गणेश देवी | ७४ | भोर, सांगली |
| रा.चिं.ढेरे | ७६ | निगडे, मावळ |
| गुंथर सोन्थायमर | ७८ | जेजुरी |
| गौरी देशपांडे | ८० | विंचुर्णी |
| व्यंकटेश माडगूळकर | ८२ | निंबवडे |
| ग.दि.माडगूळकर | ८६ | माडगूळ |
| दुर्गा भागवत | ८८ | पंढरपूर |
| विश्राम बेडेकर | ९० | सोलापूर |
| त्र्यं.वि.सरदेशमुख | ९४ | अक्कलकोट |
| रॉय किणीकर | ९८ | एस.टी.स्टँड |
| शान्ता ज. शेळके | १०० | मंचर, राजगुरुनगर |
| कुसुमाग्रज | १०२ | शिरवाडे, पिंपळगाव |
| लक्ष्मीबाई टिळक | १०५ | अहमदनगर |
| बालकवी | १०६ | धरणगाव,अहमदनगर,भादली |
| भालचंद्र नेमाडे | १०८ | सांगवी |
| माया पाटील | ११२ | तेर, मराठवाडा |
| ना.घ.देशपांडे | ११४ | मेहेकर, लोणार |
| महेश एलकुंचवार | ११८ | पारवा, यवतमाळ |
| वसंत आबाजी डहाके | १२० | चंद्रपूर |
| विलास मनोहर | १२२ | हेमलकसा, गडचिरोली |
| मारुती चितमपल्ली | १२४ | भंडारा |
| इरावती कर्वे | ११६ | महाराष्ट्र |


### संपादकीय

नाताळ, नवीन वर्षातील रजा, 'एलटीए', 'एलटीसी', उन्हाळ्याची दीर्घ सुटी - थोडक्यात पुढची सहामाही म्हणजे भटकंतीचा हंगाम. यावेळी कुठे जायचे, काय पाहायचे याची चर्चा दिवाळीपासूनच घराघरात सुरु झालेली असते आणि जीप-बसेस-रेल्वेगाड्यांच्या आरक्षणाचे वेळापत्रकही आखले जात असते. कोकण हे तर मराठी माणसांचे 'हॉट डेस्टिनेशन'.
रायगड, गुहागर, गणपतीपुळे, सिंधुदुर्ग तसंच पुढे गोवा वगैरे मनसुबे आखले गेले असतील. पर्यटक म्हणून बीचेस, रिसॉर्टस्, गडकिल्ले, अभयारण्य यांना भेटी द्यावेसे वाटत असेल, त्याचे आकर्षणही जरुर असावे. पण एक मराठी वाचक म्हणून आपण ज्या साहित्यावर प्रेम करतो, त्यातील खुणा नकाशात शोधून नेरळ ते अक्कलकोट किंवा एसटी स्टँड ते महाराष्ट्र अशी अक्षर सहल तुम्ही कधी केलीय का? यावेळी नसेल तर निदान पुढच्या सुट्टीत तरी?
त्यासाठीच हा खास अक्षर-पर्यटन विशेषांक आणि सोबत त्याच्या आखणीसाठी ग.रा.भटकळ फाउण्डेशनने प्रकाशित केलेल्या संक्षिप्त मराठी वाङ्मयकोशातील पाच नकाशेही...

# सुर्वे नावाचे झाड



नारायण गंगाराम सुर्वे

कष्टमय वातावरणात वाढूनही हृदयात कटूता नसलेला, उलट माणसातील माणुसकीवर अपार श्रद्धा ठेवून मानव्याची जोपासना करणारा एक समर्थ कवी म्हणजे नारायण गंगाराम सुर्वे. शिक्षणाचे, खानदानीपणाचे वलय मागे नसतानाही मनाची प्रगल्भता, वैचारिक उंची सुर्व्यांच्या कवितेतून प्रगट होते ही त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचीच खरी किमया आहे.




*अनाथ म्हणून वाढलेला, सुर्वे नावाच्या एका कुटुंबानं स्वत:ची ओळख दिलेला, जगण्यासाठी धडपड करताना, हमालाचे असो वा शिपायाचे अक्षरश: पडेल ते काम करणारा, 'कामगार आहे मी...' असं छाती पुढं काढून म्हणणारा आणि जिथं जिथं काव्य दिसेल तिथं तिथं भिरभिरत राहिलेला नारायण सुर्वे हा थोर कवी आयुष्याच्या संध्याकाळी शांततेच्या ओढीनं, मुंबई महानगरापासून पन्नास मैलांवरच्या नेरळ इथं स्थायिक होण्यासाठी गेला. माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या या टुमदार, निसर्गरम्य गावात आपली मुळं रुजवायचा प्रयत्न त्यानं आणि आयुष्यभर त्याला साथ देत आलेल्या सहचारिणी कृष्णाबाईनं केला. पण त्यांच्या पंखांची फडफड थांबली नाही. कुठेतरी रस्त्यावर सापडलेलं पोर म्हणून जगानं त्यांच्या 'जन्मदाखल्या'वर महानगरी मुंबईची नोंद केली, ती गिरणगावाची – आता काजळीनं आणि कोळीष्टकांनी वेढलेली – धुराडी जणू त्याला आपल्याकडे बोलावत राहिली आणि उपचाराच्या निमित्ताने ठाण्याकडे येत राहिलेल्या नारायण सुर्वे यांनी अखेरचा श्वास घेतला तोही इथंच.*

*असं म्हणतात की, दिवसभर आकाशात दूरवर विहरणारा पक्षी–'खग'– सायंकाळी आपल्या घरट्याकडे परततो, तसंच आयुष्यभर कुठेही, कितीही फिरला तरी माणूस आपल्या अखेरीस आपल्या मुळांकडे, जन्मभूमीकडे ओढ घेतो. हे खरं असेल, तर कविवर्य 'नारायण सुर्वे कोणत्या गावचे?' या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी गिरणगावला जायचं, नेरळला जायचं, नाशिकला की ठाण्याला?*

*एकत्र बांधण्याचा प्रयत्न झाला तरी एखाद्या खंडात सामावण्याएवढी सुर्वे यांची कविता लहान नव्हती. सुर्वे यांनी आत्मकथन लिहिलं नाही. कदाचित आपली कविता हाच आपला आत्मस्वर असताना वेगळं काय लिहायचं असंही त्यांना वाटलं असेल कदाचित, पण त्यांनी आत्मकथन लिहिलं नाही, हे खरं. पण कृष्णाबाईंनी मात्र त्यांच्या सहजीवनाची कहाणी 'मास्तरांच्या सावलीत' या छोटेखानी आत्मकथनात लिहून ठेवली आहे. सुर्वे यांचा जीवनप्रवास त्यातून उलगडतो. त्यांच्या वाटेनं चार पावलं जाऊन कवितेची मळवाट बनवावी, असं ज्या उदयोन्मुख कवींना वाटत असेल, त्यांनी सुर्व्यांच्या माझे विद्यापीठ, सनद या कवितासंग्रहाबरोबर 'मास्तरांच्या सावली'तही काही काळ थांबावं.*

*नेरळच्या हिरवाईच्या सावलीत हा कवी फार काळ का स्थिरावला नाही, याचं उत्तर या काही पानांत सापडतं –*

****

चित्रपटाच्या रुपाने मास्तरांची जीवन कहाणीच चित्रित झालीय. एक ऐतिहासिक ठेवाच आहे हा. पिक्चर पाहिला आणि बाबांच्या (गंगाराम सुर्वे) आठवणीने माझे डोळे भरले. ते आज जिवंत असते तर त्यांना किती अभिमान वाटला असता. त्यांच्यामुळेच तर मास्तरांना नाव मिळालं आणि स्वत:ची ओळखही 'नारायण गंगाराम सुर्वे.'

हार्टचं ऑपरेशन झाल्यानंतर मास्तरांनी सिगारेट पूर्णपणे सोडली. शांत शांत राहू लागले. शेवटी मी त्यांना म्हटलं, ''आता बाहेरची कामं बंद करा, थोडा तरी निवांतपणा ठेवा मास्तर.'' हळूहळू मास्तरांनी लोकवाङ्मयगृह, साहित्य अकादमी, अभ्यास मंडळ या सर्व जबाबदाऱ्या कमी केल्या आणि जाणीवपूर्वक तब्येतीकडे लक्ष पुरवू लागले. कामांच्या उत्साहात त्यांनी तब्येतीची खूपच हेळसांड केली होती. अनेक टीकांना, चर्चांना तोंड दिलं आणि त्याचाच मानसिक त्रास खूप झाला. आता कशाविषयी, कुणाशीही काहीही बोलावंसं वाटत नव्हतं, कारण –

ढळला रे दिन ढळला सखया
संध्या–छाया भिवविती हृदया

अशी माझी अवस्था झाली होती. जे काही दिवस उरलेत ते मास्तरांच्या सोबत निवांतपणे जगायचे म्हणून मीच अट्टहासाने मास्तरांच्या मागे लागून नेरळमध्येच वास्तव्य करायचं ठरवलं.

बऱ्याच वर्षांपूर्वी मास्तर कार्यक्रमासाठी म्हणून नेरळला गेले होते. मास्तरांना तो परिसर

खूपच आवडला होता. सहज म्हणून त्यांनी ''इथे स्वस्तात जागा मिळेल का?'' असं विचारलं आणि त्यांच्या मित्राने एक जागा दाखवली, पण मला सांगितल्याशिवाय मास्तर कोणताच निर्णय घेत नसत. अजूनही घेत नाहीत आणि मीही मास्तरांना न विचारता कोणतेच निर्णय घेत नाही. तर मास्तरांनी मला नेरळची जागा दाखवली. अगदी रेल्वेस्टेशनला लागून असली तरी खूपच शांत असा परिसर मलाही आवडला होता आणि ती जागा आम्ही घेतली. इमारत वगैरे काहीच बांधलेली नव्हती. त्यामुळे मी जरी नेरळला जाऊन राहायचं असं ठरवलेलं असलं तरी घर बांधून झाल्याखेरीज काही राहता येणार नव्हतं. त्यासाठी साताठ महिने तरी जाणारच होते.

थोडी थोडी पैशांची व्यवस्था केली. ह्यांच्या एकदोन मित्रांनीही थोडे पैसे घातले आणि वर दोन मजले बांधले. तीनचारजणांनी मिळून ही इमारत बांधली. तळमजला पूर्ण आमचा अशी रचना केली, पण यात थोडासा कालावधी गेलाच.

मास्तर अनेकदा मला आग्रह करून बाहेर नेऊ पाहतात, पण मी काही जात नाही. मला बाहेर जाण्याचा कंटाळा आणि मास्तरांना घरात राहण्याचा कंटाळा. सकाळी तर बाजारहाटाच्या निमित्ताने बाहेर पडतील. नाहीतर संध्याकाळी तरी. तेवढाच त्यांना विरंगुळा. ते बाहेर फिरुन आले की उत्साहात असतात. भाजीपाला, मासे अगदी छान घेऊन येतील. वाटेत कुणी ना कुणी भेटतं. दोनतीन तास छान जातात त्यांचे. तोपर्यंत मी हळूहळू घरातली कामं आवरते. काहीतरी आवरुन ठेव, काहीतरी धुवत बस, पुसत बस. असा वेळ जातो. नाहीतर खिडकीत बसून समोरच्या इमारतीत काम करणाऱ्या मजुरांना पाहत बसते. त्यात काही तरुण जोडपीही असतात. कच्च्याबच्च्या पोरांना पाठीशी, पोटाशी बांधून काम करणाऱ्या बायका पाहिल्या की मला माझा भूतकाळ आठवतो. त्यांच्यातूनही कोणी नारायण सुर्वे, कृष्णाबाई घडेल का? हा विचार करीत बसते. नाहीतर हात जोडून मनोमन प्रार्थना करते, 'सांभाळ रे बाबा त्या माणसांना. जीव वाचव रे त्यांचा, त्यांना सुखी ठेव!' ही माणसं काही शिकली सवरलेली नसतील, पण त्यांचे कष्ट सर्वात मोठे आहेत. त्यामुळे माझ्याकडून खाण्यापिण्याची, कपड्यांची जी काही मदत त्यांना करता येईल ती करते. घरी जाताना त्या बायका मला हाक मारुन जातात यातच मला समाधान मिळतं.

नेरळच्या घरात नाही म्हटलं तरी आम्हा दोघांनाही एकटेपणा आला हे मान्य करायलाच हवं. इथे ना शेजार ना पाजार. हाक मारायची झाली कुणाला तर फोन करावा लागतो. मी नेरळला आले होते ते वेगळ्या हेतूने की मास्तर इथे शांतपणे लेखन करतील, पण उलट इथे मास्तरांना विझलेपणाच आला, पण नाशिकला मास्तर पुन्हा माणसांच्या गराड्यात रमतील, तिथल्या कामात मग्न होतील. मुख्य म्हणजे ते लिहिते होतील. कदाचित पुन्हा एकदा त्यांची 'कविता' फुलून येईल. असं मलाही वाटतंय. म्हणून मी त्यांच्यासोबत जाईन. कारण मास्तर जिथे असतील तिथे त्यांची सावली असणारच ना? मला आमची जबाबदारी दुसऱ्यांवर टाकणं नको वाटतंय. शेवटी माझं मन एका 'बाईचं' मन आहे. तिला तिने उभा केलेला संसार असा उघड्यावर टाकून किंवा राहतं घर बंद करुन जाता येईल का? पण 'आम्ही तिथे राहावं' या निर्णयाने जर सर्वांचंच भलं होणार असेल तर मी तरी माझा हट्ट का धरू? पण पुन्हा असंही वाटतं जसं आमच्या संसाराच्या सुरुवातीच्या काळात मास्तर सतत घराबाहेर राहायचे, माणसात रमायचे आणि मी एकटी माझ्या संसारात आणि मुलाबाळांच्यात रमायची, तशीच पुन्हा परिस्थिती येणार नाही ना? म्हणजे 'सांस्कृतिक भवना'च्या कामाच्या निमित्ताने मास्तर घराबाहेरच राहतील. माझ्या वाट्याला येणारच नाहीत, मास्तर मला विसरतील, मग मी काय करू? मी एकटीच पडणार ना! चारआठ दिवस मी तिथल्या सत्कार सोहळ्यात, महिला मंडळाच्या कार्यक्रमात रमेन, पुढे काय? आज मला माझ्या मास्तरांसोबत राहण्यात जो आनंद मिळतोय, तो तर हरवला जाणार नाही ना? असं काहीबाही मनात येत राहतं. मनातली आंदोलनं संपतच नाहीत.

कधी कधी मनात येतं, पुन्हा जर इथे नेरळला यावंसं वाटलं तर पुन्हा नाशिककर मंडळींना त्रास द्यायचा, की आम्हाला तिथे नेऊन सोडा म्हणून. कारण आता या वयात नव्या ठिकाणी मुक्काम




'ऐसा गा मी ब्रह्म' (१९६२) हा सुर्व्यांचा पहिला कवितासंग्रह. लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची वाट पाहणारी कविता 'ऐसा गा...' मधून वाचकांसमोर आली. १९६६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'माझे विद्यापीठ' या त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहाने साहित्यविश्वात चांगलीच खळबळ उडवली. यात महानगरी मुंबईत 'ना घर, ना गणगोत' अशा स्थितीत 'तांबलेल्या, भाकरीसाठी करपलेल्या' उदास वस्तीत पोटासाठी झिजणाऱ्यांचे एक विलक्षण दाहक विश्व प्रकट झाले आहे. त्यांच्या मुंबई, तुमचंच नाव लिवा, तेच ते तेच ते, जाहीरनामा, माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय या आणि अशा अनेक कवितांनी लोकप्रियतेचा उच्चांक गाठला.












करून स्थिरस्थावर होणं जडच जाणार आहे. आपल्या इच्छेसाठी त्यांना किती त्रास द्यायचा त्यापेक्षा स्वत:चं एखादं वाहन असलं तर किती बरं. असा विचार करता करता मनाने मी एकदम बँकेत पोहोचले. जिथे जिथे माझी खाती होती त्या बँकेत जाऊन तिथल्या अधिकाऱ्यांना सांगूया की, 'माझा खाता नंबर मला माहीत नाही, पण पाहा जरा काही रक्कम इकडे तिकडे कुठे राहिली असेल तर. थोडीशी बँकेची काहीतरी मदत घेऊन एखादं जुनं वाहन घेता येत असेल तर घेऊ या, निदान एखादी रीक्षा तरी. म्हणजे मग दुसऱ्यांकडे मदत मागायला नको. मनात आलं की नाशिकला गेलं, कधी नेरळला म्हणजे अजूनही काहीतरी करण्याची खुमखुमी माझ्यात आहे. माझी ही आंदोलनं पाहिली की मास्तर माझी समजूत घालतात, ''किशाबाई, आता अशी वेळ येणारच नाही. आता तुमचं राज्य असेल. तुझ्या या पुस्तकामुळे तूच खूप व्यस्त होऊन जाशील. उलट तूच माझ्या वाट्याला येणार नाहीस. मुलाखती, समारंभ यांपासून तू दूर राहिलीस. आता हे सर्व तुझ्या वाट्याला येईल बघ. मी ते आनंदाने पाहत राहीन. तुझ्या डोक्यातली ही वेडी विचारचक्रंही थांबतील बघ!''

मी मास्तरांना म्हणाले, ''मास्तर माझ्या या जीवनकथेमुळे इतिहास घडेल की वादंग उठेल मला माहीत नाही. मी फक्त माझ्या मनातलं तुंबलेलं सारं बाहेर काढलंय. आणि मला 'मोकळं' केलंय. बाकी प्रसिद्धीच्या हव्यासाने मी काहीही केलेलं नाही आणि माझ्या डोक्यात सतत जी वेडी विचारचक्रं सुरु असतात त्या मागचा हेतू इतकाच की आपल्यामुळे कुणालाही त्रास होऊ नये. कारण आता आपलं वय वाढतंय, त्याप्रमाणे शरीराचे त्रासही वाढणारच. आजारपण येणारच, पण त्यामुळे आपल्याला परावलंबित्व येऊ नये म्हणून माझी सतत धडपड सुरु असते. शेवटी 'मृत्यू' हा अटळच आहे, पण तो असा आजारीरूपात येऊ नये, आनंदात हसत हसत यावा तुम्हालाही आणि मलाही, असं मला वाटतं. म्हणूनच केवळ तुम्हाला ज्या गोष्टीत आनंद मिळतोय ती गोष्ट मीही आनंदाने करीन. कारण मला पैसा, दौलत काहीही नकोय. फक्त माझ्या मास्तरांचं कर्तृत्व त्यांच्यामागेही समाजात राहावं एवढीच माझी इच्छा आहे. बाकी मी तुमच्यासोबतच तुमची सावली म्हणून राहणार. आणि तुमचीही सावली माझ्यावर सतत राहू दे. बाकी मला काहीही नको.''

**– कृष्णाबाई नारायण सुर्वे**
**(सौजन्य : मास्तरांची सावली, डिंपल पब्लिकेशन)**






किंमत - रु.२००/- ट.ख. - रु.३०/-

राजहंस प्रकाशन

पुणे २४४६५०६३, २४४७३४५९ मुंबई २४२२३९०१ नवी मुंबई ८६७३२७२४२
औरंगाबाद ९४२२७१३१७६ कोल्हापूर २६४६४२४ नागपूर ९३७२२२५२०१
सातारा ९८२२३९०८१० नाशिक ९४२२२५२२०८

# ग्रंथाली ४० नि गांगलही ४०!



दिनकर गांगल

'मला गांगलमधला ग उच्चारायचा जसा कंटाळा येतो ना, तसाच सतत ग्रंथालीचा ग्र म्हणायचाही कंटाळा येतो'- हे विधान आहे खुद्द 'ग्रंथालीकार दिनकर गांगल' यांचे. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या रविवार पुरवणीला सुरुवातीच्याच काळात खऱ्या अर्थाने आकार आणि ओळख दिली ती गांगल यांनी. मराठी सारस्वतांची तिथे जमवलेली 'मैफल' पुढे 'ग्रंथाली'च्या माळरानावर ('दरबारा'त कसे म्हणणार? कारण आजही ती अनिकेत, अशाश्वत छपराखालीच भरते आहे ! असंख्य सारस्वतांना स्वत:ची जागा मिळवून देणारी ही संस्था चाळीशीच्या उंबरठ्यावर लौकिकार्थाने चार भिंती आणि छप्पर असलेली स्वत:ची जागा मिळवू शकलेली नाही. असो.) तब्बल चार दशके भरत आली आहे; जमून येत राहिली आहे.

*इचलकरंजीच्या साहित्यसंमेलनात निपाणीच्या दोन वाचकांनी प्रश्न विचारला होता- 'मुंबई दिनांक' आणि 'विश्रब्ध शारदा' ही पुस्तकं गेली दोन वर्षं गाजतायंत. आम्ही ते ऐकतो, त्याबद्दल वाचतो. पण ती दिसतात कशी?*

*आणि गांगलांच्या मनात 'ग्रंथाली'च्या 'ग्र'चा जन्म झाला!*

*मराठी पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचविण्यसाठी चळवळ उभी केलेल्या गांगलांच्या सत्तरीनिमित्त 'गांगल ७०, ग्रंथाली ३५' नावाचा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला होता. त्यालाही आता पाच वर्षे पूर्ण होत आहेत.*

***सारंग दर्शने** यांनी घेतलेल्या मुलाखतीत 'खरं सांगू का? माझा जन्म झाला तो माझ्या वयाच्या पस्तिशीला. म्हणजे आज माझं वय तुम्हाला सत्तर दिसतं आहे. पण ते या दुसऱ्या जन्मापासून मोजायचं झालं तर पस्तीसच! त्याआधीची सगळी माझी वर्षं अंधारातच गेली, असं मी मानतो. ती धरायची नाहीत.' असे म्हणणारे दिनकर गांगल या अर्थाने आता चाळीस वर्षांचे होत आहेत. त्यांच्या 'पस्तिसाव्या वाढदिवसा'निमित्त घेतलेल्या मुलाखतीत हेच सूत्र पकडून त्यांच्या साहित्यप्रवासात केलेली एक 'सह-वाटचाल' या संवादाच्या रुपानं -*

**आयुष्यातला इतका मोठा काळ तुम्ही असा का अंधारात टाकता?**

अंधारात म्हणजे यानंतर मला जाणीव झाली की आपण माणूस आहोत. म्हणून आधीचा काळ अंधाराचा. म्हणजे तो काळ सारा पुसला गेला, संदर्भ पुसला गेला असं नाही. परंतु तो सगळा कालावधी मला बिनमहत्त्वाचा वाटतो.

**त्या काळातल्या सामाजिक घटना, राष्ट्रीय घटनांचा जसा काही संस्कार असतो तसा दुसरा संस्कार शाळेतही होतो. इतर वाचन घडू शकते. शाळेत गेल्यानंतर बाहेरच्या जगाशी तुमचा कसा संवाद झाला?**

आमच्या वडिलांनी कुठून माहीत नाही, पण रामायण-महाभारतावरची चार-पाच पुस्तकं आणली होती. वेळ असला की ते ती पुस्तकं काढून वाचत बसायचे. वडील नसले की आम्ही भावंडं ती पुस्तकं वाचायचो. आणखी एक गोष्ट म्हणजे, बाकी दारिद्र्य असलं तरी रोह्यातल्या लायब्ररीचे आम्ही मेंबर होतो. अर्थात या मेंबरशिपचा लाभ घेणारी आम्ही अकरा भावंडं होतो. या अकरा भावंडांपैकी निदान चौघा-पाच जणांना असायचीच ना वाचण्याची आवड. त्यामुळं आमच्यात एक कॉम्पिटीशन असायची, कोण पुस्तक पळवतोय याची. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या असायच्या. 'वीरधवल' वगैरे होतेच. श्री.ना.पेंडशांच्या कादंबऱ्या येऊ लागल्या होत्या. त्या असायच्या लायब्ररीत. तेव्हा पेंडसे आणि गो.नी.दांडेकर हे म्हणजे अगदी लाडके लेखक. फडके वगैरे आधीच होऊन गेले होते. मी सांगतोय त्या काळात म्हणजे ५२-५५ च्या सुमाराला पेंडसे हे अतिशय ताकदीचे लेखक होते. फार प्रभाव होता त्यांचा तेव्हा. आणि दांडेकरांची जी पुस्तके होती, त्यांच्या कथानकांशी आमच्या जगण्याचा फार जवळचा संबंध होता. मी, माझी एक बहीण- आमची तर पळवापळवीच चालायची पुस्तकांची. काही दिवसांपूर्वी मी एक लेख लिहिला होता, टीव्हीवरच्या मालिका लोकप्रिय का होतात, याचा शोध घेणारा. त्यात मी म्हटलं होतं की, 'पुढं काय' हे माणसाच्या मनात असणारं कमालीचं कुतूहल या मालिका लोकप्रिय करतं. त्या वेळी आमच्या चढाओढीत कुणा एकाच्या हातात लायब्ररीतलं पुस्तकं लागायचं. मग ते आळीपाळीनं वाचायचं. आधी बहिणीला मिळालं तर तिचं त्यातलं पुढचं वाचून व्हायचं. आम्हाला प्रचंड कुतूहल की पुस्तकात पुढं काय झालं? मालिका आणि पुस्तकांच्या बाबतीत हे एकच कुतूहल काम करत असतं. पुढं काय? आम्हा मुलांची ती वाचनाची एक रिले रेसच असायची.

**तेव्हा अनावश्यक किंवा फाफटपसारा असं काही वाचन झालं का? अर्नाळकर किंवा इतर कोणी? पेपर यायचा का तुमच्याकडं?**

हं. अर्नाळकर तर वाचले होतेच. त्या वेळी आमच्याकडं लोकमान्य हा पेपर यायचा. पण त्याचं काही फार वाचन तेव्हा झालं नाही.

**वाचनाला दिशा पुढच्या काळात मिळाली**

**असेल. पण लायब्ररीत तुम्ही जायचात नियमित? शिक्षक काही मदत करायचे?**

शाळेत तेव्हा साखळकर नावाच्या बाई होत्या. त्यांना फारसं शिकवता यायचं नाही. पण त्या मेंबर होत्या लायब्ररीच्या. त्या यायच्या तिथं नियमित. मग आम्हीही जायचो. शिक्षिकेविषयी असणाऱ्या आकर्षणाचाही तो भाग होता.

**तुम्ही शाळांच्या दिवसांचं जे महत्त्व म्हणता, ते मला नाही पटत तितकंसं. त्या दिवसांचा आपल्या भविष्यातल्या जडणघडणीवर परिणाम होत असतो ना. म्हणून या दिवसांचं महत्त्व...**

मी म्हणालो तसं तो सारा काळ अज्ञान-अंधकाराचा. घरी चालणारी कर्मकांडं. जुने संस्कार आणि तीच पठडी. तो मला मोलाचा काळ वाटतच नाही घडणीच्या दृष्टीनं.

**गावात वेगवेगळे समाज होते. बहुजन समाज किंवा त्यापलिकडचा दलित समाज. सरमिसळ असायची का ?त्या समाजाकडं तुमचं लक्ष जायचं?**

नाही जायचं. पण आमच्या डोक्यात 'जातीयता' अशी कधी आलीच नाही. तसं लिबरल वातावरण होतं. आमच्याकडं सुडक्यामामा म्हणून घरगडी होता. त्याचे आईवडील लवकर गेले. तेव्हा हा सुडक्या आमच्याकडं आम्हा मुलांसारखाच वाढला, राहिला. कोणी भेदभाव नाही केला त्याच्याशी. त्याची बायको पार्वतीमामी आमच्या घरातलीच सदस्य होती. मघाशी सांगितलं तसं माझा मित्र इब्राहिम सवाल घरी यायचा. तो आत येऊ शकायचा नाही तरी मला कोणी कधी त्याच्याशी मैत्री ठेवू नकोस, असं सांगितलं नाही. आणि पूजेचं सोवळं तर आम्हालाही जवळ येऊ द्यायचं नाही. त्यामुळं त्याचं फारसं कोणाला काही वाटायचं नाही. आम्ही सगळं मांडवातच असायचो. तो मांडवात यायचाच. प्रश्न फक्त पूजाअर्चेचा. सगळेच पुरुष जेवणखाण सोडलं तर मांडवात, बाहेरच्या पडवीत असायचे. शिवाशिवबद्दल- स्पृश्यास्पृश्यबद्दल एक खुलासा केला पाहिजे. आमचं घर जरी ब्राह्मणांचं असलं तरी कुणी माणूस परजातीचा आला म्हणून त्याला मज्जाव झालेला दिसला नाही.

**तुम्ही ज्या काळात मोठे होत होतात, त्या काळात तुमच्यावर आध्यात्मिक काही संस्कार झाले. संघाचे झाले. त्याच काळात गांधी गेले असले तरी त्यांचा समाजातला प्रभाव प्रचंड वाढत चालला होता. तर या दोन विचारांमधला संघर्ष तुम्हाला कधी जाणवला का? किंवा तुमच्या मनात कधी या विचारांविषयी ओढ निर्माण झाली का?**

नाही. नाही. आमच्याकडे गांधीजींची कधी चर्चाच व्हायची नाही. टिळकांचा विचार थांबला आणि गांधीजींचा विचार सुरु झाला हे जाणवले नाही. खरं सांगू का, एवढी जागरुकता नव्हती. मी मोठा होत गेलो तेव्हा महात्मा गांधी गेले होते आधीच. वातावरण नव्हतं तसं. पण हिंदू-मुस्लिम तेढही नव्हती. आमच्या गावची एक पालखी कित्येक वर्षं मुस्लिम वस्तीतूनच यायची. हिंदू-मुस्लिम ताणही नव्हता काही. हा ताण पुढं ६०-६२ नंतर सुरु झाला, असं मला कळलं. गांधीजींची हत्या झाली तेव्हा मी नऊच वर्षांचा होतो. पुढच्या शाळकरी वयात माझ्यापर्यंत तसा गांधी पोहोचला नाही.

**(सौजन्य : गांगल ७०, ग्रंथाली ३५, ग्रंथाली प्रकाशन )**






# रायगडालाही जाग आली



वसंत कानेटकर

शिवकालावर कानेटकरांनी तीन नाटके लिहिली. यातील 'रायगडाला जेव्हा जाग येते' (१९६२) या नाटकाने ऐतिहासिक नाटकाला वेगळे वळण दिले. शिवाजी महाराज व त्यांचा थोरला पुत्र संभाजी यांच्यातील संघर्षासंबंधीचे हे नाटक चांगलेच गाजले. या मालिकेतले दुसरे नाटक 'इथे ओशाळला मृत्यू' (१९६८) हे शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर झालेली राज्याची स्थिती, संभाजी व औरंगजेब यांच्यातील संघर्षाचे चित्रण करते. तर तिसरे नाटक 'तुझा तू वाढवी राजा' (१९६१) हे शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचे चित्रण करणारे आहे. अशा या नाट्यत्रयीतील 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाच्या संहिता लिखाणापूर्वी कानेटकर प्रत्यक्ष रायगडाला जाऊन आले होते. या 'ऐतिहासिक' भेटीची, त्यांच्या एका सुहृदाने लिहून ठेवलेली हकीकत...

**का**ही योग आतर्क्य असतात. नाशिकला आलो आणि योग्य वेळी वसंतराव कानेटकरांची भेट झाली. आपुलकी निर्माण झाली. भिकू पै आंग्ले यांची मैत्री जमली. तेव्हा ते बार्नस स्कूलमध्ये अध्यापक होते. भिकू पै नवीन नाटकाच्या आणि नाटककाराच्याही शोधात होते. कानेटकरांनादेखाल नवा विषय हवा होता. एकत्र बैठक होत तेव्हा 'विषय कोणता?' हाच प्रश्न पुढे येई. भिकू पै यांचं इतिहासावर प्रेम. मुंबई इथे गोवा हिंदूमध्ये अशा नाटकांचे त्यांच्यावर खोलवर संस्कार झालेले. अचानक छत्रपती शिवाजी ही व्यक्तिरेखा चर्चेत आली. भिकू पै म्हणाले, ''वसंतराव, आता तुम्ही छत्रपतींवर नाटक लिहायचं.''

''पण ज्या रायगडावर राहून छत्रपतींनी एवढं स्वराज्य मिळवलं त्याचं साधं दर्शनही मला नाही. बखरी, चरित्र वाचून हा विषय मिटणार नाही.''

शेवटी रायगडाला भेट द्यायची, असं ठरलं.

बहुधा डिसेंबर १९६०हा महिना. मी, पै व वसंत कानेटकर महाडमार्गे रायगडाच्या पायथ्याशी पोचलो. दुपारी गड चढायला सुरुवात केली. उत्साह सर्वांच्या मनी उदंड. गड, घाट, कोट चढण्याची हिंमत होती. पाचाड पायथ्याशी चढताना आधार हवा म्हणून ६ फूट उंचीचे बांबू विकत घेतले. पाचाड येथील जिजामातांच्या वाड्यात समाधीचं दर्शन घेतलं. साखरफुटाणे, अन्य काही, वाटेत तोंडात टाकायला हवं म्हणून घेतलं.

खरं तर वसंतरावांचा पिंड सुखासीनतेचा. व्यवसाय प्राध्यापकाचा. वर्गात शिकवणं वेगळं आणि सह्याद्रीच्या डोंगरकड्यावरुन नेटानं चढणं वेगळं. परंतु शिवरायांचं सिंहासन पाहणं, गंगासागरातील मनोरे पाहणं, छत्रपतींच्या समाधीचं दर्शन घेणं ही गोष्ट वेगळी. तिथं पायाखाली दगडगोटे होते. गडावर लवकर जाऊन पोहोचायची कोण घाई! शेवटी वसंतरावांच्या हातातील काठीचं टोक गोलसर गोट्यावरुन सटकलं. चार-पाच तरी लोळणं त्यांना घ्यावी लागली. कसेबसे ते सावरले. भिकोबा म्हणजे तत्पर स्वयंसेवक. त्यांनी धावत जाऊन वसंतरावांना सावरलं, उठवलं. अंग-हातपाय चाचपून काही मोडलंबिडलं नाही याची खात्री करुन घेतली. म्हणाले, ''वसंतराव, तुम्हाला सिंहासनावर बसायची घाई झाली आहे. जरा दमानं घ्या!'' वसंतराव मूळचे गोरेपान, ह्या अपघातामुळे त्यांचा चेहरा लालबुंद झाला. कसंबसं एका झाडाला रेलून ते बसले. डोईची हॅट काढली. थर्मासमधली पाणी मी त्यांच्या हातावर ओतलं. त्यांनी तोंडाला ते लावलं. पॅण्टच्या खिशातून कुल सिगारेटच्या पाकिटातील एक सिगारेट काढून ओठी धरली. काडी पेटवणं सुधरेना तेव्हा बॉय स्काऊटचा पोशाख केलेल्या पैंनी काडी शिलगावून सिगारेट पेटवली. म्हणाले, ''नाटककार, आता घ्या दमदार झुरके, थोडी विश्रांती घ्या, खूप पल्ला गाठायचा आहे. रायगड बहुत दूर आहे, आटपा.''

मी आंग्ले यांना म्हणालो, ''भिकोबा, काही अरिष्ट ओढवलं नाही, हे आपलं नशीब.''

''अरे हडप, छत्रपती आपल्या मावळ्याला सोडून देतील का? तू म्हणजे अगदी मास्तरच आहेस.''

वसंतराव सावरले. त्याच काठीच्या आणि झाडाच्या आधारानं नेट लावून उठले, हातीची काठी रोवून त्यांनी पहिलं पाऊल टाकलं. सारेजण रायगडाच्या महाद्वाराकडे चालू लागले. अवघड घाट, वरुन पाहिलं की ३०० ते ४०० फूट घळ दिसे, डोळ्यांसमोर झांज येई; पण खरोखरच 'रायगड' हे नाटक पूर्ण व्हावं ही श्रींचीच इच्छा होती!

महाद्वाराशीच सैनिकांना विश्रांती घेण्यासाठी बांधलेले प्रशस्त ओटे आहेत. तिथून आणखी शंभरएक पायऱ्या चढल्यावर प्रत्यक्ष किल्ल्यावर प्रवेश. तोपर्यंत सावल्या थांबल्या होत्या. बहुतेक शिदू नावाचा एक कर्मचारी गडावर येणाऱ्या पांथस्थांची जेवणाखाण्याची, इतर किरकोळ वस्तूंची गरज भागवण्यासाठी नेमलेला होता. त्याला आम्ही येत आहोत हा निरोप पाचाडला भेटलेल्या एका धनगरानं पोचवलेला होता, तो शिदू भेटला. पांथस्थांच्या सोईसाठी बांधलेल्या खोल्यांच्या धर्मशाळेत आमची उतरण्याची सोय झाली. दाट अंधार पडण्याआधी दोन-तीन कंदील

लावले गेले.

गंगासागराच्या काठावरची ती खोली. तिथून गंगासागर तलावातले मनोरे दिसत होते. कवडीचे दही, बाजरीची भाकरी, घट्ट-झुणका-कांदा, असा बेत छान जमला. दिवसभर केलेल्या वाटचालीमुळे दमून गेलेले वसंतराव पडताच छान घोरू लागले. नेमके पोर्णिमेच्या रात्री पोचायचं, गड बघायचा असं ठरलेलंच होतं. तटावर पोर्णिमेचा चंद्र दिसू लागला. भिकू पैला अशा गोष्टीचं अप्रूप. ''चला हडप, थोडी चक्कर मारू. छत्रपतींच्या पायी आपण आलो ते मनमुराद भटकायला.''

गंगासागर तलावात चंद्रबिंब लहरत होतं. दोन्ही मनोरे उजळून गेले होते.

मी आणि भिकू पै परिसरात फिरत होतो. तेवढ्यात पै व आंग्ले यांच्या मनातील शिस्त जागी झाली. ''उठा नाटककार, पोर्णिमेचं चांदणं काय छान पसरलंय गडावर! नाटक लिहायचं आहे ना? उठा रायगड पाहू या.'' पैनी कानेटकरांना चमकावलंच.




हिंडता-हिंडता आम्ही रामसभांगणात महाराजांच्या सिंहासनाच्या चौथऱ्यापाशी आलो. त्यांचा हात हाती घेतला आणि चौथऱ्यावर ठेवत ते मला म्हणाले,

''वसंतराव, 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक पुरं केल्याखेरीज मी अन्य काही लिहिणार नाही असा संकल्प उच्चारा!''

तो मला उच्चारावाच लागला, मी मनानं फारसा भाविक नाही; तरी देखील माझ्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले, याची मला पक्की याद आहे. छत्रपतींच्या हृदयातील शल्य प्रकट करण्यासाठी धजावणं ही केवढी दुर्धर कामगिरी! त्या थोर पुरुषाच्या अंतरंगातील खुणा फक्त रायगडच मला सांगेल. त्याच क्षणी रायगडच्या भूपाळीचा माझ्या मनात जन्म झाला. गडावर स्वैरपणानं भटकत असताना माझं मन मात्र स्वत:शीच गात होतं -

*त्या स्वप्नांवर, त्या शिल्पावर येथे ठिबकल्या अश्रूबिंदूवर*
*दोन बुरुजांचा सक्त पहारा, युगंधरेचा सक्त इशारा*
*आणि उभा तो तृषार्थ व्याकुळ.*
*मिटल्या ओठी गस्त घालती सह्याद्रीच्या रांगा*
*शिवरायांच्या हृदयांतरीचे शल्य मला सांगा!*

या नाटकाचा लेखनकाळ आहे १२-२-१९६१ ते २-११-१९६१. स्वत:च्या थोरल्या पुत्राचं-शंभुराजांचं मन समजलं नाही म्हणून महाराज दु:खी. राजे म्हणतात, ''जिंदगीतले सगळे गुंते सजा देऊन आणि सजा भोगून सुटते तर किती सोपं होतं. सजा देणारे आम्ही कोण? एक वर्षपर्यंत शंभूराजे आम्ही सजा पुरेपूर भोगली, भूक हरपली, तहान हरपली, अहोरात्र तुमच्या काळजीचे चटके सोसले. शिवाजीचा पोर मुगलांनी फितवून पळवून नेला या बेइज्जतीची दुनियेत धिंड निघाली; तीदेखील निमूटपणानं भोगली, दोन वेळा औरंगजेब या कालसर्पाच्या शेपटीवर पाय देऊन त्यांच्या विळख्यातून तुम्ही सहीसलामत सुटलात; पण राजे, पुन्हा कधी गवसलात तर याद ठेवा, तुमची सुटका करण्यासाठी आबासाहेब असणार नाहीत!''

असं कर्तबगार पिता-पुत्रांच्या मनातील दु:ख इतिहासाच्या पोटातून मूर्त रूपानं आपल्यासमोर उभं केलं आहे. इतिहासाचं मानवी रूप घेतलं आहे म्हणून नाटककारांच्या अनुपस्थितीत, 'रायगडाला नेहमीच जाग आलेली असणार आहे.' यापुरतं मोठं श्रेय कलावंताला मिळू शकतं?

**- यशवंत हडप**
**(सौजन्य : माझं साहित्यिक खटलं, ग्रंथाली)**

१९६० नंतर मराठी रंगभूमीला स्थैर्य प्राप्त करुन देणाऱ्या मोजक्या नाटककाकरांमधील अग्रेसर व लोकप्रिय नाव म्हणजे वसंत कानेटकर! सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथे २० मार्च १९२० रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या साहित्यिक पिंडाची जडणघडण मुख्यत: घरातील काव्य-साहित्य चर्चेने भारलेल्या व सदाभिरुचिसंपन्न वातावरणात झाली. याशिवाय वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज यांच्या सहवासाचे संस्कार त्यांच्यावर झाले. अठराव्या वर्षी 'जन्माचे गुलाम' ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. त्यानंतर दहा वर्षांनी 'घर' (१९५०) ही त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली. कथाकार, कादंबरीकार म्हणून मान्यता लाभत असतानाच कानेटकरांनी नाट्यक्षेत्रात पाऊल टाकले व तेथेच स्थिरावले. 'वेड्याचं घर उन्हात' (१९५७) या पहिल्याच नाटकात मनोविश्लेषणाच्या पार्श्वभूमीवर एक नवा प्रयोग कानेटकरांनी केला. 'लेकुरें उदंड जालीं'मध्ये ऑपेराच्या धर्तीवर रचना करुन प्रेक्षकांच्या सहभागाची कल्पना त्यांनी मांडली. 'अश्रूंची झाली फुले', 'मला काही सांगायचंय', 'अखेरचा सवाल', 'सूर्याची पिल्ले' यांसारखी मध्यमवर्गीयांच्या काळजाला हात घालणारी नाटकेही त्यांनी रचली.

# लेखकाने पाहिलेला माणूस

कोकणच्या पार्श्वभूमीवरील 'गारंबीचा बापू' या कादंबरीत जीवनातले कठीण आणि चक्रावून टाकणारे पेच बापू सुटकीसरशी सोडवताना दाखवला आहे. गतिमान व उत्कंठावर्धक, नाट्यपूर्ण कथानक, बापू, राधा, दिनकर, भूतवाडची मावशी, विठोबा ही प्रभावी व्यक्तिचित्रं, चटपटीत संवाद आणि ओघवती रसाळ निवेदनशैली ही कादंबरीची ठळक वैशिष्ट्यं. १९६२ साली आलेल्या त्यांच्या 'रथचक्र' ला साहित्य अकादमी पारितोषिक (१९६४) मिळाले.




*कथालेखनापासून आपल्या वाङ्मयीन कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या श्री.ना.पेंडसे यांची 'जीवनकला' ही पहिली कथा सह्याद्री मासिकात १९३८ साली प्रसिद्ध झाली. १९४१ मध्ये 'खडकावरील हिरवळ' हे त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. मुंबईत १९४६च्या दरम्यान हिंदू-मुसलमानांचे दंगे होऊ लागले त्यावरुन 'एल्गार' (१९४९) या कोकणात राहणाऱ्या रघु आणि कादर या हिंदू आणि मुसलमान असणाऱ्या दोन मित्रांसंबंधीची कादंबरी त्यांनी लिहिली. त्यानंतरच्या हद्दपार, गारंबीचा बापू, हत्या, यशोदा, कलंदर या कादंबऱ्यांनी पेंडशांच्या यशाचा आलेख चढता ठेवला.*

*आपल्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांमध्ये पेंडशांनी कोकणचा प्रदेश व त्यातील माणसे रंगवली. १९६६ मध्ये आलेल्या लव्हाळी आणि ऑक्टोपस (१९७२) ला मुंबईची पार्श्वभूमी आहे. तुंबाडचे खोतमध्ये १८४८ ते १९४८ असा सुमारे एक शतकाचा - एका घराण्याचा इतिहास पेंडशांनी रंगवला आहे. पेंडशांच्या सर्वच कादंबऱ्यांमध्ये धडपणारी, लौकिकदृष्ट्या अपयशी माणसे केंद्रस्थानी दिसतात. मराठी कादंबरीसृष्टीत आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या पेंडशांनी आपल्या काही कादंबऱ्यांची नाट्यरुपांतरेही केली. गारंबीचा बापू, राजेमास्तर, असं झालं आणि उजाडलं, चक्रव्यूह, रथचक्र ही त्यांची नाटके रंगभूमीवर आली. श्री.ना.पेंडसे: लेखक आणि माणूस हे त्यांचे आत्मचरित्रही निवेदनशैलीच्या दृष्टीने लक्षणीय ठरले. अशा या आगळ्या आत्मकथनात श्री.ना.पेंडसे उर्फ शिरुभाऊ यांनी आपल्या लिखाणाचा आपणच, त्रयस्थपणाने घेतलेला शोध- त्यांच्याच शब्दात...*

****

**तुंबाडचे खोत**

महादेव प्रथम पोर्ट ट्रस्टमध्ये कारकून. त्याच वेळी बी.ए. झाला. पिंड स्वप्ने पाहणाऱ्याचा. त्याला भट करुन, महादेवभटजी म्हणून मुरुडला भिक्षुकी करावी, अशी त्याच्याकरिता दोघा भावांनी योजना केली. महादेवने पुरुषसूक्तची संथाही घ्यायला सुरुवात केली होती. पण नाना लटपटी करुन तो मुंबईला आला. मॅट्रिक झाला. पोर्ट ट्रस्टमधून कमी पगारावर रुइया शेटचा वैयक्तिक कार्यवाह झाला. त्याच्या आयुष्याचा हा उष:काल ठरला. काम करताना धंद्यातील अनेक रहस्ये तो शिकला. एका व्यापाऱ्याबरोबर साहाय्यवक शम्हणून इंग्लडला गेला. दोघांना इंग्लंड कशाशी खातात माहीत नाही; पण व्यापाऱ्याला इंग्रजीचा गंध नाही, महादेव त्यात फर्डा. शिवाय दिसेल तो शिकणारा. ह्या अवधीत इंग्रजी, गुजराती, हिंदी फर्डे बोलू लागला. परत येताना काय लटपट केली, पण हर्फर्ड डिझेल इंजिनची सोल एजन्सी घेऊन आला. इकडे त्याला प्रचंड मागणी. फाळणी झालेली. त्यात काही काळ भारत आसाम दळणवळणाला फक्त विमान सर्व्हिस. हाताशी पैसा होताच. बँकेचे कर्ज. महादेवने तीन विमाने घेतली. विमानांना हवे तेवढे काम. धो-धो पैसा. असले महादेवचे नाट्यमय आयुष्य- अगदी त्याच्यावरुन 'बापू' घेतला असे म्हणता येणार नाही. त्याआधीच चाळीस सालात 'बापूकाका सामल' नावाचे व्यक्तिचित्र लिहिले होते. आज ते वाचले तर त्यावरुन 'बापू' सुचला हे सहज कळते. कादंबरीत महादेवच्या आयुष्याचे रंग नंतर आले. असे प्रत्येक कादंबरीचे मूळ सापडते. त्याला अपवाद - 'तुंबाडचे खोत'. ध्यानीमनीही नसलेला विषय; कादंबरीकाराचा 'तिसरा डोळा' सतत कार्यप्रवण असतो. रिफ्लेक्स ॲक्शनसारखी त्याची क्रिया असते.

शिरुभाऊंच्या दापोलीत वाऱ्या हा दरवर्षीचा क्रम. काहीतरी निमित्त काढून ते जात. साठ सालानंतर तर ते एकटे कधीच नसत. सोबत साहित्यिक किंवा अन्य क्षेत्रांतील गाडीवाले मित्र असत. पंचाऐंशीव्या वर्षांनंतर त्यांचा क्रम थांबला.

त्रेपन्न सालातील गोष्ट. खेडमध्ये शिरताना जगबुडी नदीचा छोटा भाग दिसतो. पुढे ती काटकोनात वळते. ह्याच नदीच्या काठी आयनी. तेथे त्यांच्या एका लांबच्या मामाचं घर. 'आयनीला ये' म्हणून ते सारखे बोलवत. ह्या खेपेला जायचे असे त्यांनी ठरवले. लाँच सकाळी सुटते अशी त्यांची माहिती. दापोलीहून निघाले.

खेडहून लाँच आधीच सुटली होती. मग बसने खेड-चिपळूणमध्ये असलेल्या लवेल गावी आले. तेथून चार मैलांवर आयनी.

हे गाव दूर दूर डोंगराळ. तसे गारंबी हे डोंगरी गावच. तुलनेने अधिक सुंदर. सारा पसारा एकूण छोटाच पण माणसाला खिळवून ठेवतो. विशेषत: साकवाकडे जातानाचा अखेरचा टप्पा. तो म्हणजे एक उंच जिनाच जवळजवळ उभा असावा. आरंभालाच काळाकभिन्न उंडीचा उंच वृक्ष. 'यशोदा' नाटकाच्या वेळी तो प्रदेश पाहायला विजया मेहता आल्या होत्या. उंडीच्या आधाराने उभी राहून म्हणाल्या, ''पेंडसे, मी काय पाहत्ये?''

''देवदर्शनाने स्वत:ला धन्य करुन घेत आहात.''

तो जिना म्हणजे रस्ता नव्हता. शेवटपर्यंत रस्ता असाच. तळाला आल्यावर साकव, पाणी नसलेली नदी- ओढा म्हणा. तेथून समोरचा डोंगर. तो चढून गेल्यावर केशवराजचं मंदिर. तेथे गेल्यावर मात्र श्रमांचे सार्थक झाल्यासारखे वाटते. एकदा आम्ही दहाबारा मित्र तेथे गेलो होतो. केशवराजचा सभामंडप विस्तीर्ण आहे. बरोबरच्या सगळ्या बाप्यांची अवखळ मुले झाली. केवराजच्यामागे उंच डोंगर. समोर पाच मैल लांबीची दरी. शेवटी फेसाळणारा समुद्र. ते दृश्य बाप्यांनासुद्धा हुंदडायला लावणारे होते. राजाभाऊ लिमये अहोरात्र वाहणाऱ्या गोमुखीशी स्नान करुन सरळ गाभाऱ्यात गेले आणि पुरुषसूक्त म्हणू लागले. वर्दनलाही स्फूर्ती आली. तोही त्यांना जाऊन मिळाला. दोघांच्या त्या पुरुषसूक्त गानाने सारे वातावरण भरुन गेले.

नंतरचे भोजन खास चित्पावनी बाजाचे. ते भोजन आजही कोणी विसरले नसतील. कोवळ्या फणसाची ती भाजी कोण विसरणार? श्रीकांत लागूने तर कमाल केली. भाताच्या जागी भाजी. भात तोंडी लावायला!

अशा निसर्गाने शिरुभाऊंना 'गारंबीचा बापू' लिहण्याची स्फूर्ती दिली ह्यात नवल नाही.

पण ह्या सौंदर्यातले काहीएक नसताना आयनी गावानेही शिरुभाऊंना वेडे केले. प्रत्येक वस्तू आपल्या जागी देखणी असते. पाहावं तिकडे काजूची लागवड. गारंबी डोंगराळ तर आयनी अधिक डोंगराळ. गावात औषधालासुद्धा सपाटी नाही. एका घरातून दुसऱ्या घरात जायचे तर चढ किंवा उतार. तो पार करायला आधार घ्यावा लागतो. दूर अंतरावरून वेडेवाकडे वळसे घेत जगबुडी दाभोळ खाडीच्या दिशेने धावते. आयनी गावाशी तिच्या प्रवाहाने गावाला जणू गळे-सर घातला आहे. गारंबीशी तुलना करता येणार नाही, तरीही निसर्गाचे हे किती वेगळे रुप, मोहक! इथल्या वास्तव्यातच त्यांच्या तिसऱ्या डोळ्याला उद्याचा संघर्ष दिसला. हासुद्धा खोतीगावच. चोवीस तास जिवंत, मुठीएवढा झरा. कान्हेरे हे खोत. विस्तार खूप, पण सपाटी कमी. चक्क डोंगर तासून सपाट्या केलेल्या होत्या.

निसर्गाचे हे रुप पाहताना शिरुभाऊ स्वत:ला विसरले होते. कादंबरीच्या 'विश्वात' गेले होते. बाप-लेकाचा संघर्ष पाहत होते. मुलगी मुंबईला. तेथील साम्यवादाचे संस्कार घेतलेले. शेतकऱ्यांवर जुलूम करुन बापाने अफाट संपत्ती गोळा केली. त्यातून इंग्रजी शाळा काढा, शेती विका. मुंबईला या- आयनीच्या मुक्कामात त्यांचा तिसरा डोळा उघडला होता. आणखी दोन दिवसांनी मुंबईच्या व्यापात सापडले. आल्यावर फार हळहळले. अनंत कान्हेरेंचा हाच गाव. त्याचे घरही आहे. तेथे त्याचा फोटो आहे. बाकीच्यांनी पाहिला. शिरुभाऊ कोठेतरी भटकत होते. नंतर शिरुभाऊंना फार लागले. पण नवीन कादंबरीची लागण अशीच असते. साऱ्याचा विसर पाडते. तुंबाडते खोत मनात बीजरुपाने आयनी मुक्कामी असे पडले. प्रत्यक्ष लेखन पंचवीस वर्षांनी सुरु होणार होते.

नेहमीचे लेखन चालू होते. विसाव्याच्यावेळी मध्येच 'आयनी' आठवे. साठ साल आले. 'रथचक्र'चे चिंतन. जगबुडीकाठीच त्यांना नायिकेचे घर दिसे. त्याच नदीतून एका पहाटे प्रवास करत होते; पण नदीला त्यांनी नाव दिले नाही, कारण, 'आयनी'ची कादंबरी ह्याच नदीकाठी घडणार होती. नंतर काही नडायला नको म्हणून. पण योग असा होता की, 'रथचक्र'च्या वेळीच त्यांना 'तुंबाड'चा शोध लागणार होता.

**(सौजन्य : माणूस आणि लेखक, पुरचुरे प्रकाशन मंदिर)**









# तुरुंगातील जन्माची कथा



पांडुरंग सदाशिव साने उर्फ सानेगुरुजी

राष्ट्रनिर्माणाची, पर्यायाने समाजनिर्माणाची प्रेरणा घेऊन प्रत्यक्ष राष्ट्रकार्य करीत असताना जीवनाची सर्व शक्ती त्या कार्यात व लेखनकार्यात खर्च करणारा, लेखणीचा उपासक सानेगुरुजी यांच्यासारखा दुसरा लेखक मराठीत नाही.

सानेगुरुजींचा जन्म रत्नागिरीतल्या पालगड या गावी २४ डिसेंबर १८९९ रोजी झाला. त्यांनी आपले सर्व महत्त्वाचे लेखन १९३० ते १९५० याकाळात, ते राष्ट्रकार्यासाठी तुरुंगवासात, समाजकार्यात किंवा विद्यार्थ्यांची सेवा करण्यात मग्न असताना केलेले आहे. वाचकांच्या मनावर नैतिक मूल्यांचा खोल ठसा उमटवण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. त्यांच्या लेखनाने, शिकवणुकीने, भाषणांनी प्रेरीत होऊन अनेकांनी राष्ट्रकार्याला, समाजकार्याला वाहून घेतले.

**म**ला माझ्या वडिलांनी आमच्या गावापासून दहा कोसांवर दापोली म्हणून एक गाव आहे, तेथे इंग्रजी शिकावयास ठेवले. मामांकडून मी दिवे लावून आलो होतो. थोडे दिवस घरी वेद वगैरे शिकत होतो. परंतु वडिलांनी इंग्रजी शिकविण्याचे ठरविले. एक-दोन यत्तांइतके माझे शिक्षण झालेले होते.

दापोली मोठा सुंदर गाव आहे. तेथील हवा फार आरोग्यदायक आहे. तेथून समुद्र चार कोस दूर आहे. दापोलीस खूप मोठमोठी मैदाने आहेत. एका काळी येथे इंग्रजांची पलटण होती; म्हणून दापोलीस कँप दापोली असेही म्हणतात. या कँपनंतर ‘काप’ असा अपभ्रंश झाला व हल्ली कापदापोली असे म्हणतात. तसे पाहिले, तर माझा तालुका इंग्रजांच्या ताब्यात इतर महाराष्ट्रात आधी गेला. नानासाहेब पेशव्यांनी आंग्रे यांचे आरमार इंग्रजांच्या मदतीने बुडविले. फारच मोठी चूक होती ती. आंग्र्यांच्या आरमाराचा इंग्रजांना पायबंद होता. इंग्रजांच्या व इतरांच्या आरमाराचा आंग्र्यांनी अनेकदा अरबी समुद्रात पराभव केला होता. शिवाजीमहाराजांनी मोठ्या प्रयत्नाने आरमार उभारले होते. पूर्वी मराठ्यांचे एक होडकूही अरबी समुद्रात फिरकत नव्हते; परंतु या महापुरुषाने आरमाराचे महत्त्व ओळखले होते. ज्याचा दर्या त्याचे वैभव. हे सूत्र त्यांच्या राजनीतीत सांगितलेले आहे. परंतु नानासाहेबाने इंग्रजांच्या मार्गातील ही अडचण आपणहून दूर केली. इंग्रजांनी आंग्र्यांचे आरमार नाहीसे करण्यात जी मदत केली, त्याचा मोबदला म्हणून जो मुलूख मिळाला, त्यात बाणकोट वगैरे दापोली तालुक्यातील बंदरकाठी गावे होती; परंतु ह्याच तालुक्यातील वेळास गावचे मनसुबीची तलवार गाजविणारे नाना फडणवीस, ह्याच तालुक्यात स्वातंत्र्यासाठी आमरण झगडणारे, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच, असे सांगणारे ‘केसरी’चे संपादक, गीतारहस्याचे कर्ते लोकमान्य टिळक यांचा गाव. त्याचप्रमाणे सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड उभारणारे, तीन मुली घेऊन हिंगण्यास आश्रम काढणारे, महिला विद्यापीठाचे संस्थापक कर्मवीर कर्वे हे याच तालुक्यातील. स्वाभिमानी विश्वनाथ नारायण मंडलीक व गणितविशारद रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे ह्याच तालुक्यातील.

दापोलीच्या आजूबाजूला जंगलही खूप आहे. सुरूचे दाट जंगल आहे. त्यातून वारा वाहू लागला म्हणजे समुद्राच्या गर्जनेसारखा आवाज कानावर पडतो. काजूची झाडेही पुष्कळ आहेत; उन्हाळ्यात लाल, पिवळे, शेंदरी असे हे काजू झाडावर हंड्या-झुंबरांसारखे डोलत असतात! दापोलीच्या आजूबाजूची गावे म्हणजे सृष्टिसौंदर्याची माहेरघरे आहेत.

दापोलीच्या इंग्रजी शाळा त्या वेळेस मिशनची होती. दापोलीचे छत्रालय एके वेळी मुंबई इलाख्यात गाजले होते. मिशनची शाळा टेकडीवर होती. आजूबाजूला कलमी आंब्याची झाडे भरपूर होती. फारच रम्य दिसे शाळा. या शाळेत मी जाऊ लागलो. अभ्यास सुरु झाले.

दापोलीहून माझा गाव सहा-साडे सहा कोस होता. पायाने मी एवढे चालून जाईन की नाही, याचा मला आत्मविश्वास नव्हता; परंतु एक दिवस चालत गेलो व आत्मविश्वास आला. त्या वेळेपासून मी दर शनिवार-रविवारी घरी जाऊ लागलो. शनिवारी दुपारी दोन वाजता शाळा सुटली की, मी घरी निघावयाचा व दिवे लागेपर्यंत घरी पोचावयाचा. रविवारचा दिवस घरी आईच्या प्रेममय सहवासात घालवावयाचा व सोमवारी पहाटेस उठून दहा वाजेपर्यंत पुन्हा दापोलीस शाळेत जावयाचा.

प्रेमासाठी जणू मी भुकेलेला होतो. मी घरची प्रेमाची हवा खाण्यासाठी निघालो. लोकमान्य टिळक म्हणत असत, ‘‘मी सिंहगडावर दोन महिने जाऊन राहतो. दोन महिने तेथील शुद्ध व स्वच्छ हवा, स्वातंत्र्याची हवा खाऊन खाली येतो. ती हवा मला वर्षभर पुरते!’’ माझीही जणू तशीच स्थिती होती. दर आठा दिवसांनी घरी जावयाचे व घरची प्रेमाची हवा खाऊन यावयाचे. या हवेवर प्रेमहीन जगात आठ दिवस राहवयाचे व पुन्हा घरी जावयाचे. त्या वयात मी प्रेम घेण्यासाठी भुकेलेला होतो. परंतु आज मला समजते आहे की, प्रेम घेण्यापेक्षाही प्रेम देण्यात

परम आनंद आहे. पण अंकुराला जर तो लहान असता प्रखर उन्हात वाळू दिले नाही, जळू दिले नाही, त्याला पाणी घातले, सुकू दिले नाही, तर तो अंकुर पुढेही छाया देईल. मोठा होऊन हजारोंना प्रेम देईल. ज्यांना वाढत्या वयात, बाळपणी प्रेम मिळाले नाही, ते लोक पुढे जीवनात कठोर होतात. त्यांनाही जगास प्रेम देता येत नाही. मनुष्य घेतो, तेच देतो.

**– पांडुरंग सदाशिव साने**

**(सौजन्य: शामची आई, पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन)**

****

'धडपडणारी मुले' हे नाव त्यांनी ज्या लेखनाला दिले आणि ज्या लेखनाचा समावेश 'कादंबरी' या प्रकाराखाली केला गेला आहे त्या 'कादंबरी'च्या लेखनप्रक्रियेबद्दल स्वत: गुरुजी काय लिहितात ते पाहण्यासारखे आहे. त्यांनी लिहिले आहे, ''माझ्या मनात ज्या शेकडो कल्पना येत असत, ज्या विचारांची गर्दी उसळे, जी स्वप्ने दिसत, ज्या स्मृती येत, जी दृश्ये आठवत, ज्या व्यक्ती उभ्या राहत, त्या सर्वांतून हे पुस्तक निर्माण झाले आहे. माझ्या मनाच्या समाधानासाठी हे सारे मी लिहीत आहे. प्रत्यक्ष सृष्टीत अतृप्त राहिलेल्या शेकडो हृदयांच्या भुका शांत करण्याचा हा एक मार्ग होता. ज्या व्यक्तींना कृतिवीर होता येत नाही ते वाचावीर होतात. माझ्यासारख्या दुबळ्या कृतीच्या माणसाच्या मनात खूप खळबळ असते. मनात मनोहर स्वप्ने असतात, मनात आशा–आकांक्षा, उच्च ध्येये असतात; परंतु त्या सर्वांना कृतीत आणण्याचे धैर्य नसते. मग दौत, लेखणी, कागद घेऊन कल्पनांचे घोडे कागदावर नाचवणे एवढाच पुरुषार्थ वाटतो व तोच मी तुरुंगात करीत बसे...

''एके दिवशी तुरुंगात मी सहज काही लिहू लागलो व त्या सहज लिहिण्याचा सहज विस्तार होत गेला. माझ्या लेखनाची नदी पुढे जात होती. लिहून झाल्यावर, याला नाव काय द्यावे असे मनात आले! पुस्तकात शेकडो ठिकाणी आलेला – 'धडपडणारी मुले' हा शब्द माझ्या डोळ्यांसमोर आला. तेच नाव या भारुडाला द्यावे असे मी ठरविले.''

गुरुजींचे सर्वच लेखन याच स्वरूपाचे, असेच झपाटून मोठ्या वेगाने केलेले होते असे दिसते.

**– वसंत पळशीकर,**

**(सौजन्य : सानेगुरुजी पुनर्मूल्यांकन )**

मराठी साहित्याच्या स्थिती–गतीबद्दल बोलत असताना सानेगुरुजींनी लिहिले आहे –

''गेल्या शंभर–पाऊणशे वर्षातील कोणते मराठी पुस्तक खेड्यापाड्यापर्यंत पोचले आहे? खरे राष्ट्राचे असे एकच पुस्तक जन्मले नाही. महाराष्ट्राचे राष्ट्रीय ग्रंथ कोणते? राष्ट्रातील बहुजनसमाज जे ग्रंथ वाचतो, राष्ट्रातील बहुजनांच्या जीवनाला जे ग्रंथ वळण देतात, राष्ट्रातील बहुजनसमाज ज्या ग्रंथांना पूज्य मानतो ते राष्ट्रीय ग्रंथ होत. ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा, श्रीधराचे व महिपतीचे ग्रंथ हेच महाराष्ट्राचे अजून राष्ट्रीय ग्रंथ आहेत... आजच्या जमान्यातील कोणते पुस्तक खेड्यापाड्यातील जनतेच्या हृदयात शिरले आहे? खेड्यापाड्यातील जनता हाच खरा महाराष्ट्र आहे. दहावीस शहरे म्हणजे महाराष्ट्र नव्हे. लाखो खेड्यांतून कोणत्या पुस्तकाचा प्रवेश झाला आहे? महाराष्ट्राचे आवडते कवी व आवडते कादंबरीकार यांचे कोणते काव्य व कोणती कादंबरी या खऱ्या महाराष्ट्रात गेली आहे? महाराष्ट्राचे आवडते याचा अर्थ चार सुशिक्षितांचे आवडते यापेक्षा अधिक नाही. खरा महाराष्ट्र या कादंबरीकारांनी व कवींनी पाहिलाही नसतो. या खऱ्या कष्टाळू व श्रमी महाराष्ट्राबद्दल यांना आदर नसतो, प्रेम नसते त्यांचे काय? कवी व कादंबरीकार ते काय म्हणून होतील?''

''अर्वाचीन कलावान ज्याप्रमाणे अर्वाचीन धार्मिक भावना देत नाहीत, त्याप्रमाणे सामान्य लोकांच्या सुखदु:खाच्या भावनाही रंगवीत नाहीत... तुमच्या रागिण्या व तुमच्या दौलती – यांचे बहुजनसमाजाला काय होय? तुमचे उच्च काव्यशास्त्र–विनोद, तुमचे सुसंस्कृत वैषयिक सुखविलास – त्यांना त्यातील काही समजत नाही. या कादंबऱ्यातील वातावरण तो ग्रहण करु शकत नाही. सिनेमातील नटांची नावे, चिरुटांची नावे, वस्त्रांची नावे, तेलांची नावे, कोटाच्या आणि केसांच्या कटाचे प्रकार– त्याला काही समजत नाही... हे सारे वातावरण कोठले आहे हे त्याला समजत नाही. दुर्दैव त्याचे! त्याच्यासाठी संस्कृती नाहीच!''

**– नागनाथ कोत्तापल्ले ,**

**(सौजन्य : सानेगुरुजी पुनर्मूल्यांकन, साहित्य अकादमी)**




माझ्यासारख्या दुबळ्या कृतीच्या माणसाच्या मनात खूप खळबळ असते. मनात मनोहर स्वप्ने असतात, मनात आशा–आकांक्षा, उच्च ध्येये असतात; परंतु त्या सर्वांना कृतीत आणण्याचे धैर्य नसते. मग दौत, लेखणी, कागद घेऊन कल्पनांचे घोडे कागदावर नाचवणे एवढाच पुरुषार्थ वाटतो व तोच मी तुरुंगात करीत बसे...



# कुणा एकाची अक्षरगाथा



गो.नी.दांडेकर

कादंबरीकार गो.नी.दांडेकर यांचा जन्म ८ जुलै १११६ रोजी विदर्भातील परतवाडा येथे झाला. पण त्यांचे मूळ गाव कोकणातील दाभोळजवळचे गुडघे. आपल्या गावाला भेट देण्याची त्यांना लागलेली ओढ, ती पूर्ण करणारा प्रवास आणि त्यातून त्यांचा सुरु झालेला लेखनप्रवास त्यांनी 'त्रिपदी' आणि 'कहाणीमागची कहाणी' या पुस्तकांद्वारे रसिकांपुढे ठेवला आहे. सुरुवातीला महात्मा गांधींच्या चळवळीत आणि नंतर गाडगेबाबांच्या सहवासात ते राहिले. वारकरी शिक्षणसंस्थेत राहून त्यांनी संतसाहित्य अभ्यासले. इंदूर संस्थानमधील वास्तव्याच्या काळात शरच्चंद्र चट्टोपाध्यायांचे साहित्य त्यांनी वाचले. त्याचा त्यांच्या लेखनावर मूलगामी परिणाम झाला.

*औंधच्या वास्तव्यात लिहिलेली बिंदूची कथा (१९४७) ही गो.नी.दांडेकरांची पहिली कादंबरी नौखाली हत्याकांडावर आधारित आहे. पण दांडेकरांना प्रसिद्धि मिळाली ती शितू (१९५३) या शोकात्म प्रेमकथेमुळे. कुणा एकाची भ्रमणगाथा आणि पवनाकाठचा धोंडी (१९५७), माचीवरला बुधा आणि पूर्णामायची लेकरं (१९५८) या त्यांच्या कादंबऱ्यातून कोकण, मावळ व विदर्भ या प्रदेशातील निसर्ग, व्यक्तिरेखा आणि त्या त्या प्रदेशातील बोलीभाषा जिवंत झाल्या आहेत. तर जैत रे जैत (१९६५) या कादंबरीत आदिवासींच्या श्रद्धा आणि खडतर जगणं त्यांनी साकारलंय.*

*दुर्गभ्रमण छंद, ऐतिहासिक संशोधन आणि बोलीभाषांचा अभ्यास यांमुळे बया दार उघड, हर हर महादेव, दर्याभवानी, झुंजारमाची आणि हे तो श्रींची इच्छा या त्यांच्या कादंबऱ्या शिवकालीन लोकजीवनाचे दर्शन घडविण्यात यशस्वी ठरल्या.*

*संतसाहित्याचा अभ्यास आणि संतांवरील अतीव श्रद्धेपोटी दांडेकरांनी मोगरा फुलला, दास डोंगरी राहतो आणि तुका आकाशाएवढा या अनुक्रमे ज्ञानेश्वर, रामदास आणि तुकाराम यांच्यावरील कादंबऱ्या लिहिल्या.अतिशय रसाळ, ओघवत्या भाषेमुळे त्या वैशिष्ट्यपूर्ण ठरतात.*

*दांडेकरांच्या कादंबऱ्या आधुनिक जीवनातील समस्या, आर्थिक-सामाजिक प्रश्नांनी घेरलेले वास्तव यांच्यापासून दूर आहेत. तरीही त्यातील निसर्ग आणि जनसमूह जिवंत करण्याचे विलक्षण कौशल्य यामुळे कादंबरीकार म्हणून त्यांचे वाङ्मयेतिहासातील स्थान अटळ आहे. स्मरणगाथा (१९७३) या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त (१९७६) आत्मचरित्रातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची संपन्नता जाणवते.*

*****

**'आपली जमीन'**

पंचावन्न वर्षे होऊन गेली त्या गोष्टीला, पण आठवणी मनात अगदी रुतून बसल्या आहेत.

जेमतेम आठ वर्षांचा असेन, आम्ही वऱ्हाडातल्या परतवाड्याहून आमच्या गावी कोकणात, दाभोळजवळच्या गुडघ्यास निघालो होतो.

गुडघे. वसिष्ठीच्या खाडीवरचे ते लहानसे गाव. कालपरवापर्यंत अत्यंत दुर्लक्षित. मोटारचा रस्ता आता होतो आहे. स्वराज्य मिळाल्यावर इतक्या वर्षांनी. आतापर्यंत गुडघ्याहून मोटार गाठायची, म्हणजे एक तर तब्बल चार मैल चालून दाभोळेस जावे लागे. सुमारे दोन-तीन वर्षांपूर्वीपासून पऱ्ह्यापलिकडे असलेल्या ओणी गावापर्यंत मोटार येऊ लागली होती. सगळा रत्नागिरी जिल्हा विजेने लखलखला, माझ्या त्या लहानशा गावात मात्र वीज आता सात-आठ वर्षांपूर्वी आली. तोपर्यंत कंद्ये ही आमच्या गुडघ्यावर रात्रीची चैन होती. चुडते हे खरे वैभव. रात्रीचे प्रवासी हातात पेटते चुडते घेऊन वावरायचे.

आमच्या त्या डोंगरी गावात बैलगाडी नामक वाहन कुणाच्याच घरी नव्हते. सगळेच डोंगर, बैलगाडीचाही रस्ता नव्हता. यायचे-जायचे प्रतिक्षणे पदेपदे! पेशवाईमध्ये मेणे होते; पण गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षात ज्याच्या घरी मेणा, असा तालेवारही कुणी नव्हता.

बारा-पंधरा दांडेकरांची घरे. बहुधा सगळी एका ओळीत. एक घर वझ्यांचे. सगळी घरे दक्षिणोत्तर पारालगत. काही दांडेकरांची घरे दक्षिणेकडे सड्यावर. एक घर उत्तरेकडे. सड्याशी खाडीकाठावर मच्छीमारांची काही घरे. त्यांच्यासमोर टांगलेली जाळी. घरापाशी गेल्यावर येणारा कोळंबीचा अन् बोंबलाचा वास. पश्चिमेकडे आमचा पऱ्ह्या. त्याच्या पलिकडे पुन: खाडीकाठी मच्छीमारांची घरे अन् त्या घरांच्या पश्चिमेस एक फार सुंदर मूर्ति असलेले विठ्ठल मंदिर. असा तो सगळाच परिसर अतिशय देखणा. कारण त्या मच्छीमारांच्या घरालगत आहे वासिष्ठीची खाडी आणि तिला असलेली एक सुंदर पकटी.

असे ते सुंदर गुडघे मी प्रथम जेव्हा पाहिले, तेव्हा मी केवळ आठ वर्षांचा होतो.

मी पाहिलेल्या कोकणास प्रारंभ होतो, दाभोळच्या नस्तांतून बोट आत शिरत होती, तेव्हापासून. उजवीकडे अंजनवेलचा गोपाळगड दिसत होता. असा हातभर अंतरावर, तो मी या जन्मात पाहिलेला दुसरा किल्ला. पहिला स्थळदुर्ग

पाहिला होता अचलपूरचा. कुणी पाहुणा आला, म्हणजे माझे नाव मला सांगावे लागे. त्यात किल्लेदार, किल्ले गोपाळगड असाही एक अंश होता. माझे मूळ नाव आत्माराम. गोपाळ ही मी केलेली सुधारणा. मला वाटते की, त्या सुधारणेत या गोपाळगडच्या किल्लेदारांचाही काही थोडा भाग असावा. अर्थात् प्रत्यक्ष किल्लेदाराशी माझा कसलाच संबंध नव्हता. असा तो गोपाळगड इतक्या जवळून पाहायला मिळाल्याबरोबर मी केवळ हरखून गेलो. पाहता-पाहता दीपस्तंभ उजवीकडे टाकून बोट दाभोळ धक्क्याशी आली आणि एक वळसा घेऊन थेट धक्क्याला टेकली.

आम्ही सगळी खाली उतरलो. माडांचे ते किनाऱ्यावरील बन पाहून माझ्या मनात आनंद मावेनासा झाला. मला वाटते की, गुडघ्यास पत्र लिहून दादांनी होडी मागवली होती. लगेच आम्ही आमचे सामान घेऊन त्या होडीत बसलो, नावाड्याने शीड उभारले आणि होडी गुडघ्याच्या दिशेने चालू लागली.

तो माझा पहिला जलप्रवास होता.

समुद्र मी पहिल्यांदा पाहत होतो. बोटीतून प्रवासही प्रथम घडत होता. त्या अपार सागरदर्शनानं धास्तावून गेलो होतो. ऐकलं-वाचलं होतं, की समुद्र एवढा असतो, तेवढा असतो. पण हे फारच झालं हां! भरल्या नदीच्या प्रचंड पात्रांत एखादी गवताची काडी हेलपाटत वाहत जावी, तशी, तेवढी क्षुद्र आमची आगबोट त्या अपार समुद्रांत !

मात्र दाभोळ जवळ येऊ लागलं, अन् माडांनी झाकलेला किनारा दिसू लागला, तेव्हा जिवांत जीव आला. म्हटलं, आतां आली आपली ती अतिशय लाडकी जमीन!

**(सौजन्य : त्रिपदी, मृण्मयी प्रकाशन)**

****

मी मुंबईहून औंधास आलो आणि वृत्तपत्रांतील बातम्या एकत्र गुंफून 'बिंदूंची कथा' ही माझी पहिलीच कादंबरी लिहिली. ती पुण्या-मुंबईकडे प्रकाशित झाली असली, तर जप्तच झाली असती. प्रकाशक तिथे औंधला घरीच भेटले. पंडितजींचे चिरंजीव वसंतराव सातवळेकर यांनी आपल्या उषा प्रकाशनातर्फे ती प्रकाशित केली. प्रस्तावना श्री. य.गो.जोशींनी लिहिली होती. अर्थ असा होता की, कुमार वाङ्मयातून मला बाहेर काढून कादंबरी-वाङ्मयाकडे वळवले श्री. शं.नवऱ्यांनी. गांधीवधोत्तर मला औंध सोडावे लागले आणि मी तळेगावी राहायला आलो. त्याकाळांत केवळ लेखणी हे एकमेव जगण्याचे साधन माझे हाती होते. औंधची नोकरी सुटली होती. पंडितजींनी मला पारडास बोलविले होते. पण मीच लेखणीवर जगायचे ठरविले.

मी कादंबरीकार म्हणून ओळखला जाऊ लागलो, तो 'शितू'पासून. 'शितू' ही कादंबरी मी कोकणची पार्श्वभूमी वापरून लिहिली. तिची कथा अशी, की मी माझ्या गुडघे या गावी गेलो होतो. आमच्या अंगणासमोरुन बंदरावर वाट जाते. माझे एक काका, त्यांचा हात लकवा लागल्याने कापत असे. त्यांचे नाव अच्युतकाका. गावातली सगळी जण त्यांच्या थट्टेतील होती. मी अंगणात घडवंचीवर बसलो होतो. तो एक तेल्याची तरुण, बरी दिसणारी मुलगी त्या वाटेने बंदराकडे निघाली. काकांनी थट्टेत तिला काही विचारले, तिने तसेच थट्टेत उत्तर दिले. मी ती गोष्ट विसरुनही गेलो.

पण दुसरे दिवशी सकाळी हाकबोंब झाली की, त्या मुलीने विहिरीत जीव दिला! काकांस पुसता ते म्हणाले, की हिचे एका आमच्या नातलगापैकी एका मुलावर प्रेम होते ! आदल्या दिवशी थट्टा करणारी ती मुलगी, तिने आपले असफल प्रेम अशा रीतीने संपविले !

मी केवळ चकित झालो. माझ्या मनी शितू रुजली. नंतर मी शितूसाठी जे कष्ट केले, ते मी 'सत्यकथे'च्या एका अंकात लिहिले होते. त्यासाठी मी माझ्या गावच्या कुणब्यांच्या, मच्छीमारांच्या घरी हिंडलो, त्यांचे वागणे, बोलणे, चालणे निरखले. त्यांचे वाक्यप्रचार टिपून घेतले. अगदी शिव्यासुद्धा. खलाटी आणि वलाटी कितीदा पार केली. किती केवड्याची बने मी पाहिली. किती खाडीकांठ तुडवले.

असे सगळे करुन मग मी ती कादंबरी लिहिली. प्रकाशक कोण, हा प्रश्न होता. एके दिवशी उठलो आणि 'मौज' कार्यालयात श्री.पु.भागवतांसमोर उभा राहिलो.

श्री.पुं.बरोबर साताठ बैठका झाल्या. एखाद्या विद्यार्थ्याचा निबंध काळजीपूर्वक तपासावा, तशी त्यांनी 'शितू' तपासली होती. कुणी संपादक लेखकाच्या लिखाणावर इतके परिश्रम












करु शकतो, ही गोष्ट मला अगदी नवी होती. त्या साताठ बैठकांमध्ये भागवतांशी चर्चा होऊन जे ठरले, त्याप्रमाणे मी हस्तलिखितात बदल केले. श्री.पु.युक्तिवाद करुन पटवून देत. आग्रह कधीही धरीत नसत. एक गोष्ट मानली पाहिजे, की शेवटचा शब्द माझा होता. जे बदल मला रुचले, तेच मी केले. मात्र हेही मानले पाहिजे, की ज्या रूपात 'शितू' प्रसिद्ध झाली, त्या रूपामध्ये श्री.पुं.चा वाटा लक्षात घेण्याजोगाआहे. नंतर ती धारावाहिक रूपाने 'सत्यकथे'तून प्रसिद्ध झाली, आणि मीही प्रसिद्धिच्या झोतात आलो.




'शितू'च्या पाठोपाठ 'पडघवली', ही मी माझ्याच गावच्या रचनेच्या कथेवर लिहिलेली दुसरी कादंबरी. ती लिहित असता मला माझ्या आईचे खूप साहाय्य झाले. माझी आई गोष्टी मोठ्या रंगवून सांगे. मी अक्षरश: तिची भाषा वापरली. माझी निराळी वाट मीच शोधून काढली. आता या वयात, इतक्या कादंबऱ्या लिहिल्यावर माझे मत असे झाले आहे, की लेखकाने स्वत:ची वाट स्वत: शोधून काढली पाहिजे. कुणाचे अनुकरण त्याने करता उपयोगाचे नाही. इथवर, की प्रत्येक मूल जसे आपले रंगरूप घेऊन जन्मते, त्याप्रमाणे कादंबरीतील तिची वाट निराळी असली पाहिजे. लेखकाने आपल्याच पद्धतीचेही अनुकरण करता उपयोगाचे नाही.

हा अनुभव मला 'भ्रमणगाथा' लिहितानाही आला.

**(सौजन्य : कहाणीमागची कहाणी, मृण्मयी प्रकाशन)**

****




**कुणा एकाची भ्रमणगाथा**

चित्तशुद्धीसाठी प्रवासात निघालेल्या यात्रिक, मृत्युच्या पलीकडील स्थितीची जिज्ञासा असणारा, अरण्यांतील एका मृत्यूचा साक्षी, नर्मदेच्या रूपदर्शनाने मुग्ध होणारा, व्याघ्रदर्शन झालेला, बिबट्यापासून वासराचे संरक्षण करायची जबाबदारी येऊन पडलेला, अश्या नाना मिषांनी मी कुणा एकाच्या रुपांत ते रंग भरले आहेत. हे सगळे अनुभव गाठीस होते, त्यासाठी कल्पनेचे साहाय्य घ्यावे लागले नाही.

यशोदाप्रकरण मात्र तितके सोपे नव्हते. यात कुणी एक शारीरिक आणि मानसिक-दोन्ही दृष्टींनी अडकला होता. खरे बोलायचे, तरमीच मजकडून ते गुंतणे गुंतलो होतो. दुसरा पक्ष अधिक सावध, अधिक दक्ष होता. कुणा एकाचे भाग्य, की निर्मोहीपणे तो तिला तिथेच-सोसण्यासाठी सोडून आपल्या शेवट न दिसणाऱ्या मार्गाने चालता झाला. यशोदेकडे सहानुभूति वळेल, ते आवश्यकही आहे.पण उघड्या आकाशाखाली अज्ञात वाटेने निघालेल्या कुणा एकालाही काही कमी साहावे लागले नाही.

ही उत्कट कथा मी 'कुणा एकाची भ्रमणगाथा' लिहून शब्दबद्ध केली आहे.

****

**पूर्णामायची लेकरं**

वऱ्हाडांत परतवाड्यास माझा जन्म झाला. लहानपणी रांगलो, मळलो, खेळलो, रडलो, झोपी गगलो, तो वऱ्हाडमातीत. त्यामुळे मजवर बाळपणीचे जबर संस्कार जर कुठल्या मातीचे असतील तर ते वऱ्हाडी मातीचे. तिचे ऋण फेडावे, म्हणून मी 'पूर्णामायची लेकरं' लिहिली. वऱ्हाडी भाषेतलं ती पहिली संपूर्ण कादंबरी.

महाराष्ट्राच्या डोंगरी भागात राहणाऱ्या जनास वऱ्हाडी जीवनाची कल्पना सहज यायची नाही. तो सगळा प्रदेश प्राय: सपाट आहे. सातपुडा आणि अमरावतीजवळच्या टेकड्या वगळता अवघी जमीन समतल. पूर्णा, वर्धा, पैनगंगा इत्यादी नद्यांनी वऱ्हाडी जमीन खूप सुपीक केली आहे. सुंदर काळी शेते, इमारत बांधायची म्हटले, तर दहा-वीस फूट खणल्याविना पायासाठी मुरूम किंवा खडक लागायचाच नाही. पावसाळ्यात जमीन भिजली, की नुसते काळे लोणी !

वऱ्हाड हा सश्रद्धांचा देश आहे. कधी कधी या श्रद्धेचे डोळे बांधून अगदी गच्च केले जातात. त्या स्वस्थ देशी साधुसन्तांची उणीव नाही. नात्यागोत्यांची जाळी तर सर्वत्र गुंफलेली. श्रीकृष्ण त्यांचा जावई. कारण रुक्मिणी त्यांची लेक. शिवाजीराजांचा त्यांचा लाहेना बाबू! कारण जिजाऊ त्यांच्या शिंदखेड राजाची !

अश्या या सहनशील, ऐसपैस देशांचे शब्दचित्र काढायचे ध्यानी धरताच भराभरा पात्रे उभी राहिली. आलोकाबुढी, रूपराव, अन् त्याचे तालीमबाज मास्तर कसबे गव्हाणला सापडले. पांडेबुवा तर वऱ्हाडात कुठल्याही गावी भेटतील.

# लोकवाङ्मय गृह

## नवी पुस्तके

### आगाजा

विनोद कुमरे



आधुनिकीकरणातून येणाऱ्या नागरीकरणात आणि जागतिकीकरणाच्या झंझावातात आपली पाळेमुळे कशी टिकवून ठेवायची, आपल्या अस्तित्वाचे विघटन कसे थांबवायचे हा आदिवासी कवितेसमोरचा तापदायक पेच आहे. अशा मूलभूत प्रश्नांना सामोरे जाण्याचा प्रयत्न विनोद कुमरे यांनी या कवितासंग्रहात केला आहे. 'आरंभ मालिके'तील तिसरा कवितासंग्रह.

पाने : ९६
किंमत : ₹१२०

### मॅगझिनीतून सुटतेय गोळी

बालिका ज्ञानदेव



व्यवस्था आणि व्यवस्थेबाहेरील वेदनांचा हिशेब बालिका ज्ञानदेव यांनी आपल्या या कवितासंग्रहात मांडला आहे. त्यांची कविता या वेदनांना धारदार हत्याराचं स्वरूप देऊन रणमैदानावर उतरते आहे. माणसांनी बनवलेल्या वेगवेगळ्या व्यवस्थांतून जन्माला आलेली विषमता ही तिचे टार्गेट आहे. 'आऊटरवर' नव्हे तर 'बुल'मध्येच शिरतेय त्यांच्या मॅगझिनीतून सुटलेली गोळी.

**– उत्तम कांबळे**

पाने : १२०
किंमत : ₹ १२०

### मार्खेजची गोष्ट

सुनील तांबे



अद्‌भुतता, कल्पनाशक्ती यांची वास्तवाशी सांगड घालण्याचं मार्खेजचं तंत्र उलगडण्यासाठी त्याचं जीवन, त्याच्या परिसराचं सामाजिक-राजकीय वास्तव यांचा शोध घ्यावा लागतो. मार्खेजच्या जादूई वास्तववादाचं तंत्र आणि मंत्र उलगडलं तर मराठी कथात्म साहित्यातील घाट आणि कला यांचं आकलन अधिक समृद्ध होईल.

**- सुनील तांबे**

पाने : १०४
किंमत : ₹ १२०

### वाचताना पाहताना जगताना

नंदा खरे



एकारलेल्या शहाणपणापेक्षा जगण्याच्या विविध अंगांना स्पर्श करत त्यातले परस्परसंबंध तपासणारे नंदा खरे यांचे 'कुतूहलमिश्रित भान' मला महत्त्वाचे वाटत आले आहे. आपल्या विशिष्ट अभ्यासविषयाच्या पलीकडे जाऊन तो विषय समग्र जगण्याच्या पार्श्वभूमीवर पाहता येणे ही मला त्यांच्या बाबतीतली महत्त्वाची गोष्ट वाटते.

**- सतीश काळसेकर**

पाने : १४८
किंमत : ₹ २००

BookGanga.com — येथेही उपलब्ध — newshunt.com

पिपल्स बुक हाऊस : १५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ✆ : ०२२-२२८७ ३७६८.
लोकवाङ्मय गृह : भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. ✆ : ०२२-२४३६ २४७४.
फॅक्स : २४३१ ३२२०. E-mail : lokvangmayagriha@gmail.com
लोकवाङ्मय गृह प्रा. लि. : ५६२, सदाशिव पेठ, पुणे -४११ ०३० ✆ : ०२०-२४४७ ८२६३

Website : www.lokvangmaygriha.com

# भाग्यवान कवी



कृष्णाजी केशव दामले
ऊर्फ केशवसुत

'कविता म्हणजे आकाशीची वीज आहे. ती धरू पाहणारे शेकडा आपणास होरपळून मात्र घेतात. मी अशा ११ जणांपैकीच आहे' अशी केशवसुतांची भूमिका होती. ही आकाशीची वीज पृथ्वीवर आणण्याचं विलक्षण सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत होतं. याचा प्रत्यय त्यांच्या स्फूर्ती, तुतारी, हरपले श्रेय, झपूर्झा, सतारीचे बोल, आम्ही कोण इत्यादी कवितांमधून येतो. अशा या महान कवीचे स्मारक त्याच्या जन्मगावी उभे राहिले, हे केशवसुतांचे आणि त्यांच्या कवितेवर प्रेम करणाऱ्या मराठी रसिकांचेही भाग्यच होय!

केशवसुत हे नाव उच्चारताच प्राणपणाने तुतारी फुंकत असलेला, नव्या युगाचा शूर शिपाई-योद्धा अशी प्रतिमा आपल्या डोळ्यांपुढे चटकन येते; तसेच 'आम्ही कोण? म्हणूनी काय पुसता?' असा खडा सवाल टाकणारा देदीप्यमान देवपुत्र नजरेसमोर येतो. किंवा भृंगगानात जिवाचा झपूर्झा होऊन हरवून गेलेला कविजीव दिसू लागतो. पण केशवसुतांची ही मानसप्रतिमा त्यांचे अपूर्ण रूप दर्शविणारी आहे. केशवसुतांची समग्र कविता स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या उदासरम्य प्रेमाची कथा आपणांपुढे उभी करीत असल्याचे सतत जाणवत राहते. स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या जुळत चाललेल्या आणि तुटत राहिलेल्या भावबंधाची ती करुण, शोकगर्भ कहाणी आहे. केशवसुत या कहाणीची सुरुवात आपल्या एका 'मिथ'ने करतात.

कोणे एके काळी, म्हणजे मनुष्य जन्मालाही आला नव्हता तेव्हा, स्वर्ग पृथ्वीपासून फार दूर नव्हता. आपल्या प्रसन्न दृष्टीने तो तिला सदैव सुखवीत होता. पृथ्वीचेही त्याच्यावर मन जडले होते. तिने आपल्या अंगच्या मळीपासून मानव निर्माण केला; इच्छा ही की, त्याने गाणे गाऊन स्वर्गाला आळवावे, त्याला मोहून टाकावे आणि मोठ्या खुषीने स्वर्गाने स्वत: खाली येऊन आपल्याजवळ प्रेमाने कायमचे रहावे! पण या दुष्ट मानवाने पृथ्वीमातेस लाथाडून, स्वत:च स्वर्गावर चढाई करण्याचे ठरविले. मानवाची ही कृतघ्नता पाहून स्वर्ग कोपला आणि आवेगात दूरवर आकाशी जाऊन बसला. तेव्हापासून ही पृथ्वी त्याच्यासाठी झुरत आहे. मानवाची ही चुकी, हा अपराध ध्यानी घेऊन, केशवसुतांचे कविमन मोठ्या पश्चात्तापाने स्वर्ग आणि पृथ्वी यांची क्षमायाचना करीत आहे.

**– व.दि.कुलकर्णी**

**(सौजन्य : पर्यालोचन : संपूर्ण केशवसुत, पॉप्युलर प्रकाशन)**

****

कविता करण्याची प्रेरणा केशवसुतांना नारायण वामन टिळक यांच्यापासून मिळाली असे समजले जाते. या कविमित्रांचा सहवास केशवसुतांना हवा होता. परंतु नागपुरातील उष्ण हवा न सोसल्यामुळे केशवसुत पुण्याला आले आणि मोरोपंत अमरावतीला गेले. पुण्यात केशवसुत आनंदाश्रमाजवळच्या खाजगीवाले यांच्या वाड्यात राहत असत. आज नूतन मराठी विद्यालयाची इमारत ज्या जागेवर आहे त्या जागेवरच खाजगीवाले यांचा वाडा होता. 'गोष्टी घराकडील मी वदतां गड्या रे' या कवितेत शेवटच्या श्लोकाच्या शेवटच्या चरणात या खाजगीवाल्यांच्या घराचा उल्लेख केशवसुतांनी केला आहे. पुण्यात आल्यांनतर ११ जून १८८४ या दिवशी न्यू इंग्लिश स्कूल या शाळेत केशवसुतांनी चौथ्या इयत्तेत प्रवेश घेतला. त्यांचे अक्षर सुवाच्य होते, वळणदारही होते. त्यांचे ड्रॉइंगही चांगले होते. या शाळेत अभ्यासाकडे दुर्लक्ष करुनही केव्हा केव्हा ते वहीत आपल्या गुरुंची चित्रे काढीत असत. टिळक, आगरकर यांची चित्रे ओळख पटण्याजोगी निघत असे सांगतात. चित्रकलेची ही आवड पुढे प्रौढ वयातही टिकून राहिली होती, असे त्यांचे धारवाड येथील शाळेतील एक समकालीन ड्रॉइंग टीचर ग.वि.मणेरीकर यांनी सांगितलेल्या आठवणीवरुन दिसते. मणेरीकरांनी म्हटले आहे, ''बसल्या बसल्या पातळ कागदावर ते पेन्सिलीने कोणाला तरी पाहून हुबेहूब चेहरा काढीत असत.''

शाळेत शिकत असताना केशवसुत कविताही करु लागले होते. श्रीधरपंतांकडे केशवसुत शिकण्यासाठी गेले होते तेव्हा त्यांचे कवित्व श्रीधरपंतांच्या नजरेसमोर आले असावे कारण, ''यापेक्षा आमचा कुशा कितीतरी उत्तम कविता लिहितो.'' असे ते म्हणत, असे सांगितले जाते. केशवसुतांपूर्वी दामले यांच्या घराण्यात कोणी कविता केल्याचे दिसत नाही. प्रतिभेची ही देणगी त्यांना मातुल घराण्याकडून मिळाली असावी असे दिसते. त्यांचे मामा कविता करीत असत अशी आठवण विनायक श्रीधर करंदीकर यांनी दिली आहे. मात्र १८८५ पूर्वीच्या काळातल्या कविता केशवसुतांनी नष्ट केल्या असाव्यात, कारण आज उपलब्ध असलेली त्यांची पहिली कविता नोव्हेंबर १८८५मध्ये त्यांनी लिहिली असे त्या कवितेखालच्या कालनिर्देशावरुन दिसते. 'खिडकीकडे मौज पहावयास' या नावाचीती कविता आहे. त्या वेळी ते इंग्रजी पाचवीत होते. परंतु चित्रकला

आणि काव्यलेखन यांच्या नादाने ते शालेय अभ्यासात मागे पडले. प.चिं.दामले यासंबंधी लिहितात की, ''वडिलांच्या करड्या नजरेमुळे लहानपणी त्यांचा (केशवसुतांचा) अभ्यास उत्तम झाला. पण पुढे वडिलांपासून दूर गेल्यामुळे त्यांचा काही विषयांचा अभ्यास फार खोल तर काही विषयांचा कच्चा राही.''

याचा परिणाम असा झाला की, १८८७मध्ये केशवसुत मॅट्रिकच्या परीक्षेत नापास झाले. इंग्रजी आणि गणित या विषयांमध्ये पास होण्यासाठी आवश्यक असणारे मार्क त्यांना मिळाले नाहीत. या काळात 'किरातार्जुनीय' या संस्कृत महाकाव्याच्या पहिल्या सर्गातील सव्वीस श्लोकांचे भाषांतर त्यांनी केले आहे. 'एक खेडे', 'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे' या दोन कविता केल्या आहेत. त्यांची त्यावेळची मन:स्थिती या दोन कवितांमधून ठळकपणे व्यक्त झाली आहे. 'एका भारतीयाचे उद्गार', 'गावी गेलेल्या मिताची खोली लागलेली पाहून' या दोन कविताही आपल्या राष्ट्राची अवनत अवस्था वर्णन करणाऱ्या आहेत. यावरुन असे वाटते की, परीक्षेसाठी नेमलेली पुस्तके त्यांना कदाचित कंटाळवाणी वाटत असावीत म्हणून त्यांच्या अभ्यासाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले असावे; काव्यरचनेत ते रमले असावेत.

याच वर्षी मोरोपंत वऱ्हाडमधील शाळेतून मॅट्रिकच्या परीक्षेला बसले होते. संस्कृतच्या पेपरात विशेष नैपुण्य दाखवून वऱ्हाडमधील विद्यार्थ्यांमध्ये ते पहिले आले आणि पुण्यात डेक्कन कॉलेजमध्ये शिकू लागले. प.चिं.दामले यांना मोरोपंतांकडून कळलेल्या माहितीप्रमाणे ''इंग्रजी कवींचा केशवसुतांनी फारच बारीक अभ्यास केला होता. शेक्सपियर व बायरन यांच्या काव्यनाट्यातील कठीण मर्मस्थाने मोरोपंतांनी केशवसुतांकडून समजावून घेतली होती. इंग्रजीप्रमाणे संस्कृत काव्यही केशवसुतांनी चांगले अभ्यासले होते.'' मोरोपंतांची ही साक्ष केशवसुतांच्या इंग्रजी कवितेच्या व्यासंगावर प्रकाश पाडणारी आहे. संस्कृत काव्याच्या अभ्यासाचा पुरावा त्यांच्या उचित शब्दयोजनेत सापडतो. स्वबळावर केलेली ही साधना केशवसुतांना जन्मभर पुरली.

**(सौजन्य : केशवसुत चरित्र, संपादक– शकुंतला क्षीरसागर, संपूर्ण केशवसुत)**

****

**केशवसुत स्मारक**

सरकारी पुढाकाराने १९६६ साली केशवसुतांच्या जन्मशताब्दीचा सोहळा झाला. केशवसुतांच्या जन्मग्रामी 'मालगुंड' येथे झालेल्या समारंभात तेथील ग्रामस्थांनी केशवसुतांच्या कीर्तीला साजेसे स्मारक या ठिकाणी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. पण केशवसुतांच्या जन्मशताब्दीच्या या समारंभानंतर पंचवीस वर्षे उलटल्यानंतरही केशवसुतांच्या स्मारकाच्या दृष्टीने काही घडले नव्हते.

१९९० साली रत्नागिरी येथे चौसष्टावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. अध्यक्षस्थानी मधु मंगेश कर्णिक यांची निवड झाली होती. त्यांनी संमेलनाच्या समारोपाच्या आपल्या भाषणात केशवसुत स्मारकाची कल्पना मांडली, स्मारकासाठी आर्थिक साहाय्य करण्याचे आवाहन त्या सभेतील श्रोत्यांना केले.

मालगुंड एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी काही अटींवर केशवसुतांचे जन्मघर आणि त्यालगतची एक एकर जमीन कोकण मराठी साहित्य परिषदेला विनामूल्य दिली. महाराष्ट्र राज्याचे त्या वेळचे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी तत्काळ पाच लाख रुपयांचा धनादेश मधु मंगेश कर्णिक यांना दिला. महाराष्ट्र सरकारप्रमाणे मुंबई महानगरपालिका, कोकणातील नगरपरिषदा, नागोठण्याची इंडियन पेट्रोकेमिकल्स, मुंबईचा महालक्ष्मी ट्रस्ट, खासगी देणगीदार आणि खुद्द केशवसुतांचे वंशज यांनी स्मारकाचा बहुतेक आर्थिक भार उचललेला आहे. १९९२-१९९५ या काळात मधु मंगेश कर्णिक यांनी यासाठी २०-२२ लाख रुपये जमवले. त्यांनी आराखड्याप्रमाणे काम पूर्ण करुन घेतले आणि ८ मे १९९४ रोजी या स्मारकाचे कविवर्य कुसुमाग्रज यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात येऊन ते महाराष्ट्राला अर्पण करण्यात आले. अर्वाचीन मराठी कवितेच्या जनकाचे हे सुंदर चिरस्मरणीय स्मारक गणपतीपुळे या निसर्गरम्य देवस्थानापासून दोन कि.मी. अंतरावर आहे.

**(सौजन्य : केशवसुत स्मारक, संपूर्ण केशवसुत, पॉप्युलर प्रकाशन)**

****











# देवगडचा फणस



विंदा करंदीकर

*बालकवितांपासून अनेक काव्यप्रकार लीलया हाताळणारे शब्दप्रभू अन् मराठीला 'ज्ञानपीठ'चा बहुमान मिळवून देणारे ज्येष्ठ साहित्यिक म्हणजे विंदा करंदीकर. साहित्यातील दैदिप्यमान कारकिर्दीसाठी जनस्थान पुरस्कार, कबीर पुरस्कार, सिनियर फुलब्राइट बहुमान या पुरस्कारांनीही त्यांना गौरवण्यात आले. अशा या महाकवीच्या तीन प्रतिमा-*

जन्म देवगड तालुक्यात, शिक्षण कोल्हापुरात, अध्यापन कर्नाटकात, कोकणात, खान्देशात आणि कवी म्हणून मान्यता मिळाल्यानंतर कर्मभूमी मुंबई. ज्ञानपीठ विजेते विंदा करंदीकर यांना महाकवी म्हणतात ते कवितेसारख्याच महान व्यक्तिमत्त्वामुळे. फणसासारखा भासणारा पण देवगडच्या हापूसपेक्षा गोड असा हा कवी. त्याच्या अष्टदर्शने या काव्यातून त्याच्यातील तत्त्वचिंतकाचे दर्शनही घडते. पण सहचारिणीने बोललेला नवस फेडण्यासाठी लेण्याद्रीपुढे नतमसयतक होणारा हा नास्तिक माणूसही तेवढाच लोभस आहे.

****

**घरचा अहेर**

आमच्या लग्नाला चाळीस वर्षं झाली. इतक्या दीर्घ प्रवासानंतर आता, खरं म्हणजे, नवऱ्याबद्दल काही लिहिणं फारच कठीण. आमचं लग्न झालं तेच मुळी ह्यांच्या तत्त्वनिष्ठेमुळे. म्हणजे त्याचं असं की, ह्यांची पहिली बायको गेली होती आणि त्यांना विधवाविवाहच करावयाचा होता. मी विधवा असल्यामुळे त्यांनी माझ्याशी लग्न केलं आमचं लग्न झालं; तेव्हा हे त्याच वर्षी एम.ए. होऊन बागलकोटच्या बसवेश्वर कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणूनअ णि मी बी.टी.होऊन जुन्नरच्या हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून रुजू झाले होते. मी आणि माझी मैत्रीण, आम्ही दोघींनीही जुन्नरच्या शाळेत नोकरी धरली होती आणि जुन्नरला बिऱ्हाड केलं होतं. तिचे यजमान युद्धावर कमिशंड ऑफिसर म्हणून गेले होते. त्या वर्षी ते जपानमध्ये होते. ह्या माझ्या मैत्रिणीचे माहितीचे हे करंदीकर होते.

१९४७च्या जानेवारीत रजिस्टर लग्न केल्यावर मी रजा घेऊन पाच-सहा दिवस बागलकोटला ह्यांच्याबरोबर त्यांच्या हॉस्टेलवर गेले होते. लग्नाची पहिली भेट म्हणून द.के.केळकरांचं 'संस्कृतिसंगम' हे पुस्तक मला ह्यांच्याकडून मिळालं. मला खूप आनंद झाला. पण परत आल्यावर माझ्या माहेरच्यांनी 'काय ग काय साडी, एखादी अंगठी नाही दिली; ही काय भेट!' म्हणून टिंगल केली. माझ्या सासुबाई माझ्या लग्नाच्या आधीच, दहा वर्षांपूर्वी वारल्या होत्या. मामंजी कोकणात पोंभुर्ल्याला एकटेच राहत असत. तेव्हा वडिलांच्या जवळ म्हणून, जून १९४७ पासून रत्नागिरीच्या कॉलेजमध्ये हे दाखल झाले. मी मालतीबाई जोशी ह्यांच्या महिला विद्यालयात नोकरीला लागले आणि, खऱ्या अर्थाने आमचा संसार सुरु झाला.

बसवेश्वर कॉलेज संपल्यावर हे, मार्चमध्ये माझ्या शाळेला सुट्टी पडेपर्यंत, जुन्नरला माझ्या मैत्रिणीच्या बिऱ्हाडी राहिले होते. काही न कळवता ते अचानक जुन्नरला आमच्या बिऱ्हाडी आले. मी शाळेत होते, शाळेत निरोप आला. मी घरी परतले. आमचा दोघींचा उठवळ संसार. आम्ही काही लोणी, तूप घेत नव्हतो. ह्यांनी आल्या आल्या, ''हे काय घरात तून नको?'' करुन मला फैलावर घेतलं आणि लोणी खरेदी करण्यासाठी बाहेर पडले. एकूण पिशवी घेऊन घराबाहेर पडणं अतिप्रिय. ह्यांच्या संतापी आणि चक्कर स्वभावाची झलक दिसली. मी मनातल्या मनात धास्तावलेच होते. ह्या माणसाशी कसं जमणार? ही अंधारातली उडी, घरच्या कोणाचा विचार न घेता घेतलेली. मी मनात जुन्नरच्या लेण्याद्रीला नवस बोलले, ''माझा हा संसार सुखाचा झाला तर तुझ्या दर्शनाला जोडीने येईन.'' लेण्याद्रीनं माझं गाऱ्हाणं ऐकलं असावं. कारण, लग्नानंतर तीस वर्षांनी माझा धाकटा मुलगा उदय बी.ई.फर्स्टक्लास झाला. त्याआधी मोठी मुलगी जया व मोठा मुलगा आनंद ह्यांचं उत्तम शिक्षण होऊन, लग्नकार्य होऊन ती स्थिर झाली होती. तेव्हा सर्वार्थानं संसार सफल झाला. आमचे तिरशिंगराव पण माझ्याबरोबर लेण्याद्रीला यायला तयार झाले. खरोखरीच लेण्याद्रीची कृपा.

**- सुमा करंदीकर**

**(सौजन्य : 'विंदा' गौरवांक, ग्रंथाली)**

****

**घरातले करंदीकर**

माणसांच्या संसाराच्या कोलाहलातच भाऊंचे लिखाण झाले आहे. संसारअ ाणि बदल्या, आईभाऊंच्या नोकऱ्या ही कोष्टके जमवीत त्यांनी

कितीतरी बिऱ्हाडे बदलली आहेत. भाऊ साहित्य-सहवासाअगोदरच्या निवासस्थानांना 'बिऱ्हाडे' म्हणतात आणि याला 'घर' म्हणतात. त्याचे कारण ते असे देतात की, या आताच्या घरातून दुसऱ्या घरात बदलून जाण्याची शक्यता नाही. या घरात ते स्थिरावले आहेत, रत्नागिरी, कागल, डोंबिवली, बेडेकर सदन या बिऱ्हाडांत राहत असताना भाऊंबरोबर एक घर सातत्याने होते, ते म्हणजे त्यांचे कोकणातले घर. 'घरातील इतरांना माहीत नसते, पण कोकणातील घर माझ्याबरोबर असते,' असे भाऊंना वाटते. भाऊंच्या कवितांमधील आणि निबंधातील विश्वात हे कोकणचे घर 'घर करुन' आहे.

त्या दृष्टीने 'विरुपिका' मधील 'भाकडकाका' ही कविता उल्लेखनीय वाटते. त्या कवितेत भाऊंची मानसिकता खंतखेदाच्या पलीकडची होत चाललेली दिसते आहे. त्यांना त्यांच्याही कविता बिलकूल आठवत नाहीत आणि त्याची मजा येत आहे. तशीच मजा आकाशातील धुराची वाटते आहे. आणि पायताणाचा कोणता खिळा वर आला हे कळल्यावरही मजा वाटत आहे. त्यात एक निरपेक्षता येत चालली आहे. गटाराच्या पाण्याच्या वळणाबाबतची माहिती सांगताना वांद्र्याला येऊन नऊ वर्षे झाल्याचा संदर्भ येतो. परंतु हान्नेरी-हुन्नेरीचे तोरण आठवते आहे. चाळीस वर्षांत ब्रह्मदेवाची घाटी चढलेली नाही, पण भाब्या गुरव आड्यातला बुरंबळा खणून द्यायचा ते आठवते आहे. कोकणातले घर चिवटपणाने तगून आहे.




भाऊंच्या भावविश्वाला जशी कोकणातल्या घराची साथ आहे तशीच लिखाणाला प्रत्यक्ष आधार म्हणून वरपांगी ओबडधोबड दिसणाऱ्या टेबलाची साथ आहे. भाऊंना लिखाणासाठी निराळी खोली कधीच नव्हती. सध्या आहे हेच टेबल डोंबिवली, बेडेकरसदन वगैरे ठिकाणी राहून साहित्य सहवासात पोचले आहे. या टेबलालाही एक हकीकत आहे. जुन्या बाजारात पंचवीस रुपयांना घेतलेले टेबल भाऊंनी स्वत:च्या डोक्यावरुन व्ही.टी.पर्यंत नेले होते आणि तेथून डोंबिवलीला आणले होते. 'आकाशाचा अर्थ'मध्ये टेबल आणि भाऊंमधील अनाकलनीय नात्याबाबत त्यांनी लिहिले आहे, 'दुसऱ्यांना हे टेबल बेडौल दिसत असेल, पण त्याच्या या मुक्या आधारानेच मी माझा तोल पुष्कळ वेळ सावरला आहे.' 'हे टेबल आता पाच हजार रुपयांनाही मिळणार नाही! फळी एकसंध, भक्कम, सागवानी आहे!'असे ते ठणकावून सांगतात. भाऊंचे लिखाण आणि लिखाणाचे टेबल हे घराचेच अविभाज्य भाग आहेत. त्यासाठी स्वतंत्र कप्पा कधी नव्हता आणि कप्पा झाल्यावर भाऊंनी लिखाण केले आहे.

**– नीलम गोऱ्हे**

**(सौजन्य : 'विंदा' गौरवांक, ग्रंथाली)**

****

**आकाशाचा अर्थ**

केशवसुतांच्या काळात सामाजिक जातीव्यवस्थेची दरी खूप खोलवर होती आणि भारतीय पारतंत्र्याच्या शेवटच्या चरणात आर्थिक विषमता शिगेला पोचली होती. मूठभर श्रीमंत आणि बाकी भोवती पसरलेले दारिद्र्य यांचा खेळ विलक्षण होता. तो उद्रेक विंदांनी १९४०च्या अगोदर पहिल्यांदा 'करवीर'ला व्यक्त केला. त्या कवितेचे नाव होते 'मुंबई'- या उंच हवेल्या!कां रस्त्यावर पडता?/ही धान्यागारे! का तळतळुनी मारता?/ ही शीघ्र वाहने! रखडता कां मग पायी?/ या प्रचंड गिरण्या! वस्त्र तुम्हां कां नाही?/ छे, नगर नव्हे हे, हिंदूभूमीच्या शरिरी/ वाटते जहाली जखम, भयंकर जहरी/शेटजी कोठले? त्यात किडे लवलवती,/ जे शरीर शोषुनि रक्तावरती जगती/ जर सूख हिच्यातिल सर्वांसाठी असते,/ ही जखम न असती भूषण मजला गमते...

'दशपदी'चा बाज असलेली विंदांच्या सुरुवातीच्या कवितांतली ही 'मुंबई' कविता विंदांच्या साम्यवादी विचारसरणीतून निश्चितच अवतरलेली आहे. पण कुठल्याही 'बावट्या'चा रंग स्वत:च्या माथ्यावर न धरणारी मानवी, व्याकुळ मनाची स्पंदने वाटतात. मूठभर श्रीमंती आणि जागोजाग पसरलेली आर्थिक, वैचारिक आणि ज्ञानात्मक गरिबी याचा विंदांनी अगदी

गोविंद विनायक करंदीकर यांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी देवगड तालुक्यातल्या धालवल या गावी एका शेतकरी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण काल्र्याच्या सरकारी शाळेत झाले. माध्यमिक महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आले. १९३१ साली ते बी.ए.झाले. पुढे इंडियन हायस्कूल (मनमाड), ओरिएण्टल हायस्कूल (गिरगाव), तासगांव हायस्कूल (तासगाव) इथे त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. १९४६ साली एम.ए. झाल्यावर बागलकोटच्या बसवेश्वर कॉलेजात प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. पण पोंभुर्ल्याला वडील एकटेच राहत होते म्हणून रत्नागिरीच्या कॉलेजात ते रुजू झाले. त्यानंतर कागल तिथून बेळगावच्या राणी पार्वतीदेवी कॉलेजात. त्यानंतर ते मुंबईला आले. करंदीकर हे इंग्रजीचे प्राध्यापक होते. जवळपास ३१ वर्षे त्यांनी शिक्षकी पेशात आपले प्रतिभावान आयुष्य अक्षरश: वेचले.




आपले काव्य लेखन ते 'विंदा करंदीकर' या टोपणनावाने करीत. 'स्वेदगंगा' (१९४९) हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. प्रयोगशीलता हे विंदांच्या काव्याचे ठळक वैशिष्ट्य आहे. चिंतनशील पिंडामुळे विश्वरहस्याचा शोध हेही त्यांच्या काव्यातील एक केंद्रवर्ती सूत्र बनले. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस- देणाऱ्याचे हात घ्यावे किंवा 'तीर्थाटन मी करीत पोचलो, नकळत शेवट तुज दारी, अन् तुझिया देहात गवसली, सखये मज तीर्थे सारी' या त्यांच्या कविता विलक्षण परिणाम साधून जातात.



सुरुवातीला जो सामाजिक छेद घेतला आहे, तो केवळ अपूर्व वाटतो.

१७ सप्टेंबर १९४० रोजी तासगाव मुक्कामी विंदांनी जी 'लाव्हा' नावाची कविता, अगदी छोटी कविता लिहिली, त्यातून करंदीकरांच्या मनातला सामाजिक जाणिवांचा उकळता लाल रस जणू बाहेर पडला आहे, जणू त्यांच्या कवितेतून त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या खाणाखुणाच नमूद केल्या आहेत. ह्या कवितेच्या निमित्ताने विंदांनी कवीचे सर्वात छोटे आत्मचरित्र किती प्रभावीपणे व्यक्त होऊ शकेल याचे वाङ्मयीन जगातले एकमेव उदाहरण जणू पेश केले आहे : ओततो हृदयिं जे लपुनि बसे/ जन वदतिल याला खचित पिसे.../ जड जगताच्या जुलुमाखाली/ मानवता जरि दडपुनि गेली/ ज्वालामुखी ही जागृत झाली/ हा लाव्हा त्यातुनी उसळतसे... ही समर्थ कवीची काव्यजाणीव जणू कवीचे चरित्र सांगून जाते आणि शेवटी करंदीकरांनी आपल्या समग्र साहित्यातून तसेच जणू दर्शन दिले. ज्वालामुखी कधी जागृत होईल, हे सांगता येत नाही, पण एकदा का तो जागृत झाला की, जो लाव्हारस प्रचंड ताकदीने बाहेर पडतो, तो थोपवता येत नाही. विंदांच्या समग्र साहित्याला हे काव्य अक्षरश: लागू आहे. कारण हा ज्वालामुखी १९८१पर्यंत प्रखरपणे वारंवार जागृत होत होता. १९८१ साली विंदांनीच कवितेचा हा ज्वालामुखी स्वत:हून बंद केला.

करंदीकरांच्या अपुऱ्या प्रीतीच्या कविता हे मराठी कवितेला मिळालेले एक भरजरी लेणे आहे, असे वाटते. त्यांची 'थोडी सुखी, थोडी दु:खी' नावाची एक कविता आहे. त्यातली प्रेमाची जात किती उत्कट आहे हे पाहण्यासारखे आहे. फारा दिवसांनी आली/ओळखीचा टांगेवाला.../ ओळखीचा वाटला तो कोण,/ कोठचा ही भ्रांत! हसला तो ओळखीने/ आणि चढली ती आत.../ नाही वळवली त्याने/ पुन्हा दृष्टी तिच्याकडे/ भरधाव सुटे घोडा/ आणि चाबूक कडाडे.../ ओळखीचे आले वाडे आली,/ आली, गेली शाळा/ ''अगबाई! तोच हा का?''/ तिला चंदू आठवला.../ आठवले सारें सारें/ आठवले त्याचे डोळे/ आणि तिच्या काळजात/ काही थरारुन गेले.../ फारा दिवसांनी आली मागारीण माहेराला/गल्लीतल्या घरापुढे त्याने टांगा थांबविला.../ नाही वळवली त्याने/ पुन्हा तिच्याकडे दृष्टी/ माहेराला भेटली ती/ थोडी सुखी, थोडी कष्टी... ही कविता प्रेमाची इतकी तरल छटा व्यक्त करते की, तो जुना काळ डोळ्यांपुढे उभा राहतो. प्रेम ही गोष्ट किती अस्पष्ट आणि अव्यक्त पातळीवर रेंगाळू शकते याची ही कविता हा एक उत्कट नमुना आहे.

अशी कविता लिहिणाऱ्या विंदांच्या काव्याची सुरुवात कोल्हापुरात एका काळ्या वहीने झाली. ती खिशात मावेल एवढी छोटी होती. तेव्हा करंदीकर पाचवीत होते. त्या काळ्या वहीत करंदीकरांनी आपली पहिली कविता लिहिली: स्फूर्तिदाता/जगत्कर्ता/ विघ्नहर्ता/गजानन... त्या पाठोपाठ आणखी एक कविता लिहिली/ गरीब बिचारा शेतकरी/ करी शिळी चत्कोर भाकरी/ घेउनि मेरेवरी बैसला/ अश्रू ढाळीत.. पण ह्या कविता विंदांच्या आठवणीतल्या आहेत. पण २ सप्टेंबर १९३६ रोली वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी 'प्रतिभेस' ही कविता लिहिली, ती करवीर मुक्कामी. जादूची अधरी पुंगी/ धरूनी प्रतिभे! का ग उभी... या कवितेचा शेवट करताना करंदीकरांनी ज्या दोन ओळी लिहिल्या त्या मात्र त्यांचे जे स्वप्न होते ते पुरे झालेले मराठी काव्याने अनुभवले. ये! वाजव प्रतिभे पुंगी,/ आणव जगताला गुंगी... त्या शेवटच्या ओळीत विंदा म्हणतात की, माझी प्रतिभेची पुंगी जगताला गुंगी आणेल आणि विंदांच्या समग्र कवितेने काव्यजगताला गुंगी आणली हे मात्र खरे.

'स्वेदगंगे'पासून विंदांची काव्यगंगा वाहू लागली. ती शेवटच्या, १९८१ मध्ये प्रकाशित झालेल्या 'विरूपिका' ह्या संग्रहापर्यंत. तिने विविध वळणे घेतली. त्यातील या गंगेला मिळालेली यमुना नदी म्हणजे विंदांची बालकविता. यमुनेच्या तटावर श्रीकृष्णाचे बालपण रंगले. तसेच, मराठी बालकवितेत विंदांची बालकविता ही श्रीकृष्णाच्या खोडकर वृत्तीसारखी विलक्षण रंगली. त्याचप्रमाणे त्यांनी सूक्ते लिहिली, गझला लिहिल्या, विरूपिका लिहिल्या आणि विशेष म्हणजे प्रत्येक ठिकाणी विंदा विशेषत्वाने गाजले.

**– वामन देशपांडे**

**(सौजन्य : 'विंदा' गौरवांक, ग्रंथाली)**

# मुंबई कामगार मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित

(बहुराज्य ग्राहक सहकारी संस्था)

# अपना बाज़ार™ को-ऑप

१०६-ए, गोविंदजी केणी रोड, नायगांव, दादर (पूर्व), मुंबई नं.४०० ०१४

दुरध्वनी :- २४१९५२००, फॅक्स : २४१३३६८०/२४१५७४९७

## दर्जा, गुणवत्ता आणि विश्वासार्हता म्हणजेच अपना बाजार

### आमची ठळक वैशिष्ट्ये

- ❑ ६६ वर्षांची अभिमानास्पद ग्राहक सेवा
- ❑ भारतातील एकमेव बहुराज्य ग्राहक सहकारी संस्था
- ❑ एकूण विक्री दालने २९
- ❑ वार्षिक उलाढाल रु.१३७ कोटी
- ❑ ३०लाख निष्ठावंत ग्राहक
- ❑ तीन वेळा जमनालाल बजाज उचित व्यवहार पुरस्कार (१९८९,२००१,२०१३)
- ❑ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट फोरनतर्फे ग्लोबल अचिव्हर्स पुरस्कार फॉर बिझनेस लिडरशिप (२०१२)
- ❑ नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनिअन ऑफ इंडिया तर्फे ॲवार्ड ऑफ एक्सीलन्स (२०१३)

### आरोग्यसेवा :

- ❑ दादा सरफरे आरोग्य केंद्र व क्लिनीकल लॅबोरेटरी, नायगांव.

### सामाजिक उपक्रम :

- ❑ खरेदी बचत योजनांना प्रोत्साहन
- ❑ ग्राहक जागरुकतेसाठी विविध कार्यक्रम

### अपना बाजार सर्वांसाठी :

१) खरेदीवर वेळोवेळी विविध सवलती
२) दर्जेदार वस्तू खात्रीपुर्वक मिळण्याचे ठिकाण
३) वेळ आणि पैसा यांची बचत
४) सणासुदीसाठी खास सवलत
५) मोफत घरपोच सेवा
६) भेट देण्याकरिता अपना गिफ्ट व्हावचर
७) मंगल कार्याकरिता अपना बाजार नायगांव एअर कंडिशन बँक्वेट हॉल
८) सोडॅक्सो पास, तिकीट रेस्टॉरंट कुपन्स आणि बँक कार्ड्स मार्फत खरेदी

**आपले सहकारी**

| अनिल गंगर | श्रीपाद फाटक | ज्ञानदेव दळवी, संतोष सरफरे<br>नंदिनी गावडे, राजेंद्र आंग्रे | एस्.टी.काजळे |
|---|---|---|---|
| **कार्याध्यक्ष** | **उपकार्याध्यक्ष** | **एक्झिक्युटिव कमिटी सदस्य** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |

**संचालक :-** भारती शिरसाट, शिवाजी गावंड, विश्वनाथ मलुष्टे, अश्विन उपाध्याय, अंजना सावंत, नरेंद्र कदम, रमाकांत साळुंखे, बाळा राऊळ, निलेश वैद्य, नरेंद्र भुर्के, उमेश फाटक, मनिषा डुबळे, नितिन अणेराव, जगदीश नलावडे

# मग्न तळ्याकाठी



सुनीता देशपांडे

माझ्या एवढ्याशा
ललाटी या नियतीने
काय लिहिले आहे?
आणि माझ्या
धामापूरच्या तलावाच्या
विशाल भालप्रदेशावर
तिने काय कोरुन ठेवले
आहे?
प्रत्येक सुखाला,
दु:खाला संदर्भ
असतात. या
धामापूरच्या तलावालाही
माझ्या जीवनात,
स्मृतीत संदर्भ आहेत.
प्रत्यक्षात मी त्या
तलावाच्या पोटात गेले
तर मृत्यूनंतर तरंगत
वर येणाऱ्या माझ्या
ऐहिक मेंदूबरोबर ते
संदर्भ नाहीसे होतील
की त्या जलाशयाच्या
गर्भाशयात
पुनर्जन्मासाठी,
पुर्ननिर्मितीसाठी,
डुगडुगत राहतील?
तिथे त्यांना पोसणारी
नाळ कोणती?

**धा**मापूर हे मालवणपासून बारा मैलांवर आहे. मालवणहून नेरुरपाराला नदीपाशी येणारा रस्ता धामापूरवरून जातो. गावाच्या तोंडापाशीच छोटीशी टेकडी आहे. टेकडीवर भगवतीचे खूप जुने देऊळ आणि पलीकडे प्रचंड तलाव. भगवती ही आमची कुलस्वामिनी. खरे तर हे एवढेसे तर गाव. आमच्या घरापासून ते देऊळ मैल-दीड मैलावरच असेल. पण घरातल्या बायकांना इतक्या दूर जायला नको म्हणून घराशेजारीच आमचे खाजगी देऊळ आहे. त्यात लक्ष्मी-नारायणाच्या मूर्ती आहेत. या देव-देवतांची परस्परांशी असलेली नाती मला माहीत नाहीत. लहानपणी इतरांप्रमाणे देवाला भक्तिभावाने नमस्कार तेवढा घडे. त्या वेळी कुलस्वामिनी भगवतीचे लक्ष्मी-नारायणाशी नाते काय हा प्रश्न पडलाच नाही. कदाचित ते कुणा माहेरवाष्णीचे कुलदैवत असेल.

आमचे धामापूरचे घर म्हणजे प्रचंड चौसेपी वाडा होता. मधल्या चौकात सुंदर गोल बांधलेली, खोल, काळ्याशार पाण्याची विहीर होती आणि आंघोळीला आणि कपडे धुवायला चार-पाच पाथरी आणि डोणी होत्या. विहिरीत छान मोठे मासे पोहताना दिसत, पण पाणी काढताना ते कधी घागरीत येत नसत. या विहिरीचा दगडी कठडा चांगला रुंद होता. त्यावर आजी तऱ्हेतऱ्हेच्या फुलझाडांच्या कुंड्या ठेवी. इतकी सुंदर दुसरी विहीर अगदी चित्रातदेखील मी पाहिलेली नाही. त्या विहिरीत कुणी पडल्याचे, जीव दिल्याच, असले काहीही घडलेले नव्हते. ती आमची अगदी खाजगी, घरगुती होती. घरातीलच कुणी चारित्र्यशील बाई असल्यासारखी. त्या वाड्याच्या जोडीने जन्माला आलेली, तिथे घडलेल्या सगळ्या अकल्पितांना साक्षी असलेली; निर्मळपणा, गारवा, ओलावा यांनी रसरसलेली. आता त्या वाड्यात आजीच्या सोबतीने राहणारी. त्या वेळी मला वाटते, रोज रात्री मी झोपल्यावर आजी आणि ती नक्कीच गप्पा मारत बसत असतील.

आमचा धामापूरचा तलाव त्या परिसरात नावाजलेला होता. असे सांगतात की, गावात कुणाकडे काही कार्य असलं आणि परिस्थितीमुळे दागिने पुरेसे नसले तर हवे असलेले सर्व दागिने त्या त्या आकाराचे, फुलांचे करायचे आणि एका परडीत घालून ती परडी तळ्यात उतरणाऱ्या एखाद्या पायरीवर ठेवून द्यायची. दुसऱ्या दिवशी ती खऱ्या दागिन्यांनी भरलेली असायची. मग ते दागिने वापरून झाल्यावर, कार्य संपले की पुन्हा त्याच परडीत घालून त्या पायरीवर नेऊन ठेवायचे. पुढे म्हणे कधीतरी कुण्या करंट्याने ती परडी परत केलीच नाही आणि तेव्हापासून तलावाने गावाला दागिने द्यायचे थांबवले. पण असा हा उदार बापाजी.

गावाच्या पोटातून जाणाऱ्या एकमेव रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाण्याचे पाट बारमास वाहत. ते त्या तलावापासून थेट नदीपर्यंत रस्त्याच्या जोडीने भालदार-चोपदारांसारखे किंवा दोन बाजूला दोन राण्या घेऊन राजाची स्वारी निघावी तसे, त्याला सतत सोबत करत. त्यांना आम्ही हरणी म्हणत असू. या दोन्ही हरण्या पोरांना डुंबायला, पोहायला मिळत. त्यातून अनेकदा मासेही येत. जिथे वावर कमी असे तिथे या हरण्यांच्या काठाला पांढरा आणि पिवळा सोनटक्का आणि इतरही सुगंधी फुलझाडे असत. मग जवळपास डुंबताना घमघमाट असे.

मी एकटी मात्र हरणीवर कधी जात नसे. सुट्टीत इतर मुलांबरोबर पोहायला वगैरे मी हरणीवर जाई. पण एकटी असताना आजीची आणि घरच्या विहीरीची सोबतच बरी वाटे.

आमचा हा चौसेपी वाडा दुमजली होता. वरच्या मजल्यावरच्या एका खोलीत तीन-चार मोठ्ठाली शिसवी कपाटं पुस्तकांनी भरलेली होती. या कपाटांना कुलुपं नव्हती. मी एक-दोन पुस्तकं बाहेर काढून उलटसुलट करुनही पाहिल्याचं आठवतंय. काळी भक्कम कव्हरं आणि पानांच्या सोनेरी कडा. ती कोणत्या भाषेतली किंवा कोणत्या विषयांवरची होती ते जाणून घेण्याचं ते वयंही नव्हतं. ही पुस्तकं कुणी, कुठून आणि कशासाठी आणली असतील? ती त्यांनी वाचली का? इतक्या दूरच्या कोपऱ्यातल्या खेड्यात राहणाऱ्या त्यांच्या जीवनावर त्या पुस्तकांचा काही

परिणाम झाला होता का? हे किंवा असे दुसरे प्रश्न कुणाला पडले नसावेतच. कोण जाणे. आज त्या पुस्तकांबरोबरच त्यांचा हा सगळा संदर्भही  काळाच्या पोटात गडप होऊन गेला आहे.

एकूणच त्या प्रचंड वाड्यात खोल्या कमीच होत्या. वरच्या मजल्यावर तर दोनच खोल्या होत्या. ही पुस्तकांची, आणि दुसरी एक, नेहमी बंद असलेली. बाकी खूप लांबरुंद मोठ्ठाले दिवाणखानेच होते.  वरच्या पुस्तकांच्याक पाटांच्या खोलीसारख्याच खालच्या खोल्यांपैकी दोनच खोल्या मला चांगल्या आठवतात. त्यातली एक लहानशीच पण अगदी कुरुप खोली होती. संपूर्ण मोकळी. वारा, उजेड, सगळे तिथे असेल, पण त्यांचे अस्तित्व जाणवू नये असेच काहीचे तिचे दर्शन असे. महिन्या-दोन महिन्यांनी कधीतरी आजीचं डोकं करायला न्हावी येई त्या वेळीच थोडा वेळ ही खोली वापरली जाई. मला ती खोली कधीच आवडली नाही. आत जावेसे वाटले नाही. जणू आपली तिच्याशी ओळखच नाही अशीच माझी धारणा होती.

दुसरी लक्षात राहिलेली खोली ही एकेकाळची बाळंतिणीची खोली असावी. आप्पांचा जन्म याच खोलीत झाला की त्यांच्या आजोळी कुंभवाड्याला झाला ते मला माहीत नाही. पण त्यानंतर माझ्या समजुतीप्रमाणे त्या घरात मूल जन्माला आलेच नसावे. बाहेरुन कुलूप असलेली, ही त्या प्रचंड वाड्यातली एकमेव खोली. त्या खोलीत सोन्याचांदीच्या वस्तू आणि इतर काही महत्त्वाच्या गोष्टी असाव्यात. ती खोली फारशी वापरात नसेच. याच खोलीच्या दाराच्या बाजूच्या भिंतीवर दर्शनी भागावरच मोठ्ठाले, खूप वेटोळ्या घातलेले नागाचे चित्र होते. खरा 'राखणदार' अधूनमधून दर्शन देई. पण त्याचे प्रतीक असलेल्या या भिंतीवर रंगवलेल्या नागाला रोज गंध-फूल वाहिले जाई. या दोन्ही नागांचे अतूट नाते आहे यावर आजीची, आणि म्हणून माझीही, श्रद्धा होती. या बाबतीतल्या एका योगायोगाचे मला मोठे नवल वाटते. आमचा हा वाडा पडला त्यापूर्वीच्या नागपंचमीला, नव्याने रंगवलेल्या भिंतीवरच्या नागाची यथासांग पूजा झाली आणि त्यानंतरच्या आठवड्यात 'राखणदार' वरचेवर घरात दिसू लागला. जिवंत नागाचे घरातले हे वास्तव्य आजीला धोकादायकच होते, तेव्हा मांत्रिकाला बोलावणे, जवळपासच्या भाऊबंदांनी येऊन विचार करणे वगैरे झाले आणि शेवटी 'तो' म्हातारा झाला असावा. आता आपल्याच्याने 'राखण' झेपणार नाही हे सांगायला आला असावा, असा अर्थ काढला गेला. तरीही त्याला घरात राहू देणे योग्य नव्हतेच, म्हणून त्याला मारायचे ठरले. माझे एक दूरचे काका शिकारी होते. त्यांच्याकडे बंदूक होती. ते आणि इतरही लोक जमून शेवटी त्या नागाला मारण्यात आले. पण योगायोग असा की घरभर इकडून तिकडे पळणाऱ्या त्या नागाला शेवटी गोळी लागली त्या वेळी नेमका तो त्या भिंतीवरील चित्रातल्या नागाच्या वरती छपराजवळ गेला होता. त्यामुळे गोळी लागून उडालेल्या रक्ताचे शिंतोडे भिंतीवरच्या चित्रातल्या नागावरती पडले. पुढच्या नागपंचमीपूर्वीच अण्णांनी वाडा पाडायला घेतल्याने ते डाग शेवटपर्यंत तसेच राहिले. पुसले गेले नाहित. त्या काळात त्या चित्राकडे माझे लक्ष गेले, की कसलीतरी गूढ भीती शरीराला आतून बाहेरुन स्पर्श करुन जातेयसे वाटते. पुढे मग तो वाडा, त्याच्या राखणदाराचे ते रक्त आणि त्याचे प्रतीक असलेले ते चित्र एकदमच जमीनदोस्त झाले.

**– सुनीता देशपांडे**

**(सौजन्य : आहे मनोहर तरी, मौज प्रकाशन)**

****

**यक्षाचं तळं**

माझ्या एवढ्याशा ललाटी या नियतीने काय लिहिले आहे? आणि माझ्या धामापूरच्या तलावाच्या विशाल भालप्रदेशावर तिने काय कोरुन ठेवले आहे?

प्रत्येक सुखाला, दु:खाला संदर्भ असतात. या धामापूरच्या तलावालाही माझ्या जीवनात, स्मृतीत संदर्भ आहेत. प्रत्यक्षात मी त्या तलावाच्या पोटात गेले तर मृत्यूनंतर तरंगत वर येणाऱ्या माझ्या ऐहिक मेंदूबरोबर ते संदर्भ नाहीसे होतील की त्या जलाशयाच्या गर्भाशयात पुनर्जन्मासाठी, पुर्ननिर्मितीसाठी, दुगदुगत राहतील? तिथे त्यांना पोसणारी नाळ कोणती?

असंख्या दु:खितांनी, सासुरवाशिणींनी, 'चोचींतच दुखावलेल्या राजबंशी पाखरांनी' शेवटच्या क्षणी विहिरीचा आसरा घेतला आहे. ज्या पाण्याची त्यांना अखेरीला ओढ लागली,




'आहे मनोहर तरी' हे सुनिताबाईंचे आत्मकथन प्रचंड गाजले. सुनिताबाईंच्या आयुष्यावर सर्वात जास्त प्रभाव होता ती व्यक्ती, जिने त्यांना भरभरुन प्रेम दिले ती धामापूरची आजी. घरच्यांच्या मनाविरुद्ध पु.ल.देशपांडे यांच्याबरोबर केलेल्या लग्नात तीच पाठीशी उभी राहिली. आपल्या आत्मकथनात आजीचे अतुलनीय मानसिक धैर्य, खंबीरपणा, निष्ठा याचे वर्णन करताना सुनीताबाई जिव्हाळ्याने भरुन जातात.

या पुस्तकाशिवाय वसंतराव देशपांडे, कुमार गंधर्व, माधव आचवल, मल्लिकार्जुन मन्सूर इत्यादी सुहृदांची आत्मीयतेने रेखाटलेली व्यक्तिचित्रे समाविष्ट असलेले 'सोयरे सकळ' हे त्यांचे ललित लेखन प्रसिद्ध आहे.




त्याच्या पृष्ठभागापर्यंतचा त्या जीवांचा प्रवास गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने, गतीने झाला, हे मान्य आहे. पण त्या पृष्ठभागाला त्यांचा स्पर्श झाल्या क्षणापासून प्राण जाईपर्यंतच्या क्षणापर्यंत त्या पाण्याच्या पोटात काय काय घडले? सोबत आणलेले ते सगळे दुःख, तो जिवंतपणा, तो लाख मोलाचा प्राण, ती ताटातुटीची हुरहूर, क्वचित त्या हतबल क्षणींचा पश्चात्ताप– सगळे सगळे संचित त्या पाण्याच्या पोटात जपून ठेवायला त्याच्या स्वाधीन केले गेले असणार. अशी किती जणांची, युगानुयुगांची, या तलावाच्या पाण्याला पहिला मानवी स्पर्श झाला तेव्हापासूनची किती संचिते इथे गोळा झाली असणार! ती वाचायला मला प्रत्यक्षच तिथे जायला हवे? एक्स–रे किंवा लेझर–रेसारखा एखादा नवा किरण ती टिपून उजेडात आणू शकणार नाही का? त्या पाण्यातले सनातन दगड, सूर्यकिरण, मासे, इतर जलचर, तिथे वाढणाऱ्या वनस्पती, काठावरच्या झाडांची पाळेमुळे, पाण्याच्या तळाचा भूभाग, यांना कुणाला त्या साऱ्याची पुसटशी तरी कल्पना असेल का? हा धामापूरचा तलाव म्हटला की त्याच्या अंतरंगात शिरुन तिथल्या कविता वाचाव्या अशीच जबरदस्त ओढ मला लागते खरी.

या तलावाच्या तिनही बाजूंना झाडाझुडपांनी भरलेल्या टेकड्या पुरातन काळापासून तशाच आहेत. चवथ्या बाजूच्या टेकडीवर ही भगवती केव्हा वस्तीला आली मला माहीत नाही. पण कोणे एके काळी ज्या कुणी या टेकडीवर हे भगवतीचे देऊळ बांधले, त्यानेच बहुधा त्या टेकडीवरुन तलावाच्या काठापर्यंत नव्हे तर पाण्यातही अगदी आतापर्यंत बऱ्याच पायऱ्याही बांधून काढल्या आहेत. खूप लांबलचक चिरेबंदी पायऱ्या. सुंदर लाल चिऱ्यांच्या. एकेकाळी म्हणे गावातल्या जनसामान्यांपैकी कुणाकडे लग्नकार्य असले आणि दागदागिने कमी पडत असले तर हाच तलाव गरजू गावकऱ्यांना सोन्यारुप्याचे, हिऱ्यामोत्याचे दागिने पुरवत असे. आपल्याला हवे ते दागिने कळ्या–फुलांचे करायचे आणि ती परडी संध्याकाळी तळ्याकाठी पायरीवर नेऊन ठेवायची. दुसऱ्या दिवशी सकाळी खऱ्या दागिन्यांनी भरलेली ती परडी घेऊन जायची आणि कार्यसिद्धिनंतर ते दागिने तलावाला परत करायचे. गावावर अशी माया करणारा, पाखर घालणारा हा तलाव. काम झाल्यावरही दागिने परत न करण्याची दुर्बुद्धि झालेल्या कुण्या गावकऱ्याला ज्या दिवशी धामापुरने सामावून घेतले त्या दिवशी त्या तलावाच्या मनात केवढा हलकल्लोळ उडाला असेल! मायेचे मोल न उमजणाऱ्या लेकरांना तो अजूनही पाणी देतो; पण केवळ कर्तव्यबुद्धीने. आता आपण बरे की आपले काम बरे. जेवढ्यास तेवढे ठीक आहे. अधिक उत्साह नको. इतकी वर्षे गावाच्या सोबतीने राहणारा तो तलाव त्या क्षणी एकटा एकटा झाला तो झालाच.

आणि त्या टेकड्या? भोवतालच्या जीवसृष्टीतले किती जन्म आणि किती मरणे त्यांनी तटस्थतेने पाहिली असतील! इथले हे प्रचंड दगड युगानुयुगे कुणाची वाट पाहत इथ उभे असतील? शांत, थंड, पण शक्तिशाली दगड! या दगडादगडांतही किती जाती, पोटजाती आहेत! वेरुळचा दगड, बेलूरचा, हलेबीडचा दगड, लेण्यांचे भाग्य ज्यांच्या भाळी कोरले गेले ते सगळे दगड. कलावंतांच्या अपयशाने अशा दगडांच्या काळजाच्या ठिकऱ्या उडतात; पण यशाने मात्र त्यांची छाती फुगत नाही. उलट एक सात्त्विक, नम्र भावच त्यांच्या रोमारोमांतून प्रगट होतो. हा प्रभाव त्या कलेचा असेल का? पण असले कोणतेही विधिलिखित ज्यांच्या नशिबी नाही अशा या टेकड्या माझ्या त्या धामापूरच्या तलावाला संरक्षण देत, सोबत करत, किती युगे इथे उभ्याच आहेत. त्यांच्या या तपस्येला फळ आले, ते इथे भगवतीचे देऊळ बांधले गेले तेव्हा. तेव्हापासून ही दैवी बाहुली या टेकडीने आपल्या डोक्यावर मिरवली. मग कितीतरी रंगीबेरंगी, सुवासिक फुलझाडेही माळायला सुरुवात केली. तिच्या अंगाखांद्यावरचा राबता वाढला. नित्य पूजा आणि नैमित्तिक उत्सव सुरु झाले. पण या सगळ्या वरवरच्या गोष्टी. अनंत काळाच्या हिशेबात तेरड्याच्या रंगासारख्या. एरवी या चार टेकड्या आणि त्यांच्या कुशीतला हा माझा तलाव, हेच खरे.

**– सुनीता देशपांडे**

**(सौजन्य : सोयरे सकळ, मौज प्रकाशन)**

दगडादगडांतही किती जाती, पोटजाती आहेत! वेरुळचा दगड, बेलूरचा, हलेबीडचा दगड, लेण्यांचे भाग्य ज्यांच्या भाळी कोरले गेले ते सगळे दगड. कलावंतांच्या अपयशाने अशा दगडांच्या काळजाच्या ठिकऱ्या उडतात; पण यशाने मात्र त्यांची छाती फुगत नाही. उलट एक सात्त्विक, नम्र भावच त्यांच्या रोमारोमांतून प्रगट होतो. हा प्रभाव त्या कलेचा असेल का? पण असले कोणतेही विधिलिखित ज्यांच्या नशिबी नाही अशा या टेकड्या माझ्या त्या धामापूरच्या तलावाला संरक्षण देत, सोबत करत, किती युगे इथे उभ्याच आहेत.

## ॥ग्रंथाली॥ पुस्तक प्रकाशन समारंभ




'एका शिक्षिकेची शिदोरी'
या पुस्तक प्रकाशनसमयी
लेखिका सुधा देसाई मनोगत व्यक्त करताना,
सोबत प्रिन्सिपॉल व्ही.एन. शानभाग
डॉ. अरविंद सरदेसाई, प्रेसिडेंट
लेखक, विद्यार्थी किशोर शहा
नॅशनल अ‍ॅवॉर्ड विजेता ओंकार
(नववी इयत्ता, किशोरचा मुलगा)
अच्युत शेणॉय, जनरल सेक्रेटरी



'गुरुदत्त'
या पुस्तक प्रकाशनसमयी
संतोष पाठारे
पुस्तकाचे संपादन सुधीर नांदगावकर
लक्ष्मीकांत देशमुख
श्याम बेनेगल
शरद काळे आणि
सुदेश हिंगलासपूरकर

## ग्रंथाली-४० निमित्त महाविद्यालयांत 'मराठी'जागृती
### चला ऐकुया.... चला वाचूया!




चंद्रशेखर सानेकर
प्राचार्य वैदेही दप्तरदार
आदर्श महाविद्यालय, बदलापूर
आणि अस्मिता पांडे




विद्यार्थ्याला पुस्तकभेट देताना
चंद्रशेखर सानेकर, अस्मिता पांडे,
प्राचार्य डॉ. यू.बी. जंगम,
गोवेली महाविद्यालय, टिटवाळा



कार्यक्रमाला लाभलेला
विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद

सहकार्य : श्रीधर पाटील

# ... तुझे नक्षत्रांचे देणे




चिं.त्र्यं.खानोलकर

चिंतामण त्र्यंबक खानोलकर यांच्या कवितेकडे रसिकांचे लक्ष वेधले ते सत्यकथेच्या १९५४च्या फेब्रुवारी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'शून्य श्रृंगारते' या कवितेमुळे. ही कविता 'आरती प्रभु' या टोपणनावाने प्रसिद्ध झाली. 'नक्षत्रांचे देणे' या त्यांच्या कवितासंग्रहास साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. चरितार्थ चालवण्यासाठी त्यांनी काही काळ आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावर स्टाफ आर्टिस्ट म्हणून काम केले. १९६१ मध्ये ती नोकरी सुटल्यानंतर ते पुन्हा लेखनाकडे वळले. १९६६ साली त्यांचे 'एक शून्य बाजीराव' हे नाटक रंगभूमीवर आले.

**स्व**त:च्या दिव्य प्रतिभाबळाबद्दल आणि नियतीने आपल्यासाठी ठीक योजून ठेवलेल्या अलौकिक अवतार कृत्याबद्दल एकदम नि:शंक असलेल्या खोनालकराला कालप्रवाहाच्या काठावर बसलेला अगदी कालपरवापर्यंत मी स्पष्टपणे पाहिला होता. आज तो तिथं नाही. उंच वृक्षाच्या काळवंडलेल्या सावल्या डोहात अक्राळविक्राळ पसरलेल्या दिसाव्यात. तशा चिंतू खानोलकराच्या त्या भुरकट स्मृती आता अस्ताव्यस्त पसरट घाट धारण करु लागल्या आहेत. खानोलकर म्हणजे एक रेशमी गुंताच वाटतो.

त्यातल्या धाग्यांची ही काही सुटी टोकं.

एक खानोलकरप्रेमी वाचक कुडाळात चक्कर टाकून आले. खानोलकरांची वाङ्मयात प्रतिष्ठा पावू घातलेली ती बाळबोध खानावळ होती तरी कुठं, म्हणून त्यांनी कुडाळात चाचपून पाहिलं. नंबर बोऱ्या वाजलेली ती खानावळ कुडाळात कुणालाच आठवेना! वाचक हात हलवीत परत आले. त्यांनी झाला प्रकार कविमहाशयांना कथन केला. त्यावर खानोलकरानं उत्तर दिलं,

'तुम्ही कुडाळात चिं.त्र्यं.खानोलकरांची खानावळ कुठली, म्हणून चौकशी केलीत हेच चुकलं. त्याएवेजी, 'चिंतू खानावळ्या' कुठं राहायचा म्हणून विचारलं असतंत, तर कुठल्याही गावकऱ्यानं आमची ती मांगरातली गावठी जागा तुम्हांला दाखवली असती.'

तर महानगराच्या वस्तीत गुर्मीत गुरफटलेले कविवर्य आरती प्रभु खुद्द गावाकडे 'चिंतू खानावळ्या' म्हणूनच गावकऱ्यांना परिचित होते.

कुडाळकर मंडळींना थोडं वेगळं सांगायचं आहे. ते अख्खं गाव खानोलकरांच्या खानावळीला 'आईची खानावळ' म्हणूनच ओळखी नि नावाजी. चिंतामणी त्र्यंबक कुणाच्या खिजगणतीतही नव्हता. कारण खूप घाव सोसून जगाचे व्यवहार पाहिलेल्या त्या सोशिक माऊलीनेच ती घरगुती खानावळ शून्यातून उभी केली आणि सर्वांशी मायेचे शब्द बोलून भरभराटीला आणली. खानावळीला पाटी नव्हती. पण कुडाळात वसतीला येणारे चाकरमने आणि दुकानदार नेमके 'आईची खानावळ'च गाठीत.

'आईची खानावळ' चांगली चालू असतानाच कराचीहून निर्वासित म्हणून कुडाळात डबोलं घेऊन परतलेल्या राऊळ नावाच्या एका सत्प्रवृत्त माणसानं एक नवी दोन मजली इमारत बांधली नि आईला सांगितलं, 'अगो तू अन्नपूर्णा आहेस. माझ्या नव्या बिल्डिंगात खानावळ हलव नि छान चालव. नाव दे 'अन्नपूर्णा खानावळ'!' राऊळांनी आईच्या संमतीची धड वाटही पाहिली नाही. 'अन्नपूर्णा खानावळ' हे नाव सरकारात नोंदवलं. एका ग्रामस्थ चित्रकारानं नामफलक आपखुशीनं करुन दिला. मग आईनं खानावळ राऊळांच्या नव्याकोऱ्या इमारतीत हलवली.

खानोलकरातला कवी जागृत झाला. तो म्हणाला, 'सरस्वती वीणावादन करते; मी सरस्वतीचा सेवक. म्हणून खानावळीचं नवं नाव 'वीणा गेस्ट हाउस' ठेवायचं. चित्रकारालाही पटलं. त्यानं त्याप्रमाणे वीणेचं चित्र असलेली नवी पाटी करुन दिली. 'वीणा गेस्ट हाउस' सुरु झालं. त्याचे पहिले पर्मनंट मेंबर म्हणजे त्या वेळच्या कुडाळ हायस्कूलचे शिक्षक-लेखक प्र.श्री.नेरुरकर!

हा नवा नामफलक पाहून मामलेदार गरम झाला. म्हणाला, ''आमच्या दप्तरात नोंदवता 'अन्नपूर्णा खानावळ' नि बोर्ड लावता 'वीणा गेस्ट हाउस'? उतरवा तो बोर्ड अगोदर.''

प्र.श्री.नेरुरकर मध्यस्थी पडले. म्हणाले, ''आम्ही अन्नपूर्णा हा शब्द ॲड करतो. मग झालं ना?''

मामलेदारांना पटलं. तेव्हापासून बोर्डावर नाव झालं:

'अन्नपूर्णा-वीणा गेस्ट हाउस!'

**- रवींद्र पिंगे**

**(सौजन्य : सर्वोत्तम रविंद्र पिंगे, राजहंस प्रकाशन)**

****

फेब्रुवारी १९६४ ला रायटर्स सेंटर या संस्थेकडे अभ्यासवृत्ती मिळावी म्हणून खानोलकरांनी अर्ज केला होता. या संस्थेतर्फे 'हरि नारायण आपटे अभ्यासवृत्ती' लेखकांना दिली जात असे. त्याआधी लेखकानं संकल्पित

लेखनाचा आराखडा देणं आवश्यक असे. या आराखड्यात खानोलकरांनी एका मनस्वी अवलिया व्यक्तिरेखेविषयी लिहिलं होतं.

'मला माझ्या खेडेगावात भेटलेल्या अवलियाच्या आयुष्यावर लिहावयाचे आहे. हा भणंग माणूस रानावनातून भटकणारा असा असतो. रानपाला खाऊन पोट भरतो. कुणी वाटेला गेले तर शिव्या घालतो. कधी कधी गावातही येतो. मनाला आले तर बोलतो. नाहीतर कुठल्याही देवळात जाऊन कुठल्या तरी कोपऱ्यात पडून राहतो. आयुष्याचा अर्थ लावण्याचा आणि तो अर्थ लावता लावता मानवी जीवनातल्या स्वार्थादी प्रवृत्तींवर विजय मिळवण्याच्या प्रयत्नात तो वेडसरपणे वागत असतो. इतर माणसे त्याच्याभोवती जमतात... हळू हळू काही लोक त्याच्या भजनी लागतात. माणसांचे अनेक नमुने त्यांच्या भोवती असतात. अवलिया तसा कुणालाच सापडत नाही. शेवटी शेवटी तर तो बोलणेच सोडून देतो. माणसांच्या जंगलातून रानावनात पळू पाहतो. पण माणसे त्याला सोडत नाहीत. तो अखेरपर्यंत आतून सारखा जळत असतो. आणि अखेरपर्यंत तृप्त होत नाही. काही शिष्य आग्रह धरतात की, भव्य समुदायाला काहीतरी सांगा. पण तो बोलणेच टाकतो.

असा हा अवलिया काही बोलत नाही म्हटल्यावर लोक यायचे बंद होतात आणि एकाकी पडलेला अवलिया अस्वस्थ मनस्थितीत रानात गेल्यावर त्याचा अंत होतो, असं खानोलकरांना दाखवायचं होतं. अवलिया माणूस जे टाळू पाहतो तेच त्याला चिकटतं आणि आजवरच्या त्याच्या सगळ्या श्रद्धा ढासळून पडतात हे या संकल्पित कादंबरीचं प्रमुख सूत्र होतं.

अवलिया व्यक्तीवर लिहिलेल्या कादंबरीचं नाव होतं, 'कोंडुरा'. अवलियेपण असलेल्या व्यक्ती 'रात्र काळी... घागर काळी'मध्ये होत्या. यज्ञेश्वरबाबा आणि चांदबाबा. 'सूर्यफूल'मध्ये प्रो, नाबरांचं व्यक्तिचित्र होतं. आणि आता 'कोंडुरा'मध्ये पर्शरामातल्या या अवलिया पुरुषाभोवती सारी कादंबरी गुंफलेली होती.

नान्याचं व्यक्तिमत्त्व जसं दुभंगलेलं होतं तसंच या पर्शुरामतात्यांचंही. देवाला नाकारणं वाटतं तितकं सोपं नाही हे त्याला समजून चुकलं होतं. माणूस क:पदार्थ आहे, त्याचं स्वातंत्र्य हिरावलं गेलं आहे, परमेश्वरासारखी एक काल्पनिक वस्तू कल्पून आम्ही या पारतंत्र्याचा अर्थ लावतो आहोत इत्यादी नाबरांचं तत्त्वज्ञान म्हणजे शब्दांचे बुडबुडे आहेत असं नान्याला समजून चुकलं होतं. एखादा गुरु ज्याप्रमाणे भक्तांच्या भावनांना आवाहन करतो त्याप्रमाणे प्रा. नाबर भक्तांच्या बुद्धीला आवाहन करुन बौद्धिक श्रेष्ठत्वाचा गंड जोपासत होते. जे कृष्णमुर्तींची आठवण यावी अशा पद्धतीने खानोलकरांनी 'सूर्यफूल'मधील प्रा. नाबरांचं व्यक्तिचित्र रंगवलं होतं.

'कोंडुरा'मधले पर्शरामतात्या अवलिया खरे, पण हे अवलियेपण त्यांच्यावर लोकांनी लादलेलं होतं. माणसाची बुद्धी आणि भावना, दोन्ही गोष्टी विश्वरचनेचं गूढ उकलण्याच्या दृष्टीनं अगदीच तोकड्या पडतात याची खानोलकरांना जाणीव होती. प्रा. नाबर जसे शब्दांच्या बुडबुड्यापलिकडे काही निर्माण करु शकले नाहीत तसेच तात्याही कोंडुऱ्याच्या कृपेनं विश्वरहस्याचा शोध पूर्ण करु शकले नाहीत.

चिदानंद स्वामींच्या मठाप्रमाणेच कोंडुराही खानोलकरांचं आवडतं स्थान होतं. सश्रद्धतेचे संस्कार बागलांच्या राईतल्या मठामुळे झाले असले तरी विश्वरचनेचं अफाट रुप खानोलकरांना कोंडुराच्या लाटांमधून प्रथम दिसलं होतं. मठातला घंटानाद जितका पवित्र तितकाच या समुद्रातल्या खडकांवर आदळून होणारा धोऽधोऽधास हा कोंडुऱ्याचा आवाजही धीरगंभीर होता. चिदानंद स्वामींचा मठ आणि कोंडुरा यांची मनोमन सांगड खानोलकरांच्या मनात घातली गेली होती. कोकणात असताना अनेक वेळा खानोलकर कोंडुऱ्याच्या या समुद्रकिनाऱ्यावर येऊन बसले होते. वळण घेत गेलेल्या वाळूच्या पांढऱ्या पट्ट्यावर ते अनेकदा चालले होते. डोंगरघाटीवर विसावलेल्या घरांकडे पाठ करुन समोरच्या अथांग समुद्राकडे तासन्तास पहात बसले होते. इथल्या निसर्गाला जणू काही भोवतालच्या घरांशी आणि माणसांशी कर्तव्य नव्हतं. लाटा फेसाळत समोरच्या खडकावर आदळत, मागे जात. तितक्याच जोमानं पांढरे शुभ्र तुषार उडवीत पुन्हा येत. अनादि काळापासून असंच चालत आलं होतं. इथलं वातावरण असं भारुन टाकणारं होतं. एक




खानोलकरांनी कोंडुराच्या अथांग निळाईला आदिसागराचं रुप दिलं. एका बाजूला सृष्टीचे नियम पाळणारा रौद्रभीषण निसर्ग होता तर दुसऱ्या बाजूला अतिंद्रिय शक्तीच्या सामर्थ्यानं नियती घडवू पाहणारा मानव होता. एकीकडे शब्दांच्या, परंपरेच्या कवेत न मावणारं ब्रह्म होतं तर दुसरीकडे त्या निराकाराला सरूप करण्याचा, जाणून घेण्याचा तोकडा प्रयत्न होता. कोंडुरा आणि बागलाची राई एकत्र आणून खानोलकरांनी एक नवं विश्व निर्माण केलं.
कादंबरीतला कोंडुरा म्हणजे दोन-चार उंच माडांएवढा उभा असलेला डोंगराचा तुटलेला कडा आणि त्याच्या पायाशी असलेलं प्रचंड विवर होतं. हे विवर म्हणजे काळोखाचं गर्भाशय होतं. विश्वरहस्याचा शिक्का असलेलं. विश्वरहस्य हा जणू काही गर्भ होता आणि तो नेहमी अज्ञातच राहणार होता. खानोलकरांच्या दृष्टीने गर्भपात हेच मानवी जीवनाचं सूत्र होतं.




सुमारे २५ वर्षांच्या कालखंडात खानोलकरांचे जोगवा, दिवेलागण, नक्षत्रांचे देणे हे कवितासंग्रह, सनई, राखीपाखरू, चाफा आणि देवाची आई हे कथासंग्रह, रात्र काळी घागर काळी, अजगर, कोंडुरा, त्रिशंकू, गणुराया आणि चानी, पिशाच, अगोचर, पाषाणपालवी या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्यांच्या 'चानी' आणि 'कोंडुरा' या कादंबरीवर चित्रपटही निघाले.




विशाल, अस्वस्थ करणारा, शब्दात पकडता न येणारा, स्वत:ला भोवतालच्या अथांग निळ्या रंगात विसरायला लावणारा अनुभव खानोलकरांनी अनेक वेळा इथे अनुभवला होता.

खानोलकरांनी कोंडुराच्या या अथांग निळाईला आदिसागराचं रुप दिलं. कोंडुराच्या लाटांचा आवाज प्रचंढ वाढवून त्याला रौद्रभीषण स्वरूप दिलं. कोंडुराला दैवी स्वरुप देऊन एक नवी मिथ तयार केली. एका बाजूला सृष्टीचे नियम पाळणारा रौद्रभीषण निसर्ग होता तर दुसऱ्या बाजूला अतिंद्रिय शक्तीच्या सामर्थ्यानं नियती घडवू पाहणारा मानव होता. एकीकडे शब्दांच्या, परंपरेच्या कवेत न मावणारं ब्रह्म होतं तर दुसरीकडे त्या निराकराला सरूप करण्याचा, जाणून घेण्याचा तोकडा प्रयत्न होता. कोंडुरा आणि बागलाची राई एकत्र आणून खानोलकरांनी एक नवं विश्व निर्माण केलं.

कादंबरीतला कोंडुरा म्हणजे दोन-चार उंच माडांएवढा उभा असलेला डोंगराचा तुटलेला कडा आणि त्याच्या पायाशी असलेलं प्रचंड विवर होतं. हे विवर म्हणजे काळोखाचं गर्भाशय होतं. विश्वरहस्याचा शिक्का असलेलं. विश्वरहस्य हा जणू काही गर्भ होता आणि तो नेहमी अज्ञातच राहणार होता. काळोखातून बाहेरच्या जगात येताच गोठून पडलेल्या खडकांसारखा तो मृतवत्, चेतनाहीन बनून राहणार होता. खानोलकरांच्या दृष्टीने गर्भपात हेच मानवी जीवनाचं सूत्र होतं.

कोंडुऱ्यातल्या गावकऱ्यांपैकी एक सामान्य माणूस म्हणजे पर्शरामतात्या. घरात होणारी उपेक्षा आणि लग्न होऊनही भावाच्या धाकापायी न मिळालेलं स्त्रीसुख यामुळे वैतागून तात्या घराबाहेर पडले. पण रस्त्यावर जोगी भेटला. गर्भाचं पाणी करणारी मुळी देऊन तो म्हणाला, 'प्रत्येकाची वाट ठरलेली आहे.' त्या दिवसापासून तात्यांचं जगच बदललं. कामवासना आणि जोग्याने दिलेला ब्रह्मचर्याचा आदेश यामध्ये रस्सीखेच सुरु झाली. 'रात्र काळी... घागर काळी' पासून खानोलकरांचं सूत्र होतं- सौंदर्य हा स्त्रीला मिळालेला शाप आहे. सौंदर्यापुढे सारे पुरुष हतबल ठरतात. पर्शरामतात्यांच्या बाबतीतही ते होतंच. प्रथम भावामुळे आणि नंतर कोंडुऱ्याच्या आदेशामुळे तात्यांना पत्नीपासून स्त्रीसुख घेता आलं नाही आणि नारोबाच्या वाड्यातल्या पार्वतीला वश करुन घेता आलं नाही. शेवटी स्वत:च्या पत्नीवर बलात्कार करण्यापर्यंत तात्यांची मजल गेली.

तात्यांना गर्भपाताची मुळी मिळाली होती. अप्राप्य पार्वतीला त्यांनी ती दिली ती द्वेषभावनेपोटी. नारोबाशी संगनमत करुन. गर्भपात खानोलकरांच्या कादंबऱ्यांमध्ये अपरिहार्यपणे येई. त्याचं कारण खानोलकरांना गर्भपाताचं आकर्षण असण्यात होतं. स्वत: खानोलकरांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या आईला गर्भपाताचं औषध देण्यात आलं होतं. तरीही खानोलकरांचा गर्भ वाचला होता आणि ते जन्माला आले होते. ही गोष्ट आईच्या तोंडून त्यांनी अनेक वेळा ऐकली होती. शिवाय असफल प्रेमाची परिणती अखेर गर्भपातात व्हावी हे खानोलकरांच्या पात्रांच्या संदर्भात तर्कसंगत वाटेल असंच होतं.

या कादंबरीतलं दुसरं आणि महत्त्वाचं सूत्र म्हणजे अध्यात्म आणि सेक्स या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तात्या खानोलकरांप्रमाणेच दुभंगलेले होते. अनावर वासना आणि विश्वरहस्याचा शोध या दोन्ही प्रवृत्ती सारख्याच तीव्रतेने त्यांच्यामध्ये होत्या. तात्यांची आणि पर्यायानं मानवाची खरी शोकांतिका अत्यंत मर्यादित अशा आकलनशक्तीमध्ये होती. अज्ञात शक्तीचं तात्यांना झालेलं तोकडं दर्शन खानोलकरांनी यशस्वीपणे दाखविलं होतं. माणूस नियती बदलू शकत नाही. या नियतीचं अस्तित्व मानवी सुखदु:ख, पाप-पुण्याच्या कल्पना यांच्यापासून पूर्णपणे अलिप्त, स्वयंभू असतं. अतिंद्रिय शक्तीचं सामर्थ्य लाभलेला साक्षात्कारी पुरुष नीती-अनीतीबद्दल उदासीन तरी असतो किंवा ढोंगी तरी असतो, हेच खानोलकरांनी या कादंबरीतल्या पात्रांच्या द्वारे दाखवलं होतं.

खानोलकरांच्या लेखनामागची मूलभूत प्रेरणा लैंगिक वासना होती. या प्रेरणेबरोबरच अधिक मूलभूत असे जीवनविषयक प्रश्न खानोलकरांनी 'कोंडुरा'मध्ये उपस्थित केले होते. या प्रश्नांना निश्चित उत्तरं नव्हती...

**(सौजन्य : ललित चरित्र, दिपक घारे, ग्रंथाली प्रकाशन)**

****



# मी...वगैरे

– वैभव जोशी

“ पुन्हा घेतली मी भरारी वगैरे
पुन्हा सज्ज झाले शिकारी वगैरे

खरा प्रश्न मी टाकलेलाच नाही
तुझी मात्र चर्या विचारी वगैरे

बिचारा खरोखर भिकारी निघाला
मला वाटले की पुढारी वगैरे

जगा तूच किंमत करावीस माझी
तुला शोभते सावकारी वगैरे

कशाचीच आता नशा येत नाही
तसा घाव होतो जिव्हारी वगैरे

तिथे एकटा तोच होता दरिद्री
रुबाबात होते पुजारी वगैरे

आता फक्त होतील भेटी मनांच्या
मळभ दाटलेल्या दुपारी वगैरे

किती जीवना रोज देतोस धमक्या
दिली का यमाने सुपारी वगैरे?

अतीही सुगंधी नसावीत नाती
पुढे येत जाते शिसारी वगैरे


*सर्व पुस्तक दुकानात उपलब्ध*

प्रमुख विक्रेते

रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ : ०२०२४४५११२९

*Online Purchase :* www.erasik.com

# अर्णवाची लेखणी



वि.स.खांडेकर

ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त पहिले मराठी साहित्यिक वि.स.खांडेकर यांच्या लेखक म्हणून झालेल्या जडणघडणीत कोकणातल्या शिरोडा या गावाचा कसा आणि किती सहभाग होता याचे विवेचन करणारे एक वेगळ्या प्रकारचे पुस्तक म्हणजे 'एक गाव आणि एक खेडे'.




*वि.स. खांडेकर शिक्षकी पेशा स्वीकारण्यासाठी सावंतवाडीहून शिरोड्यास गेले, त्या दिवसाबद्दल जया दडकर यांच्याशी बोलताना म्हणाले होते की, ''माझ्या आयुष्यातला अत्यंत भाग्याचा दिवस कोणता, असा जर कोणी मला प्रश्न केला तर मोठ्या आनंदानं मी याच दिवसाकडे बोट दाखवीन...''*
*हाच धागा पकडून 'एक लेखक एक खेडे' या पुस्तकात दडकर पुढे लिहितात –*

१२ एप्रिल १९२०. लोकमान्य टिळकांच्या हयातीतला, गांधींच्या 'खेड्यात चला' या घोषणेच्या कित्येक वर्ष आधीचा, अर्धशतकापूर्वीचा काळ. विष्णू सखाराम खांडेकर नावाचा, नुकतीच वीशी उलटलेला एक उंच, हाडकुळा, तरुण मुलगा सावंतवाडीहून शिरोड्याला जाणारा मैलांचा रस्ता पायानं तुडवत चालला होता. जेमतेम गुडघे झाकणारं, तांबड्या मातीत रंगलेलं धोतर, त्याला शोभणारा तांबूस सदरा, वर मळका आखूड कोट, डोळ्यांवर चांदीच्या काड्या असलेला जाड काचेचा चष्मा, एका हातात छत्री, दुसऱ्या हातात बाजारात घेऊन जातात तसली पिशवी, पिशवीत चार कपडे व केशवसुतांच्या कवितेचं पुस्तक कोंबलेलं, असा त्याचा थाट होता.

तो निरवड्याला पोचला तेव्हा पूर्व दिशेला सूर्य सावकाशपणे वर सरकत होता. त्या उगवत्या सूर्याकडे लक्ष जाताच तो काही काळ जाग्यावर खिळून उभा राहिला. कित्येक वर्षांत त्यानं संध्या केली नव्हती. पण त्या वेळी मात्र गायत्री मंत्राचे प्रतिध्वनी त्याच्या मनाच्या गाभाऱ्यात उमटू लागले. त्यानं मनोमन प्रार्थना केली :

''हे सूर्यनारायणा माझ्या बुद्धीला चालना दे. आतापर्यंत ज्या अंधारात मी चाचपडत होतो, त्यातून मला बाहेर काढ. तुझ्या प्रकाशाचा अत्यंत अल्पांश जरी मला मिळाला, तरी मी स्वत:ला भाग्यवान समजेन.''

त्या सूर्यबिंबाच्या सोबतीनं तो पुढची वाटचाल करु लागला.

चालताना जे काही वाचलं असेल त्याचा विचार करीत राह्यचं, काही लिहायचं, नवं सुचलं असेल तर त्याचं चिंतन करायचं, ही त्याची नेहमीची पद्धत. पण त्या दिवशी शिरोडं, तिथली शाळा, तिथली माणसं, याखेरील दुसरा कुठला विचार त्याच्या मनात येईना.

भोवतालचे छोटे डोंगर आणि विस्तीर्ण माळ हळूहळू उन्हानं तापत होते. वाऱ्याच्या उष्ण झळा जाणवू लागल्या होत्या. अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. मधूनच वाऱ्याची झुळूक येई, तेव्हा मोहरलेल्या काजीच्या नाहीतर रानफुलांच्या वासानं मन उल्हसित होई. शरीराला छोटी तरतरी आल्यासारखं वाटून पावलं जलद पडत. पण थोडा वेळचं. चाल पुन्हा मंद होत होती. एक-एक मैल सावकाशपणे मागे सरकत होता.

मळेवाड आली. इथं तीन रस्ते फुटतात. डावीकडचा साताड्यांकडे जाणारा, समोरचा आरोंद्याकडे आणि तिसरा उजवीकडून आजगाव- शिरोड्याकडे वळणारा. एक अंधूक कल्पना त्याच्या मनात डोकावून गेली. त्या क्षणाला आयुष्याच्याही तिठ्यावरच तो उभा होता. पहिली वाट सांगलीला परत जायची. तिथं जाऊन मित्र आणि आप्तेष्ट यांच्या मदतीनं शिक्षण पुरं करायचं, चांगली नोकरी मिळवायची. दुसरी वाट- नानेलीला दत्तक-घरी निमूटपणे परतायचं. बापूंशी आपलं पटत नसलं तरी ते सांगतील त्याप्रमाणे वागायचं. खाऊनपिऊन सुखी होण्याचा तो सर्वात सोपा मार्ग होता. तिसरी वाट- एका शाळेसाठी शिरोड्याला जायचं. त्यानं दारिद्र्य पाहिलं होतं, धर्मभोळेपणा पाहिला होता. कोकणच्या पुढच्या पिढीत तरी या विषवेली फोफावू नयेत, याकरता धडपडत राह्यचं. त्या खेडेगावच्या सर्व प्रकारच्या सुधारणेसाठी कष्ट उपसायचे.

यातली तिसरी वाट आपली. हे मनाशी गृहित धरुन मळेवाडहून शिरोड्याच्या दिशेनं झपाझप पावलं उचलीत तो चालू लागला.

शिरोड्यात त्यानं पाऊल टाकलं तेव्हा सूर्य माथ्यावर आला होता. त्याचा तो काटकुळा देह, वेंधळा पोशाख पाहून गावच्या लोकांचं नव्या

मास्तराविषयीचं कुतूहल थोडंसं चाळवलं गेलं. 'हयतो रे काय शिकयतलो पोरांक!' एवढीच शंका शिरोडकरांच्या मनात चाटून गेली. त्या वेळचं खेड्याचं जीवन हे नाही म्हटलं तरी साठलेल्या पाण्यासारखं होतं. कोणीतरी पाण्यात दगड टाकावा, थोडी खळबळ निर्माण करावी, त्या पाण्यात काही तरंग उठावेत, एवढंच काम त्याच्या येण्यामुळं झालं होतं.

सुरवातीला काही दिवस त्यांची राहायची सोय नाबरवाड्यातल्या बापू खांडेकरांकडे केली होती. शिरोड्यातील त्या पहिल्यावहिल्या दिवसाविषयी भाऊसाहेब सांगतात:

''बापूभटजीचं हे घर छोटं होतं. बाहेर अगदी लहान अशी ओसरी. आत दोन-तीन लहान खोल्या. मी ओसरीवर झोपत असे. रात्री झोपायच्या आधी बाहेर येऊन पाहिलं म्हणजे, आईच्या पदराखाली एखादं अर्भक झोपलेलं असावं, तशी आवाठातली वस्ती गर्द माडांच्या कुशीत पेंगुळलेली दिसायची. जाळीतून एखाद्या प्राण्याचे डोळे दिसावेत त्याप्रमाणे माडांच्या हलत्या चुडतांतून एखाददुसऱ्या चांदणीचं दर्शन होई. झाडावरती संध्याकाळी कावळे व इतर पाखरं कलकलाट करीत. रात्रीच्या विश्रांतीसाठी येत. पहाट झाली की, त्यांची कुजबूज सुरु होई. सकाळ-संध्याकाळ अगदी नियमितपणे चाललेली त्यांची ही किलबिल मी अगदी जवळून पहिल्यांदाच ऐकत होतो. निसर्ग हा माणसांचा अबोल भासणारा जिवाभावाचा मित्र आहे. कविता करण्याचा नाद असल्यामुळे या गोष्टीची जरी मला जाणीव होती, तरी असं एकट्यानं राह्यची पाळी माझ्यावर आतापर्यंत कधी आली नव्हती. शिरोड्यातल्या या पहिल्या दिवसांतच ती आली. आणि माडाचं चुडत वाऱ्यानं हलत नसून, जणू काही आपल्याशी ओळख दाखविण्याकरता तो आपला हात हलवत आहे, चांदण्या चमकत नसून त्या नेत्रपल्लवी करीत आहेत, अशा प्रकारचा सुखद भास मला होऊ लागला. खेड्यामध्ये निसर्गाची माणसाशी लौकर मैत्री होते, हा अनुभव मी घेतला.''

शिरोडं गाव अगदी लहान. रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला अरबी समुद्राच्या काठावर वसलेलं. दक्षिणोत्तर रेडी, तिरोडा, आजगाव, आरवली या गावांनी घेरलेलं. जेमतेम दोन हजार वस्तीचं चिमुकलं खेडं. तिथली 'ट्युटोरियल इंग्लिश स्कूल' शाळा तेव्हा बाल्यावस्थेत होती. शाळेत एकंदर चार इयत्ता होत्या. शाळेला स्वत:ची इमारत नसल्यामुळं शाळा तीन ठिकाणी भरत असे. महादेव नाबारांच्या घरात, कोटणिसांच्या घरात आणि बाजारात निखार्ग्यांच्या माडीवर. दहा-पंधरा मिनिटांच्या अंतरावर ही तिन्ही ठिकाणं होती. मास्तर होते सहा-सात. त्यामुळे एखादे दिवशी एखादे मास्तर गैरहजर असले तर पंचाईत व्हायची. मग खांडेकरांना एके ठिकाणी गणित सोडवायला सांगून दुसऱ्या ठिकाणी इंग्लिशच्या तासाला जावं लागे.

भोवतालच्या पंचक्रोशीतून मुलं येत. उन्हातान्हातून, पावसापाण्यातून ती तीन-तीन, चार-चार मैल रस्ता तुडवत यायची. पांढरपेशांची मुलं फारशी नसत. अधिक भरणा होता गावडे, भंडारी वगैरे कष्टकरी वर्गातल्या गरीब मुलांचा. इंग्रजी शिक्षणाची संधी मिळणारी त्यांची ही पहिलीच पिढी होती.

दहा-बारा वर्षांची लहानलहान मुलं 'सर', 'सर' म्हणून जेव्हा हाका मारायची, तेव्हा 'आई' या पहिल्या मुलाच्या पहिल्या हाकेने आईला जो आनंद होतो, त्याचा अनुभव खांडेकर मास्तरांना यायचा. समोर बसलेल्या मुलांचा परिचय करुन घेताना, तोपर्यंत अपरिचित असलेल्या आडनावांनी मुलाला हाक मारताना, त्यांना शिकवताना त्यांना आनंद होई. ते शिकवू लागले की वर्ग हेच त्यांचं जग व्हायचं, त्यात ते रकून जायचे. शिक्षणशास्त्र म्हणून काही आहे, याची त्या वेळी त्यांना नीटशी कल्पनाही नव्हती. डोंगराच्या घळीतून पाण्याचा एखादा लहानसा ओघळ जसा आपणहून येतो, तसे त्याच्या मुखावाटे शब्द बाहेर पडत. जे जे स्वत:ला ठाऊक आहे ते सारं सांगावं, या भावनेनं त्यांचं शिकवणं चालत असे.

शाळा सुटली की, शिरोडं व त्याच्या भोवतालचा रमणीय परिसर दाखविण्याकरता म्हणून शिनारी मास्तर, आप्पा नाबर वगैरे काही मंडळी खांडेकरांना बरोबर घेऊन संध्याकाळी फिरायला निघत.

एक दिवस शाळा, बाजार, मारुतीच्या देवळाशेजारील गाडीतळ या मार्गानं ते रेडीकडे निघायचे. वाटेत मिठागरं लागायची. बुद्धिबळाच्या पटावरील घरांप्रमाणे दिसणाऱ्या




१९२० पासून १९३८ पर्यंत खांडेकर नोकरीच्या निमित्ताने शिरोडा या गावी राहिले. लेखनाचे पहिले धडे त्यांनी तिथेच गिरवले. कविता, विनोदी लेख आणि टीकात्मक लेखन अशी सुरुवात करुन खांडेकर पुढे हळूहळू लघुकथा लेखनाकडे आणि नंतर नाटक-कादंबरी लेखनाकडे वळले. १९३६ च्या सुमारास चित्रपटांसाठी पटकथा लेखनाचे काम त्यांनी स्वीकारले आणि चित्रपटक्षेत्रात अधिक भरीव कामगिरी करण्याच्या उद्देशाने त्यांनी शिरोडे सोडले व ते कोल्हापूरला स्थायिक झाले. या काळात शिरोड्यात वास्तव्य करताना या गावाने त्यांच्या मनोवृत्तीवर, लेखनावर कसा संस्कार व कशा प्रकारचा परिणाम केला हे जाणून घेण्याचा प्रयत्न जया दडकर यांनी या पुस्तकात केला आहे.




एक कादंबरीकार म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच वि.स. खांडेकरांना महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही अफाट लोकप्रियता मिळाली. १९३० मध्ये 'हृदयाची हाक' ही पहिली कादंबरी त्यांनी लिहिली. त्यानंतर एकापाठोपाठ एक कांचनमृग, दोन ध्रुव, हिरवा चाफा, दोन मने, रिकामा देव्हारा, पहिले प्रेम अशा अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. छाया, ज्वाला, अमृत, देवता, माझं बाळ यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांच्या कथाही त्यांनी लिहिल्या.
खांडेकरांची क्रौंचवध (१९४२) ही कादंबरी चांगलीच लोकप्रिय ठरली. ययाती (१९५१), अमृतवेल (१९६७) या स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या सर्वांत जास्त गाजलेल्या कादंबऱ्या होत. 'ययाती'ला १९६०चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला.

मिठागरातील कोंड्या, त्या कोंड्यांत पाणी घेण्याची पद्धत, त्या पाण्यावर उत्पन्न होणारा मिठाचा तवंग, तो गोळा करण्याचे कौशल्य यांविषयी त्यांना माहिती पुरवली जायची. साधारण पाऊण मैलच्या वाटचालीनंतर नदी पार करनु रेडीज जायचं. दुसऱ्या दिवशी आजगाव, तिसऱ्या दिवशी भिकेडोंगरी, अशी भ्रमंती व्हायची.

अशी भ्रमंती चालू असताना एके दिवशी ते आरवलीला गेले. शिरोडं आणि आरवली ही गावं सयामी जुळ्यासारखी आहेत, एकमेकांना चिकटलेली. आरवलीलाच खांडेकरांना एक जिवलग मित्र भेटला– तो म्हणजे तिथला समुद्र.

समुद्राकडे जाताना मळ्यात उतरुन बांधावरल्या वाटेनं जावं लागायचं. मळा संपल्यावर तीच वाट मुख्य रस्त्याला मिळायची. या रस्त्यानं पुढं गेलं की, वाळूत पसरलेल्या खुरट्या काजी दिसत. डावीकडे वळून वाळूत रुतणारी पावलं उचलत चालू लागलं की, प्रथम वाळूचा उंचवटा लागे. तो चढून वर गेलं की, फर्लांगभर अंतरावर क्षितिजापर्यंत पसरलेल्या निळ्या शांत समुद्राचं दर्शन होईल. ते फर्लांगाचं अंतर तोडलं की, समुद्राच्या अंगणात प्रवेश होई. हा किनारा फार सुंदर आहे. दोन्ही बाजूंना लांबवर पसरलेला. कुठंतरी एखादी होडी दिसायची. क्वचित कोळ्यांनी रापण घातलेली असायची. संध्याकाळ झाली की, हळूहळू सूर्यबिंब खाली उतरे.

भाऊसाहेब म्हणाले :

''त्या पहिल्याच दिवशी पाहिलेला सूर्यास्त अजून माझ्या नजरेसमोर आहे. त्या सूर्यास्ताचं वर्णन करण्यास शब्दसुद्धा तोकडे पडावेत !

समुद्राच्या त्या प्रथम दर्शनीच मी त्याच्या प्रेमात पडलो. लाटांचा खेळ पाहत, सूर्यास्तावेळचं रंगीबेरंगी क्षितिज न्याहाळत, असंख्य संध्याकाळी मी या किनाऱ्यावर घालविल्या आहेत अगदी एकट्यानं. कधीकधी केशवसुतांच्या कविता वाचीत. तिथं कानावर पडणाऱ्या सागराच्या गंभीर संगीताचा माझ्या हातात असलेल्या काव्याशी फार निकटचा संबंध आहे, असा भास मला कैक वेळा झाला आहे.

''त्या किनाऱ्यावर माझ्या बसायच्या जागेपासून काही अंतरावर एक छोटी टेकडी होती. एखादं सुंदर देवालय तिथं उभारता आलं तर काय बहार होईल, असा विचार नेहमी माझ्या मनात डोकावून जायचा. एखादं छोटं घर बांधण्याइतकीही माझी आर्थिक परिस्थिती नव्हती, त्यामुळे देवालय उभारण्याचं काम मला कल्पनासृष्टीतच पुरं करुन घ्यावं लागलं. माझ्या 'कांचनमृगा'च्या उत्तरार्धात सदानंदस्वामी ज्या शिवमंदिरात राहतात, ते हेच.

**– जया दडकर**

**(सौजन्य : एक लेखक आणि एक खेडे, पॉप्युलर प्रकाशन)**

****

'कांचनमृगा'तील स्वभावचित्रांप्रमाणे वर्णनेही माझ्या अनुभवाची आहेत. कादंबरीच्या उत्तरार्धात सदानंदस्वामी ज्या शिवमंदिरात राहतात ते हेच मंदिर. 'कांचनमृगा'तले यमूच्या घराचे वर्णनही माझ्या भोवतालच्या असंख्य दरिद्री घरांतून घेतलेले आहे. या गंभीर भागाइतकेच 'अगंऽबाई मसणात सर्व गेले' या कवितेचे कर्ते आप्पाण्णातनय (प्रथम मी त्यांना आण्णाप्पातनयच बनविले होते, पण 'ण्णा' च 'प्पा' यांचा हस्तलिखितात गोंधळ झाल्यामुळे मी आण्णाप्पांचे चिरंजीव अप्पाण्णांना दत्तक दिले.) हेही सत्यसृष्टीतील आहेत. पहिल्या पत्नीवरील विलापिकेच्या प्रती आणि दुसऱ्या लग्नाला मदत करण्याविषयी विनंती बरोबरच पाठविणारे कविमहाशय वऱ्हाडच्या लोकांना काही अपरिचित नाहीत.

'हृदयाच्या हाके'तील कुमुदचे जीवनचरित्र तर माझ्या एका विद्यार्थीनीवरुनच सुचलेले आहे. निर्दय नवऱ्याच्या हातून तिने भोगलेले हाल आठवले. निराशेने, 'चुलीतलं लाकूड चुलीतच जळायचं', ह्या तिने एका पत्रात काढलेल्या उद्‌गारांचे स्मरण झाले की इजूनी मन उदास होते. त्या बुद्धिवान आणि महत्त्वाकांक्षी मुलीला आलेले अकाली मरण– मरण कसले हिंदु पतिदेवाने घेतलेला तिचा बळी आठवला म्हणजे आपल्या समाजिक दुबळेपणाची भयंकर चीड येते.

**(सौजन्य : पहिली पावलं, मेहता पब्लिकेशन)**

****

# ज्यांना वाचनाची आवड असते ते ललित मासिक आवडीने वाचतात!

# ललित

**साहित्यिक घडामोडींचा बातमीदार**

**आणि ग्रंथखरेदीचा मार्गदर्शक**

**दिवाळी अंकासह वार्षिक वर्गणी २८० रुपये**

**चार वर्षांची सवलतीची वर्गणी फक्त १००० रुपये**

-वाचकप्रिय सदरलेखन-

विनोदी चुरचुरीत सदर
समीक्षा-संज्ञा
पन्नाशीपूर्वीची पुस्तके
ज्ञानपीठ भाषणे
स्वागत
मानाचे पान
लक्षवेधी पुस्तके
दशकातील साहित्यिक
अभिनव प्रश्नमंजूषा
दृष्टिक्षेप
इथे-तिथे
प्रासंगिक लेख / मुलाखती
सप्रेम नमस्कार
साभार पोच
बाजारात आलेली पुस्तके

वर्गणी खालील ठिकाणी स्वीकारली जाईल-
ललित कार्यालय २३८२६२२५. मॅजेस्टिक बुक स्टॉल २३८८२२४४.
मॅजेस्टिक ग्रंथदालन ९८९२२२०२३९. मॅजेस्टिक बुक डेपो २५३७६८६५
मॅजेस्टिक (पुणे) ९९२२३४४०८१.
वर्गणीचा मनिऑर्डर / डीडी 'ललित मासिक' या नावाने
३०८, फिनिक्स, ४५७ एस.व्ही.पी.रोड, गिरगाव, मुंबई ४००००४
या पत्त्यावर पाठवावा किंवा 'ललित'च्या बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगाव शाखेच्या
२००५३७०१००६ या क्रमांकाच्या बँक खात्यात रक्कम जमा करून
majesticph@gmail.com या इमेलवर पैसे भरल्याचे तपशील कळवावेत.
शिवाय www.majesticonthenet.com येथेही आपणांस वर्गणी भरता येईल.

**ग्रंथजगताशी परिचित राहण्यासाठी 'ललित मासिका'चे वर्गणीदार व्हा!**

# तुझ्या गोव्याच्या भूमीत



बा.भ.बोरकर

बा.भ.बोरकर यांना लहानपणासूनच कवितेचा छंद जडला. १९३० साली प्रतिभा हा त्यांचा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला. १९३४ साली बडोद्याच्या साहित्य संमेलनात ‘तेथे कर माझे जुळती’ या काव्यगायनाने त्यांना सर्वदूर ख्याती मिळवून दिली. जीवनसंगीत, दूधसागर, आनंदभैरवी, चित्रवीणा या संग्रहांनी बोरकरांची कीर्ती वृद्धिंगत होत गेली. त्यानंतर आलेले संग्रह म्हणजे गितार, चैत्रपुनव, चांदणवेल, कांचनसंध्या, अनुरागिणी आणि चिन्मयी. बोरकरांच्या या काव्यप्रवासाचा केंद्रबिंदू होता निसर्ग आणि प्रेम. निसर्ग प्रतिमांनी त्यांची कविता संपन्न आहे.

**आनंदयात्री कवी**

**गो**व्यातल्या कुडचडे ह्या आजोळच्या गावी ३० नोव्हेंबर १९१० रोजी कवींचा जन्म झाला. भावंडांमध्ये बोरकर सर्वात थोरले. नाव बाळकृष्ण. आत्या त्यांना लाडात ‘बाकीट’ अशी लडिवाळ हाक मारायची. त्यातला ‘ट’ पुढं गळला. ‘बाकी’ हे सोपं नाव रुढ झालं. पुढं कवी म्हणून कीर्ती पसरु लागल्यावर ‘बाकी’ म्हणून हाक मारणं जड वाटू लागलं. म्हणून ‘बाब’ हा बहुमानार्थी प्रत्यय लागून त्यांचं नाव ‘बाकीबाब’ म्हणजे बाळकृष्णबुवा झालं. आई-वडील त्यांना घरी ‘आबा’ अशी हाक मारीत. घरात आबा, लोकांत बाकीबाब.

जुवारी नदीच्या काठावरच्या बोरी ह्या घराण्याच्या गावी कवी लहानाचे मोठे झाले. १९२६ साली धारवाडला जाऊन त्या वेळच्या मुंबई विद्यापीठाचे ते मॅट्रिक झाले.

नोकरीसाठी मुंबईला आले. ‘विविधवृत्त’ साप्ताहिकात दोन-तीन महिने उमेदवारी केली. तिथं विचारधारा जुळेनात. गोत्र पटेना. म्हणून शहर मुंबई आणि साप्ताहिक ‘विविधवृत्त’ सोडून कवी गोव्यात माघारी वळले.

गोव्यात शिक्षक म्हणून नोकरीला लागले. वास्कोच्या सेंट जोसेफ स्कूलमध्ये एक वर्ष, म्हापशाला एक वर्ष, पणजीच्या पोर्तुगीज ट्रेनिंग कॉलेजात इंग्रजीचे अध्यापक. तिथून नंतर हाणजून गावी दीड वर्षं मुख्याध्यापक. नंतर मडगावला युनियन हायस्कूलमध्ये तीन वर्षं. शेवटी केप्याच्या शासकीय शाळेत पाच वर्षं. अशी १९३० ते १९४६ पर्यंत सतरा वर्षं शिक्षकाच्या पेशात बढत्या घेत काढली. .

केप्याच्या शाळेत शिक्षक असताना ‘मनोहर’ मासिकात त्यांनी लिहिलं :

*'Laugh and be merry remember*
*better the world with a song*
*Better the world with a blow*
*in the teeth of a wrong.*

‘ हे माझं वैयक्तिक तत्त्वज्ञान. त्याच्याबरोबरच एका सामाजिक तत्त्वज्ञानाची आपल्याला आवश्यकता आहे. आपल्यापुढचे देवदानवांचे आदर्श जाऊन त्यांची जागा शास्त्रशुद्ध मानवाने घेतली पाहिजे. सध्या आपल्या संस्कृतीला असलेलं भीतीचं अधिष्ठान नष्ट होऊन स्वातंत्र्यावर तिची पुनर्घटना झाली पाहिजे आणि अन्नक्षुधा व कामक्षुधा यांची तृप्ती थोड्या श्रमांत होऊन, उरलेली शक्ती संस्कृतिवर्धनार्थ वेचली जाईल, अशी तिच्यात सोय पाहिजे.’

**– रवींद्र पिंगे**

**(सौजन्य : सर्वोत्तम रविंद्र पिंगे, राजहंस प्रकाशन)**

****

बोरकरांच्या घराण्यात कुणी पूर्वज कवी नव्हता. वडिलांना चित्रकलेचा नाद होता आणि मामा चांगले गात असत. काव्य रचले जाऊ शकते हे लहानपणी त्यांच्या लक्षातच आले नव्हते. परंतु एकदा एका किरिस्ताव भंडाऱ्यांच्या वाडीत लग्नाला गेले असताना तेथे एका म्हाताऱ्या पात्रीसने लग्नातल्या लहानसहान घटनांवर आधारलेले आपले शीघ्र काव्य सादर केले तेव्हा काव्यरचनेची जाणीव त्यांना झाली. बोरकरांनी आपल्या कोकणी कवितांचा संग्रह ‘पांयजणां’ हा काव्यशक्तीचा पहिला जिवंत साक्षात्कार घडवणाऱ्या या पात्रीसला अर्पण केला आहे.

काव्यरचनेचा चाळा जरी लागला असला तरी आजीने घातलेल्या शपथेमुळे कित्येक दिवस काव्याची ऊर्मी बोरकरांनी दाबून ठेवली. परंतु भोवतीचे जग अष्टौप्रहर आणि बाराही मास कवितेने गजबजलेले असे. घरातल्या भजनात संतकवितेचे दृढ संस्कार होते. भोवतीही देवळाच्या शुचिर्भूत सौंदर्याने नटलेल्या परिसरात शांता दुर्गेची, नवदुर्गेची नवरात्रे, गणेशोत्सव, पूजा समारंभ असे उत्सव चालत व त्यातही दिंड्या टाळमृदुंगाच्या घोषांत सामूहित भजने होत. या सर्व वातावरणाचा बोरकरांच्या मनावर गाढ प्रभाव पडला असावा. केवळ दोन इयत्ता एवढेच मराठी शिक्षण झालेले असून बोरकरांची मराठी भाषा विलक्षण रसाळ, गोड आणि शब्दसमृद्ध कशी झाली याचेही रहस्य या

भोवती सतत घुमणाऱ्या संतकवितेच्या संस्कारामध्येच असावे.

माध्यमिक शिक्षणासाठी ते फोंड्याच्या आल्मेद कॉलेजमध्ये होते. ही गोमंतकातील एकमेव राष्ट्रीय शाळा. शा शाळेने बोरकरांवर राष्ट्रीयत्वाचे संस्कार केले. महाराष्ट्रापासून दूर, परकीयांच्या संस्कृतीच्या दबावाखाली वावरत असूनही बोरकरांमध्ये भारत, भारतीय संस्कृती, महाराष्ट्र, टिळक, गांधी यांच्याविषयी आदर निर्माण झाला तो या शाळेच्या प्रभावाने. इथेच त्यांच्यातील वक्तृत्वादी गुणांचा विकास झाला. त्यांच्यात राष्ट्रभक्तीचे बीज पडले. ''आल्मेद कॉलेजला मी माझी दुसरी आई मानतो.'' असे कृतज्ञतेचे उद्गार बोरकरांनी काढले आहेत त्यावरुन बोरकरांच्या व्यक्तिमत्वाच्या घडणीत या संस्थेचा केवढा वाटा होता याची कल्पना येते. १९४६ नंतर बोरकरांच्या कवितेत आढळणारा राष्ट्रीयत्वाचा पदर बोरकरांच्या व्यक्तिमत्त्वात इतक्या लहानपणीच गुंफला गेलेला होता.

घरातील धार्मिक वातावरण, प्रेमळ आप्तपरिवार, शालेय जीवनातील सुसंस्कार यांच्या जोडीलाच बोरकरांमध्ये अखंड जीवनलालसा, सौंदर्यपूजा आणि सखोल श्रद्धा निर्माण करणारी आणखी एक गोष्ट बोरकरांच्या आसपास सदैव वावरत होती. ती म्हणजे गोव्याचा निसर्ग, तिथली आंब्याफणसांची, नारळीकाजूची कुळागरे, झुळुझुळु वाहणारे निर्मळ जळ, ऋतू साधून येणारी पानांत लपून फुलांना साद घालणारी पाखरे, चान्या, पिसोळी, दूधसागरासारखा धबधबा, गावची जुवारी नदी, धुंद आणि मस्त पाऊस, बोरीच्या त्यांच्या वाड्यामागची टेकडी आणि तिथला जांभा दगड, असंख्य प्रकारचे चाफे, पारिजात आणि अबोली, जाई-जुई, बकुळी, सुरंगी... अशा असंख्य रुपांनी, विभ्रमांनी जाणवणारा हा निसर्ग बोरकरांच्या जीवनाचाच एक भाग होता. ऋतुक्रमानुसार बदलणाऱ्या त्याच्या शेकडो रंगछटांनी बोरकरांना आनंदाचा, चैतन्याचा आणि सौंदर्याचा अखंड, अविनाशी प्रत्यय दिला. ईश्वरी सर्जकतेचा रोमहर्षक साक्षात्कार घडवला. ''करंगळीएवढा अभ्रकी पंखांचा लाल चुटुक चतुर जेव्हा अवकाशात भिरभिरत असलेला मी पाहातो तेव्हा मी आश्चर्याने स्तिमित होतो. मंद वायुलहरीची नाजूक कुजबूज माझ्या अंगावर रोमांच आणते. झऱ्याची मंजूळ झुळझुळ, प्रपातांचा गंभीर घोष, वादळी समुद्राची रौद्र गर्जना यातून प्रकटणाऱ्या विविध लयीतल्या संगीताने मला आनंदाच्या उकळ्या फुटतात. सूर्याच्या उदयास्ताच्या वेळी आकाशात जेव्हा मी नाना रंगाचे आणि आकारांचे ढक पाहतो तेव्हा तो दिव्य सोहळा मला थक्क करतो... काळोख्या रात्री मी जेव्हा नक्षत्रांकित आकाशाचा अनंत विस्तार पाहतो तेव्हा सारे ग्रहतारे आपापल्या कक्षा सांभाळून फिरत असतात या जाणिवेने त्यांचे सूत्रसंचालन करणाऱ्या विराट शक्तीचा मला साक्षात्कार होतो... '

'चांदण्याचे कवडसे' या लघुनिबंध संग्रहातील 'वन्ही तो चेतवावा रे' या लघुनिबंधातील या उताऱ्यावरुन निसर्गाची विविध रुपे बोरकरांनी किती कौतुकाने, तन्मयतेने, विस्मयचकित होऊन न्याहाळली आहेत हे जाणवते. निसर्गसौंदर्याच्या अद्भुत साक्षात्कारातून त्यांना ईश्वराचे अस्तित्व जाणवले. सारे स्थिरचर ही एका चैतन्याचीच विविध रूपे आहेत, हे अखिल विश्व ही त्या जगन्नियंत्याची निर्मिती आहे, त्याच्या प्रत्येक अंशात त्याचा अंश मिसळला आहे ही जाणीव वेदकालीन ऋषीमुनींपासून सर्व तत्त्ववेत्त्यांना आणि कवींना झाली ती विश्वाच्या एकसूत्रीपणातून, एकतानतेतून, सृष्टिचक्राच्या अखंड लयीतून, सर्व जगाला वेढून असणाऱ्या लयविलयाच्या गतीतून. ही एकतानता आणि लयविलयाची गती दरक्षणी निसर्गाच्या विविध रुपात व्यक्त होते. या निसर्गाच्या भव्योत्कट सौंदर्याचा बोरकरांना ध्यास जडला. माणसांपेक्षाही हे स्थिरचर त्यांना अधिक सजीव, सहृदय आणि आत्मीय वाटू लागले. निसर्ग हीच त्यांची भाषा बनली. त्यांच्या अविष्काराचे माध्यम, प्रतीतीचे माध्यम बनून गेले. बोरकरांचीकविता इतर सर्व मराठी कवींहून वेगळी ठरते ती ह्या निसर्गप्रेमामुळे.

**(सौजन्य : भारतीय साहित्याचे निर्माते, बा.भ. बोरकर, संपादक – प्रभा गणोरकर, साहित्य अकादमी प्रकाशन)**

****




काव्यरचनेबरोबरच बोरकरांनी ललित लेख. कादंबरी, कथा, चरित्रात्मक प्रबंध असे इतर लेखनही केले. कागदी होड्या, घुमटावरले पारवे, चांदण्यांचे कवडसे, पावलापुरता प्रकाश हे ललित लेखांचे संग्रह तसेच मावळता चंद्र, अंधारातली वाट, भावीण, प्रियकामा, प्रियदर्शिनी, समुद्रकाठची रात्र ही त्यांची ललित साहित्याची पुस्तके प्रसिद्ध आहेत. बोरकरांनी कोकणीतही लेखन केले. त्यांच्या सासाय (१९८०) या संग्रहाला साहित्य अकादमी पारितोषिक लाभले.



# लिहिता सर्जन



डॉ. पी.एस.रामाणी

डॉ. पी.एस.रामाणी हे व्यवसायाने न्यूरोस्पायनल सर्जन. लौकिक अर्थाने ते लेखक नाहीत. पाठदुखीसारख्या दुखण्यावर साध्या-सोप्या भाषेत मार्गदर्शन करताकरता ते लिहू लागले. ते फक्त आपल्या रुग्णापुरते न उरता त्यांची पुस्तके येत गेली आणि डॉ. रामाणी यांच्या हातून तेरा पुस्तके लिहून झाली. ती वाचकांत प्रिय झाली. साहजिकच रामाणी यांना 'लिहिता सर्जन' अशी ओळख मिळाली आणि याच आंतरिक प्रेरणेतून 'ताठ कणा' हे त्यांचे आत्मकथन वाचकांपुढे आले.

**गोवेकरांच्या सेवेत**

*गोव्यात फोंड्याजवळ कवळे संस्थानाच्या मागे, पाच कि.मी. अंतरावर वाडी नावाचं एक छोटसं गाव- किंबहुना वस्ती आहे. तिथला प्रेमानंद नावाचा मुलगा मुंबईत शिकून डॉक्टर होतो, इंग्लडला जाऊन सर्जन होतो आणि न्यूरोस्पायनल सर्जन म्हणून जगभरात ख्याती कमावतो. पण आपल्या मायभूमीला विसरत नाही. किंबहुना इंग्लड-अमेरिकेच्या हाकांकडे लक्ष न देता मुंबईत येऊन सामान्य माणसांना 'ताठ कण्या'ने उभे राहता यावे म्हणून आपले सारे कसब पणाला लावतो. त्यांचा हा जीवनप्रवास वेधक आहेच; पण पंखांमध्ये कितीही बळ आले आणि कितीही मोठी भरारी घेता आली, तरी अशा विभूतींना आपल्या घराची, गावाची ओढ पुन्हा आपल्या घरट्याकडे कशी ओढून नेते, हे डॉ. रामाणी यांच्याच शब्दांत -*

गोव्याच्या परंपरेनुसार, काही कार्यास आरंभ करताना कुलदेवतेची पूजा, अभिषेक केला जातो. ते मी करणार होतोच, पण एक डॉक्टर या नात्यानं मी 'रुग्णसेवा हीच प्रभुसेवा' असं मानत होतो. दीनदुबळे, व्याधिग्रस्त यांना वेदनामुक्त करणं ही एक प्रकारे परमेश्वराची साधना आहे असं मी मानतो. ह्या मार्गावरुन चालताना समोरच्या पेशंटच्या चेहऱ्यावरचं हास्य बघताना नकळत आपला आत्मा सुखावतो. यातच माझ्या मनाची सार्थकता होती. गोव्याला जाण्याची माझी तळमळ डॉक्टर पानसे यांनी समजावून घेतली. त्यांनी मी गोव्याहून परत आल्यानंतर सायन हॉस्पिटलची न्यूरोसर्जरीची जागा स्वीकारावी असं सुचवलं. मी त्यांचे आभार मानले.




आता, मला 'गोवा' ह्या शब्दाचाच ध्यास लागला होता. गोवा मेडिकल कॉलेजनं मला एक वर्षासाठी पूल ऑफिसरची पोस्ट दिली. महिना एक हजार रुपये पगार दिल्लीहून येणार होता. मी उत्सुक मनानं परत गोव्याला आलो होतो. आईलासुद्धा बरोबर आणलं होतं. अडीच वर्षांचा अनुप बूट, पॅण्ट, वर आडवे पट्टे असलेला टी-शर्ट, डोक्यावर हॅट व हातात क्रिकेटची बॅट घेऊन विमानातून उतरताना पाहून सर्वांच्याच नजरेत कौतुक दाटलं होतं. आम्हाला न्यायला कुडाळहून माझा आतेभाऊ प्रकाश केंकरे विमानतळावर आला होता. पुढचे दोन दिवस आम्हाला सोबत म्हणून तो आमच्याबरोबर राहिला.

आता वाडीचं आमचं प्रेमळ घर बंद होतं. मधू स्वतंत्र घर बांधून आपली पत्नी, मीनाक्षीबरोबर मडगावला स्थायिक झाला होता. बाय आरोब्याला होती. सुनंदाचं मुंबईत कमलाकांत थळीबरोबर लग्न होऊन ती मालाडला राहत असे. शालिनीनं तर लग्न न करता नर्सचं सेवाभावी व्रत घेऊन सिल्वासाला नाव कमावलं होतं. आईला आता शेवटपर्यंत मी माझ्याकडे ठेवणार असा मी मनाशी निश्चय केला.

गोव्यात राजवट बदलली होती, पण निसर्ग तसाच सुंदर होता. सागरकिनारे तसेच फेसाळत होते. मांडवी, जुवारी नद्या तशाच वाहत-धावत होत्या. माडांचे शेंडे आजही सोनेरी उन्हात चमकत होते आणि सकाळी ताडी काढताना रेंदेराच्या तोंडातून अजून कांतारांचेच सूर ऐकून मन प्रसन्न होत होतं. मी आताच इंग्लडहून आलो आहे हे विसरुन जायला होत होतं.

हिरव्या झाडीमधील लाल मातीच्या रस्त्यांच्या कडेची पोर्तुगीज धाटणीची, आडव्या बांधणीची, ऐसपैस जुनी घरं तशीच पसरलेली होती. त्या प्रशस्त घरांच्या व्हरांड्याच्या खांबाला टेकून असणाऱ्या बलकावात म्हातारे हातपाय आपल्या मुटूमुटू नजरेनं गेटकडे पाहत आपल्या गल्फला गेलेल्या अंतोन, जॉन, जोसेफ ह्यांची वाट बघत बसलेले आजही दिसत होते. एखादी 'माना'

नुस्त्याची टोपली डोईवर घेऊन खाडी ते मार्केट आजही रस्त्यानं धावत होती. अंगणातल्या तुळशी वृंदावनाला आजही एकादी व्हनिबाय, काकीबाय फेऱ्या घालत होती. कुणी फटोबाब, शाणोबाब अगदी पूर्वीसारखेच राजकारणाच्या गजाली करत तिठ्यावर उभे दिसत होते. ते सर्व बघून मन कसं खूश होऊन गेलं! ही माझी माणसं होती. माझी माती आणि माझं आकाश बघून काम करण्याचा उत्साह वाढला.

स्वतंत्र गोव्याचा संपूर्ण कायापालट १९७४पर्यंत झाला होता. वाडीच्या खोपटीपर्यंत ज्ञानगंगा पोचली होती. गावची सारी मुलं शिकत होती. 'शिकलो तर टिकलो' याची जाणीव होऊन गोवेकरांनी धूर्तपणे आपल्या मुलांना शाळेत घातलं होतं. घरच्या मुली नोकरीनिमित्तानं घराबाहेर पडल्या होत्या. पूर्वी, फक्त जत्रा-पालखी-चवथ किंवा हळदीकुंकवाच्या निमित्तानं घरातून बाहेर पडणारी गोमंतकीय आधुनिक स्त्री आता भल्या सकाळी, खांद्यावर पर्स लटकावून बससाठी धावताना दिसत होती. आधुनिक झाली तरी तिची पूर्वीची गोमंतकीय वेशभूषा मात्र तीच होती. केसांत फुलं माळण्याची, चांगले कपडे नेसण्याची, सुंदर दिसण्याची तिची हौस आजही तीच होती. अर्थार्जनाचं महत्त्व तिनं ओळखलं होतं. स्वातंत्र्याच्या परिसस्पर्शानं कात टाकलेल्या सर्पासारखं समाजजीवन बदललं होतं. ते बघून मनाला समाधान झालं. गोव्यात आल्यावर प्रथम कुलदेवता शांतादुर्गेचं आणि नंतर वाडीला जाऊन माझ्या घराचं दर्शन घेतलं. वाडी ते शांतादुर्गा-कवळे हा सारा परिसर अगदी तसाच, शांत-नि:शब्द होता. त्या भागात नांदणारी शांतता, मंदिराचं पावित्र्य, मनोहारी निसर्ग बघून मन स्तिमित झालं होतं. भगवान परशुराम ऋषींच्या आशीर्वादानं पुनित झालेली ही देवभूमी, १९७४ साल उजाडलं तरी थोडीशी निरागस राहिली होती. इथं माणसांवर निसर्गाचा वरदहस्त आहे. माणसांची आजही देव-देवतांवर श्रद्धा आहे. पापभीरु वृत्तीच्या माणसांची संस्कृती आजसुद्धा इथं नांदत आहे.

''प्रेमानंद, बरो मरे?'' अशी एकेरी हाक ऐकली आणि मन कसं पिसासारखं हलकं झालं! दुर्भाटच्या खाडीवरुन पलिकडच्या किनाऱ्यावरची काळपट हिरवी झाडी बघताना, वाडीच्या नारायणदेवाचं मंदिर डोळे भरुन बघून मन प्रफुल्लित झालं होतं.

विचारांच्या भरात मी कवळ्याच्या मठात जाऊन स्वामीजींचं दर्शन घेतलं. त्यांना नतमस्तक होऊन नमस्कार करताना मनात म्हणालो, 'स्वामीजी, अहंकाराचा वारा न लागो माझ्या चित्ता, आशीर्वाद देणार तर इतकाच द्या, स्वामी.'

प्रसन्न मनानं पणजीला जाऊन, मी अधिष्ठाता डॉक्टर चौधरींच्या ऑफिसमध्ये हजेरी लावली आणि कामावर रुजू झालो. गोवा मेडिकल कॉलेजमध्येसुद्धा न्यूरोसर्जरी डिपार्टमेंट नव्हतं, म्हणून मला डिपार्टमेंट ऑफ सर्जरीच्या डॉक्टर सरस्वती गुप्ता यांच्या हाताखाली ठेवण्यात आलं. माझं नाव ऐकून, विशेषत: मी परदेशातून एक तज्ञ डॉक्टर बनून आलो आहे हे समजून अनेक रुग्णांनी हॉस्पिटलकडे धाव घेतली. हां हां म्हणता बरेच रुग्ण जमा झाले. सरस्वतीबाई पाईल्स, फिशर, फिस्टुला, हर्निया अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करुन जेवायला घरी गेल्या, की त्यानंतर मला ऑपरेशन थिएटर मिळे व तिथे माझ्या रुग्णांना नेता येत असे. असा एक कायदा आहे, की मेंदूवरची नाजूक शस्त्रक्रिया शक्य तो सकाळी आणि अगदी स्वच्छ ऑपरेशन थिएटरमध्ये करायची असते. विशेषत: पाईल्स, फिशर, हर्निया वगैरे ओंगळ समजल्या जाणाऱ्या जागांवरचं ऑपरेशन त्या थिएटरमध्ये केल्यानंतर मेंदूवर शस्त्रक्रिया करणं हे वैद्यकीय शास्त्राच्या तत्त्वांना हरताळ फासण्यासारखं होतं. वारंवार विनंती करुनसुद्धा डॉक्टर सरस्वतींनी सहकार्य दिलं नाही. माझे अनेक अर्ज, पेपर तप्तरतेने पुढं सरकावणं, त्यांच्या हाती असूनसुद्धा त्यांनी सतत दिरंगाई केली. तो त्यांचा एक वेगळा स्वभाव आहे असं समजून मी मात्र माझ्याकडे आशेनं येणाऱ्या रुग्णांवर उपचार करत होतो. अनेक ऑपरेशन यशस्वी करुन दाखवली. डॉ. चौधरी खूष होते. या ऑपरेशनमुळे हॉस्पिटलच्या कीर्तीत भर पडत गेली. मीही समाधानी होतो.

**डॉ. पी.एस. रामाणी**

**(सौजन्य : ताठ कणा, ग्रंथाली प्रकाशन)**

****









# ‘स्वामी’ मराठी कथेचा



जी. ए. कुलकर्णी

जी.ए.कुलकर्णी यांची कथा साहित्य अकादमी पुरस्काराच्या पात्रतेची नव्हती असे म्हणण्याचे धाडस कुणी करु शकणार नाही एवढी ती श्रेष्ठ आहे. तरीसुद्धा प्रकाशनाचा काळ आणि पुरस्काराचे साल यातील तांत्रिक गफलतीमुळे आणि कुणीतरी घेतलेल्या आक्षेपामुळे दुखावलेल्या जी.एं.नी तो पुरस्कारच परत करुन टाकला आणि हा मराठी कथेचा स्वामी पुरस्काराविना कोरडा राहिला.

*‘कथाकार’ म्हणून सुपरिचित असलेल्या जी.ए.कुलकर्णी यांचा जन्म १० जुलै १९२३ रोजी चिकोडी तालुक्यातल्या एकसंबा या गावी झाला. याच गावात त्यांचे शालेय शिक्षण झाले. माध्यमिक शिक्षण बेळगावात झाले. १९४३ साली त्यांनी लिंगराज महाविद्यालयातून बी.ए., आणि एम.ए. इंग्रजी विषयात (१९४६) केले. काही काळ मुंबईला सरकारी खात्यात, कारवारच्या महाविद्यालयात नोकरी केल्यानंतर धारवाडच्या जनता महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून ते रुजू व तेथेच स्थायिक झाले. निवृत्तीनंतर काही दिवसांनी, अखेरच्या काळात त्यांनी पुण्यात वास्तव्य केले.*

*१९४०च्या सुमारास जी.एं.नी आपल्या कथालेखनाचा श्रीगणेशा केला. त्यांचा पहिला संग्रह निळासावळा (१९५९), त्यानंतर पारवा, हिरवे रावे, रक्तचंदन, काजळमाया, रमलखुणा, सांजशकुन, पिंगळावेळ त्यांच्या हयातीत प्रसिद्ध झाले. तर कुसुमगुंजा, आकाशफुले, सोनपावले हे संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाले. या सर्व कथासंग्रहातील कथांमधून जी.एं.च्या अलौकिक प्रतिभेचे दर्शन घडते. मराठी वाचकांच्या तीन पिढ्यांना जी.एं.ची कथा नेहमीच व सारखीच मोहवीत राहिली.*

*जीएंच्या कथेतील व्यक्ती, स्थळे आणि परिसर यांचा प्रत्यक्षात शोध घेऊन त्याचा वास्तवाशी धागा जुळवण्याचा आणि कथेची बीजे शोधण्याचा एक आगळा वाङ्मयीन प्रयोग अ.रा.यार्दी आणि वि.गो.वडेर यांनी केला. जीएंची कथा, परिसरयात्रा नावाने तो पुस्तकरुपात सचित्र प्रसिद्ध झाला आहे. त्यातील हा एका वाटेवरचा छोटा प्रवास –*

****

‘स्वामी’ या कथेतले गूढगर्भीचे रहस्य शोधताशोधता ‘स्वामी’मध्ये रूपांतरीत झालेल्या प्रवाशाचे आणि महंताचे संवाद वाचकांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहेत. ‘स्वामी’ या कथेचे गडदपण अधोरेखित करताना जीएंनी पाच वेळा संन्याशी, पंचावन्न वेळा महंत, तेवीस वेळा मठ आणि साठ वेळा स्वामी हा शब्द पुनरावर्तित केला आहे. जीएंनी हे पुनरावर्तन जाणुनबुजून केले आहे असे आम्हाला मुळीच म्हणायचे नाही. जीए ज्या वेळी कथा लिहित, त्या त्या वेळी त्यांच्या लेखनाचा प्रोसेस कसा चालत असेल याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने अशा पुनरावर्तित शब्दांचा निश्चितपणे उपयोग होईल असे आम्हाला वाटते.

आमचे दुसरे गृहीतक असे की, जीएंची ‘सोनूमावशी’ ही म्हसवडमध्ये राहात होती, आणि जीए त्यांच्या लहानपणी म्हसवडमध्ये राहून आले आहेत. ‘कैरी’ या कथेतल्या आशयाने आम्ही पार वेडावून गेलो हे तर खरेच, पण यातल्या भावविश्वाच्या पिसाऱ्याने आमच्या मनाचे मोर पिसारु लागले हे निश्चित. याा कथेत श्रीपूमामा चाळीस वेळा येतो, तर तानीमावशी एकशे पंचेचाळीस वेळा येते. कथानायकाचे बालविश्व समृद्ध करणारी, त्याच्या मनाच्या आकाशात नक्षत्राच्या प्रसन्न तेजाने झळाळत राहणारी तानीमावशी इतक्या वेळा येते, यावरुन जीएंच्या मनातला खोल तळ निवळशंख पाण्यासारखा स्वच्छ दिसतो. ‘कमळी’ हे नाव सात वेळा येते, तर ज्या मोराच्या न दिसण्याने बालमान सैरभैर होते असा मोर या कथेत वीस वेळा येतो.

गावात एकशेचाळीस वर्षांपूर्वी ब्रिटीशांनी स्थापन केलेली नगरपरिषद आहे.

गावात बरीचशी पडझड झालेला भव्य राजवाडा असून त्यात इतिहासप्रसिद्ध नागोजीराजे यांचे वंशज राहतात.

गावात बालवाड्या आहेत, शाळा-विद्यालये आहेत, महाविद्यालये आहेत.

गावाच्या व भोवतालच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या विविध बँका व आर्थिक संस्था आहेत.

गावात दिवाणी व फौजदारी अशी दोन्ही न्यायालये आहेत.

गावात बुधवारी आठवड्याचा बाजार भरतो, आणि नेहमीच गजबज असलेला स्टँडचा परिसर अधिकच गजबजून जातो.

बसस्टँडच्या डाव्या बाजूने नीट गेलेल्या रस्त्याने गेले, की उजव्या बाजूला माणगंगेच्या पात्राची विशाल सोबत जाणवू लागते. ही नदी

जी.ए.

गावाच्या पश्चिमेकडून उत्तर-आग्नेय-पूर्व अशी वाहात जाते. एका अर्थाने या नदीने संपूर्ण गावाला जवळजवळ साठ टक्के वेढलेले आहे, असे म्हणायला हरकत नसावी. स्टँडवरच्या त्या रस्त्याने चालत गेले, की दोन-तीन तासात सगळे गाव पाहून संपते.

म्हसवड हे गाव छोटेसेच व सदा गजबजलेले असून ते खरोखरच स्वच्छ व सुंदर आहे. गावातले रस्ते सुरेख आहेत. ते अरुंद व बोळसदृश असले, तरी नजर लागावी असे आहेत. रस्त्यांचे डांबरीकरण झालेले असून ते नेहमी नुकतेच झाडलेले व सडा-रांगोळीच्या प्रतीक्षेत असल्यासारखे वाटतात. विशेष लक्षात राहणारी व इतर शहरांनाही अनुकरणीय वाटावी अशी एक गोष्ट म्हणजे रस्त्यांच्या कोपऱ्याकोपऱ्यांवर उभे केलेले, लहानच पण लक्ष वेधून घेणारे, दिशा-स्थळदर्शक फलक. त्यामुळे नवख्या माणसाला कुठे काय आहे, काय नाही हे चटकन समजते व जास्त कोणाला विचारीत न बसता हव्या असलेल्या ठिकाणी अचूक पोचता येते.

म्हसवडमधील घरेही मातीची, कौलारु व बैठी असून मधूनच जुन्या संस्थांनी काळाची आठवण जागविणारी आहेत, आणि जमिनीतून वर ओघळ फुटल्याप्रमाणे इथे शहरी सिमेंट-जंगल अजिबात दिसून येत नाही.

आम्ही म्हसवडला आलो होतो ते जीएंच्या 'कैरी' कथेतल्या परिसराचा शोध- आस्वाद घेण्यासाठी म्हणून! त्यामुळे पहिल्यांदा आम्ही, आणि आधीच ठरविल्याप्रमाणे ॲडव्होकेट श्री. सुधाकर नेसकर यांना जाऊन भेटलो. आमच्या कामाबद्दल सविस्तर माहिती दिली. ते आम्हाला 'आधी नाथाच्या देवळात जाऊ या', असे म्हणाले. नाथाच्या देवळाकडे जाताना वाटेतच श्री. आप्पासाहेब गुरव भेटले आणि त्यांच्या रूपात आम्हाला चिंतामणीच मिळाल्यासारखे झाले. वय वर्षे अठ्ठ्याहत्तर, बुजुर्ग पत्रकार, अलीकडेच बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावे दिला जाणारा 'दर्पण पुरस्कार' त्यांना मिळाला होता. या आप्पासाहेबांनी आम्हाला अनेक विषयांची खूप माहिती दिली, आणि सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासनही दिले. पुढे आप्पासाहेबांना श्री. बी.आर. टकलेगुरुजी भेटले. त्या दोघांच्या ओट्यात आम्हा दोघांना घालून सुधाकर नेसकर घरी आले आणि आमच्या 'कैरी'मधील शोधयात्रेला सुरुवात झाली.

म्हसवड गाव तसे लहानच असले, तरी गावात अनेक मंदिरे आहेत. उदाहरणार्थ, श्री रुक्मिणीपांडुरंग मंदिर, श्री यमाई मंदिर, श्री यल्लमा मंदिर, श्री गणेश मंदिर, श्री दत्त मंदिर, श्री तुकाराम मंदिर, श्री रामहनुमान मंदिर, श्री सत्यनाथ मठ, श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर इत्यादी. परंतु म्हसवडमधले सगळ्यात मोठे आणि सगळ्यात जुने देऊळ म्हणजे श्री सिद्धनाथाचे देऊळ !

भारतात काळभैरवाची स्थाने फक्त चारच ठिकाणी आहेत. पहिले काशी विश्वेश्वर, दुसरे उज्जयिनी, तिसरे हरिहरेश्वर (रत्नागिरीजवळ), आणि चौथे म्हसवडचे श्री सिद्धनाथ!

श्री सिद्धनाथ हे म्हसवडचे ग्रामदैवत असून ते 'नाथाचे देऊळ' म्हणूनही ओळखले जाते. या देवळाचे बांधकाम करड्या रंगाच्या दगडांनी केलेले असून ते 'बलदंड' या नावाला शोभेल असेच आहे. या देवळाचा गाभारा सुमारे दहा बाय पंधराचा आहे. पण बाहेरचा आवार मात्र प्रशस्त आहे. या देवळाच्या भिंतीची उंचीही चांगली नजरेत भरणारी आहे. देवळाच्या शिखराची उंची अंदाजे तीस-पस्तीस फूट असून ते अष्टकोनाकृती आहे. या देवळाच्या मध्यभागी चार दगडी खांब असून त्यावरची कोरीव कलाकुसर अतिशय देखणी आहे. देवळात नाथाची मन भरुन टाकणारी मूर्ती असून तिच्या बाजूला श्री जोगेश्वरीची मूर्ती आहे. या देवळाच्या व मूर्तीच्याही बाबतीत अनेक गोष्टी कुतुहलजनक आहेत. म्हणजे नाथाची मूर्ती उभी असली, तरी नग्न आहे. जैन तीर्थंकरांचा भास जाणवून देणारी आहे. पण तिच्या हातात आयुधेही आहेत. या मूर्तीच्या उजव्या बाजूच्या भिंतीत एक कोनाड्यासारखी जागा असून तिथे खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. तिथून उतरुन आत गेले, की बरोबर नाथाच्या मूर्तीखाली शिवपिंड आहे. वर्षातून एकदाच, महाशिवरात्रीला, ही शिवपिंड दर्शनासाठी खुली केली जाते. त्या भुयारासारख्या जागेत एका वेळी एकच व्यक्ती जाऊन येऊ शकेल, एवढी अरुंद वाट आहे.

नाथाच्या देवळाच्या निमित्ताने जीएंनी




जीएंच्या कथेतील व्यक्ती, स्थळे आणि परिसर यांचा प्रत्यक्षात शोध घेऊन त्याचा वास्तवाशी धागा जुळवण्याचा आणि कथेची बीजे शोधण्याचा एक आगळा वाङ्मयीन प्रयोग अ.रा.यार्दी आणि वि.गो.वडेर यांनी केला. जीएंची कथा:परिसरयात्रा नावाने तो पुस्तकरुपात सचित्र प्रसिद्ध झाला आहे.



'कैरी'ची सुरुवातच 'मोटरस्टँडवरुन दवाखान्याकडं येताना' अशी होते.




'चंद्रावळ', 'सोडवण', 'भोवरे', 'राधी', 'गुंतवळ', 'काकणे', 'तुती', 'कैरी', 'घर', 'राक्षस', 'रात्र झाली गोकुळी', 'बळी' अशा जी.एं.च्या काही कथा मराठी कथेची शिखरे होत.

त्यांची 'स्वामी' ही कथा राजकीय विचारसरणीसंबंधी माणसाने माणसावर लादलेले निर्बंध स्पष्ट करणारी करुण रूपककथा असून तिचा शेवट आशेच्या हिरव्या पानाचे आणि सूर्याच्या स्वच्छ जीवनदायी प्रकाशाचे स्मरण जागवणारा आहे. कथा या साहित्यप्रकाराच्या सर्व शक्यता जी.एं.नी आपल्या कथेत फार प्रभावीपणे मुरवून घेतल्या. आकाराने लहान असूनही मानवी जीवनासंबंधी व्यापक आणि सखोल आशय सामावून घेण्याइतपत सामर्थ्य कथा धारण करु शकते हे त्यांनी सिद्ध केले. मानवी भावनांचे शतरंग उधळत जी.एं.च्या कथेने मराठी कथा आणि मराठी वाचकांचे भावविश्व ही दोन्ही समृद्ध केली.

एकूणच देवळांबद्दल आणि देवळांतील माणसांबद्दल सुंदर भाष्य केले आहे. 'जगात पिशाच्च। अंतरी शहाणा। सदा ब्रह्मीं जाणा। निमग्न तो।' असे जे म्हटले, ते फार वेगळ्या अर्थाने घ्यायला हवे. जसा खरा सत्पुरुष बाहेरुन सर्वसामान्यांसारखा दिसत असतो, त्यामुळे त्याला ओळखणे जसे कठीण असते, तसे जीएंचे हे भाष्यही समजून घेणे कठीण आहे. त्यासाठी त्या भाष्याच्या अंतरंगातच शिरायला हवे. जीएंच्या अनेक कथांना देवळांचा परिसर पार्श्वभूमी म्हणून लाभलेला आहे, पण आपले अंतरंग लपविणाऱ्या सत्पुरुषांप्रमाणेच त्यांची ती देवळे आहेत. त्यांच्याशी सलगी करुन, 'शरण' भाव बाळगूनच त्यांच्या अंतरंगात शिरता येते. त्या दृष्टीने त्यांच्या वीज, कवठे, वंश, तळपट, लक्ष्मी, राधी, स्वामी, फुंका इ. कथांमध्ये येणारे देवळांचे उल्लेख-संदर्भ तपासून पाहण्यासारखे आहेत.

शिवाय हरिद्राकुंकुमाक्षतेप्रमाणे कथेच्या आरंभी, मध्यावर आणि शेवटी येणारे नाथाच्या देवळाचे 'कैरी'मधले तिन्ही उल्लेख अनाहत घंटानादाप्रमाणे कथाभर निनादत राहतात.

जीएंनी आपल्या कथा या सत्याचा शंभर टक्के आधार घेऊन लिहिल्या, किंवा त्यातला परिसर शंभर टक्के खरा आहे, अशा अतिरेकी विधानांना आम्ही कधीच थारा दिलेला नाही, आणि देणारही नाही. त्याचबरोबर 'काही वेळा एक स्थळ समोर ठेऊन भोवतालच्या व्यक्तींचे जीवन दाखविता येते.' (जीएंची पत्रे, खंड २, पृ.१६) हे त्यांचेच वाक्य नजरेआड करुनही चालणार नाही. पण एवढे मात्र खरे, की जीएंच्या बालमनावरचे कलासक्त मनावरचे परिसराचे संस्कार फार खोलवर आहेत, दृढ आहेत.

'कैरी' कथेत याचा पदोपदी प्रत्यय येतो.

आम्हाला इथे एक गोष्ट नम्रपणे नमूद करावीशी वाटते, ती ही की जीएंच्या 'कैरी', 'राधी' आणि 'तुती' या तीनही कथा त्यांच्या बाल-मनाशी, बाल-जीवनाशी निगडित असाव्यात. त्यांच्या रक्तातल्या कणाकणांचे शिंपण त्या कथांमधून झालेले आहे, आणि म्हणूनच या तिन्ही कथांचा 'कथात्रयी' या दृष्टीने अभ्यास व्हायला हवा!

चौतीस पृष्ठसंख्या असलेली 'कैरी' ही कथा जीएंनी कधी लिहिली, याची निश्चित नोंद आढळली नाही. २६ नोव्हेंबर १९५४ च्या एका पत्रात 'बनगरवाडी'च्या संदर्भात जीए लिहितात- 'माण तालुक्यात एका ठिकाणी मी दोन महिने सुटी घालविली असल्यामुळे त्यातील व्यक्ती, भाषा, धनगरांचे गाणे-नाचणे याची मला पुन्हा स्मृती झाली.' म्हणजे तेव्हापासून या कथेचे बीज त्यांच्या मनात आकारत असावे अशी आमची प्रामाणिक भावना आहे. कारण 'कैरी' कथा 'पिंगळावेळ'मध्ये असून त्या संग्रहाची पहिली आवृत्ती एकोणीसशे सत्याहत्तरमध्ये प्रकाशित झाली. सारांश, त्याही आधी चाळीसेक वर्षे कथानायक त्या म्हसवडमध्ये हिंडला-फिरला असावा. म्हणजे सुमारे सत्तर वर्षांपूर्वीचे म्हसवड आणि आजचे म्हसवड यात नक्कीच फरक आहे. परंतु आमच्या सुदैवाने आम्हाला म्हसवडमध्ये जे दोघे मार्गदर्शक मिळाले होते, त्यांतील एक अठ्ठ्याहत्तर वर्षांचे होते, तर दुसरे अठ्ठावन्न वर्षांचे! दोघेही तिथेच जन्मलेले, वाढलेले, जगलेले आणि जगत असलेले! त्यामुळे 'कैरी'चा परिसर शोधताना अडचण जाणवली, पण तितकी नाही!

'कैरी'ची सुरुवातच 'मोटरस्टँडवरुन दवाखान्याकडं येताना' अशी होते. आम्हीही मग त्या मोटरस्टँडपासूनच श्रीपूमामा व कथेतल्या 'मी' या कथानायकाचे बोट धरुन चालू लागलो.

**- अ.रा. यादी, वि.गो. वडेर**

**(सौजन्य: जीएंची कथा : परिसरयात्रा, राजहंस प्रकाशन)**

****


**ग्रंथाली**



**अनाहत**

**मंदाकिनी पाटील**

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

गेल्या दोन दशकात लिहिणाऱ्या कवयित्री त्यांच्या पूर्वासुरींच्या पावलावर पाऊल टाकून लिहित आहेत. मंदाकिनी पाटीलही या वाटेवर चालत आहेत. स्त्रीच्या जगण्याला समर्थपणे भिडताहेत. आणखी नवी आशयसुत्रे, नवी प्रतिमासृष्टी घेऊन त्या वाचकांपुढे पुढील काळात येतील अशी अपेक्षा करण्याइतकी त्यांची कविता परिपक्व होत आहे हे नमूद करायला हवे.

**- नीरजा**

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने




भूतकाळातल्या आठवणी आणि संवेदना (नॉस्टॅल्जिया) जाग्या करणारा एक खजिना. नर्मविनोदाची झालर असलेले हे लेखन, वाचायला हलकेफुलके पण अतिशय प्रामाणिक आणि परखड आहे. यात विचारलेले गहन प्रश्न कुठल्याही वयाच्या वाचकाला विचार करायला लावतील.

## पन्नाशीचा भोज्या

रवी अभ्यंकर

किंमत ३०० रुपये




आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्नांना सखोलपणे भिडणारं हे पुस्तक भारतातील दुष्काळाच्या इतिहासाचा सर्वांगीण वेध घेतंच; परंतु चीन, दक्षिण कोरिया, इथियोपिया या देशांनी आर्थिक प्रगती साधून सुकाळ कसा निर्माण केला याचंही तुलनात्मक विवेचन करतं. निळू दामले यांच्या खास शैलीत टिपलेली ही बोलकी नि जिवंत चित्रं.

जत, चीन, दक्षिण कोरिया, ईथियोपिया

## दुष्काळ-सुकाळ

निळू दामले

किंमत २०० रुपये




'आनंदमेवा' शिबिरात सहभागी झालेले पालक, त्यांची मुलं यांनी करायचा आपापल्या संगोपनाचा गिरवलेला आदर्श वस्तुपाठ, शिबिरातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून हळूहळू कसा साकारत गेला त्याचं हे पुस्तक. मुलांच्या जडणघडणीत निकोप समाजाचे महत्त्व अधोरेखित करणारं पुस्तक.

## आनंदमेवा

डॉ. लता काटदरे

किंमत २०० रुपये



जमिनीच्या व्यवहारात जमीनमालकाकडून विश्वासघाताने होरपळल्या गेलेल्या कष्टकरी कुळाची–त्याच्या मनस्वी कुटुंबाची हेलावून टाकणारी कादंबरी

## धूळमाती

कृष्णात खोत

किंमत १२५ रुपये

मौज प्रकाशन गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

# ग्रंथाली ताजी पुस्तके...

## स्वान्तसुखाय पद्मा कऱ्हाडे




अनेक व्यक्ती अशा असतात की, एखादी घटना घडली तर ती अलिप्तपणे पाहात राहतात आणि विसरूनही जातात. मात्र पद्मा कऱ्हाडे हातात लेखणी घेतात. ...आणि जरी स्वान्तसुखाय म्हटलं तरी त्यांचं विविध सामाजिक विषयांवरचं लिखाण ही अशी मर्यादा ओलांडून, प्रत्येक लेख हा आपल्याशी बोलत राहतो!

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १२० रु.**

## भटकंतीची साद पद्मा कऱ्हाडे



पद्माताईंना मुळात भटकण्याची खूप आवड. परदेशात असो अथवा देशात. त्यांची भटकंती मात्र निर्हेतूक होत नाही. त्या नेहमी सजग असतात. म्हणून आनंदवन असो, पाँन्डेचेरी असो त्यांचा तिसरा नेत्र हा नावीन्याच्या शोधात असतो; कान टवकारलेले असतात. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला एक वेगळा आयाम प्राप्त होतो.

**मूल्य २०० रु. ● सवलतीत रु.**

## बालघाटची साद भारत गजेंद्रगडकर




उस्मानाबादच्या भारत गजेंद्रगडकर यांच्या नसानसात, निरीक्षण आणि विचारांच्या अनुषंगाने पत्रकारिता सदैव जागरूक असते. त्यामुळे या जिल्ह्यातील एखादे ऐतिहासिक ठिकाण, पुराणवस्तुसंग्रहालय, धार्मिक स्थळ वा क्षेत्र असो, आणि त्या त्या संदर्भातील व्यक्ती असोत... परंपरा असो... या साऱ्याची सामाजिक अंगानं अभिव्यक्ती त्यांच्या लिखाणातून होते.

**मूल्य १०० रु. ● सवलतीत ६० रु.**

## धाराशिव ते उस्मानाबाद भारत गजेंद्रगडकर




उस्मानाबाद जिल्ह्याचा निजामाच्या काळापासूनचा तपशील, बहुतांशी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रारंभीच्या काळापासून कार्यरत व्यक्ती आणि लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका यांचा ऊहापोह प्रस्तुत पुस्तकात होतो.

**मूल्य १८० रु. ● सवलतीत ११० रु.**

## चंदेरी सृष्टी सोनेरी गोष्टी प्रकाश चान्दे



हा चित्रपटसृष्टीचा इतिहास नव्हे. बोलपटसृष्टीच्या सुवर्णयुग काळातल्या मनोरंजक गोष्टींची ही नोंद आहे. तो काळ अनुभवलेल्यांना स्मरणरंजन आणि न पाहिलेल्यांना त्यांचे कुतूहल जागृत होईल अशा गोष्टी या लेखात मांडल्या आहेत. त्या वाचून चित्रपटसृष्टीचा इतिहास जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण व्हावी, हाही उद्देश या लेखनामागे आहे.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**

## मराठीतील साहित्यलेणी दीपक घारे




'लीळाचरित्रापासून 'संवादा'पर्यंतच्या निवडक मराठी ग्रंथांचा तपशील व थोडक्यात परिचय. प्रत्येक ग्रंथप्रेमीच्या संग्रही असायलाच हवे असे संदर्भपुस्तक!

**मूल्य १०० रु. ● सवलतीत ६० रु.**

## कामगार आहे मी... मार्कुस डाबरे




व्होल्टास ॲण्ड व्होल्कार्ट एम्प्लॉईज युनियनचा कार्यकर्ता ते ऑल इंडिया व्होल्टास ॲण्ड व्होल्कार्ट एम्प्लॉईज फेडरेशनचा सरचिटणीस या १९६५ ते १९९७ काळातील जीवनप्रवास. सौहार्द, फसवणूक, विखारी अनुभवांतून घडलेल्या प्रवासाची आत्मकथा.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

## वाझुंठाव भाऊ गावंडे



नागपूर-अमरावती भागातल्या सेल्स टॅक्स ऑफिसर प्रमोदची आकसापोटी मुंबईत बदली होते. शांत जीवनातून या धावत्या मायानगरीत आल्यावर त्याला काही वर्षांत जीवघेण्या, धक्कादायक प्रसंगांना सामोरे जावे लागते. या घटनांत त्याच्या आप्तांचे मृत्यू होतात आणि तो बेभान होतो...

**मूल्य ५०० रु. ● सवलतीत ४०० रु.**

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

प्रस्तुत

# महापर्यटन

## पर्यटनातून रोजगाराच्या संधी

**डीडी सह्याद्री वाहिनीवर १ नोव्हेंबर पासून दर शनिवारी रात्री ८ ते ९**

**संकल्पना:**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने पर्यटनाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी या विषयी एक तासांच्या १३ भागांची एक मालिका तयार केली आहे. या मालिकेच्या माध्यमातून निवास व न्याहारी, महाभ्रमण, होम स्टे, स्मृती चिन्हे या संबंधीच्या उपक्रमांची माहिती राज्यातल्या सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा महामंडळाचा मानस आहे.

या मालिकेत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अधिकारी, पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध योजनांचे लाभधारक चर्चेच्या माध्यमातून विषय मांडतील. त्याच बरोबर प्रत्यक्ष पर्यटन स्थळी जाऊन केलेले चित्रीकरण या कार्यक्रमात दाखविण्यात येईल. गेल्या काही वर्षात पर्यटनाच्या संकल्पना बदललेल्या उदा. कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन, आरोग्य, संस्कृती, कला व हुन्नर, ऐतिहासिक वारसा, शैक्षणिक सहल, खाद्यसंस्कृती या सगळ्यांचा मागोवा या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

या मालिकेमुळे अनेकांना पर्यटनासंबंधी योगदान देण्याची प्रेरणा मिळेल, त्यांना रोजगाराची संधी मिळेल आणि त्यांच्या सहभागातून राज्याच्या पर्यटन क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल.

अधिक माहितीसाठी संपर्क: **डॉ. मुकेश कुळकर्णी**, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्याशी mukeshmtdc@gmail.com संपर्क साधता येईल.

या मालिकेत खाली दिल्याप्रमाणे विविध विषयांवरील पर्यटन निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी विषयी माहिती देण्यात येणार आहे



**कृषी पर्यटन व रोजगाराच्या संधी**





**ऐतिहासिक वारसा, शैक्षणिक सहल व रोजगाराच्या संधी**

**परंपरा, संस्कृती व रोजगाराच्या संधी**





निसर्ग व
रोजगाराच्या
संधी





कला, हुन्नर, स्मृतीचिन्हे व
रोजगाराच्या संधी



निवास न्याहारी ग्रामीण,
होम स्टे व रोजगाराच्या
संधी



निवास न्याहारी शहरी व
रोजगाराच्या संधी



वेगळ्या उपक्रमावर आधारित
पर्यटन रोजगाराच्या संधी



खाद्य संस्कृती व
रोजगाराच्या संधी



आरोग्य मन:शांती व
रोजगाराच्या संधी




पर्यटनातून गाव विकास, वेळास व
स्वच्छ भारत अभियान



पर्यटन क्षेत्र संबंधित
व्यापक चर्चा, संधी व
महामंडळाचे योगदान

संपर्क: ०८८७९२२२०९२

## पर्यटकांसाठी निवास व न्याहारी योजना

राज्यातील विविध धार्मिक स्थळे, ऐतिहासिक महत्वाच्या जागा, समुद्र किनारे, डोंगरद-या व जंगले याकडे पर्यटकांचा ओघ जास्त प्रमाणात वाढलेला आहे व त्यासाठी प्रत्येक ठिकाणी लगेच पर्यटन संकुले बांधण्यावर खर्च करणे फायदेशीर ठरणार नाही. अशा स्थळांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की ब-याच ठिकाणी स्थानिक लोकांकडे दोन ते पाच अतिरिक्त खोल्या व काही घरे, बंगले उपलब्ध आहेत. स्थानिक घरमालकांची घरे / बंगले पर्यटकांच्या सोईसाठी उपलब्ध करुन दिल्यास दोन फायदे संभवतात – एक म्हणजे पर्यटकांसाठी किफायतशीर पध्दतीवर स्वच्छ, राहण्याची आणि निवासाची घरगुती सोय उपलब्ध होईल. तसेच स्थानिक घरमालकांना किंवा त्यांच्या नोतेवाईकांना स्वयंरोजगार निर्माण होईल. दुसरा महत्वाचा फायदा म्हणजे राज्याबाहेरील किंवा परदेशी पर्यटकांना स्थनिक राहून स्थानिक संस्कृती, राहणी, चालीरिती आणि खाद्यपदार्थ यांची चांगल्या प्रकारे ओळखदेखील होईल आणि पर्यटन स्थळांना भेट दिल्याचा खरा आनंद मिळेल. या दृष्टीने शासनाने दि.२० ऑगस्ट १९९६ रोजी झालेल्या बैठकीत निवास व न्याहारी योजनेस मान्यता दिली. या योजनेमध्ये पर्यटकांच्या सोयीसाठी स्थानिक लोक कमीतकमी ०२ व जास्तीत जास्त ०५ खोल्या उपलब्ध करून देऊ शकतात. संपूर्ण महाराष्ट्रात सदर योजना अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत असून जवळपास १००० च्या वर अशी एकक महाराष्ट्रात सुरु आहे. या योजनेमुळे स्थानिकांसोबतच देशी विदेशी पर्यटक याचा लाभ घेत आहे. निवास व न्याहारी योजना अधिक वृध्दींगत व्हावी व पर्यटकांना चांगल्यात चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी निवास व न्याहारी योजनेत सिल्वर, गोल्ड व डायमंड अशी स्टार कॅटेगरी लागू करण्यात आली आहे.

## महाभ्रमण योजना

महाराष्ट्रात भ्रमंती करून महाराष्ट्राच्या मातीची, संस्कृतीची व परंपरांची ओळख करून घेता यावी म्हणून पारंपारिक पर्यटनापेक्षा वेगळी अनुभुती देणारं असं काही तरी पर्यटकांना दिलं पाहिजे, या कल्पनेतून पुढे आली एक संकल्पना, महाभ्रमण. महाराष्ट्रात काही शेतकरी, खाजगी उद्योजक तसेच अशासकीय संस्था पर्यटनाच्या क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करीत आहेत. त्यातून पर्यटकाला महाराष्ट्राच्या बहूरंगी अस्तित्वाची ओळख होते. मातीशी नाळ जोडलेल्या शेतकऱ्याची जीवनशैली, डोंगर-दऱ्यातून पदभ्रमण करताना पानाफुलांची सळसळ, वाऱ्याने घातलेली शीळ अनुभवायला, घनदाट जंगलांच्या पाणथळ जागांवर श्वापदाचा अलगद वावर, अवखळ नद्यांच्या प्रवाहाशी खेळ समुद्र तहाच्या अनोख्या विश्वाचा शोध, आदिवासींच्या कला, हस्तकला-सण उत्सव, खाद्य संस्कृती, इ.मध्ये दिसणारा उत्साह व रंगोत्सव ह्या सर्व बाबी एक वेगळा अनुभव देणाऱ्या आहेत. या योजनेत खालील विषयांवर आधारित पॅकेजेस देण्यात येतात :- अ) शेती , ब) निसर्ग, क) ऐतिहासिक वारसा, साहसी क्रीडा, ड) कला, हस्तकला, पाककला, इ) जंगले व पर्यावरण, ई) परंपरा व जीवनशैली इत्यादी. वरील विषयावर महाराष्ट्रात नियमित पर्यटनापेक्षा वेगळा अनुभव देणार्यांना प्रोत्साहन देणे, त्यांचा प्रचार व प्रसार करणे व पर्यायाने महाराष्ट्रातील पर्यटनाला एक वेगळे परिणाम व रोजच्या पर्यटना पेक्षा वेगळा अनुभवाद्वारे महाभ्रमण ही संकल्पना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत राबविली जात आहे.

## प्रस्तावित होम स्टे अथवा घरगुती पर्यटन योजना

सदर योजना महाराष्ट्रातील दुर्गम भागातील निसर्गरम्य ठिकाणे, पानथळी, आदिवासी अशा वैशिष्टपूर्ण ठिकाणी पर्यटकांची राहण्याची सुविधा वाढवून स्थानिक नागरीकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने तयार केली आहे. सदर योजनेत अर्जदार वैयक्तिक पातळीवर / बचत गट, गैर सरकारी संस्था (NGO), युवा मंडळ, सहकारी संस्था यांच्या माध्यमातून स्थानिक घरमालकांची घरे किंवा राहात्या घरातील ओसरीवरील जागा व्यावसायिक तत्वावर पर्यटकांच्या सोईसाठी उपलब्ध करुन देतील. ही योजना विशेषकरून Trekkers, Bird watchers, Photographers, Bag packers यांच्या सोबतच इतर पर्यटकांसाठी सुद्धाउपयोगी होईल. (सदर बाबत महामंडळामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.या बाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित होणे प्रस्तावित आहे.)

**योजनेचे उद्दिष्टय:**

- अर्जदार होम स्टे ही योजना व्यावसायिक तत्वावर चालवेल.
- स्थानिक घरमालकांच्या राहत्या जागेचा उपयोग होऊन पर्यटन विकासाला हातभार लागेल.
- पर्यटकांसाठी राहाण्याची आणि निवासाची घरगुती सोय किफायतशीर दरात उपलब्ध होईल आणि स्थानिकांना रोजगाराची एक संधी निर्माण होईल.
- राज्यातील, राज्याबाहेरील किंवा परदेशी पर्यटकांना दुर्गम भागात राहून तेथील स्थानिक संस्कृती, राहणीमान, चालीरिती आणि खाद्यपदार्थ यांचा अनूभव घेता येईल.
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विविध ठिकाणी असलेल्या पर्यटन माहिती केंद्राद्वारे या योजनेखालील नोंदणीकृत होम स्टेची माहिती इच्छुक पर्यटकांना देण्यात येईल.

▸ होम स्टे च्या माध्यमातून बचत गट, गैर सरकारी संस्था (NGO), युवा मंडळ, सहकारी संस्था यांच्या सोबतच वैयक्तिक स्तरावर सुद्धा मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल आणि दुर्गम भागात अधिक बांधकाम न करता उपलब्ध संसाधनांतर्गत पर्यटन विकास व पर्यावरणाचे संवर्धन करता येईल.

## स्वच्छ भारत अभियान




महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे स्वच्छ व नीटनेटकी ठेवण्यास कार्यरत आहे. या साठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत स्वच्छ भारत अभियानावर स्थानिक स्वराज्य संस्थासाठी उदा. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांच्यासाठी संपूर्ण मार्गदर्शक तत्वांसह एक माहिती पुस्तिका तयार केलेली आहे. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत महामंडळा मार्फत ग्रामपंचायत हरिहरेश्वर, जिल्हा परिषद परिषद, ठाणे येथे कार्यशाळा घेवून तेथील ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, बी.डी.ओ. यांना सदर बाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. महामंडळामार्फत शाश्वत व जबाबदार पर्यटनावर १६ लघु चित्रफितीची डी.व्ही.डी तयार करण्यात आली आहे. या अभियानाद्वारे महामंडळ महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहे. वरील सर्व योजनांची माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रधान कार्यालय, सर्व प्रादेशिक कार्यालये, माहिती केंद्रे, महामंडळाची अधिकृत वेबसाइट येथे मिळेल.

अधिक माहितीसाठी **डॉ. मुकेश कुळकर्णी**, प्रकल्प अधिकारी (स्वच्छ भारत अभियान) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्याशी ०८८७९२२२०९२/ cleanindiamaharashtratourism.gov.in वर संपर्क साधता यईल.

## महाराष्ट्राची स्मृतिचिन्हे

आपल्या घरी परत जाताना पर्यटकांना आपल्या समवेत महाराष्ट्राच्या आठवणी स्मरणचिन्हांच्या रुपात घेऊन जाता याव्यात या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने स्मरणचिन्हांची संकल्पना पुढे आणली आहे. खास मराठमोळी ओळख प्रकर्षाने करून देतील अशी २५० हून अधिक स्मृतिचिन्हे मंडळाने तयार केली आहेत. यामध्ये मराठी संस्कृतीचे प्रतिक असलेली कडकलक्ष्मी, वासुदेव, शुभचिन्ह असलेले तुळशी वृंदावन, नववर्षाचे प्रतिक गुढी, पारंपारिक तांब्या-पितळ्याची भांडी आणि वारी परंपरेतील अनेक स्मृतिचिन्हांचा समावेष आहे. परंपरा, संस्कृती व कलांचा वापर न केल्याने त्या हळूहळू लोप पावत चालल्या आहेत. महाराष्ट्राच्या संस्कृतीला चालना मिळावी या हेतूने, पुण्यासह राज्याच्या विविध भागात, दुकानांमध्ये स्मरणचिन्हे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याची योजना एमटीडीसी ने आखलेली आहे. उत्तम गुणवत्ता राखून व कला क्षेत्रातील डिझायनर्स ची मदत घेऊन स्थानिक कलाकारांकडून प्रांतरचनेनुसार या वस्तू बनवून घेतल्या जात आहेत. येवल्याची / पैठणची पैठणी, कोल्हापूरचा ठुशी दागिना, औरंगाबादमधील बिद्री वर्क अशा सुरेख कलाकृती यामध्ये शामील आहेत. शोकेस मध्ये शोभेसाठी व दररोजच्या वापरासाठी डिझायनर टच असलेल्या तब्बल हजार वस्तू पुढील काही महिन्यात तयार करून त्यांचा आकर्षक कॅटलॉग तयार करण्याचे काम सुरु आहे. यामुळे स्थानिकांनाही रोजगार उपलब्ध होईल.




प्रत्येक पर्यटकाला भेट दिलेल्या राज्यातील संस्कृती, जीवनशैली आणि कला ही आठवण म्हणून आपल्या समवेत घरी घेऊन जाता यावी, तसेच राज्याच्या संस्कृती संवर्धनासाठी आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी हा प्रयत्न सुरू आहे. स्मरणचिन्हांमध्ये वासुदेव, कडकलक्ष्मी, लावणी करणाऱ्या नृत्यांगनांच्या छोटया मूर्त्या, तुळशी वृंदावन, गुढी यांची प्रतिके, ईत्यादी वस्तू प्रस्तूत केल्या गेल्या आहेत. तसेच खणाच्या वापरातून रंगी बेरंगी माळा, पिशव्या आणि सॅक, पैठणीच्या पर्स, फोल्डर, मोबाईल पाऊच, तांब्याचा डिनर सेट,कॅण्डल स्टॅण्ड, ट्रे वगैरे या सूशोभेच्या गोष्टीदेखील उपलब्ध आहेत. महाराष्ट्राची ओळख असलेल्या पर्यटनस्थळांची व वस्तूंची चित्रे असलेले टी- शर्ट आणि पिशव्या तसेच आधुनिक आणि डिझायनर टच असलेले पारंपरिक दागिने, पोस्टर, कोस्टर आणि फोटो फ्रेमस् अशा अनेक शोभिवंत वस्तू व स्मृतिचिन्हे महामंडळ पर्यटकांसाठी तयार करून देत आहे. या स्मरणचिन्हांसाठी एक स्वतंत्र कॅटलॉग बनवून तब्बल एक हजार प्रकारच्या स्मरणचिन्हांच्या विक्रीसाठी माय महाराष्ट्र हा नवीन ब्रॅण्ड विकसीत करण्यात आला आहे. राज्याच्या काना-कोप-यात ही उत्पादने विक्रीस उपलब्ध असतील.



आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बरेच कारागीर आहेत जे फायबर, माती, कागदाचा लगदा, धातू किंवा लाकडाचे काम करतात, पन या सगळ्यांनी महाराष्ट्राची वैशिष्ठ्ये ओळखून आपली कलाकृती स्मृतीचिन्हांच्या स्वरूपात आणली तर या सर्वांना एक वेगळी व खास बाजारपेठ उपलब्ध होईल आणि यातून नव्या रोजगाराच्या संध्या निर्माण होतील. याशिवाय महाराष्ट्राची कला, परंपरा व संस्कृती ही जोपासण्यास मदत होईल.

वरील विषयासंदर्भात अधिक माहिती साठी souvenirmaharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

रोहन प्रकाशन

## प्रवासवर्णनाची ३ वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकं...




वैशिष्ट्यपूर्ण अशा
जरा हटके स्थळांची सफर घडवणारं
आणि आगळ्या-वेगळ्या
प्रवासअनुभवाची प्रचीती देणारं
रोमांचकारी पुस्तक...

लेखक : **जयप्रकाश प्रधान**

पृष्ठसंख्या : २५२ • **किं.रु.२४०**




देश-विदेशातील
भटकंतीमधील अनोखे,
थरारक व बोलके अनुभव...

लेखक : **डॉ. लिली जोशी**

पृष्ठसंख्या : २४० • **किं.रु.२००**




५०° से. तापमानात, ८६४ तास
उंटावरून चाललेला
१६०० कि.मी.चा प्रवास...

ध्यास एकच– **'पांढरं' सोनं!**

लेखक : **मायकल बेनानव्ह** • अनुवाद : **शुभदा पटवर्धन**

पृष्ठसंख्या : २१२ • **किं.रु.१९५**

**उपलब्धता :**
प्रमुख पुस्तक विक्रेते
ग्रंथप्रदर्शनं
FLIPKART
AMAZON व इतर
ऑनलाइन स्टोअर्स

**रोहन प्रकाशन**
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**

# भूमीनं चाक गिळलेला कर्ण



रणजीत देसाई

रणजित देसाई लिखित थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावरील 'स्वामी' आणि शिवाजी महाराजांच्या जीवनावरील 'श्रीमान योगी' या कादंबऱ्यांना मराठी साहित्यविश्वात मानाचे स्थान आहे. 'स्वामी'तील माधवराव व त्यांची पत्नी रमा तसेच 'श्रीमान योगी'तील शिवाजी व त्यांचे गुरु रामदासस्वामी यांच्या नात्यांना देसायांनी वेगळीच परिमाणे दिली आहेत. 'स्वामी' (१९६४) या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्काराबरोबरच हरि नारायण आपटे पुरस्कार तसेच महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय पद्मश्री आणि महाराष्ट्र गौरव पुरस्काराने रणजित देसाई यांना गौरवण्यात आलं आहे.
लक्ष्यवेध, पावनखिंड, कर्णाच्या जीवनावरील राधेय, राजा रविवर्मा अशा अनेक ऐतिहासिक-पौराणिक कादंबऱ्यांचे लेखन देसायांनी केले.

अगदी सुरुवातीपासून आपली कथा मित्रांना सांगावी, वाचून दाखवावी, योग्य वाटणाऱ्या सूचना अनमान न करता स्वीकारायच्या ही रणजितची ठेवणच होती. अगदी १९८२च्या जूनमध्ये अचानक कोवाडला गेलो, तेव्हा 'रवी वर्मा' कादंबरी त्यानं ऐकवली. जरा काही बदल सुचवावे वाटले तर त्याची ताबडतोब नोंद केली गेलीही. रणजित लेखनासाठी किती कष्ट घ्यायचा याची जाणीव 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'रवी वर्मा' या कादंबऱ्यांसाठी त्यानं तयार केलेल्या टिपणांच्या वह्या वाचल्या-पाहिल्याशिवाय येणार नाही.

मध्यंतरी १९६२-६३मध्ये असा काळ आला की रणजितचे समकालीन कथा-कादंबरी प्रकारात सरकारी पारितोषिकं पाहता पाहता मिळवत होते. मला आठवतं, रणजितला हिणवतही होते. 'यशवंत, यांना मिळालं नाही एवढं उदंड यश मी मिळवून दाखवीन. हातच घालायचा झाला तर अकादमी अवॉर्डलाच का नको?' हा प्रश्न त्यानं मला पूर्ण आत्मविश्वासानं विचारलं. आणि 'स्वामी'नं इतिहासच घडवला. राज्य पातळीवरचं आणि साहित्य अकादमीचं पारितोषिकही त्याला मिळालं. पण खरं श्रेय दिलं अथांग लोकप्रियतेनं. आजही रणजित देसाई 'स्वामी'कार म्हणूनच ओळखावे लागतात.

वास्तविक रणजितनं लेखक व्हावं असं वातावरण कोवाडच्या वडिलोपार्जित 'इस्टेटीत' किंवा परिसरात, गोतावळ्यात मुळीच नाही. १९५८मध्ये रणजितनं, कोवाडच्या 'मोठ्या' वाड्याच्या परिसरात जो कोपरा मिळाला तिथं दुमजली घर बांधलं. एका वाड्यात ग्रंथ, साहित्य वगैरेंना फारसं स्थान नाही. रणजितच्या 'धाकल्या वाड्यात' मात्र अमोल पुस्तकांचा खजिना आहे. पण या ग्रंथांनी त्याला सुखावलं आहे. घडवलं आहे. त्यांना स्पर्श करताना रणजितनं थोडी आरडाओरड केली तर मला ती आवडायची आणि पटायचीही.

१९५८साली रणजित कोल्हापूर सोडून कोवाडला गेला नसता तर 'स्वामी', 'श्रीमान योगी' वगैरे लेखनप्रपंच झाला असता किंवा नाही याची मला शंका आहे. चांगलं लिहायचं-वाचायचं असेल तर आर्थिक पाया मजबूत हवा, याची त्याला जाण आली होती. त्याचे वडील 'आबा' यांनी त्याला सांगितले, 'ह्या काळातच बापूसाहेब, तुम्ही मोठे व्हाल. वाड्याचा आसरा सोडायचा नाही. घ्या शपथ?' ती रणजितनं पाळली.

१९५८मध्ये 'बारी' नावाच्या त्याच्या वाट्याला आलेल्या रानमाळात डोंगराच्या पायथ्याशी त्यानं काजूची झाडं लावली. जाणकारांनी त्याला वेड्यात काढलं. आता त्याची 'बारी' हे शिवार आंबे-काजूंनी बहरुन जातं. ताम्रपर्णी नदीच्या काठी शिवार आहे. तिथं आता ऊस वगैरे नगदी पिकं येतात. हे सर्व आताशी. १९५८ मध्ये सगळा आनंदच होता. कोल्हापूरचं शहरी जीवन, सिनेमे, सर्व सुविधा चैन सोडून सुजाणपणानं रणजित कोवाडच्या कुशीत विसावला म्हणून त्याला आर्थिक स्वास्थ्य मिळालं, ज्याच्यावर जीव लावला त्यानं गळा आवळून धरला. पुस्तकांची रॉयल्टीही मिळेना, सर्वच अगतिकता, अशाच काळात हात दिला त्याच्या 'कोवाड' गावच्या जमिनीनं. तो आदर्श शेतकरी होता किंवा नाही मला माहीत नाही. कोथिंबीरीला हरबरा म्हणण्याइतकं माझं ज्ञान आहे. परंतु 'हे शहाणे काय शेती करणार?' असं सुरुवातीला म्हणणाऱ्या आप्तांना त्यानं शेतकी कामातही एक आदर्श पाठ घालून दिला आहे.

भाऊसाहेब खांडेकरांचं एवढं प्रेम त्यानं मिळवलं ते त्याच्या वागणुकीनं, अदबीनं. मला नाही आठवत भाऊसाहेब कधी समकालीनांबद्दल अधिक्षेपानं बोललेले. रणजित छोटा होता. उपेक्षित होता. 'स्वामी'कार झाला. 'पद्मश्री'ही झाला, परंतु अहंकाराच्या वासानं त्याला स्पर्शही केला नाही. त्याचं कारण मला वाटतं, जगातल्या अनेक भाषांतून इंग्रजीत असलेल्या वाङ्मयावर त्यानं प्रेम केलं. 'लावायचीच पैज, तर ज्ञानेश्वराशीच का नको?' उत्तुंग आदर्श समोर ठेवले म्हणजे निकट परिसराशी स्पर्धा करण्याची इच्छा होत नसावी.

रसिक आणि दिलखुलासपणा हा रणजितच्या स्वभावाचा एक अनमोल पैलू होता. संगीताचं त्याला वेड होतं. लता मंगेशकर, वसंतराव

देशपांडे, भीमसेन जोशी, कुमार गंधर्वादी मंडळी रणजितच्या वाड्यात समाधानानं भिंतीवर विसावलेले आहेत. त्याच चित्रसमूहात ‘आबा’– रणजितचे वडील आणि ऐन भरातले बालगंधर्व यांचीही देखणी छायाचित्रं आहेत.

रणजितची ‘बारी’ नावाची जमीन आहे. तिकडे जाणारी पायवाटही वळसे घेत जाताना दिसते. या वातावरणानंही रणजितला दिलासा दिला असला पाहिजे. नाही तर, मला वाटतं, ‘तानसेन’ नावाचं त्याचं पहिलंच नाटक संघ मंदिरात कोसळलं तरी तो कोसळला नाही. ‘रणजित, नाटक लिहिणं तुमचा प्रांतच नाही, तुम्ही कथा–कादंबऱ्याच लिहाव्यात.’ असे अनाहूत, पण प्रेमळ आदेशही त्याला मिळाले. ‘आमच्या खर्चानं दिलेले मोगऱ्याचे गजरे हुंगत हुंगत रसिकांनी माझ्या ‘तानसेन’ला दरबारातून उठवलं.’ ही रणजितची प्रतिक्रिया. मोठी खुलवून सांगायचा. पण अपयशामुळं रणजितनं उसळी घेतली. झकास नाटकं लिहिली. धंदा करणारी. त्यात नाव मिळवलं म्हणजेच हा नाटकाचा नाद सोडायचा– रणजितनं ‘तानसेन’नंतर मुंबईला भेट झाली तेव्हा विश्वासना सांगितलं. ‘स्वामी’, ‘गरुडझेप’, ‘हे बंध रेशमाचे’ हे त्या जिद्दीचे अविष्कार आहेत. संघ मंदिरातील त्या प्रयोगाला जमलेल्या प्रेक्षकांनाही ‘रणजित देसाई’ नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष झाला, याचं कौतुकच वाटलं असेल यात मला शंका नाही पण रणजित हा मला ‘स्वामी’च वाटतो. ती कादंबरी लिहिली नव्हती तेव्हापासून त्याच्या वागण्या–बोलण्यातील शालीनता, खानदानीपणा ही सर्व स्वत:चेच ‘स्वामी’ असल्याची पदचिन्हं होती.

रणजितनं ‘कोवाड’ या गावाला महाराष्ट्राच्या नकाशात ठळक स्थान मिळवून दिलं. कोल्हापूरलाही गौरव मिळवून दिला. पण आमच्यासारख्याला तो ‘पद्मश्री’ आहे, मोठा लेखक आहे, या सर्वांपेक्षा प्रथम तो आपल्या जवळकीचा आहे, ‘रणजित’ आहे याचंच खरं तर कौतुक व अभिमानही होता.

त्यावर्षीच्या जूनमध्ये अचानक कोवाडला गेलो तेव्हा रणजित व सौ. माधवीवहिनी ‘रणजित नगर’ या ट्रस्टची कल्पना सांगत होते. ‘बारी’ नावाच्या शेतावर रणजितचा जीव. तिथंच आपण जमवलेल्या कलाधनाचे–ग्रंथसंग्रहाचे जतन होईल अशी इमारत बांधायची. संशोधन–लेखन करणाऱ्यांची तिथंच निवासासह सोय करायची अशी काहीशी ती कल्पना. शिवछत्रपतींच्या ‘ही तो श्रींची इच्छा. हे राज्य त्यांचंच आहे’ अशा निष्ठेशी सुसंगत असणारी ही ट्रस्टची कल्पना, प्रत्यक्षात आलीच पाहिजे इतकी चांगली होती.

‘रणजित नगर’ची कल्पना जेव्हा प्रत्यक्षात येईल तेव्हा मात्र लेखनाचं सोडा, पण वाचनासाठी तरी तिथं मुक्काम करायची इच्छा आजच माझ्या मनात होती. त्या संकल्पित विश्रामधामाकडे थोडी झुकती पावलं टाकत रणजित व माधवीवहिनी येताना दिसावीत आणि आपणच पुढं म्हणावं –

‘या स्वामी, कृतार्थतेनं या. हे असं व्हावं हीच श्रींची इच्छा होती!’

आनंद व समाधान हाच रणजितच्या वाङ्मयाचा स्थायिभाव आहे.

‘स्वामी’ कादंबरीचं लेखन रणजितचे मामेभाऊ इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्सचे प्रमुख डी.जे.जाधव यांच्या बंगल्यात चालू होतं. तेव्हाच पहिली पत्नी सौ.सुनंदा ह्या समोरच्या मेंटलमध्ये उपचार करवून घेत होत्या. ते दडपण मनावर येऊ न देता ‘स्वामी’ सिद्ध झाली. ह्या कादंबरीनं रणजितला उदंड पैसा दिला. त्याची जाण म्हणून थेऊर येथील गणपतीच्या कळसाला त्यानं सोन्याचा पत्रा मढवून दिला. आजही तो तेजानं लखलखत असतो.

मंदिराच्या आवारात शिरलं की उजव्या हाताच्या भिंतीलगत एक काचेचं आच्छादन लावलेली पेटी आहे. त्यात ‘स्वामी’च्या हस्तलिखिताचा काही भाग आणि गजाननाला अर्पण केलेल्या पहिल्या आवृत्तीच्या पहिल्या प्रतीची मांडणी सुबकपणे केलेली आहे. ही रणजितची अपार निष्ठा.

आता रणजित नसताना आठवते ती त्याची आवडती ओवी...

मन हा मोगरा । अर्पून ईश्वरा।
पुनरपि जन्मा। येऊ नये।।

**– यशवंत हडप**

**(सौजन्य : माझं साहित्यिक खटलं, ग्रंथाली)**

****












# गेले 'तें' दिवस



**विजय तेंडुलकर**

माणूस जसा आणि जेवढा आपल्याला दिसतो, त्याच्या पलिकडे आपल्याला न दिसणारा केवढा तरी पसरलेला दिसतो. अशा दिसणाऱ्या माणसाचा आरपार वेध घेणारी नजर आणि न दिसणाऱ्या माणसाचा सहृदय समजुतीतून शोध घेणारी प्रतिभा लाभलेले विजय तेंडुलकर.

विविध विषय, निरनिराळ्या व्यक्तीरेखा आणि नाट्यलेखनातील प्रयोगशीलता या वैशिष्ट्यांमुळे विजय तेंडुलकर यांची आघाडीच्या भारतीय नाटककारात गणना केली जाते. तेंडुलकरांचे सर्वाधिक भरीव व अमूल्य कार्य आहे ते रंगभूमी व नाट्यलेखन क्षेत्रातले. आशय व तंत्रदृष्ट्या मराठी रंगभूमीचा चेहराच त्यांनी बदलून टाकला.

*विजय तेंडुलकर यांचे वडील धोंडोपत स्वत: लेखक, प्रकाशक व हौशी नट असल्याने त्यांच्याकडून लेखन-वाचनाचे संस्कार विजय तेंडुलकरांवर झाले. सुरुवातीचा बराचसा काळ पुणे-मुंबई अशा दोन्ही ठिकाणी अस्थिरतेत गेला. मात्र १९६६ पासून मुंबईतील वास्तव्याने तीच त्यांची कर्मभूमी बनली. मुंबईतच त्यांचा प्रायोगिक रंगभूमी, नाट्यकर्मींशी संबंध आला व त्यांचे नाट्यलेखन बहरले.*

*मानवी मनाचे, त्यातही त्याच्या कुरुपतेचे चित्रण करुन अशा व्यक्तिरेखांना समजून घेण्यात, त्यांचे उघडे-नागडे जीवन मांडताना माणसांचे घडते-बदलते संबंध, त्यातले ताण व त्या अनुषंगाने व्यवस्थांचे बंदिस्तपण टिपण्यावर तेंडुलकरांचा विशेष भर होता. म्हणूनच काव्य-कारुण्य, व्यक्ती-समाज, वास्तव-फॅण्टसी यांची कलात्मक सरमिसळ त्यांच्या नाटकांत आढळते.*

*'गृहस्थ' हे तेंडुलकरांचे लेखनदृष्ट्या पहिले नाटक. तर श्रीमंत (१९५५) हे त्यांचे रंगभूमीवरील पहिले नाटक. त्यानंतर माणूस नावाचे बेट, मधल्या भिंती, सरी गं सरी, एक हट्टी मुलगी ही त्यांची नाटके रंगभूमीवर आली. पण तेंडुलकर सर्वाधिक चर्चेत आले ते 'शांतता! कोर्ट चालू आहे' या नाटकामुळे. कुमारी मातृत्त्वाच्या समस्येवरील हे नाटक सुरुवातीला बरेच वादग्रस्त ठरले असले तरी नंतर सर्व भारतीय व काही परदेशी भाषांत भाषांतरीत होऊन त्याला भारतीय नाट्यसंघाचे सर्वश्रेष्ठ भारतीय नाटकासाठीचे 'कमलादेवी चट्टोपाध्याय पारितोषिक' (१९७०) मिळाले. त्याच्यापाठोपाठ 'अशी पाखरे येती' हे पूर्णपणे भावुक वृत्तीचे नाटक आले. पण त्यापुढील 'गिधाडे', 'सखाराम बाइंडर', 'घाशीराम कोतवाल' ही नाटके रुढ सामाजिक संकेतांना व नाट्यसंकेतांना हादरा देणारी व म्हणून वादग्रस्त ठरली. यातील 'घाशीराम कोतवाल' हे लोकनाट्याच्या अंगाने जाणारे व नाना फडणवीसांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक नाटक. याही नाटकाने संगीत व तंत्रदृष्ट्या मोठीच क्रांती केली.*

*सामना, सिंहासन, आक्रित, उंबरठा, चिमणराव, प्रार्थना, निशांत, मंथन, आक्रोश, अर्धसत्य, कमला या हिंदी-मराठी चित्रपटांच्या पटकथाही त्यांनी लिहिल्या.*

****

**गेले लिहायचे राहून...**

माणूस जसा आणि जेवढा आपल्याला दिसतो, त्याच्या पलिकडे आपल्याला न दिसणारा केवढा तरी पसरलेला दिसतो. अशा दिसणाऱ्या माणसाचा आरपार वेध घेणारी नजर आणि न दिसणाऱ्या माणसाचा सहृदय समजुतीतून शोध घेणारी प्रतिभा लाभलेले विजय तेंडुलकर.

नाटककार म्हणून मराठी रंगभूमीला कलाटणी देणारा सर्जनशील साहित्यिक म्हणून तेंडुलकर केवळ मराठी वा भारतीय नव्हे, तर जागतिक रंगभूमीवरही ख्यातकीर्त झाले. तेंडुलकरांनी कथा, ललित लेखन, कादंबरी हेही साहित्यप्रकार हाताळले अन् त्यातही त्यांच्या विलक्षण प्रतिभेचे कवडसे पाहायला मिळतात. पण या साऱ्या साहित्यातून सतत जाणवत राहतो तो तेंडुलकरांचा अवतीभोवतीच्या माणसांचा चाललेला सजग शोध. त्यांना या साऱ्या माणसांबद्दल कालच्या, आजच्या आणि उद्याचाही – वाटणारे अपार कुतूहल. सामान्यांपासून असामान्यांपर्यंत. करुणामूर्तीपासून क्रूरकर्म्यापर्यंत. मुख्यमंत्र्यापासून मसाजवाल्यापर्यंत. मेधा पाटकरांपासून चिमणभाई पटेलांपर्यंत. 'सखाराम बाइंडरा'पासून 'घाशीराम कोतवाला'पर्यंत. असंख्य माणसे, माणसे आणि

माणसे. त्यांची आयुष्ये, त्यांचे भावबंध. त्यांचे नातेसंबंध, त्यांच्या वासना. त्यांच्या भावना. त्यांचे राग. लोभ. प्रेम. ईर्षा. स्पर्धा. उत्कटपणा. हलकटपणा. उदात्तता. अधमता. सामर्थ्य. हतबलता. अगतकता. आणि या साऱ्यांतून जगत राहण्याची चिवटजिवट मूलभूत प्रेरणा. कधी ही प्रेरणा झुगारुन देणारी मरणाबद्दलची ओढ. कधी दुसऱ्याचे अस्तित्वच नष्ट करु इच्छिणारी पराकोटीची तेढ. माणसांबद्दलच्या या शोधामुळेच तेंडुलकरांच्या साहित्यात निखळ निसर्ग फारसा भेटत नाही.

तर असाहा प्रतिभावान लेखक जेव्हा स्वत:समोर आरसा धरायचा विचार करतो, तेव्हा? या आरशात तो स्वत:ला न्याहाळू लागतो, तेव्हा? तेंडुलकरांनी स्वत:च्या आयुष्याकडे मागे वळून पाहण्याचा विचार केला. पण त्यांच्या मनातले हे लिखाण रूढार्थाने आत्मचरित्रासारखे नव्हते. आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्याच्या कालपटाचा कॅन्व्हास वापरून त्यांना न्याहाळायची होती त्यांच्या आयुष्यात आलेली माणसे. महत्त्वाचे म्हणजे साऱ्या माणसांनी या तेंडुलकरांवर काही ना काही परिणाम घडवलेला. कधी नुसता आठवणीचा. कधी आयुष्यभरच्या साठवणीचा. कधी वरवरचा ओरखडा. कधी जिवावरचा जिव्हारी घाव केलेला. कधी सुबक घडवणारा. कधी बसलेली घडी पुरी विस्कटणारा. या साऱ्या माणसांना तेंडुलकर पुन्हा भेटू पाहात होते.

त्यांनी हा काळ, ही माणसे शब्दांत मांडण्याची सुरुवातही केली; पण दुर्देवाने त्यांच्या निधनामुळे हे लेखन या सुरुवातीपाशीच थबकले. तीच ही तेंडुलकरांनी आरंभ केलेली संहिता – 'तें' दिवस (आरंभकाळ).

**– दिलीप माजगावकर**

**('तें' दिवस पुस्तकाच्या प्रस्तावनेतून)**

****

वडलांनी नोकरीत निवृत्तीचे वय होण्याआधीच निवृत्ती घेतली. (आईला आणि आम्हा भावंडांना विचारण्याचा प्रश्न नव्हताच.) आणि आम्हाला सामानासकट एका बसमध्ये घालून ते कोल्हापूरला पोहोचले. कोल्हापूर तेव्हा ब्रिटीश अमलातले संस्थान होते.

नवे घर म्हणून वडलांनी आम्हाला उतरवले. ते ठिकाण मुगभाट कांदेवाडीतल्या चाळीतून इतके वेगळे आणि माझ्या दृष्टीने टाकाऊ होते की तिथे आम्ही राहणार ही कल्पनाच मला पटेना.

तो जुना, कौलारु तळमजली 'वाडा' होता. मधेमधे चौक. त्यात पाण्याचे नळ आणि हौद. कोपऱ्यात त्याच्या एका भागात एक 'माडी' बांधलेली होती. सर्व काही जुनाट आणि ओबडधोबड. चौकही तसाच. सार्वजनिक संडास मुंबईतल्या चाळीतही होते पण ते ओढण्याच्या साखळीचे, फ्लशचे. इथे एका कोपऱ्यात ते होते. टोपलीचे होते आणि विजेअभावी कायम काळोखातले. रात्री तर फारच काळोखातले. त्यातून आणि त्याखालून तऱ्हेतऱ्हेचे जीवजिवज्ञाणू फिरत. यात साप आले. वाड्याच्या मागे मोकळा माळ आणि त्यापुढे एक लांबरुंद खड्डा. आसपासची माणसे याचा उपयोग एकाच मोठ्या संडासासारखा करीत. त्यापलिकडे अंतरावर कोल्हापूरचे तेव्हाचे रेसकोर्स. रेसेसचे दिवस सोडले तर ओस.

वैभवातून विपन्नावस्थेत जाऊन पडावे तशी आईसकट सर्वांची भावना या नव्या घरात झाली.

मुंबईच्या तुलनेने कोल्हापूर (तेव्हाचे संस्थान) खूपच प्रेक्षणीय होते. उदाहरणार्थ, शनिवारी माझी शाळा सकाळची असे आणि ती लक्ष्मीपुरीत म्हणजे बऱ्यापैकी अंतरावर होती. खासबागेचे मैदान ओलांडून पुढे आलो की सकाळी फिरावयाला काढलेले सरकारी किंवा 'वाड्यावरचे' चित्ते भेटत. सर्कसमध्येच जेमतेम











A scene from a performance during the 1980s




पाहिलेले जंगली श्वापद चक्क रस्त्यावरुन आपल्या बाजूने चालत जाताना पाहणे हे 'थ्रिल' होते. या चित्त्यांच्या डोळ्यांना झापडे, गळ्याला साखळदंड (तो फिरवणाऱ्या रक्षकाच्या हाती असे) आणि चित्त्यांच्या थोडे पुढे चालणाऱ्या या रक्षकाच्या दुसऱ्या हातात कच्च्या मांसाचा एक मोठा तुकडा असे. हा त्याने चित्त्यापुढे काही अंतरावर धरलेला असे. या वासावर चित्ता पुढे पुढे चालत राही. एखाद्या अभिजात नटाचा चालण्याचा डौल चित्त्याच्या चालीत असे. श्वास रोखून मी ही दृश्य दर शनिवारी शाळेच्या मार्गावर पाही. शाळेत जाताना जुन्या राजवाड्याच्या आवारातून पुढे जावे लागे. या राजवाड्याच्या दगडी प्रवेशद्वाराशीच दोन बाजूंना दोन भव्य हत्ती झुलत असत. या छोट्या वयात माझ्या उंचीवरुन ते थांबून पाहाताना ते पर्वतप्राय वाटत आणि त्यांच्याविषयी भीतीयुक्त आदर वाटे. हत्ती पिसाळल्याच्या खऱ्या-खोट्या सनसनाटी हकिकती कानावर असतच.



सणावारी वाड्यावरुन मिरवणुका निघत. त्यात पुढे घोडेस्वार असत. मुंबईत व्हिक्टोरियाचे हाडकुळे, थकलेले घोडे पाहिलेल्या मला 'वाड्या'वरचे हे पोसलेले, निगा राखलेले, सतेज कांतीचे, डौलदार घोडे चक्क स्वप्नातले वाटत.

आयुष्यातला पहिला किल्ला मी या काळात पाहिला. पन्हाळगडावर आमच्या शाळेची सहल गेली होती. ऐतिहासिक स्थळ म्हटले की हृदय अभिमानाने भरुन येण्याचा संस्कार आमच्यावरही होता. तसे झाले. क्रमिक पुस्तकात धडे आणि कविता, इतकेच नव्हे तर नाट्यप्रवेशदेखील मराठ्यांचे शौर्य, मोगलांशी लढाया, शिवरायांचा महिमा, दुष्ट कारस्थानी मोगल, नीच औरंगजेब, स्वामिनिष्ठ खंडोबल्लाळ असलेच असत. त्या काळाकडे आज बघतो तेव्हा काही प्रश्न पडतात. उदाहरणार्थ, आमच्या जवळजवळ सर्व शालेय कवितात 'देश' महाराष्ट्र होता. असा देश पृथ्वीच्या पाठीवर दुसरा झाला नाही, असे या कवितांतून आमच्या कोवळ्या मनांवर आवर्जून मराठी भाषेतले अलंकार महाराष्ट्रावर उधळून ठसवण्यात आले. मग त्या काळात (आणि आजही) भारत कुठे होता? तो देश येऊन-जाऊन आमा देश असतो, असे म्हणायचे काय, की तो महाराष्ट्राचा उपखंड?




देशाभिमान, राष्ट्राभिमान ही मूल्ये एकीकडे राष्ट्रीय चळवळी जनतेच्या मनावर बिंबवण्याची धडपड करीत असतानाची ही महाराष्ट्रात शाळेशाळेत शिकणाऱ्या आम्हा मुलांची स्थिती. आणखी एक नोंद. माझ्या शालेय काळात स्वामिनिष्ठा आणि बलिदान ही आमच्या क्रमिक पुस्तकातली जणू श्रेष्ठ मूल्ये होती. आदर्श त्यांचेच. प्राण ही जणू पहिल्या संधीला फेकून देण्याची वस्तू आहे असाच धड्याधड्यातला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संदेश. तो 'स्वामी'साठी फेकणे यापरते तर चांगले मरण नाही. त्या वयात हे सर्व आम्ही जिवाला लावून घेतो तर काय घडते? पण शाळेत शिकलेल्या गोष्टी शाळेत ठेवायच्या असतात, हे आमच्या लक्षात आले म्हणून या संस्कारापासून बचावलो.

आमच्या शाळेत मुलीही होत्या. रात्री आमच्या इंग्रजीच्या उत्साही (आणि अविवाहीत) 'सरां'नी कथा-कथनाचा एक कार्यक्रम केला तोही माझ्यासाठी (आणि इतरही मुलांसाठी) एक 'ऐतिहासिक' अनुभव होता. यात शिवराय नव्हते आणि मोंगलही नव्हते. आमच्या संमिश्र समुदायासमोर त्यांनी कीर्तनकाराची एक तद्दन वाह्यात आणि अश्लील गोष्ट त्या रात्री हातवाऱ्यांनिशी, रंगवून सांगितली. तेच एकटे शिक्षक आमच्या सोबत असल्याने कुणी आक्षेप घेण्याचा प्रश्न नव्हता. ती रात्र नंतर ती गोष्ट ऐकलेल्या सर्वांनाच अस्वस्थतेची गेली असणार. निदान मला तरी गेली. चुकीच्या पद्धतीने माझ्या लैंगिक ज्ञानात एवढी भर एका रात्रीत पडली होती. शाळेतील इतर मुले माझ्या मानाने 'सज्ञान'. वर्गात माझ्या बाकावरची मुले नंतर त्या सरांच्या तासाला (तेव्हा ते इंग्रजीच शिकवत असत.) एक पाय मुडपून पोटरी आणि मांडी यामधला फुगीर आकार एकमेकांना आणि मलाही अर्थपूर्णपणे डोळा घालून दाखवत, तेव्हा संकोचाने मी अर्धा होई. मला ते आवडत नसे. अश्लील वाटे.

माझे लैंगिक शिक्षण हे असे शिवरायांच्या पन्हाळगडावर चालू झाले.

**– विजय तेंडुलकर**
**(सौजन्य : 'तें' दिवस**
**राजहंस प्रकाशन)**

****

# पक्षी

## किरण पुरंदरे




**'पक्षी' या मालिकेतील पुस्तके :**

**पक्षी - आपले सख्खे शेजारी**
**पक्षी - पाणथळीतले**

एका संवेदनशील पक्षी अभ्यासकाने करून दिलेली पक्ष्यांची सचित्र ओळख.

पक्ष्यांचे अधिवास, त्यांची स्थानिक मराठी नावे, त्यांच्या सवयी, त्यांची घरटी, निसर्गातील भूमिका, अशा पक्षिजीवनाच्या वेगवेगळ्या पैलूंना स्पर्श करतानाच लेखक पक्ष्यांच्या संवर्धनाचे महत्त्वही विशद करतो.



ज्योत्स्ना प्रकाशन

• 'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
• मोहन बिल्डिंग, १६२ ज. शंकरशेट मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
For online purchase www.jyotsnaprakashan.com

---

**वन्दे मातरम् या शब्दांत आहे**
**धगधगती राष्ट्रभावना,**
**या शब्दांत आहे मातृभूमीविषयी जाज्वल्य निष्ठा,**
**या शब्दांत आहे मातृभूमीच्या चरणी लीन होण्याची शरणभावना,**
**या शब्दात आहे खड्गाचे सामर्थ्य !**



बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या १७५ व्या जयंतीनिमित्त सा. विवेक प्रकाशित करीत आहे, स्वातंत्र्याच्या काळात इंग्रजांना बसलेली प्रचंड दहशत आणि स्वातंत्र्याचा रणघोष बनलेल्या '**वन्दे मातरम्**' या दोन शब्दांची निर्मिती व प्रवास यांची मांडणी करणारा

मूळ किंमत रु. १६,००/-

# समग्र वन्दे मातरम् द्विखंडात्मक ग्रंथ

✻ संपादन: मिलिंद सबनीस ✻ पृष्ठसंख्या: ९००

**✻ सवलत मूल्य: रु.११००/-**

सवलत केवळ **३१ डिसेंबर २०१४** पर्यंतच...

**'राष्ट्रगान'चा दर्जा मिळालेल्या अशा या गीताच्या ग्रंथासाठी आजच नोंदणी करा.**

आपला धनादेश अथवा धनाकर्ष **'हिंदुस्थान प्रकाशन संस्था'** या नावाने काढावा.

संपर्क – स्थानिक प्रतिनिधी आणि सा. विवेक, प्रशासकीय कार्यालय : दूरध्वनी : (०२२) २७८१०२३५/३६

# कऱ्हेकाठचा वनवासी



**प्रकाश नारायण संत**

सुप्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत व ना.मा.संत यांचे चिरंजीव म्हणजे प्रकाश नारायण संत. ते आपल्या आजोळी दत्तक गेल्याने त्यांचे नाव दीक्षित असे झाले तरी त्यांनी आपले लेखन प्रकाश नारायण संत या नावानेच केले. त्यांचे वनवास (१९९४), शारदासंगीत (१९९७), पंखा (२००१) हे कथासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहेत. बेळगाव, धारवाडकडच्या सीमाप्रांतातील संस्कृती, भाषा आणि जुन्या पिढीतील मानवी संबंधांमधील माधुर्य यांचे चित्रण त्यांची कथा सहजपणे करते.

‘लंपन’ला मराठीत अढळस्थान देणाऱ्या लेखकाचे त्याच्या सहचारिणीने रेखाटलेले शब्दचित्र–

**कॉ**टेज हॉस्पिटल कंपाउंडमधील पोस्टमॉर्टेम रूम एका सुंदर लेखाचा विषय होऊ शकते? चकितच व्हायला झालं. आम्ही हा इथला प्लॉट घ्यायला निघालो तेव्हा समोरच दिसणाऱ्या या इमारतीबद्दल कितीतरी जणांनी आक्षेप घेऊन आम्हांला सावध करायचा प्रयत्न केला होता आणि आता आक्कांनी तिला ‘अक्षर’ करुन टाकलं होतं. प्रकाशना त्या विषय सुचवायला सांगत. प्रकाशांनी पुरवलेल्या कितीतरी विषयांवर दोघांची चर्चा होई. कुवेशीतल्या आक्कांना विसर पडलेल्या, प्रकाशांच्या जिऑलॉजिस्ट या नात्यानं मिळालेल्या जंगलातल्या अनुभवांची उजळणीही अशीच एकदा ऐकायला मिळाली होती. मला हा अनुभव अगदी नवा कोरा होता.

डिव्हायडरचं डिझाइन प्रकाशनी स्वत:च फार विचारपूर्वक केलं होतं. नुकताच घेतलेला शार्पचा टू इन वन, स्पीकर्स आणि कॅसेट्सचा संग्रह यांना त्यांच्या आकाराचे कप्पे मिळाले होते. या नवीन पाहुण्यांबरोबर आमच्या जुन्या रेकॉर्ड प्लेअरला आणि रेकॉर्ड बॉक्सला प्रतिष्ठेची जागा द्यायला प्रकाश विसरले नव्हते. काही उघड्या कप्प्यांत प्रकाशांची आवडती निवडक पुस्तकं दिसायला लागली होती. त्यांत मानानं मिरवत होता त्यांचा पी.एच.डी.चा प्रबंध ! एका उघड्या कप्प्यात काही देखण्या भरत्नांना नेमकी जागा मिळाली होती. डिव्हायडरच्या काही मोकळ्या चौकटी माझ्या पुष्परचनेसाठी ठेवलेल्या. डायनिंग हॉलमधल्या भिंतीवर लावलेलं प्रकाशाचं पर्वतीचं तैलचित्र या चौकटीतून सुरेख दिसायचं. पण आमच्या घरी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचं लक्ष वेधून घेत असे आमच्या ड्र्यूझ – हॉलचा मानबिंदू. एका देखण्या दगडाचा अर्धगोल त्याच्या खास जागेत विराजमान झालेला. त्याच्या नैसर्गिक खोबणीमध्ये बल्ब लावून त्याच्या अंतरंगातले पांढरेशुभ्र पारदर्शक स्फटिक प्रकाशनी अजूनच उजळून टाकलेले. प्रत्येकाला तो दाखवताना सोबत यायची ती कथा. भर पावसाळ्यातली काही इंजिनियर्सबरोबर कोयनानगरला आम्ही केलेली सफर. आम्ही सगळे चिखलानं माखलेल्या त्या मोठ्या गोल दगडाला ओलांडून पुढं जाणारे आणि प्रकाश तिथंच थबकलेले. दगडावरचा चिखल बाजूला करत न्याहाळत असलेले. मग तो फोडताना झालेले त्याचे तीन तुकडे. हा अर्धगोल आमच्याकडे आलेला आणि उरलेले दोन चतकोर इंजिनियरद्वयांनी घेतलेले. या कथेबरोबर मला आठवत ते प्रकाशांचे त्या वेळी रखचटलेले दोन्ही हातांचे तळवे, घरी आल्यानंतर स्वच्छ धुवून तो जडशीळ ड्र्यूझ टेबलावर ठेवल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेला आनंद आणि त्यांनी उच्चारलेले ते शब्द, 'Life-time Specimen आहे हा सुधा. एखाद्यालाच मिळतो. '

प्रकाशनी मला विचारलं होतं, ‘‘सुधा, आपल्या घराचं नाव काय ठेवायचं?’’ ‘‘मला काय विचारता? खरं म्हणजे माझी खात्री आहे नाव तुमच्या मनात नक्कीच तयार असणार. उगीच आपलं मला विचारायचं म्हणून विचारता,’’ मी म्हणाले होते.

आणि अचानक एके दिवशी प्रकाशनी घराचं नाव सुचवलं, ‘अमलताश’! – आमच्या अत्यंत आवडीच्या बहावा वृक्षाचं दुसरं नाव! प्रकाशांच्या मनाच्या गाभाऱ्यातून आलेलं सुंदर नाव.

महाराष्ट्र टाइम्समधून झाडांवर लिहिल्या जाणाऱ्या लेखांवर प्रकाश आणि मी लुब्ध झालो होतो. शरदिनी डहाणूकर या नावाची ओळख झाली ती अशी त्यांच्या लेखातून. आम्हांला प्रिय असलेली कितीतरी झाडं त्यांच्या लेखांतून आपापल्या तपशिलांसकट, देखण्या रुपात नजरेसमोर उभी राहत होती. आमच्या माहितीत कितीतरी भर पडत होती. प्रकाशनी शरदिनीबाई डहाणूकरांना पत्र पाठवलं– ‘अमलताश’बद्दल अधिक जाणून घेण्यासाठी. समोरच्या कुंपणालगत लावलेली बहावाची हळूहळू वाढणारी झाडं. त्यांच्या पोपटी पानावरएक वेगळीच कांती चढलेली आम्हांला दिसायला लागली.

गेले काही महिने प्रकाशांच्या एकंदर मूडवरुन, ते सतत करत असलेल्या चिंतनावरुन, ते पुन्हा लेखनाकडे वळणार असं मला वाटायला लागलं होतं. श्रीनिवास अधूनमधून यायचे. लेखनासाठी तगादा लावायचे. एकदा तर त्यांनी प्रकाशना सांगितलंच, ''या वर्षी 'मौज'च्या दिवाळी अंकात तुमचं लेखन हवंच कोणत्याही परिस्थितीत.'' ''सरळसरळ तंबीच देऊन गेलेत की श्रीनिवास मला'' म्हणत त्यांनी एक लेख लिहिला. बऱ्याच वर्षांपूर्वी कऱ्हाडमधल्या एका रस्त्यानं रात्री फिरत जात असताना चांदण्यांचा एक मोठा पट्टा रस्त्यावर पडलेला प्रकाशनी पाहिला. झपाटून गेल्यासारखं त्यांनी एक अप्रतिम चित्र रंगवलं होतं. या चित्रावरच लिहायचं असं ठरवून तयार झालेला हा लेख. मौज दिवाळी अंकाची ताज्या ललितच्या अंकात जाहिरात होती आणि प्रकाश नारायण संत हे नाव पुन्हा एकदा वाचायला मिळालं. मुंबईहून श्रीनिवासांनी पत्र पाठवलं, 'तुमचे चांदण्याचा रस्ता हे चित्र आणि त्या संदर्भातले तुमचे लेखन श्री.पु.भागवत यांना दाखवले. त्यांनी तुमचे हे चित्र पूर्वी पाहिलेलेच होते. त्यांना ते आवडलेही आहे. त्या संदर्भातले तुमचे लेखन त्यांनी वाचले. त्यांना ते अतिशय आवडले. 'इकडचा शब्द तिकडे करायला नको इतके ते बंदिस्त, सुंदर, प्रतीतिपूर्ण आहे', म्हणाले. भागवतांची ही प्रतिक्रिया ऐकून मला फार आनंद वाटला. माझीही प्रतिक्रिया जवळ जवळ अशीच होती आणि मी ती तुम्हाला सांगितली होती. पूर्वी तुम्ही सत्यकथेतून ललित लेख लिहिले होते. उरलेले आता लिहायला घेऊन पुरे करावे असा तुम्हाला श्री.पु.भागवत यांचा निरोप आहे.'

श्री.पु.भागवतांची प्रकाशाचं चित्र आणि त्या संदर्भातला लेख यावरील प्रतिक्रिया कळल्यावर प्रकाशांच्यापेक्षा काकणभर अधिकच मी आनंदले.

तो लेख संपवताना प्रकाशनी लिहिलं होतं:

'शहराबद्दल, गावाबद्दल मला प्रेम नसलं तरी ती मला जिवंत वाटतात. रस्ते धमन्यांप्रमाणं धुगधुगणारे वाटतात. रस्त्याचं व्यक्तिमत्त्व आणि सौंदर्य माणसांनी पायदळी तुडवलेलं असतं. रात्री सामसूम झाल्यावर रस्ते जिवंत होतात. त्यांचा स्वत:चा असा एक वेगळा प्रवास सुरु होतो असं वाटतं. असे सुने सुने, निर्जन रस्ते मी रंगवले. कऱ्हाडमधील एका रस्त्यानं अपरात्री जात असताना चांदण्याचा एक मोठा पट्टा रस्त्यावर पडलेला पाहिला. वीज गेलेली असावी. त्यामुळं छायाप्रकाशाचाएक रमणीय आकृतीबंध तिथं निर्माण झाला होता. दुतर्फा उभी असलेली घरं रेखीव सावल्यांत लपलेली होती. रस्त्याचाही बराचसा भाग त्यांच्या तुटक सावल्यांमुळे तुटल्यासारखा दिसत होता. सर्व काही शांत, अचेतन दिसत असतानाच एका घराची दगडी भिंत त्या चांदण्यांच्या प्रकाशात उजळून निघाली. त्या भिंतीवरुन चांदणं द्रवरुप होऊन ओघळत आहे असं वाटलं. क्षणापूर्वी अचेतन वाटणारा तो परिसर एकदम चैतन्यमय वाटायला लागला. सर्व आसमंत एखाद्या अमृतमय रुपेरी द्रवानं न्हाऊन निघत आहे आणि रस्त्यावरचे चांदण्यांचे पट्टे म्हणजे याच अमृताच्या धारा आहेत असं वाटलं. घरांच्या रांगेतून नजर सरळ पुढं आकाशापर्यंत जाऊन पोचत होती. आकाश आणि रस्ता यांमधली सीमारेषा नाहीशी झाली होती. चांदण्यानं न्हालेला रस्ता त्या आकाशाचाच एक भाग असावा असं वाटलं. या अनुभवानं मन उल्हसित होऊन गेलं. हा अनामिक आत्मिक आनंद व्यक्त करण्यासाठी मी हे चित्र काढलं.'

'वनवास'च्या प्रकाशन समारंभाची आमची चर्चा सुरु झाली. २८ जून ही तारीच निश्चित झाली. मौजेकडून येणाऱ्या पत्रिकांची आम्ही वाट पाहत होतो. तोपर्यंत पत्र पाठवण्याचं मोठं काम प्रकाशनी संपवून टाकलं होतं. पुस्तकांच्या प्रती मिळायला मात्र थोडासा उशीर झाला. पुस्तकांच्या प्रती आणि श्रीनिवासांचं पत्र! पुस्तकाचा स्पर्शच मनाला इतका सुखावणारा. पद्मा सहस्रबुद्धे यांनी काढलेलं अप्रतिम चित्र मुखपृष्ठावर. हिरव्या रंगाच्या अनेक छटा अलगद मनापर्यंत पोचवत मन प्रसन्न करुन टाकणाऱ्या आणि दोन्ही गुडघे हातात वेढून, गुडघ्यांवर डोकं टेकून उडणाऱ्या फुलपाखरांकडे एकटक पाहणारा तो छोटा लंपन! कितीकिती वर्षं प्रकाशनी मनात जपून ठेवलेलं हे चित्र त्यांच्या पहिल्या पुस्तकावर असं उतरुन आलं!

**– सुप्रिया दीक्षित**

**(सौजन्य : अमलताश, मौज प्रकाशन)**







# का येतसे रडावया...?



बा.सी.मर्ढेकर

केशवसुतांनंतरचे मराठी साहित्यातील एक युगप्रर्वक कवी म्हणून बा.सी.मर्ढेकर यांचा मानाने उल्लेख केला जातो. माणूस-व्यक्ती, समाज, परिस्थिती, विज्ञान आणि अध्यात्म हे विसाव्या शतकाच्या साहित्यातील जिव्हाळ्याचे विषय मर्ढेकरांच्या कवितेत प्रथमच उत्कटतेने आणि चिंतनभाष्यासह उमटले. त्यामुळे मराठी कवितेचा चेहरामोहराच बदलून गेला.




**म**र्ढेकर कवींचं मी देणं लागतो. त्यातून उतराई होण्याचा मार्ग म्हणजे त्यांचं गाव पाहायचं, घर पाहायचं, वंशपरंपरेनं त्यांच्याकडं चालत आलेला त्यांचा रामदासी मठ पाहायचा, ज्याचं स्मरण ते लेखनाच्या प्रारंभी करीत असत. त्या समर्थांच्या रामरायापुढं दंडवत घालायचा आणि मठाबद्दल लिहायचं! अरे, मर्ढेकरांच्या तुलनेत मी काय लिहिणार? ते चांदीचा बंदा रुपया, तर मी शिकस्तीनं जस्ताचे चार पाच पैसे भरेन. तरीसुद्धा लिहिल्यावाचून ऋणमुक्ती नाही. म्हणून मर्ढे गावाचा रस्ता पकडायचं पक्कं केलं.

शंभरजणांना विचारुन पाहिलं पण मर्ढ्याचा अचूक ठावठिकाणा कुणालाच माहीत नाही.

कुणी म्हणाला, 'शिरवळला उतरा.'

कुणी सांगितलं, 'तिकडं कराडच्या बाजूला एक मठ हाये!'

तर एक म्हणाला, 'सातारा रोडला उतरा, की तिथंच मर्ढं लागतं.'

नंतर कळलं, मर्ढेकरांच्या चुलत चुलत भावाच्या पत्नी श्रीमती वीणाताई आगरबाजारात 'वैभव' अपार्टमेंटमध्ये असतात; त्यांना माहीत असेल म्हणून  दोस्त डॉ. सतीश राजमाचीकराला कामगिरीवर पिटाळला. त्यानं बाईंना हुडकून काढून माझ्या भेटीचा वायदाही परस्परच ठरवून टाकला!'

गेलो. क्षणार्धात गुंता सुटला.

वीणाताईंनी सांगितलं, 'स्वारगेटहून चाफळला जाणारी सकाळची सव्वासहाची एस.टी.पकडा. पुणे-सातारा रस्त्याला प्रथम पाचवड लागेल. त्यानंतर आनेवाडी नावाचं लहान गाव लागेल. साताऱ्याच्या अलीकडे ते नऊ मैलावर आहे. तिथं उतरा, आनेवाडीत बैलगाडी करा नि पूर्वेकडे चला. वाटेत कृष्णा लागेल. ती ओलांडा. बघता बघता मर्ढं दिसायला लागेल.''

निघालो.

आनेवाडीला उतरलो. तिथं शुद्ध शुकशुकाट. एक तरुण शेतकरी रस्त्यावर उभा होता. त्याला मर्ढ्याची दिशा विचारली. तो म्हणाला, ''मर्ढं? बी.सी.मर्ढेकरांचं मर्ढं का?''

मर्ढेकर कवीचं नाव रस्त्यावर शेतकरी उच्चारतो, हे ऐकून मी साक्षात विरघळलोच.

''हो. मला मर्ढेकरांचं राममंदिर बघायचंय.'' – मी.

''बघा की! मैलभर असे पायरस्त्यानं खाली खाली चला. वाटेत नदी लागेल. तिच्यात पाणी कमी आहे. पण तुम्ही निष्कारण नदीतून जाऊ नका. पाण्याचा काही नेम नाही. जरा पलिकडं फरशीपूल दिसेल. तो ओलांडा, मग नदीकाठावरल्या रानातून पायवाट पकडायची, ती थेट रामाच्या मंदिरापाशीच नेईल. गेल्यावर नामदेव मास्तरांना हाक मारा. ते सर्व दाखवतील. मर्ढेकरांची एक म्हातारी देवळात असते. पण ती काय सांगणार? तुम्ही आपले नामदेव मास्तरांना हाक मारा.''

''नामदेवराव असतील का घरी?''

''नसायला काय झालं? मास्तरमाणूस कुठं जाणारत्त घरी बसलेलाच आहे. निघा तुम्ही.''

मजा अशी की दुतर्फा माजलेल्या मळ्यांमधून पायउतार होताना गांधी टोपी अडकवलेले दोन-तीन तरुण मला रस्त्यात दिसले. प्रत्येक वेळी वाटलं, हेच ते नामदेवमास्तर! विचारल्यावर म्हणाले,

''नामदेव मास्त नं? आहेत, घरी बसलेले आहेत.''

जिवात जीव आला.

तीन-चार फर्लांगावर कृष्णेचा सौम्य खळाळ लागला. पात्र फार रुंद नव्हतं. धारेला जोर नव्हता. एका काठावर ज्वारीचं शेतं. दुसऱ्या काठावर झाडी. पिछाडीला उंचावर रामाचं शिखर. घाट, डोह, पाण्यात पोरंटोरं दंगामस्ती करीत होती.

मी कॅमेरा काढला. फोटो टिपले.

दुर्बिणीतून आसमंत न्याहाळलं. दूरवर शेती पसरलेली दिसली. गाव टीचभर.

ऊन पडलं होतं. वारा झुळझुळत होता. नदीतल्या खडकांवर बगळे डुलक्या काढीत होते.

बाकी सामसूम.

म्हटलं, हाच तो क्षण, की जेव्हा पोहण्यातला आनंद लुटला पाहिले. लागलीच कपडे उतरवले. डोहात सूर मारला. जळ अतिगार होतं. अंग तरतरीत झालं. पंधरा मिनिटं आनंद केला. बाहेर आलो. अंग कोरडं केलं. कपडे

पेहेनले. रस्ता पकडला.

कुणाला विचारण्याची गरजच पडली नाही. वर निघालेली चढी घाटी होती. ती थेट एका दगडी दिंडीपाशी पोहोचली. दिंडीवर पाटी होती:

'सिद्धामृत मठ, मर्ढे.'

मठ म्हणजे साधं देवस्थान आहे. छोटंसंच. ऐसपैस बिलकूल नाही. नदीच्या वळणावर एका बाजूला एक उंच टेकडावर चार बाजूंनी दगडी भिंती घातलेलं एक आवार आहे. मधोमध रामाचं जुनं देऊळ आहे. समोर सोळा लाकडी खांबांचा, पक्क्या बांधणीचा मंडप आहे. मंडपावर काल–परवापर्यंत खापरी कौलं होती. ती काढून श्रीमती वीणाताईंनी तिथं पत्रा ठोकला आहे. स्वखर्चानं रंगरंगोटी करुन घेतली आहे. देवळाची विहीर उपसून तिथं रहाट बसवला आहे. मठ, म्हणजेच हे राममंदिर, स्वच्छ आहे. गावकऱ्यांनी फरशी बसविली आहे.

मठात निवांत वाटलं.

राममंदिराच्या दोन्ही अंगांना अगदी अरुंद बोळ सोडले आहेत. त्यातून गाय सुद्धा जाऊ शकणार नाही. या दोन्ही अंगांना घरं आहेत. आहेत, म्हणजे पूर्वी होती. एका अंगाला एकमेकांना जोडलेली तीन घरं, पहिलं घर कलेक्टर मर्ढेकरांचं. ते जमीनदोस्त झालं. त्याचा फक्त चौथरा शिल्लक आहे. दुसरं म्हणजे, मधलं घर जे धड उभं आहे, ते कविवर्य मर्ढेकरांचं 'सावित्रीसदन.' शेवटचं तिसरं भाऊबंदांचं. ते घर पडून तिथं उकिरडा झाला आहे. मंदिराच्या दुसऱ्या अंगाकडलं घर चांगलं सुस्थितीत, परंतु जुनं आहे. तिथं मंदिराची व्यवस्था बघणारी मर्ढेकरांच्या चुलत नातेसंबंधातली कुटुंब राहत होती. मर्ढेकरांच्या काळात आत्मारामपंत गोसावी राहत. त्यानंतर आनंदीकाकू नावाच्या वृद्ध कुटुंबीय राहत असत. नंतर स्वातंत्र्यसैनिक सखाराम विश्वनाथ मर्ढेकर राहू लागले. ती सगळी पिढी गेली. आता वयस्क श्रीमती सरलाबाई सखाराम मर्ढेकर एकट्या राहतात.

मठाचं आवार उघडं आहे. झाडझुडूप काही नाही. वर आकाश, तटाच्या बाहेर खोलात कृष्णेचं वाहतं पात्र. पलीकडं अपरंपार शेतमळे.

ऊन छान पडलं होतं. सावली–उजेडाचा खेळ नामी वाटला. म्हणून मठाचे, मंदिराचे, शिखराचे नि मर्ढेकरांच्या 'सावित्रीसदना'चे भराभर फोटो काढले.

मठाच्या आवारातलं 'सावित्रीसदन' आतून–बाहेरून पाहिलं. तो तीन खोल्यांचा गाळा आहे, असं समजू या. एक बाहेरची उठाबसायची लहान खोली. आतल्या बाजूला तेवढीच खोली. तिचे दोन कप्पे पाडले आहेत. एक स्वयंपाकाची जागा. दुसरं देवघर. सध्या या जागेत नव्वद वर्ष वयाचे लक्ष्मण निकम हे परीट लेकीसह राहतात.

इतक्यात सरलाबाई ओचेपदर सावरीत आल्या. म्हणाल्या,

''हे आमचं मर्ढेकर मंडळींचं राममंदिर. फार पूर्वी इथं विद्याभ्यास व्हायचर, म्हणून मठ म्हणत. ह्या वास्तूला म्हणतात 'सिद्धामृत मठ.' पण मूळ जो वासुदेव गोसाव्यांचा मठ होता, तो ह्या जागेत नव्हे. तो दूर तिकडं खोलात गणेश डोहाजवळ होता. वासुदेव गोसाव्यांची बयाबाई म्हणून शिष्या होती. तिलाच 'विदेहास्वामी' म्हणत. तिने तो गणेश डोहाजवळचा खोलातला मठ उठवून ह्या सध्याच्या उंचावरल्या जागी आणला. त्या बयाबाईला जंगलात एक मूल मिळालं. तो पुढे अमृतेश्वरस्वामी म्हणून प्रसिद्ध झाला. त्याने पावनबुवा गोसावी नावाच्या शिष्याला संसार करण्याची परवानगी दिली. आमच्या मर्ढेकरांच्या वंशाचा तो पावनबुवा गोसावी हा मूळपुरुष. आम्ही गोसावीच. नंतर गोसावी मर्ढ्याचे म्हणून मर्ढेकर झालो; पावनबुवांपासून आमच्या पिढ्या सुरु झाल्या.''

''मर्ढेकरांचं आता कोण कोण शिल्लक राहिलंय?'' मी विचारलं.

त्यावर बराच वेळ आठवून त्या म्हणाल्या,

''पाहा, बाळासाहेब मर्ढेकरांपैकी असं आता कुणीच हयात दिसत नाही. त्यांचा राघव आईबरोबर चंदीगडला गेला, तो गेलाच. बाळासाहेबांना कमल म्हणून एक बहीण होती. ती पाडळीकरांकडं पुण्याला दिली होती. तीही गेली. त्या कलेक्टरांचा मुलगा डॉक्टर होता, तोही गेला. आगरबाजारातल्या वीणाताई ह्या त्या डॉक्टरांच्या पत्नी. त्यांचा लेक मुंबईला डोळ्यांचा डॉक्टर आहे. तोच शेवटचा मर्ढेकर म्हणायचा. पुण्याला हिंदविजय सिनेमाजवळ कुणी बाबूराव मर्ढेकर आहेत, म्हणतात. पण माझी गाठभेट नाही. खरं सांगू का, मी बाळासाहेबांनाही फारसं पाहिलेलं नाही. ते क्वचित कधी इकडं येत. त्यांचे वडील आबा. त्यांना मात्र खूप जवळून पाहिलं. ते इथंच




१९३१ साली 'शिशिरागम' हा त्यांचा पहिला कविता संग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर आलेले संग्रह म्हणजे 'काही कविता'(१९४७) आणि 'आणखी काही कविता' (१९५१). मर्ढेकरांच्या कवितेवर त्यांच्या काळात अश्लीलतेचे, दुर्बोधतेचे आरोप झाले, ती विफलतावादी, निराशावादी, जंतुवादी आहे असे आक्षेप घेण्यात आले. परंतु ती युगभान व्यक्त करणारी कविता आहे याचा उलगडा पुढे हळूहळू झाला आणि विसाव्या शतकातल्या भारतीय साहित्यातला एक समर्थ कवी अशी ख्याती त्यांना लाभली.




मर्ढेकरांच्या कादंबऱ्यात 'रात्रीचा दिवस' हा संज्ञाप्रवाहात्मक कादंबरीचा प्रयोग आहे. तर 'तांबडी माती' आणि 'पाणी' या कादंबऱ्या बदलत्या ग्रामीण जीवनातील नव्या समस्यांचा वेध घेणाऱ्या आहेत. आशय आणि अभिव्यक्तीत अखेरपर्यंत नवता जोपासणाऱ्या या सारस्वताचा मृत्यू १९५६ साली दिल्ली येथे झाला.

राहायचे. हे 'सावित्रीसदन' खानदेशातून परतल्यावर त्यांनीच बांधलं. पण आमच्या बाळासाहेबांचं नाव जगभर झालं, बघा. फारच मोठा माणूस. एकदा मजाच झाली, बघा. मी विहिरीवर पाण्याला गेले होते. आमच्या शेतावर, विहिर जुन्या पद्धतीची पायऱ्यांची होती. मी विहिरीत रहाटावरुन कळशी सोडणार, इतक्यात विहिरीतून कुणीतरी बोलल्याचा आवाज आला. मी दचकलेच. वाकून पाहिलं, तर विहिरीत पायऱ्यांवर बसून एक शाळकरी मुलगा अभ्यासाची कविता वाचीत होता. म्हणून कान देऊन ऐकू लागले. आश्चर्य म्हणजे, ती बाळासाहेबांचीच दहावीच्या पुस्तकातील कविता होती! मला अगदी धन्य धन्य वाटलं. बघा, त्या क्षणी! ती सगळी कविता मी नीट ऐकली आणि नंतर पाणी भरलं. कविता तोंडवेचना, बघा. म्हटलं, केवढे थोर आपले बाळासाहेब, सगळं जग त्यांना नावाजतंय! पण इथं ह्या गावात त्यांचा काहीच प्रकाश नाही. दैव!''

''ह्या मठात जुनी पुस्तकं, पोथ्या वगैरे आहेत? मला दाखवाल?''

''दाखवते ना. आबांचीच ती धन आहे. 'सावित्रीसदना'त रद्दी म्हणून पडलीवती पुस्तकं. मी उचलली नि आमच्या घरता ठवेली. थांबा, आणत्ये.''

मठाची संपत्ती म्हणजेच जतन केलेली ग्रंथसंपदा आणायला बाई गेल्या.

कपडे पालटून, मी खांबाला टेकून बैठक मारली.

आता मर्ढेकर मंडळींची माझ्या टिपणवहीत असलेली हकिकत सांगतो :

कवी बा.सी.मर्ढेकर यांचे सीताराम नारायण मर्ढेकर हे वडील. त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातल्या कोरेगाव इथं १८७७ मध्ये झाला. घरची गरीबी. त्यामुळं मर्ढ्याला प्राथमिक शिक्षण पूर्ण करुन, ते प्राथमिक शिक्षकाच्या नोकरीसाठी पूर्व खानदेशात गेले. चाळीस वर्षं ते खानदेशातच शाळाखात्यात राहिले. हेडमास्तर झाले. सेवानिवृत्तीच्या अगोदर काही दिवस ए.डी.इ.आय. म्हणजे शिक्षणविस्ताराधिकारी झाले. सेवानिवृत्तीनंतर शांतपणे लेखन-वाचन करण्याकरिता ते खानदेशचा त्याग करुन मर्ढे गावी माघारी आले. त्यांनी स्वत:च्या पैशांनी मंदिराला लागून दोन खोल्यांचं लहानसं घर बांधलं. आबा आणि आबांच्या पत्नी सौ. सावित्रीबाई असं दोघेजण मर्ढ्याच्या घरात राहू लागले. घर बांधताना झालेला सर्व जमाखर्च आबांनी एका वहीत नीट उतरवून ठेवलेला आहे. त्या वहीचं नाव, 'घर बांधणेबद्दल जमाखर्चाची वही, दि. २१-१-१९३९.'

**– रवींद्र पिंगे**

**(सौजन्य : मर्ढेकरांचा रामदासी गाव, सर्वोत्तम रवींद्र पिंगे, राजहंस प्रकाशन )**



# ब्राह्मण शिक्षण मंडळाचे 'वर्तकनगर माध्यमिक विद्यालय' व

## ग्रंथाली ठाणे केंद्र आयोजित

## वाचकदिन : लढा स्वातंत्र्याचा

विद्यार्थी मित्रांनो,

स्वातंत्र्य लढ्यातील एक प्रसंग / एक देशभक्ताचे चरित्र आपणास दिले आहे. आपण कथाकथन, नाट्य, समूहगान, पोवाडा, नृत्य नाट्य द्वारे तो सादर करणार आहात. कार्यक्रमस्थळी वेळेवर या.

**लक्षात ठेवा :**
१) प्रत्येक शाळेची इ. ७ व ८ मधील, शक्यतो ५ मुले भाग घेतील
२) कोणत्या प्रसंग / घटना सादर करावयाच्या आहेत; हे आपल्या शिक्षकांनी आपणास सांगितलेच आहे.
३) ८ ते १० मिनिटात तो प्रसंग सादर करावयाचा आहे.
४) शाळेच्या युनिफॉर्ममध्ये यायचे आहे. नृत्य / नाट्य सादर करणारे अनुरूप पोषाखात येतील.
५) येताना स्वत:ची पाण्याची बाटली आणण्यास विसरू नका.
६) प्रत्येक भाग घेणाऱ्यास एक पुस्तक व खाऊ दिला जाईल.
७) दोनही दिवशी प्रत्येकाने हजर रहावयाचे आहे.

**विशेष सूचना :**
१) **कार्यक्रमस्थळी 'ग्रंथाली'ची उपलब्ध पुस्तके ४०% सवलतीने मिळतील. त्याचा लाभ घ्या.**
२) कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. तेव्हा आपले पालक, मित्र-मैत्रिणींना मुद्दाम बरोबर आणा.

**शनिवार, दि. १० व रविवार, दि. ११ जानेवारी २०१५**
**वेळ : दोनही दिवशी दुपारी ३ ते ६.३० पर्यंत**
**स्थळ : वर्तकनगर माध्यमिक विद्यालय, शास्त्रीनगर (बस स्टॉप), अयप्पा मंदिराजवळ, वर्तकनगर, ठाणे (प.) - ४०० ६०६**
**फोन : २५८५४१५३**

**केदार जोशी**
चिटणीस
**ब्राह्मण शिक्षण मंडळ**

**मोहन महाजन**
मुख्याध्यापक
**वर्तकनगर माध्यमिक विद्यालय**

**सौ. नंदिनी-अविनाश बर्वे**
बी-१०६ सुचेता,
सिद्धेश्वर तलाव, पाटीलवाडी,
ठाणे-१
फोन : २५३३७२५०

**श्री. सुरेश भिडे**
५०२, मधुपुष्प,
ब्राह्मण विद्यालय शेजारी,
स्वा. सावरकर पथ, ठाणे-१
फोन : २५४२०३६३

**श्री. श्रीधर गांगल**
डी-९०६, सुमेर कॅसल, मीनाताई ठाकरे चौक, लाल बहादूर शास्त्री मार्ग,
ठाणे-१
फोन : २५४७१७९५

# कृष्णेकाठचा कोशकार




**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

लक्ष्मणशास्त्रींचे वडील खानदेशातील पिंपळनेर गावी पौरोहित्य करीत. आठव्या वर्षापासून त्यांनी लक्ष्मणशास्त्रींना वेदांचे अध्ययन करण्यास शिकवले. तेराव्या वर्षी ते वाईला नेले. तेथे नारायणशास्त्री मराठे, स्वामी केवलानंद यांच्याकडे लक्ष्मणशास्त्री न्याय, वेदान्त, मीमांसा यांचे अध्ययन करु लागले. पुढील अभ्यासासाठी ते काशीला गेले. तिथल्या विद्वान पंडितांकडे त्यांनी न्यायाचे धडे गिरवले. कलकत्त्याच्या संस्कृत महाविद्यालयातून त्यांनी 'तर्कतीर्थ' ही पदवी संपादन केली.

१९५६मध्ये द्वैभाषिक मुंबईचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांची नियुक्ती झाली. त्यानंतरचा काही काळ यशवंतरावांनी नेहरु व तेव्हाच्या काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधींना महाराष्ट्राची, मराठी भाषिकांची बाजू पटवून देणाचे प्रयत्न चालू ठेवले. यशवंतराव हे समन्वयाच्या वृत्तीचे द्योतक. शेवटी संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी मान्य होऊन एक मे १९६० रोजी त्याची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले.

यशवंतरावांची अबा, ह.रा.महाजनी, आत्माराम बापू पाटील, पारीख वगैरे रॉयवाद्यांशी जवळीक असल्यामुळे त्यांनी येथील समाजाच्या औद्योगिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा कार्यक्रम नक्की केला होता. यशवंतरावांनी शिक्षणविषयक महत्त्वाचे विधेयक अमलात आणलेच, शिवाय कृषिऔद्योगिक विकासाचा आराखडा तयार करवून महाराष्ट्राचा आर्थिक पाया मजबूत करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यामुळे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने यशवंतरावांनी ज्या योजना तयार केल्या त्यांतील एक 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळा'ची स्थापना ही होय. १९६०च्या डिसेंबरमध्ये हे मंडळ स्थापून त्याचे अध्यक्ष म्हणून अबांकडे जबाबदारी सोपविली गेली. या पदासाठी अबांची केली गेलेली निवड योग्यच ठरली. अबांनी आपल्या मंडळावर नामवंत, विचारवंत व साहित्यिक, सदस्य म्हणून घेतले. प्रो. गोवर्धन पारीख, पु. ल. देशपांडे, ग.दि.माडगूळकर, डॉ. सरोजिनी बाबर, श्री. ए.ए.ए.फैजी, डॉ. ना.गो.कालेलकर, सेतुमाधवराव पगडी, बापूराव नाईक इत्यादींचा त्यात समावेश होता. साहित्य संस्कृती मंडळाने प्रारंभीच आपली उद्दीष्टे ठरविली. मराठी भाषेसाठी आधुनिक विज्ञानाचा पाया तयार करणे, मराठी भाषिकाला सर्वांगीण, समृद्ध व्यक्ती बनवण्याच्या हेतूने दर्जेदार वैचारिक साहित्याला प्रकाशनासाठी आर्थिक सहाय्य करणे आणि अन्य भाषांतील चिरंतन मूल्य लाभलेले ग्रंथ पूर्णरुपाने वा साररुपाने मराठीत भाषांतरित करण्यास द्रव्यबळ देऊन प्रसिद्ध करणे असा सर्वसाधारणपणे कार्यक्रम हाती घेतला. समृद्ध साहित्य निर्माण होऊन ते सहज उपलब्ध झाल्याखेरीज आधुनिक जगात माणसाला यशस्वी होता येत नाही. कामगारालाही कुशल होण्यासाठी लागणारे वाङ्मय तज्ज्ञांकडून तयार करवून घेणे व बंगाली, कानडी, गुजराथी वगैरे प्रादेशिक भाषांतील साहित्याकडे मराठी माणसाला वळवण्यासाठी उपयुक्त साहित्य तयार करणे हेही उपक्रम या मंडळाने ठरवले.

या मंडळाची धोरणे व योजना मोठ्या मोलाच्या होत्या. मंडळाच्या कामाच्या निमित्ताने कार्यक्रम अमलात आणण्याच्या दृष्टीने स्वतंत्र कार्यालयाची मंत्रालयात सिद्धता झाली. अनेक विद्वानांशी आता पुनः पुनः संपर्क करावा लागणार म्हणून घरात फोन आला तो सरकारतर्फे. वाईला टेलिफोनची सोय आली, ती प्रथम विश्वकोश निर्मिती प्रकल्पाच्या निमित्ताने. अबांच्या घरातील फोनचा नंबर फक्त २६ असा होता. साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्यालयात अबांना वारंवार मुंबईत यावे लागे. सदस्यांच्या बैठकी बहुधा तिकडे होत. महाराष्ट्रात नागपूर, औरंगाबाद वगैरे ठिकाणी काही वेळा असत. नवे कार्यक्रम व पहिल्या कार्यक्रमातील प्रगतीची माहिती वेळोवेळी सदस्यांना देण्यात येई. याच सुमारास राम कोल्हटकर हा अबांचा स्वीय सहाय्यक झाला. लवकरच मंडळाने त्यांच्या उद्दिष्टाला पूरक असा मराठीतील नवा ज्ञानकोश तयार करण्याची योजना केली. मराठी ज्ञानकोश करण्याचे प्रयत्न डॉ. केतकरांसारख्या विद्वानांनी आधी केले होते. परंतु नव्या ज्ञानसाधनांमुळे ज्ञानाचा विस्तार व सखोलता यात ठाशीव असा गुणात्मक फरक होत होता. नव्या विद्याशाखा इतक्या वेगाने आकारास आल्या की, या पसरत जाणाऱ्या ज्ञानाला एकत्र करण्याचा प्रयत्न एकट्यादुकट्याने करण्याजोगा नव्हता. अशा सर्वंकष ज्ञानाला संग्रहित करण्यास अनेक खंड लागणार होते. शेकडो विद्वान,तज्ज्ञ यांजकडून लेखन करुन घेणे व ते मुद्रित प्रकाशित करणे, म्हणजे भक्कम अर्थबळ असावयास हवे होते. या प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली.

अबांना कोशवाङ्मयाचा अनुभव होताच.

केवलानन्द सरस्वतींचा मीमांसाकोश त्रिखंडात्मक होता. आता मराठी वीस खंडाच्या विश्वकोशाच्या प्रमुख संपादनाच्या कार्याची जबाबदारी अबांनी उचलली. हे काम फार आव्हानाचे होते. मराठी विश्वकोश हा पाश्चात्य संस्कृतीतील 'ब्रिटानिका'च्या धर्तीवर असणार होता. मंडळावर असलेल्या सुविद्य सदस्यांना अशा महत्त्वाच्या कामाची कल्पना होती. पारीख व अबा माहिती करुन घेण्यासाठी एकदा अमेरिकेत जाऊन आले होते.

मराठी विश्वकोशाच्या रचनेचे स्वरुप व उद्देश निश्चित झाले. विश्वकोशाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत अबांनी त्याविषयी निवेदन केलेले आहे. प्रत्येक एक ते सहस्र ते बाराशे पृष्ठांचे सतरा खंड. या खंडांना संहिताखंड म्हटले जाते. त्यात तंत्र-विज्ञान व मानविकींना समान महत्त्व देण्यात येणार होते.

काळाबरोबर समाजात अनेक प्रकारचे बदल होतात. अपेक्षित अनपेक्षित घटना उद्भवतात आणि नव्या मार्गाचा विचार करावा लागतो. यशस्वी व कल्याणकारक समाजजीवनासाठी धर्मरुढींची आवश्यकता होती. तथापि समाजातील व भोवतालच्या समाजपरिस्थितीतील परिवर्तने पाहिल्यास त्या गतार्थ झाल्याचेही लक्षात घ्यावे लागते. मनुष्यप्राण्याची बौद्धिक क्षमता सर्वात वरच्या दर्जाची. इतर प्राणीवर्गांसारखी निसर्गदत्त साधने मनुष्यापाशी नसतात. त्याला ती पुन: पुन: शोधावी लागतात. ज्ञानाच्या प्रकाशात माणूस अधिक चांगले जगू शकतो. माणसाच्या वैचारिक सधनतेवर अबांची श्रद्धा होती. म्हणून ठराविक नेमस्त पंथ त्यांनी टाकले. तरी ते 'तेच' राहिले. सर्वसामान्यांच्या नजरेतून अबांमध्ये वैचारिक स्थित्यंतरे होऊनही अबांबाबत समाजानेही त्यांना नितांत आदर दिला. सेतू माधवराव पगडी, डॉ. वि.वि.कोलते, स.मा.गर्गे, श्री. चोरघडे, कुसुमाग्रज, कवी ग्रेस, डॉ. रा.चिं.ढेरे, गोविंद तळवळकर वगैरे साहित्यिक विचारवंतांनी अबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या एकेका पैलूंवर प्रकाश टाकून अबांच्या प्रगतिशील विद्वत्तेचा गौरव केला. डॉ. आर.एन.दांडेकरांनी अबांना श्रद्धांजली वाहताना त्यांना 'पांडित्याचे परिसीमाचिन्ह' असे संबोधिले. डॉ. दांडेकर म्हणाले, 'अबांचे व्यक्तिमत्त्व सतत विकसित होत गेले. त्यांनी आजुबाजूच्या घडामोडींना प्रतिसाद देताना आंधळी दृष्टी न ठेवता चिकित्सक दृष्टी ठवेली. नवीन विद्येच्या प्रकाशात प्राचीन भारतीय विद्या तपासून घेतली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता.

कृष्णेचा स्रोत उगमापाशी अगदी किरकोळ आहे. ती वाईपर्यंत अठरा-वीस मैल प्रवास करुन येईपर्यंत तिचा प्रवाह चांगलाच रुंदावतो. पुढे कराडला पोहोचताना तिला कोयना मिळते. त्यामुळे आणखी वाढून तिच्या पाण्याचा प्रवाह सांगलीहून वेगाने सरकत राहतो. वाटेत चंद्रभागा, तुंगभद्रा कृष्णेत सरमिसळून जातात तरी ती कृष्णाच मानली जाते. कर्नाटक, आंध्रप्रदेशांना सुजल व सुफल करीत निघालेल्या कृष्णेच्या तीरी प्रदेशानुसार वेगवेगळी संस्कृती घडते. अनेक उपनद्यांना बरोबर घेत कृष्णेची प्रगती चालू राहते. नदीच्या सतत वाहणाऱ्या स्वभावाने अनेकांना असामान्य स्फूर्ती मिळते. काका कालेलकर हे एक व्यासंगी गांधीवादी. नद्यांच्या प्रवाहीपणाने ते भारले गेले. त्यांनी 'लोकमाता' व 'जीवनलीला' या पुस्तकातून नदीवर जणू गद्यकाव्य लिहिले. नदीच्या तरल दर्शनाने कालिदास, भवभूति, क्षेमेंद्र, जगन्नाथ वगैरेंची प्रतिभा फुलली. त्यांचे कालेलकरांना संस्मरण झाले. त्यांनी म्हटले, ''... पाण्याचा स्वभाव चंचल आहे.'' नदी म्हणजे जीवन. जीवनासारखी ती पुढे सरकते. पुढे सरकणे, प्रगती करणे हा तिचा धर्म. ती वाहात राहते तोपर्यंत प्रगती करते. अबांच्या वैचारिक प्रगतीचे सादृश्य कृष्णेच्या प्रवाहाबरोबर असल्याचे भासते. सायणाचार्यांनी वेदांवरील भाष्ये तुंगभद्रेच्या किनारी लिहिली. काही तत्त्वचिंतकांनी वास्तविक जगताचे सत्यस्वरुप अखंड वाहत राहणाऱ्या जलप्रवाहासारखे ठरविले. हेरिक्लिटस् या प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञालाही ते तसेच वाटले. बौद्ध तत्त्वज्ञानात वास्तविक सत्य हे अविरतपणे परिवर्तनीय, 'क्षणभंग' असल्याचे मानले. संततपणे बदलत्या धारेतही वस्तूंचा परिचय पुसला जात नाही. त्यांची 'जातकुळी' लक्षात घेण्याजोगी.

**– अरुंधती खंडकर**

**(सौजन्य : तर्कतीर्थ, एक प्रज्ञाप्रवाह, श्रीविद्या प्रकाशन )**




'शुद्धिसर्वस्वम्' (१९३४) हा तर्कतीर्थांचा पहिला ग्रंथ. याशिवाय आनंदमिमांसा, हिंदुधर्माची समीक्षा, जडवाद, वैदिक संस्कृतीचा इतिहास, आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत हे त्यांचे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ होत.

महाराष्ट्र शासनाने साहित्य-संस्कृती मंडळाचे कार्य त्यांच्यावर सोपवले तेव्हा त्यांनी विश्वकोशाची योजना आखली. अखेरपर्यंत ते त्याच्याशी निगडीत होते. भारताच्या घटनेचे संस्कृत भाषांतर 'संविधान' त्यांनी केले.

तर्कतीर्थांना 'पद्मभूषण' व 'पद्मविभूषण' हे किताब देऊन गौरवण्यात आले.

# वनांतील दुभाषी

जन्म पुणे जिल्ह्यातील भोर येथे, उच्च शिक्षण इंग्लडमध्ये, अध्यापन वडोदऱ्यात आणि लौकिकार्थाने मानमरातबाच्या अनेक संधी समोर असतानाही ४५ व्या वर्षी प्राध्यापकाची नोकरी सोडून आदिवासींच्या सहवासात भाषा संशोधन-जतन-वृद्धीचे काम करणारा तसेच 'टिंबर' एरियापासून जगातील रानावनापर्यंत जंगलांचा भाषेच्या माध्यमातून शोध घेणारा, झाडांचीही भाषा जाणणारा भाषातज्ज्ञ... गणेश देवी यांची ओळख खरे तर अशा चार ओळीत देता येतच नाही. साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेला त्यांचा इंग्लिशमधील ग्रंथ किंवा पद्मगंधाने प्रकाशित केलेले भाषाविषयक खंड वाचूनही हा माणूस पुरेसा कळत नाही. तरीही वानप्रस्थ या छोट्याशा पुस्तकातून त्यांनी मराठी वाचकांशी साधलेला हा एक संवाद म्हणजे त्यांच्या मोठेपणाची एक झलक-

**मा**झ्या आईचे वडील-आजोबा, सांगली शहरात नव्यानेच वसत आलेल्या 'टिंबर एरिया' नावाच्या भागात राहत होते. त्यांनी सांगलीच्या पटवर्धन संस्थानिकांच्या अनेक इमारतींचे बांधकाम केले होते. लाकडाने बनलेल्या त्यांच्या कौलारु कलोनियल बंगल्याच्या आवारातच बांधकामासाठी वापरायच्या लाकडाची प्रचंड वखार होती. त्यात कर्नाटकमधून अळणावरच्या जंगलातून तोडून आलेल्या शेकडो वृक्षांचे सरळसोट जाडे बुंधे पडलेले असायचे. त्यांच्या केवळ गंधावरुनही ते किती महिन्यांपूर्वी तोडले असावेत याचा अंदाज त्या वयातही मला येत असे. आजोबा, तेव्हा त्यांचे वय नव्वद वर्षे होते. वारले. माझ्या मामांनी तीस-चाळीस वर्षे तोच व्यवसाय चालवला. पण नंतर लाकडाची जागा खिळे, स्क्रू, काचा, प्लायवूड यांनी घेतली. त्या दोघांच्या सत्तर-ऐंशी वर्षांच्या कारकिर्दीत अळणावरचे जंगल संपत आले असावे.

आजोबांच्या जाडजूड लाकडांनी बनलेल्या काचेच्या कपाटात पुस्तके होती. त्यात 'चांदोबा' मासिकाचे रंगीबेरंगी पानांचे अंक होते. त्यात प्रथमच मी 'टारझन' नावाच्या अफ्रिकन नायकाला भेटलो. नंतर टारझनच्या गोष्टी-अंक एक ते अंक अनेकपर्यंत वाचायला मिळाल्या. जंगलात राहणारा, जंगली प्राण्यांवर अतोनात प्रेम करणारा हा हमेशाचा तत्पर नायक माझ्या बालमनावर जंगलाची अप्रतिम छाप ठसवून गेला.

माझ्या वडिलांचे वडील - आजोबा, भोर गावाजवळच्या लहान लहान घाटी खेड्यांतून हिरडे-बेहडे गोळा करायचे. त्याचे 'परमिट' त्यांना पुण्याच्या ब्रिटीश कलेक्टरने दिले होते. ते गेल्यानंतर अनेक वर्षे ते 'परमिट' घरात कागदपत्रे खेचून ठेवण्यासाठी छतावर बांधलेल्या तारेला लटकत राहिले. 'जेथे हिरडे-बेहडे मिळतात ते जंगल' हेही माझ्या मनावर ठसले हाते. त्यांच्या काळातच भोर गावाजवळ नीरा नदीला भाटघर नावाचे एक धरण बांधण्यात आले. त्यातून विजेची निर्मिती सुरु झाली. धरणाजवळच काही वर्षांतच आर.एल.मिल्स नावाची एक हिरड्यापासून मेणकापडावर लावायचा रंग बनविण्याची गिरणी निघाली. भागघरच्या पात्रातून येणाऱ्या जाणाऱ्या नावांतून त्या गिरणीसाठी जंगलातून तोडलेले माल-सामान येत राहिले.

माझे वडील एका सात्त्विक व्यक्तींचे भक्त होते. त्या महात्म्याच्या सहवासात असताना ते पुण्याच्या एका कागद कारखान्याच्या मालकांच्या संपर्कात आले. मी सुरतला नुकताच प्राध्यापक म्हणून लागलो होतो, तेव्हा त्या कारखानदारांच्या उत्पादनकेंद्राला भेट देण्याचा प्रसंग आला. गुजरातमध्ये सोनगड-व्याराच्या जवळ हा कारखाना होता. तिथल्या झाडांचा कागद जवळपास अर्धे शतक, महाराष्ट्र-गुजरातमधल्या लिखाणामागे लपला होता.

कॉलेजमध्ये असताना मला जिम कॉर्बेटच्या लिखाणाचा लळा लागला. पण बऱ्याच वर्षांनंतर जेव्हा नैनितालला जाण्याचा प्रसंग आला, तेव्हा तेथे कॉर्बेटचे जंगल शिल्लक नव्हते हे लक्षात आले.

माझ्या सांगलीच्या आजोबांच्या कपाटात मला एक अब्राहम लिंकन यांचे चरित्र मराठी अनुवाद असलेले सापडले. त्यात लिंकनच्या गावाचे नाव स्प्रिंगफील्ड. पण तो स्वत: कुमारवयात लाकूडतोड्याचे काम करत असे हा विनोदाचा भाग वाटला होता. कॉलेजमध्ये गेलो तेव्हा हॉलीवूडमध्ये बनवलेल्या काऊबॉय सिनेमांची चलती होती. त्यात टेक्सासमध्ये असणाऱ्या निर्वृक्ष जमिनीसंबंधीचे कुतूहल वाटायचे. मनात विचार यायचा की, कोलंबसने अमेरिकेत पाय ठेवला तेव्हाही अमेरिका अशीच सावलीविनाची असेल?

कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात पी.एच.डी. केल्यावर मी इंग्लडमधल्या लीडस् विद्यापीठात गेली. तेथे ब्रदरटन नावाचे अत्यंत भव्य ग्रंथालय आहे. त्याच्या सर्व भिंतीवर लाकडाची झालर फार दर्शनीय होती. पण इंग्लडमधल्या जंगलात सर्व झाडे प्राचीन वाटायची. तर मग ब्रदरटनचे सारे लाकूड कोठून आले? त्यानंतर मी अनेकवेळा लीड्सला गेलो, पण ह्या प्रश्नाचा उलगडा होण्यासाठी मला अमेरिकेत जाण्याचा योग येईपर्यंत थांबावे लागले.

अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर न्यू हेवन नावाच्या शहरात येल विद्यापीठ आहे. तेथे संशोधनकार्यासाठी गेलो असताना त्या विद्यापीठाचा इतिहास वाचनात आला. 'येल' एका व्यक्तीचे नाव; पूर्ण नाव इमॅन्युअल येल. तो इंग्लडमध्ये जन्मलेला, अत्यंत कंजूस व लहरी स्वभावाचा. त्याचे आयुष्य भारतात गेले. तेथे त्याला जंगलतोडीचे मोठे कॉन्ट्रॅक्ट मिळाले होते. त्यात मिळालेला अमाप पैसा त्याने चर्चाच्या विनंतीला मान देऊन, न्यू हेवन कॉलेजला देणगी स्वरुपात देऊन टाकला. त्या कॉलेजला स्वत:चे नाव द्यायचा आग्रह धरला. दोनशे वर्षांनंतर आता त्या विद्यापीठातून शिकलेल्यांतून अमेरिकेचा प्रत्येक नवा राष्ट्राध्यक्ष निवडून येतो.

'आफ्टर ॲम्नेशिया' पुस्तकाचे लेखन करत असताना, माझ्या हातात कॅनडामधल्या रेल्वे प्रकल्पावरचे एक पुस्तक आले. त्यात मी रेल्वेचे विस्तरण व जंगलांचा नाश यातल्या परस्परसंबंधांची अत्यंत अस्वस्थ करणारी आकडेवारी वाचली.

बडोदा विद्यापीठात मी तौलनिक साहित्य या विषयाचा अभ्यास सुरु केल्यावर फ्रेंच साहित्याचा गंभीरपणे विचार करायला सुरुवात केली. त्यात मला व्हिक्टर ह्यूगोच्या एका कादंबरीतल्या, पूर्वाश्रमीच्या गरिबीमुळे गुन्हेगार बनलेल्या पण नंतर कैदेतून सुटका करुन घेऊन एका छोट्या शहराचा मेयर बनलेल्या नायकाने बरेच आकर्षित केले. ह्या नायकाच्या आयुष्यातल्या सर्व स्टेजेसमध्ये त्याचा लाकडी गाडी, लाकडी जहाज इत्यादी लाकूडबद्ध कारागिरीशी फार निकटचा संबंध. फ्रेंच साहित्यात रुसो 'निसर्गाकडे परत वळा' का म्हणत असावा ते व्हिक्टर ह्यूगो वाचल्याखेरीज पुरते आकलन होणार नाही.

भोरजवळच्या जंगलातील हिरडे-तोड व अळणावरच्या जंगलांची सफाई, वास्तविक भारतातच प्रत्येक कागदाआड आणि रेल्वे-रुळांखाली दिसायला हवी होती. पण ती मला दिसली येल विद्यापीठाच्या इतिहासात आणि लीड्स वाचनालयातील सुंदर लाकूडकामात.

कोलंबसच्या काळापासून अमेरिकेत इतकी जंगलतोड झाली, की येलच्या काळापर्यंत म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांपर्यंत अमेरिकेत परदेशातून लाकडांची आयात करण्यापर्यंत पाळी आली होती. कोठे गेली ती सारी झाडे? ह्याचे उत्तर म्हणजे अमेरिकेतल्या प्रत्येक गावात बांधल्या गेलेल्या प्रत्येक घराच्या लाकडांनीच बनवलेल्या देखण्या भिंती, जमिनी.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यात, मोगलांच्या महालकामात कुठे लाकडांचा उपयोग केला होता? इतकेच काय तर लंडनच्या मध्ययुगीन काळात बांधलेल्या लंडन टॉवरमध्येपण मुळात लाकूड नव्हते. पण राजस्थान-सौराष्ट्र या इलाख्यात, विशेषत: नक्षीकामाच्या इमारती मध्ययुगापासून दिसतात. बिहार-ओरिसाकडेही ही पद्धत असावी. केरळात, विशेषत: मलबार प्रांतात लाकडी बांधकामाची प्रथा होती. खास या प्रदेशातील शेतजमीन-मालकीचाा इतिहास तपासला अथवा राजकीय प्रवाह-उपप्रवाह पाहिले तर स्पष्ट होते, की जेथे जेथे राजा व कूळ म्हणजे शेतमजुरी अथवा उत्पादन करणाऱ्या वर्गात तणाव निर्माण झाले तेथे तेथे बिनझाडांची मोठाली शेते बनवून, त्यावर निरंकुश सत्ता मिळवून व नंतर त्या तोडलेल्या लाकडांची प्रचंड नक्षीकाम केलेली वाडेवजा घरे बांधून, या प्रांतातल्या संस्कृतीची वाढ झाली. थोडक्यात जंगलतोडीचा इतिहास, युरोपियन वसाहतवादातून निर्माण झालेला असो अथवा त्यापूर्वीच्या मर्यादित सरंजामशाहीतला असो, मुळात तो सत्ताधीशांकडून जमीन कसणाऱ्यांवर झालेल्या अन्यायातून बनलेला इतिहास आहे. ह्या सर्व सत्ताधीशांना साथ देणाऱ्या व्यापारीवर्गाने नंतरच्या वैश्विक औद्योगिकीकरणाच्या जमान्यात उरल्यासुरल्या जंगलांचाही सफाया केला. मी अमेरिकेत असताना माझ्या एका मित्राने सांगितले होते, की पहिल्या महायुद्धाआधीचे एकही झाड वॉशिंग्टन शहराच्या जवळपास नाही. सगळी झाडे विसाव्या शतकातच लावलेली आहेत. मग त्याआधीची कोठे गेली?

**– गणेश देवी**
**(सौजन्य : वानप्रस्थ, पद्मगंधा प्रकाशन)**




भोरजवळच्या जंगलातील हिरडे-तोड व अळणावरच्या जंगलांची सफाई, वास्तविक भारतातच प्रत्येक कागदाआड आणि रेल्वे-रुळांखाली दिसायला हवी होती. पण ती मला दिसली येल विद्यापीठाच्या इतिहासात आणि लीड्स वाचनालयातील सुंदर लाकूडकामात. कोलंबसच्या काळापासून अमेरिकेत इतकी जंगलतोड झाली, की येलच्या काळापर्यंत म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांपर्यंत अमेरिकेत परदेशातून लाकडांची आयात करण्यापर्यंत पाळी आली होती. कोठे गेली ती सारी झाडे? ह्याचे उत्तर म्हणजे अमेरिकेतल्या प्रत्येक गावात बांधल्या गेलेल्या प्रत्येक घराच्या लाकडांनीच बनवलेल्या देखण्या भिंती, जमिनी.

# अनंत शोधयात्री



रा.चिं.ढेरे

अफाट या एका शब्दात रा.चिं.ढेरे यांच्या कार्याचे वर्णन करावे लागेल. त्यांच्या श्री विठ्ठल - एक महासमन्वय या ग्रंथास साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. पण श्रीतुळजाभवानी, शिखर शिंगणापूरचा श्रीशंभु महादेव अशी त्यांची इतर पुस्तकेही तेवढीच महत्त्वपूर्ण आहेत.



*संशोधक, समीक्षक रा.चिं.ढेरे यांचा जन्म पुण्याच्या मावळ तालुक्यातील निगडे या गावात झाला. लहान असतानाच ढेरे यांच्या आईवडिलांचं छत्र हरवले. मुद्रितशोधक, रात्रशाळेत ग्रंथपाल अशी कामे करीत कष्टाने त्यांनी पुण्यात आपले शिक्षण पूर्ण केले.*

*ढेरे यांच्या व्यासंगाचा पैस मोठा. भारतीय संस्कृती, प्राचीन साहित्य, लोकसाहित्य, लोककलाप्रकार, रंगभूमी, महाराष्ट्रातील धर्म, धार्मिक स्थळे अशा अनेक विषयांवर त्यांनी संशोधनात्मक लेखन केले आहे. खंडोबा (१९६१), लोकसंस्कृतीचे उपासक (१९६४), लोकसंस्कृतीची क्षितीजे (१९७१), चक्रपाणी, शोधशिल्प, संतसाहित्य आणि लोकसाहित्य अशा अनेक ग्रंथातून त्यांच्या विद्वत्तेचा व संशोधन वृत्तीचा प्रत्यय येतो. पंढरपुरात युगे अठ्ठावीस उभा असलेला संतांचा आणि वारकऱ्यांचा प्रिय देव 'विठ्ठल' याच्या मुळाचा शोध घेणाऱ्या 'श्री विठ्ठल: एक महासमन्वय' या त्यांच्या ग्रंथाला १९८७ साली साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. ढेरे यांच्या विद्वत्तेचा व मौलिक संशोधनाचा गौरव करण्यासाठी पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट्. ही पदवी प्रदान केली.*

*रा.चिं.ढेरे हे मराठी वाङ्मयाला लाभलेले एक अलौकिक वरदान आहे. लोकसाहित्यातून मंदिर- शिल्पे, ताम्रपट-शिलालेख असोत, काव्य असो वा हरवलेला सांस्कृतिक वारसा - महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे दुवे शोधण्यात ढेरे यांनी तन-मन-धन आणि हयात वेचली. अफाट या एका शब्दात त्यांच्या कार्याचे वर्णन करावे लागेल. वयाची ८० ओलांडल्यामुळे शरीर थकले तरी त्यांची शोधयात्रा संपलेली नाही. आपले काम अद्याप अपुरेच आहे असे त्यांना वाटते. संशोधनाचा हा अनंत शोधयात्री अजूनही लिहितोच आहे.*

****

*लोकसंस्कृतीचे प्रातिभ दर्शन, या ग्रंथास अरुणा ढेरे यांनी लिहिलेली प्रस्तावना म्हणजे 'ज्योतीने तेजाची आरती' आहे-*

१९३० साली अण्णांचा जन्म झाला आणि १९३५च्या मध्यात त्यांचे आई-वडील दोघेही मृत्यू पावले. तेव्हापासून १९४३ सालापर्यंतचा आठ वर्षांचा काळ अण्णांनी त्यांच्या आजोळघरी काढला. अंदर मावळात निगडे नावाच्या लहानशा गावी त्यांचे आजोळ होते. घरात हयात माणसे दोनच. अशक्य, आजारी, ब्रह्मचारी मामा आणि दु:ख-दारिद्र्याचा तळीतून भरडून निघालेली नव्वदीच्या घरातली म्हातारी आजी.

पण या दोघांशिवाय घरात आणखीही पुष्कळ होते. आजोबांनी मागे ठेवलेले ग्रामजोसपण होते, कृष्णेकाठच्या वाईमधल्या पाठशाळेतून त्यांनी आणलेला ज्ञानसाधनेचा वसा होता, संस्कृत-प्राकृत हस्तलिखिते, पोथ्या-पुराणे आणि संस्कृतिदर्शन घडवणाऱ्या वस्तू यांचा मोठा संग्रह होता आणि आजीच्या स्मृतीत त्यांच्यामुळे उघडलेले, मौखिक परंपरागत ज्ञानाचे भांडार होते.

शिवाय त्या कर्मठ व्यवस्थेच्या पंज्यात सापडलेल्या निर्दय काळातही दलित कुटुंबासकट गावातल्या सगळ्यांशी सहृदय भलेपणाने जवळीक साधणारे घरातले वातावरण होते, प्रचंड पडीक शेती भाऊबंदांनी गिळून टाकल्यानंतर निमूट राहण्याची दुबळी सोशिकता होती आणि अगदी काठोकाठ दारिद्र्य होते.

कला, दारिद्र्य आणि शिवाय भलेपण यांचे एकत्र येणे नेहमीच यातनामय असते. अण्णा तसल्या आयुष्याला गाठी बांधून मोठे झाले. दुबळी सोशिकता घेऊन मोठे झाले. निरपेक्ष माया पोरक्या मुलाला कधी कधी जे अतिहळवेपण देते, ते घेऊन मोठे झाले. निर्धनाला न परवडणारा स्वाभिमान घेऊन मोठे झाले.

१९४४ साल उजाडताच पहिल्याच दिवशी गाव सोडून आजी-मामांनी अण्णांना आणि त्यांच्या धाकट्या बहिणीला शिक्षणासाठी पुण्यात आणले तेव्हा त्या तेरा वर्षांच्या लहान मुलाजवळ पुष्कळ मोठी शिदोरी होती. त्याला पोथ्या वाचता येत होत्या, उत्तम चित्रे काढता येत होती, गावाकडच्या तमाशा फडासाठी

लावण्या रचण्याचे कसब होते.

अण्णांचे वडील निराधार, पोरके, अस्थिराचा शाप मिळालेले होते. तो शाप त्यांच्याकडून अण्णांना अनुवंशाने मिळाला होता; तसेच त्यांच्याजवळचे सुतारकामाचे उत्तम कौशल्यही मिळाले होते. हाताने मातीच्या, शाडूच्या देखण्या मूर्ती घडवता येत होत्या. भिंतीवर पौराणिक देखावे रंगावता येत होते. अक्षर सुंदर आणि जिवंत होते. मुख्य म्हणजे प्रतिभा होती. प्रज्ञाही होती.

लहान वयात पुष्कळ दु:ख सोसण्याने मूल अकाली मोठे होते, तशी अण्णांची बहीण आणि अण्णा ही भावंडे अकाली मोठी झाली होती. दिलासा देणाऱ्या तीनच गोष्टी होत्या. आजी-मामांची जाणते, संस्कारक्षम प्रेम, गावाकडचा निसर्ग आणि गावाकडचे सांस्कृतिक जीवन. या तीन गोष्टींचा फार गाढ परिणाम अण्णांवर झाला. त्यांच्या भावनिक विश्वाचे ते पोसणे होते.




पुण्याला आल्यानंतर अवघ्या आठ-नऊ वर्षांत आजी-मामांच्या नुसत्या असण्याचा आधारही त्यांनी गमावला; तेव्हा वाढीसाठी जी पारंबी पकडली ती गावाकडच्या जगण्याची. आपले कुणीही नाही अशा काळात त्यांचाच आधार घेत ते जगले आणि पुढे तेच त्यांच्या बाह्य विश्वातल्या झगड्यामध्ये त्यांचे संरक्षक साधन झाले.

पुणे मोठे शहर. विद्येचे माहेरघर. अगदी लहान खेड्यातून आलेल्या गरीब आणि मानी मुलाने पंधराव्या-सोळाव्या वर्षी अर्ध्या वयातल्या बहिणीला घेऊन तिथे कसे जगायचे? स्वत:ला उभे राहाण्यासाठी जागा कशी शोधायची? कशी निर्माण करायची? या काळात गावाकडे गोळा झालेले सगळे संचित अण्णांनी ऐहिकात उभे राहण्यासाठी वापरले. त्या संचिताचा अन्वय लावण्याची बुद्धी आपल्याजवळ आहे आणि त्या गोष्टीला पुण्याच्या बौद्धिक विश्वात एक मोल आहे, याची जाणीव झाली आणि अण्णांना वाट सापडली.

गावाकडचे ऋतुचक्राच्या लयीत फिरणारे लोकजीवन, तिथल्या श्रद्धा-समजुती, ग्रामदैवते, तिथ नाचणारी शिमग्याची सोंगे, उरसातले तमाशे, नवरात्रातले भराड, कुळधर्मातला देवीचा गोंधळ, वाघ्या-मुरळ्यांचे जागरण, देवळांतून घडणारे देवजन्माचे सोहळे, पारावरची प्रवचने, देवमंडपातली कीर्तने, घरोघरची व्रतवैकल्ये, दाराशी येणारे भुत्ये, वासुदेव, पोतराज- लोकसंस्कृती आणि संतसंस्कृतीने दिलेली ही ठेव उलगडणे हेच अण्णांनी आपल्या जगण्याचे साधन बनवले. अस्तित्वाला आधार आणि अर्थ देण्याचे प्रयोजन बनवले.

पुण्यात प्रतिष्ठेने जगण्यासाठी अण्णांनी केलेले कष्ट, सोसलेले कडूपण आणि धरलेला धीर यांचे तपशील त्यांच्या व्यक्तित्वाचा शोध घेताना आज महत्त्वाचे नाहीत असे मी म्हणणार नाही. पण वाईट परिस्थितीतून वर येऊन यशस्वी झालेल्या कोणाही माणसाची कहाणी बहुधा तशीच असते. त्या कहाणीचा ढोबळपणा फोडून आत गेले की मग अण्णांचे त्यांच्या गावाकडच्या जगण्याशी असलेले नाते लक्षात येते. एखाद्या माणसाला वयाच्या बारा-तेरा वर्षांपर्यंतच्या जगण्याने आयुष्यभर उभे राहण्याचे बळ द्यावे ही गोष्ट नवलाची खरी, पण ती अण्णांबाबत घडली आहे. त्यांच्या संशोधनाचा मूलाधार म्हणजे त्यांचे गाव आणि गावाकडचे बालवय.

**– अरुणा ढेरे**

**(सौजन्य : लोकसंस्कृतीचे प्रातिभ दर्शन, या ग्रंथास लिहिलेल्या प्रस्तावनेतून, पद्मगंधा प्रकाशन)**

****









# जर्मन जेजुरीकर

जन्माने जर्मन पण अभ्यास मराठी वाङ्मयाचा असे अनेक जण असतील, पण महाराष्ट्र पालथा घालताघालता इथल्या संस्कृतीशी, समाजाशी एकरुप होणारा गुन्थर सोन्थायमर यांच्यासारखा उपासक विरळाच. धनगर समाजाला आणि त्याच्या अभ्यासकांना थक्क करावे एवढे खंडोबा, विरोबाचे संशोधन केलेला हा 'जर्मन जेजुरीकर'. आपल्या अकाली निधनामुळे आपले कार्य अधुरे राहत असल्याच्या जाणीवेने ते किती अस्वस्थ झाले असतील हे त्यांच्या इच्छेनुसार जेजुरीत त्यांचे अस्थिविसर्जन करणाऱ्यांना जाणवले असेल.



*मराठी वाङ्मयाचे व संस्कृतीचे जर्मन अभ्यासक, अनुवादक. गुन्थर यांचा जन्म जर्मनीतील उल्म या गावी झाला. जडणघडणीच्या वयातच त्यांच्यात भारतीय संस्कृती व परंपरांचे आकर्षण निर्माण झाले. शिष्यवृत्ती घेऊन भारतात आलेल्या गुन्थर यांनी १९५८ ते १९६१ याकाळात पुण्याच्या विधी महाविद्यालयात प्रा.वि.म. बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास सुरु केला. पुण्याच्या वास्तव्यात त्यांचा दामोदर धर्मानंद कोसंबी यांच्याशी परिचय झाला. त्यातून लोकव्यवहाराच्या अभ्यासाला सुरुवात झाली. ग्रामीण महाराष्ट्रात प्रत्यक्ष हिंडून त्यांनी लोकपरंपराचाही अभ्यास केला.*

*महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाशी नाते जुळवणाऱ्या डॉ. गुन्थर यांनी 'बनगरवाडी' तसेच अरुण कोलटकरांच्या 'काळ्या कविता'चा जर्मन भाषेत अनुवाद केला आहे. मराठी भाषेचे त्यांना उत्तम ज्ञान होते. त्यांच्यामुळे पाश्चिमात्य भारतविद्येत क्रांती घडून आली आणि भारतविद्येत 'हायडलबर्ग घराणे' निर्माण झाले.*

*'संयुक्त हिंदू कुटुंब : एका कायदेशीर संस्थेची उत्क्रांती' या विषयात त्यांनी पी.एच.डी. मिळवली. 'पॅस्टरल डीइटीज इन वेस्टर्न इंडिया' (१९८९) हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे.*

*गुन्थर सोन्थायमर यांनी खंडोबा, विरोबा आदी धनगरांच्या दैवतांचा अभ्यास केला. खंडोबावर माहीतीपट तयार केला. खंडोबाची कहाणी पडद्यावर काव्याप्रमाणे सादर करणारा हा महाराष्ट्रीय संस्कृतीचा अभ्यासक अकाली निधन पावला.*

****

### आद्य वंदे मातरम्

*जेजुरी घर जाता, वारे दोही भुजी कलकी*
*मधी चाले पालखी, देवा मल्हारीची*

अशी गाणी जेजुरीच्या वाटेवर ऐकली.

किंवा

*आल्या गं जल्मात सये जेजुरी करावी*
*नवलाखाची पायरी बाई ध्येनात धरावी*

असा निश्चय मराठी स्त्री-पुरुषांच्या मुखातून ऐकला की जेजुरीच्या खंडोबाचे स्मरण नकळत होत जाते.

दिवाळी होऊन महिना लोटलेला. रब्बीच्या पेरण्या होऊन हिरवेगार कोंब वर तरारलेले. हवेत उत्साही गारवा. अशा वेळी येतो चंपाषष्ठीचा उत्सव.

नवरात्रात बसवतात तसे ह्या काळात देव, विशेषत: देवघरात असलेला खंडोबाचा टाक बसवला जातो. पाच दिवस तरवडांच्या अथवा झेंडूच्या फुलांची माळ घालून, समोर सतत नंदादीप तेवत ठेवला जातो. कोणाच्या घरी किंवा एखाद्या देवळात वा सार्वजनिक ठिकाणी 'मल्हारी-माहात्म्य' या ग्रंथाचे वाचन-श्रवण चाललेले दिसून येते. खंडोबा हे महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांचे कुलदैवत असल्याने ह्या काळात हा कुलाचार-कुलधर्म प्रतिवर्षी लोक आपआपल्या घरी करताना दिसतात.

चंपाषष्ठीच्या दिवशी मार्तंड भैरवाने मल्लासुरांचा वध केला तेव्हा देवांनी व ऋषिमुनींनी देवाची पूजा चाफ्याच्या फुलांनी केली. यामुळे षष्ठीच्या या दिवसाला चंपाषष्ठी असे म्हणतात.

समाजजीवनाच्या विश्लेषण करण्याच्या ज्या पद्धती आहेत, त्यात लोकदैवते, दंतकथा, लोककथा, लोकसाहित्य, पूजा-पद्धती ह्यांचाही समावेश होतो. महाराष्ट्रातील प्रत्येक गावी अशी खंडोबाची मंदिरे आहेत, विशेषत: खंडोबाचे छोटेसे देऊळ कोठेतरी माळरानावर, बाजूच्या टेकडीवर, डोंगरावर दिसते. अशा माळांना 'खंडोबाळी माळ' वा 'खंडोबाचा डोंगर' अशीच नावे असतात.

एरवी देवळासमोर असणाऱ्या तीन दीपमाळा अशा माळरानावर दिसतीलच असे नाही. छोटेसे चौकोनी व वर निमुळते होत जाणारे देऊळ व पुढे मागे दगडांचेच कठडे, माळरानावर असणारे एखादे सौंदडीचे, पिंपळाचे अथवा कसलेतरी जंगली झाड. झाले एवढेच. माळरानावर गुरं-ढोरं, मेंढ्या-बकरी चारायला घेऊन येणाऱ्या

गुराख्यांचे हे एरवी विश्रांतीस्थान असते, पण खंडोबाचे वर्षभरातले उत्सव वा रविवारचा दिवस असेल तर अशा शुकशुकाट असणाऱ्या माळावरही मग माणसं दिसायला लागतात. जेथे खंडोबाचे देऊळ नाही तेथे भैरवनाथाचे तरी नक्कीच असते. अशा ह्या देवतेने मात्र महाराष्ट्राचे संपूर्ण सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक जीवन व्यापून टाकले आहे.

खंडोबा, मल्हारी, मैलार, मार्तंड-भैरव, मल्हारी मार्तंड, मैराळ अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या खंडोबाचे उपासक आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटकप्रमाणेच उत्तर भारतातही आहेत. मल्लूखान व अजमतखान ही दोन मुसलमानी नावे खंडोबास आहेत. (काही मुसलमान खंडोबाचे भक्त आहेत.) खंडोबाच्या उपासनेत 'मल्लूखानाची गदा' ही सर्वपरिचित आहे, तर अजमतखान हे नाव औरंगजेबाने बहाल केले आहे. (अजमत म्हणजे चमत्कार.) त्याची ही लोकप्रियता, लोकवाणी व लोकसाहित्यातील स्थान, धर्मपरंपरा, पूजाविधीत त्याला असलेला मान लक्षात घेऊनच त्याला 'लोकदेव' म्हटले आहे.

लोकदेव हा शब्द व्यापक आहे. अभिजनांपासून उपेक्षित, त्याज्य वर्गांपर्यंत सर्वमान्य असलेला हा देव, म्हणून तर महाराष्ट्रातील अभ्यासकांसाठीही महत्त्वाचा ठरला आहे. इतिहासाचार्य राजवाडे, भांडारकर, ग.ह.खरे व सध्या डॉ. रा.चिं.ढेरे अशा थोर संशोधकांनी ह्या देवतेचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. रा.चिं.ढेरे म्हणतात- 'एखाद्या देवतेच्या घडणीचा इतिहास आणि लोकप्रियतेचे रहस्य उकलण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला, तर त्या अध्ययनाच्या द्वारा लोकमानसाच्या विविध आंदोलनांचा इतिहास आपल्या हाती येईल. डॉ. ढेरे यांचे हे विधान लक्षात घेतले तर अशा शोधकार्याचे महत्त्व जाणल्याशिवाय राहत नाही.

महाराष्ट्राच्या लोकमानसात खंडोबाचे असलेले हे प्रस्थ लक्षात आल्यामुळेच परदेशी अभ्यासकांचेही ह्या देवतेकडे लक्ष आहे. त्यामुळे हे अभ्यासक्षेत्र जागतिक अभ्यासक्षेत झाले. महाराष्ट्राच्या सर्व लोकजीवनाशी एकरूप झालेले जर्मन अभ्यासक डॉ. गुंथर डी. सोंथायमर यांच्याविषयी आपण नेहमीच कृतज्ञ असले पाहिजे.

खंडोबा ह्या लोकदैवताचा अभ्यास करतानाच महाराष्ट्रातील धनगर समाज, त्यांच्या चालीरीती, परंपरा, लोकसाहित्य आणि एकूणच त्यांचे ऐतिहासिक व सामाजिक स्थान डॉ. सोंथायमर यांनी अभ्यासले. ह्या अभ्यासक्षेत्राशी ते इतके एकरुप झाले होते की, आपल्या मृत्यूनंतर आपली रक्षा जेजुरी येथे विसर्जित करावी, अशी इच्छाही त्यांनी लिहून ठेवली होती.

खंडोबा ही वीरदेवता आहे आणि 'येळकोट येळकोट जयमल्हार' ही रणघोषणा आहे. महाराष्ट्राचे सत्त्व, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यभावना प्रेरित ठेवली ती ह्या रणघोषणांनी. ब्रिटीशांविरुद्ध लढताना 'वंदे मातरम्' ही राष्ट्रीय घोषणा प्रेरक झाली, पण ही स्वातंत्र्याची उर्मी जन्मजात असलेल्या मराठी माणसाची ही अस्मिता पूर्वपरंपरेतूनच आली आहे. 'हर हर महादेव', 'तुळजाभवानी माता की जय' किंवा 'येळकोट येळकोट जयमल्हार', 'सदानंदाचं चांगभलं' अशा घोषणांनी केवळ सैन्यच पेटून उठून नसे तर संपूर्ण समाजच चैतन्यमय होऊन हाती शस्त्र घेऊ लागला. ही घोषणा ऐकताच माणसांप्रमाणे घोड्यांनाही हत्तीचे बळ यायचे व ती चेकाळून शत्रूवर तुटून पडत. शरीरातील कणन्कण, रेणु-अणुरेणू शाहारुन टाकणाऱ्या ह्या घोषणा 'वंदे मातरम्' ह्या राष्ट्रीय अस्मितेच्याही पूर्वघोषणा आहेत. आपल्या लढाऊ वृत्तीची ती ऊर्जा आहे.

उमाजी नाईक आणि राघे भांगऱ्या हे अलीकडच्या काळातील क्रांतिकारक खंडोबापासूनच प्रेरणा घेऊन लढले. स्वातंत्र्यपूर्व आणि नंतरच्याही काळात जेजुरीच्या वैभवाकडे लक्ष देऊन काही दरोडे पडले. त्यांतला एक स्वातंत्र्यलढ्यात आवश्यक असणारा पैसा मिळावा म्हणूनच. हा इतिहास आपणास माहीत आहेच. खंडोबा ही रणकथा आहे तशीच ती प्रीतिकथाही आहे. धनगरांच्या अनेक लोकगीतात याचे उल्लेख सापडतात.

**- अरुण जाखडे**

**(सौजन्य : इर्जिक, लोकवाङ्मय गृह)**

****












# विंचुर्णीची विद्यार्थिनी



गौरी देशपांडे

इरावती कर्वे यांच्या पोटी जन्म घेतलेल्या गौरी देशपांडे यांना स्वत:च्या जबाबदारीचे निर्णय स्वत:च घेण्याचे आधुनिक वळण लावण्यात आले. कुटुंबात लहानपणापासून मिळालेल्या या स्वातंत्र्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जी जडणघडण झाली त्याचे प्रतिबिंब त्यांच्या सर्वच लेखनातून उमटल्याचे दिसते. त्यामुळे समकालीन लेखकांपेक्षा वेगळ्या स्वरुपाचे लेखन करणारी, महत्त्वाची लेखिका अशी त्यांची ओळख, तीस वर्षांच्या लेखनप्रवासातून पक्की होत गेली.

१९८४ च्या सप्टेंबरमध्ये विंचुर्णीचे घर उभे राहिल्यापासून मी १९९२च्या जूनपर्यंत तिथे सातत्याने बराच काळ राहिले. सलग चार-पाच महिने विंचुर्णी, मग दोन-तीन महिने नवरा असेल तिथे (बहुतांश हाँगकाँग) अशा रीतीने ती वर्षे बऱ्यापैकी आनंदाने घालवल्यावर मुलीची शाळा संपली आणि मग पुढची दोन वर्षे तिच्या कॉलेजच्या निमित्ताने मी पुण्याला घर थाटले. पुण्याहून विंचुर्णी काय, तीन तासांच्या वाटेवर, असे म्हणता म्हणता त्या दोन वर्षांत माझ्या विंचुर्णी-भेटी संपुष्टातच आल्या आणि त्याची खंत वाटत राहिली.

कधीतरी पटकन वेळ काढून फलटणला एखाददोन दिवस ताईकडे गेले तेव्हाही दाताओठ घट्ट आवळून पळतच विंचुर्णीला जाऊन एखादे जरुरीचे पुस्तक- कागद घेऊन येण्यापलीकडे काही केले नाही. नानी-गोरखना माझ्या दीर्घ अनुपस्थितीत माझ्याकडे रोजगारावर ठेवून, माझ्या घरा-बावरांची कामे सांगून, त्यांची देखभाल करण्याचा भार शेजाऱ्यांवर टाकणे शक्य नव्हते. म्हणून त्यांना रजा देणे भाग पडले होते. तशातच नेहमीचा दुष्काळ पडला. त्यांचे काय, कसे चालले असेल याची भाकड चिंता करण्यात अर्थ नव्हता.

रोज रात्री पुण्याला अंथरुणावर अंग टाकताना दाटून येणाऱ्या, विंचुर्णीच्या दु:खकारक विचारांना दूर लोटायला मनाला शिकवले ते, दुसऱ्या दिवशी उठून मुलांना ॲरिस्टॉटल शिकवायचा, तो वाचताना सोपे जायला लागले. एखादे कार्ड टाकून पत्ता कळवल्यावर नानींच्या हनमानाचेही एखादे कार्ड यायचे. त्यात नानी बऱ्या नाहीत, दुष्काळात हाल होतात. पुण्याहून अमुक पुस्तके पाठवा असा मजकूर असायचा. त्याप्रमाणे पुस्तके, हस्ते-परहस्ते काही पैसे, साड्या, औषधे असा माल पाठवून मी ठसठसणाऱ्या सद्सद्विवेकबुद्धीला मलमपट्ट्या करायला पाही.

पण खरे तर पुण्याच्या धबडग्यात विंचुर्णीच्या आठवणी काढायला मला फुरसद नव्हती. जन्मापासून रक्ताने 'पुणेकर' असणाऱ्या मला पुण्यात, म्हणजे कुठेतरी विचित्र, नव्या जागी आपण राहतो आहोत (अगदी कोरेगाव पार्क आणि वानवडी या पार वेड्यावाकड्या अपरिचित जागी राहिले तरी!) असे वाटायचे कारण नव्हते.

त्र्याणवच्या भूकंपानंतर लेकीने विंचुर्णीला एक धावती भेट दिली आणि परत येऊन रिपोर्ट दिला की, भिंतीवर टांगलेली एक चित्राची प्लेट फुटण्यापलिकडे काही नुकसान नाही. नानी-गोरखना भेटणे तेवढ्यात तिला जमले नाही. त्या भूकंपानंतर पडलेल्या मुसळधार पावसाने बिचाऱ्या भूकंपग्रस्तांचे फार हाल आणि नुकसान झाले, पण आठ वर्षांनंतर प्रथम विंचुर्णीच्या आसमंतातले सारे नदी-नाले, तलाव अगदी ओसंडून वाहायला लागले आणि आमचा दुष्काळ मात्र संपला. विंचुर्णीला धो-धो पाऊस पडतोय असे ताईचे रोज चार दिवस फोन आले. आमचा तलाव तर भरलाच. पण विंचुर्णीचा, कुरवलीचा आणि बाणगंगेचाही भरला. त्यानंतर खरी, मित्रमैत्रिणी आणि मुलाबाळांसहित विंचुर्णीला गेले ते त्र्याणवच्या दिवाळीत. घर परत गजबजून गेले. 'आता ते जुनंपानं दिसायला लागलं, रंग द्या, दुरुस्त्या करा' असा मुलींनी तगादा केल्यावर त्यांचा बाप म्हणाला, ''अरे! इतकी वर्षं खपून आम्ही ते जुनंपानं केलंय आणि तुम्ही ही काय कटकट लावलीय? मुळीच नाही काही करणार!'' मला तर त्याच्यात काही दोष दिसत नव्हते; त्याचे हे मत ऐकून मी खूषच झाले. मनाचा निश्चय करुन आकला, की काय श्रम पडतील ते पडतील पण महिन्यातून तीनचार दिवस येऊन रहायचेच. उमजले होते की, पुण्यातल्या दोन वर्षांत माझ्या डोक्याला कितीही जरी चालना मिळाली असली, कितीही उत्तम उद्योग मी केले असले आणि मित्रमैत्रिणी पैदा केल्या असल्या तरी आत कुठेतरी मला खुपत होते. कारण जन्मत: कधी आजारी न पडलेली मी त्या दोन वर्षांत वारंवार आजारी पडले. ताप, खोकला, सर्दी, एक्झिमा, ॲलर्जी इथपासून ते हात-पाय-मान मुरगळणे, पाऊल मोडणे इथपर्यंत मला काही ना काही दुखण्यांनी सतत बेजार करुन टाकले.

अंबूने मायेने म्हटले, ''बायो, काहीतरी कर. अगदी रया गेली तुझी!'' तर तिला, ''पन्नास वर्षं

उलटून गेल्यावर रया जायची नाही तर काय?'' असे म्हटले तरी वाटले, ''विंचुर्णीला राहिलो असतो तर अशा बघता बघता कामातून गेल्यासारख्या झालो असतो का?' आणि मग दिवाळी संपल्यावर नवऱ्याबरोबर हाँगकाँगची वारी झाली तेव्हा तर मी सगळीकडून आणखीच आजारी पडले. तेव्हा मनात म्हणाले, आता बास हे! ख्रिसमसच्या निमित्ताने परत एकदा अतिशय आनंदाने विंचुर्णीत चार दिवस काढले आणि मग मात्र निश्चयच केला, की पुण्याला रामराम ठोकायचा. अंगावर घेतलेली भाषांतरे राहिली होती, एक कादंबरी भिजत घोंगडे पडली होती, प्रकृतीचे तीनतेरा वाजले होते. आता विंचुर्णीकडे धाव घेण्यावाचून गत्यंतर नव्हते. आणि म्हणून मी 'नोकरी' जाताच विंचुर्णीला आले. तिथे आल्यामुळे मी 'बरी' झाले, दोन वर्षांमागे केलेल्या, जवळ जवळ विसरुनच गेलेल्या अनेक गोष्टी करु लागले. नानी-गोरखना परत कामाला लावले. बाग-वावरांत करायची अनेक कामे हातात घेतली... पण मध्यंतरात सगळीकडे, माझ्यात आणि त्यांच्यातही पडलेला लक्षणीय फरक मला जाणवल्यावाचून राहिला नाही. आणि विंचुर्णीने मला अत्यंत महत्त्वाचा असा शेवटचा एक धडा शिकवला. माझ्या गैरहजेरीत विंचुर्णी काही माझी वाट बघत थांबली नव्हती. सातत्याने मी इथे राहत असताना आमचे जे संबंध निर्माण झाले होते ते संपले होते. पुणे, मुंबई, कलकत्ता, हाँगकाँग, जिनीव्ह, मेलबर्न, न्यूयॉर्क, ऑस्लोहून इथे येऊन चार दिवस मजा करुन जाणाऱ्या पाहुण्यांपैकी मीही एक, असे त्यांना आता वाटायला लागले तर नवल नव्हते. पुण्यात राहिल्यामुळे माझे काही नुकसान झाले नव्हते. पण दोनतीन वर्षांचा दीर्घ दुष्काळ सोसल्यानंतर विंचुर्णीकरांची दुर्दशा झाली होती; आणि त्यांच्यातल्या काहींना पैशाची थोडी मदत करण्यापलिकडे माझा खरे तर त्या कष्टांत काहीही सहभाग नव्हता. दर चारदोन दिवसांआड भेटायला येऊन गप्पा मारणारे, चहा पिणारे कुणीही आता माझ्या ओसरीवर फिरकत नव्हते. बरेचसे कामधंदा शोधत गाव सोडून गेले होते. उरलेल्यांतले बहुतेक जण माझ्याकडे, एक उपजीविकेचे साधन, एक 'बकरा', 'चार दिवसांची पाहुणी' म्हणून बघायला लागले होते. 'आमच्या जमिनीभोवती गेल्या दोन वर्षांत पडलेल्या कुंपणा-फाटका-कुलपांनी त्यांच्या-माझ्यातले अंतर अधोरेखित झाले होते. ज्यांनी हे अंतर निर्माण केले ते सारे माझे शेजारी आणि कुटुंबीय असल्याने मी त्यांच्याविरुद्ध काही करु शकत नव्हते, करु इच्छीतही नव्हते, कारण मी खरे तर विंचुर्णीकर नव्हते, नाही.

मी शिकले, की त्यांच्या-माझ्यातली दरी सांधण्यासारखी नाही.  मी इथे राहते ती माझ्यासाठी. आणि हे उमजायला मला जवळ जवळ दहा वर्षे लागली तरी त्यांनी ते केव्हाच जाणले होते. ज्यांचा माझा रोज उठून संबंध येतो त्या विंचुर्णीकरांची मी अजूनही 'मावशी' आहे, त्यांच्या बरोबरीने मी वावरांत (ती वावरे अर्थात 'माझी' आहेत) उन्हातान्हात काबाडकष्टही करते, मग संध्याकाळच्या बसून चार गप्पा मारते; डोक्यावरुन जाणारे कांडेकरकोचे कुठे उतरतात ते उत्सुकतेने पाहते; रोज दूध आणायला जाऊन एखादे कलिंगड, दुधी, कारली, बाबुलाल-मगनलालकडून पैदा करुन येते... पण सुट्टी झाल्यावर 'विंचुर्णीकर' घरी गेले की मला त्यांच्या-माझ्यांतली गर्ता स्पष्ट समजते.

सूर्य बुडाला की, मी माझ्या साध्या का होईना, पण पक्क्या घरात येऊन भरपूर गरम पाण्याने आंघोळ करुन दिवसाचे श्रम हलके करु शकते; बायो-गॅसवर का होईना पण कमीत कमी खटपटीने शिजवलेले जेवण जेवू शकते; ते जेवल्यावर पिठा-तेलाचे डबे जवळ जवळ भरलेले असतात हे मला दिसते; बटण दाबल्यावर विजेचा प्रकाश पडतो, आणि मुख्य म्हणजे त्या विजेच्या प्रकाशात घरभर गच्च भरलेली पुस्तके मला वाचता येतात, वाचावीशी वाटतात; हाताजवळच्या फोनच्या साहाय्याने मी जगातल्या कोणीशीही - हाँगकाँगच्या नवऱ्यासकट! संपर्क साधू शकते; मी हे बसून लिहू शकते... 'विंचुर्णीकर' यापैकी काय काय करु शकतात? यांतले फारसे काही ते करु शकत नाहीत याला मुख्यत: ते स्वत:च कारणीभूत आहेत असे जरी आपण मानले, तरी ते करु शकत नाहीत हे सत्य उरतेच!

**- गौरी देशपांडे**

**(सौजन्य : विंचुर्णीचे धडे,**
**मौज प्रकाशन)**

****




जीवनाच्या सर्व अंगांचे, त्यातील मोह आणि वेदना यांचे भान असणारी लेखिका म्हणून गौरी देशपांडे महत्त्वाच्या ठरतात. 'विंचुर्णीचे धडे' (१९९६) या पुस्तकात त्यांनी खेड्यातल्या जीवनाचे आणि तिथल्या माणसांच्या अनुभवांचे ललित कथन केले आहे. त्यांच्या मिश्किल शैलीमुळे आणि विचारांच्या वेगळेपणामुळे ते वाचनीय ठरते.

देशविदेशांत त्यांनी भरपूर प्रवास केला. त्याचे संदर्भ 'एकेक पान गळावया', 'चंद्रिके ग', 'मुक्काम' यांसारख्या कादंबऱ्यात वाचायला मिळतात. अरेबियन नाइट्सच्या भाग १ ते १६ च्या अनुवादाचे प्रचंड काम हे त्यांचे एक महत्त्वाचे योगदान होय.

# अस्सल माणदेशी

सांगलीतील आटपाडी तालुक्यातील माडगूळ या लहानशा खेड्यात वयाची अठरा वर्षे घालवणाऱ्या व्यंकटेश माडगूळरांचे भावविश्व भोवतीचा निसर्ग आणि अठरापगड जातीतले शाळूसोबती यांच्या सहवासाने समृद्ध होत गेले. मौज साप्ताहिकात आठवड्यातून एक अशी प्रकाशित झालेली 'माणदेशी माणसे' (१९४९), भारतातल्या सर्व भाषांत तसेच इंग्रजी, जर्मन, डॅनिश भाषांत अनुवादित झालेली बनगरवाडी (१९५५) या साहित्यकृतींनी माडगूळकरांना उदंड कीर्ती मिळवून दिली.

व्यंकटेश माडगूळकर



*व्यंकटेश माडगूळकरांचे 'प्रवास एका लेखकाचा' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडते. त्यातील ही काही पाने...*

**चरित्र : एका कादंबरीचं**

निंबवड्याचं रुप माणदेशातील चार गबाळ्या खेड्यांपेक्षा वेगळं नव्हतं. जुनीपानी धाब्याची घरं, काडानं शेकारलेल्या झोपड्या, खिंडार, खिळगे, दगडं, लाकडं, धूळ, म्हशी, शेरडं, कोंबड्या, कुत्री, उकिरडे, वाहतं आणि साठलेलं सांडपाणी. चार कडुनिंबाची झाडं, एखादी दुसरी पिंपरण, एक पिंपळ, एक वड, कावळे, चिमण्या, साळुंख्या.

वैरणीच्या गंजी, अंगणात वाळत घातलेल्या वाकळा, कुठं तांबड्या मिरच्यांचं वाळवण, पालथ्या पत्री मोटा. सोडलेल्या बैलगाड्या. चरणारी गरीब गाढवं. खिळग्यांवर वाळत घातलेली हिरवी-तांबडी लुगडी. खणाच्या चोळ्या. शेणाचा, तिखट कांद्यांचा, धुराचावास. उंच, पातळ स्वरातलं संभाषण, पोरांचं रडगाणं. बंद कवाडं, मोकळ्या निवांत पडव्या.

काही वर्षं शिक्षकाचीच नोकरी करणाऱ्या माझ्या वडील बंधूंनी, गावात अमक्याच्या घरी जा, तमक्याला भेट, असं सांगितलं होतं.

शाळा म्हणजे, पडक्या वाड्यातले काटकोनातले दोन काडीपाट सोपे होते. कोनाडे, खुंट्या आणि कडीपाट असलेले. जुन्या दरवाज्याला कुलूपं घातलं, की गाढवं, गुरं आत जाऊन सावलीला बसायची अडत. रात्री कधी चुकार कोंबड्या उडून आत जात आणि कोनाड्यात बसून अंड घालत. अंगणात पाण्याचा आड होता; पण त्याला उन्हाळ्यात पाणी नसे.

आडाशेजारी जुनं डाळिंबाचं झाड होतं. त्यावर फक्त लाल फुलं दिसत. फुलाचं फळ झालेलं मी कधी पाहिलं नाही.

शाळा-मास्तराचं जीवन मला निंबवड्यात जगायला मिळालं. ह्याचा मला पुढं कादंबरीसाठी उपयोग होईल, माणदेशी माणसांतल्या झेल्या मला इथं मिळेल, असं कधी वाटलं नाही. मी कधी लेखक होईन, असंही वाटलं नव्हतं.

लेखनाकडं वळायला अनेक गोष्टी कारण होत असाव्यात.त्यातलं एक कारण म्हणजे आजूबाजूचे लोक हे आपलं उणंदुणं काढतात आणि सारखं हिणवतात, आता तुझ्या हातून नाव होण्याजोगं काही होणार नाही. तू खायला कहार आणि धरणीला भार आहेस.

मी उनाड होतोच. शिक्षणाकडं लक्ष नव्हतं. खेळ, रानावनात भटकणं, मिसळू नये, अशा सवंगड्यांत मिसळून, साधारणत: भल्या माणसाच्या घरात जन्मलेल्या पोरानं करु नयेत, असे उद्योग मी करी. हे सगळे उद्योग वांड पोरानं करावेत, असेच होते. त्यात, हायस्कूलमध्ये असतानाच मी शाळा सोडली आणि चळवळीत गेलो. घरीदारी काही न सांगता दोन-तीन वर्षं भटकण्यात घालवली. त्यामुळं जवळचे, नात्यागोत्यातले लोक म्हणायला लागले की हे पार वाया गेलं. ह्याच्या हातून आता काही होणं कठीण आहे.

आता मला वाटतं, ह्या लोकांना उत्तर देण्यासाठीही मी लेखनाकडं वळलो.

निंबवड्याची माझी नोकरी मी किती काळ केली, हे आता माझ्या नेमकं ध्यानात नाही. जुना पत्रव्यवहार, कागद, चित्रं, फोटो जपून ठेवणं आपल्याला माहीत नसतं. त्यात म. गांधींच्या मृत्युनंतर, खेड्यापाड्यांतून झालेल्या जाळपोळीत आमचं माडगूळचं घर जळालं. त्यात

घरातले सगळे कागदपत्र जळून गेले. विनोबांनी विचारपूर्वक आपली शैक्षणिक सर्टिफिकिटं, निर्माल्याप्रमाणं नदीत सोडली. मला शैक्षणिक काळात मिळालेली चित्रकलेसाठीची दोन आणि व्हा.फा.चं एक अशी तिन्ही सर्टिफिकिटं जाळपोळीत राख झाली. त्यामुळं शिक्षणाबद्दलचा काही पुरावा माझ्याकडे राहिलेला नाही.

काही वर्षामागं मी कऱ्हाड मार्गे एस.टी.बसनं माडगूळला गेलो. ही बस निंबवड्यावरुन जाते, हे मला माहीत नव्हतं. आजचं बदललेलं निंबवडं बघून मी चकित झालो. माझ्या आठवणीतलं निंबवडं आता प्रत्यक्षात राहिलेलं नाही. तिथली मेंढरं, तिथली माणसं, तिथली घरं, तिथला अंधार, तिथली ऊब माझ्यापुरती नाहीशी झाली आहे.

माझे वडील बंधू आटपाडीपासून आठएक मैल दूर असलेल्या लेंगरवाडी ह्या धनगराच्या गावी काही वर्ष शिक्षक होते. ही सुद्धा एकशिक्षकी शाळाच होती. सुट्टीच्या दिवशी ते घरी येत. पुष्कळ वेळा माझी आई दशम्या पोचवण्यासाठी मला लेंगरवाडीला धाडी. लेंगरवाडीची एकाकी वाट तुडवीत मी जाई.

भाऊ मला म्हणत, ''आता कुठं लगेच माघारी जातोस? राहा दोन दिवस. शनिवार सकाळची शाळा करुन आपण दोघंही परत जाऊ.''

त्यांच्या खोलीत मी राहत असे. संध्याकाळी चरून गावाकडं येणारी मेंढरांची खांडं, पाहत-ऐकत असे. रात्री चावडी-देवळापुढं अंधारात होणाऱ्या धनगरांच्या गप्पा ऐकत असे. माझा भाऊ चांगलाच गोष्टीवेल्हाळ आहे. रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या ह्या गावातल्या अनेक गोष्टी अतिशय रसाळ भाषेत तो मला ऐकवी. लेंगरवाडीहून परत आटपाडीच्या घरी येतानाही, वाट ओसरावी, उन्हाचा आणि चालण्याचा ताप जाणवू नये, म्हणूनही तो मला शाळेतल्या गोष्टी सांगे. हे सगळं मला 'बनगरवाडी' लिहिताना उपयोगी पडलं आहे.

माझे वडील मला गुरवाची गोष्ट सांगायचे. त्यांच्या तरुण वयात घडलेली. गावातल्या गुरवाचं नाव मुरा. गावच्या मध्यभागी असलेल्या मारुतीच्या देवळाला लागून त्याचं लहानसं घर होतं. घरापुढं बेलाचं झाड होतं. परसदारी फुलझाडं होती. गावातलं मारुतीचं देऊळ म्हणजे चांगली इमारत होती. गाभारा ऐसपैस होता. वर कडीपाटीचा तक्तपोशी होती. गिलावा केलेल्या भिंतीवर कोणा कसबी चित्रकारानं देवादिकांची सुरेख चित्रं रंगवलेली होती. देवळात पोथ्या-पुराणाचं वान होई. भजन-कीर्तन होई. मारुती-जन्माचा सोहळा होई. पाडव्याला निंब खाण्यासाठी उभा गाव मारुतीच्या देवळात जमा होई. कोणी साधू, संत गावात आला, म्हणजे त्याची उतरण्याची सोय देवळात होई. रोज संध्याकाळी गावातली माणसं देवळातच घटकाभर बसून एकमेकांशी बोलत. रात्री झोपायलाही काही माणसं देवळाकडं येत. देऊळ हे गावातलं फार महत्त्वाचं सांस्कृतिक मंदिर होतं आणि मुरा गुरवाकडं मारुतीची पूजाअर्चा, नैवेद्य, नारळ, झाडलोट-सारवण असल्यामुळं त्याला गावात मान होता. मुरा गुरव सणाच्या दिवशी गावकऱ्यांना पत्रावळी द्यायचा. ह्या वडाच्या पानांच्या असत. त्यामुळं गावातल्या महत्त्वाच्या घरी त्यांचं जाणं-येणं होई.

मुरा गुरव भला माणूस होता. भांडणतंटा, चोरी-चहाडी, व्यसनं, शिंदळकी असल्या कशाही गोष्टींत तो नव्हता. चोख, सरळमार्गी माणूस. होता होईल तेवढी मदत दुसऱ्याला करणारा स्पष्ट बोलणारा.

एके दिवशी रात्री त्याला चमत्कारिक स्वप्न पडलं. सकाळी मारुतीची पूजाअर्चा झाल्यावर हा दिवसभर घरोघरी हिंडला आणि त्यानं लोभातल्या लोकांचा निरोप घेतला.

''आप्पा, काय उणंदुणं माझ्याकडनं घडलं असलं तर माफी करा. मी आता चाललो.''

''कुठं चाललास मुरा? कधी माघारी यायचास?''

''आता माघारी येणं नाही. आप्पा, मला वरचं बोलावणं आलंय्.''

''म्हणजे, रं?''

''काल राती बगा पहाटं पहाटं, एक मळवट भरल्याली, केस मोकळं सोडल्याली, हिरवं लुगडं आणि लाल खणाची चोळी लेल्याली बाई सपनात आली. मला म्हणाली, मुरा, चल माझ्यासंगट, तयारी कर. एवढं बोलली आन् मी जागा झालो. आप्पा, माजं भरलं आता. रामराम.''

असं गावभर सांगत मुरा गुरव त्या दिवशी हिंडला.




'आपण लिहीत आहोत ही कादंबरी आहे का याची मला खात्री नव्हती...' असे माडगूळकरांनी 'बनगरवाडी'बद्दल म्हटले आहे. तिचे सहज, ओघवते लेखन पाहता 'कादंबरी' हा घाट लेखकाने हेतुपुरस्सर स्वीकारला नव्हता हे ध्यानात येते. 'दशम्यांची पिशवी पाठीला बांधून' एक पोरवयाचा मास्तर धनगरांच्या वस्तीत बंद पडलेली शाळा चालवण्यासाठी येतो. ही वस्ती म्हणजेच बनगरवाडी. तिथला ओसाड भूभाग, रापलेली, दरिद्री माणसे यांचाच तोही एक भाग होऊन जातो. एका वर्षभरातल्या, धनगर वस्तीच्या जीवनचक्राचे तपशील या कादंबरीत बारकाव्यांनिशी मांडण्यात आले आहेत. यथार्थ जीवनवास्तवाचे हृद्यपणे चित्रण करणारी कलाकृती म्हणून बनगरवाडी महत्त्वाची मानली जाते.




‘वावटळ’ (१९८५), ‘करुणाष्टक’ (१९८६), ‘कोवळे दिवस’ (१९९०) या त्यांच्या काही अन्य प्रसिद्ध कादंबऱ्या. त्यांच्या सत्तांतर (१९८२) या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. मानवी जीवनाइतकाच प्राणीजीवनात मनापासून रस घेणाऱ्या माडगूळकरांची ही कादंबरी वानरांच्या विश्वावर आधारित आहे. सत्तास्पर्धेचे हे चित्रण प्रतीकात्मक पातळीवर पोचून सत्तेची लालसा, क्रौर्य, हिंसा आणि वासना या आदिम प्रेरणांचे दर्शन ही कादंबरी घडवते.




त्याचं बोलणं कुणी फारसं मनावर घेतलं नाही. समजूत काढली.

‘‘असं नसतं, मुरा. हरेक सपन खरं हुतंच, असं नाही. तुला देवीनं दर्शन दिलं, समज. इथनं पुढं तुलं भलंच होईल.’’

पण मुराची समजूत निघाली नाही. त्यानं सगळ्या लोभाच्या माणसांचा अखेरचा निरोप घेतला.- आणि रात्री अचानकपणे ढाळवांत्या होऊन दिवस उगवायला म्हातारा मुरा गुरव मरुन गेला.

चांगल्या कळत्या वयामध्ये माझ्या वडिलांनी मुरा गुरवाला पाहिला होता. त्याचं विलक्षण मरण पाहिलं होतं. त्यामुळं तपशिलानं हा प्रसंग ते सांगत.

दहा-बारा वर्षांच्या वयात वडलांच्या तोंडून ऐकलेला मुरा गुरवाचा मृत्यू माझ्या मनात खोल असा राहिलेला होता. ‘बनगरवाडी’तील कारभारी मुराच्या पद्धतीनं मरुन गेला.

मी त्रेचाळीस सालच्या सुमारास गावी राहिलो होतो, तेव्हा आमच्या घरासमोरच्या रस्त्यापलिकडे असलेल्या उजाड, पडक्या घरात एक जोडपं रहायला आलं. इतके दिवस हे जोडपं कुठं, कोणत्या गावी राहायला होतं, कोण जाणे. बाई भली सासनकाठीसारखी उंच, रोडकी, रंगानं गर्द काळी होती आणि विलक्षण कष्टाळू आणि अबोल होती. हिनं आणि नवऱ्यानं खूप खपून घराच्या ढासळलेल्या भिंती स्वत:च बांधून काढलेल्या मी पाहिल्या. दोघंच माती आणत, चिखल तुडवत. भेंडे घालत. भिंती नवरा बांधी, बायको त्याच्या हाताखाली काम करी.

माझ्या घराच्या उजव्या बाजूला सळनळीत अंगकाठीचा, आखूड धोतर नेसणारा आणि गबाळा पटका डोईला बांधणारा, खालचा ओठ लोंबता असलेला कोणी गरीब शेतकरी होता. हा आणि ती कष्टाळू काळी बाई म्हणजे ‘बनगरवाडी’तील शेकू आणि त्याच्यापेक्षा मुंडा हात उंच अशी त्याची घरवाली आहे. मला वाटतं, माझ्या बाईआजीचेही काही गुण मी शेकूच्या बायकोला दिले आहेत आणि त्या बाळा बनगरात थोडासा मीही मिसळलो आहे.

**- व्यंकटेश माडगूळकर**

**(सौजन्य : प्रवास एका लेखकाचा, मॅजेस्टिक प्रकाशन )**

****

ग्रंथाली | थिंक महाराष्ट्र.कॉम | रविंद्र कुळकर्णी मदत निधी

## सोलापूर जिल्हा संस्कृतिवेध

१० ते २१ डिसेंबर ※ जिल्हाभराचे माहिती संकलन आणि जनजागरण विशेष साहाय्य : जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

### २१ डिसेंबर २०१४ वाचकदिन

**स्थळ : फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिरासमोर, सोलापूर**

**❁ कार्यक्रम रूपरेषा ❁**

**सकाळी ९ ते दुपारी ४**

**ग्रंथपालांसाठी कार्यशाळा**

विषय : ग्रंथालय हा विषय

कार्यशाळेतील सहभाग : मुंबई येथून **श्री. हेमंत शेट्ये** (ग्रंथपाल)
पुणे येथून **श्री. विक्रम धडगावकर** (कॉम्प्युटर सॉफ्टवेअर)

**दुपारी ४.३० ते ५.३०**

**पुस्तक प्रकाशन : हस्ते अच्युत गोडबोले**

**दीपदान** - चंद्रशेखर सानेकर, **वाझुंठाव** - भाऊ गावंडे,
**चंदेरी सृष्टी, सोनेरी गोष्टी** - प्रकाश चान्दे,
**आनंदनक्षत्र** - प्रल्हाद जाधव

**संध्याकाळी ५.३० ते ७.३०**

मराठी चित्रपटातील नवी लाट चित्रपटविषयक चर्चात्मक कार्यक्रम
सहभाग **- समीर पाटील, संजय भास्कर जोशी**

संस्कृतिशिबिरे

| दिवस | तालुका |
|---|---|
| १०/१२/२०१४ | बार्शी |
| ११/१२/२०१४ | करमाळा |
| १२/१२/२०१४ | माढा |
| १३/१२/२०१४ | सांगोला |
| १४/१२/२०१४ | माळशिरस |
| १५/१२/२०१४ | पंढरपूर |
| १६/१२/२०१४ | मंगळवेढा |
| १७/१२/२०१४ | मोहोळ |
| १९/१२/२०१४ | अक्कलकोट |
| २०/१२/२०१४ | सोलापूर |

**विशेष साहाय्य**

VISHWASHANTI GURUKUL ❁ CBSE School ❁

# डॉ. द. ता. भोसले यांचे निवडक साहित्य













₹ १२०




₹ १००




₹ १२०




₹ १००

संस्कृती प्रकाशन ६८८, नारायणपेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे-३० : ०२०-२४४९७३४३
Email- sanskrutiprakashan@yahoo.com
www.sanskrutiprakashan.com

# वाट आम्हां ती आवडे



ग.दि.माडगूळकर

'गीतरामायणकार' ग.दि.माडगूळकर यांचा जन्म शेटेफळ या गावी झाला. शिक्षण आटपाडी, कुंडल, औंध येथे झाले. वि.स.खांडेकरांचे लेखनिक म्हणून काम करीत असताना त्यांना वाचनाची गोडी लागली आणि लेखनाची ओढ वाटू लागली. 'भक्त दामाजी' व 'पहिला पाळणा' या चित्रपटांपासून त्यांनी चित्रपटगीते लिहिण्यास सुरुवात केली. 'रामजोशी' या चित्रपटाची कथा, संवाद, गीते त्यांनी लिहिली. या चित्रपटात त्यांनी अभिनयसुद्धा केला. येथूनच पुढे पटकथा लेखक व गीतकार म्हणून ते चित्रपटसृष्टीचा भक्कम आधार बनले.

**प्रतिभेच्या मळ्यात**

रात्री साधारण अकराला माडगूळची वेस आली. अरुंद रस्त्यावर एका ठिकाणी श्रीधरनी गाडी थांबवायला सांगितलं. 'दिलीप,' त्यांनी धाकट्या भावाला कल्पना दिली, ''सरपंच आत्ता घरी असेल. उशीर झालाय खरा. पण त्याला बोलावून घेऊ. तो बाकीच्यांना घेउन येईल.

सरपंचाच्या नावानं सगळ्यांनीच रस्त्यावरुन शंख केला. पंधरावीस मिनिटांनी तो घरातून बाहेर आला. काय करीत होता, कुणास ठाऊक! शिरा ताणूनताणून तुटायला आल्या. अंधारातच श्रीधरनी सर्वांच्या त्याच्याशी ओळखी करुन दिल्या. खूप दिवसांनी गावची मंडळी भेटल्यानं तो हरखून गेला होता.

''येवढ्या राच्चं येनं क्येलं? लौकर न्हाई का निगायचं?'' त्यानं काळजीनं विचारलं.

आम्ही सर्वांनी अंधारातच विठ्ठलकडे नजरा लावल्या. काय बोलणार?

''आसं करा, गाडी जाऊ द्या 'पावा'त. तुम्ही फुडं जावां; मी येतून मागोमाग.'' असं श्रीधरना सांगून तो पुन्हा घराकडे झपझप चालू लागला. मधेच मागे वळून ओरडला, ''थांबा जरा. पानी घेऊन येतो.''

अंधारातच पाणी पिऊन निघालो.

दहाएक मिनिटांतच गाडी गावात आली. डाव्या बाजूच्या एका अरुंद, खाबडखुबट वाटेनं आत शिरली. जेमतेम बैलगाडी जाऊ शकेल इतकीच रुंद वाट. दोन्ही बाजूंना पिकं उभी होती. एका बैठ्या चाळवजा इमारतीपाशी गाडी आली. हेच 'पावा'तलं घर. आता आम्ही माडगूळच्या भूमीवर उभे होतो. गदिमांच्या साक्षात 'बामणाच्या पत्र्या'जवळ. भोवताली मिट्ट अंधार. परिसराचा अंदाज येईना. आजूबाजूला फक्त ज्वारीची ताटं. मधूनच वाहणाऱ्या थंडीच्या लहरी. त्यांनी शहारुन जाणाऱ्या ताटांच्या दिठ्या. पायाखाली काळीकभिन्न भुसभुशीत माती. नाकपुड्यांत भरुन राहणारा शेतगंध.

आम्ही हातपाय धुऊन तयार होतोय, तोवर सात-आठ गावकरी जमले. त्यात सरपंच, चेअरमन, गदिमांचे धाकटे बंधू श्यामकाका, म्हादा नसले इत्यादी मंडळी होती. त्यांच्या ओळखी होत गेल्या.

माडगूळच्या त्या पहिल्या दर्शनाबरोबरच मनात 'मंतरलेल्या दिवसां'तली शब्दांची रांग धावू लागली:

*'मी बैठकीवर येतो आणि लिहिण्यास प्रारंभ करतो.*

*एकांताच्या परिणामामुळे असो की बीज अंकुरित करण्याच्या त्या भूमीच्या सामर्थ्यामुळे असो, डोक्यातल्या कल्पना साकार होण्यासाठी धडपडू लागतात. माझे लेखन सुरु होते. कधी मी स्वत: लिहितो; कधी मी सांगून बरोबरीचा सहकारी ते उतरुन घेतो. लिहिण्याचे वा सांगण्याचे काम एकदा सुरु झाले की मग ते अडखळत नाही. विचारांची चाती फिरत राहते; मेंदू कापसासारखा हलका आणि फुगीर होतो; कथानकाचा पिळदार धागा अतूटपणे निघत राहतो. मधेच घराकडून न्याहरी येते. त्यात बाजरीची खरपूस भाकरी, लसणाची चटणी, साईचे दही अशा खास ग्रामीण वस्तू असतात. त्यांच्या सेवनाने पोट आहारत नाही की कंटाळा आसपास फिरकत नाही. न्याहरीच्या वेळी सोडलेले बैल पुन्हा शिवळ खांद्यावर घेतात तसा मेंदू पुन्हा विचाराखाली मान देतो आणि लिखाणाचे काम निष्ठेने सुरु होते. झोपडी पूर्वाभिमुख असल्यामुळे सूर्याचे अंगाला चटके बसू लागेपर्यंत कामाचा वेग उतरत नाही...'*

दोघाही माडगूळकर बंधूंना त्यांचे आणखी एक बंधू भालूकाका यांनी काही लेखनासाठी कच्चं साहित्य पुरवलं आहे. पण अखेर कथा किंवा अनुभव सांगणे आणि ते सर्जनशील, प्रतिभावंत व कलावंत लेखणीतून उतरणं यांत मोठा फरक राहतो. माडगूळकरांचे सर्वात धाकटे बंधू अंबादास यांनाही लेखणी प्रसन्न होती. त्यांच्या लेखनाविषयी बुजुर्ग समीक्षक वा.ल.कुलकर्णी यांनी माझ्यापाशी प्रशंसोद्गार काढले होते. पण त्यांनीही आपल्या लेखनाकडे पुरेशा गांभीर्यानं लक्ष पुरवलं नाही. लेखनविषयक काही ना काही गुण असलेले हे सर्वच माडगूळकर बंधू लिहीत राहिले असते, तर मराठीमधे तो एक आगळा विक्रम झाला असता,

असं कधीकधी तीव्रतेनं माझ्या मनात येतं, आणि मन व्याकुळल्याविना राहात नाही.

श्यामकाकांच्या नंतर म्हादा नसलेबरोबर आणखी एक वाद रंगला. त्यानं भुताखेतांच्या कथांची पुडी सोडली. मोठ्या छातीठोकपणे तो आपले पिशाचविषयक अनुभव सांगू लागला. सरपंच आणि आणखी एक कोणीतरी त्याच्या सुरात सूर मिसळवू लागला. कुठलंसं म्हणे एक पडकं घर. ते झपाटलेलं. त्याच्या बाजूने गेलं की ढोल-झांजांचे आवाज ऐकू येतात. माणसांना भूतबाधा होते. आमावस्येला तिकडे गेलात तर तुमची धडगत नाही. वगैरे वगैरे.

मी बराच वेळ ते सगळं चऱ्हाट ऐकून घेतलं. असली थोतांडं ऐकण्यात आता काहीच स्वारस्य उरलेलं नाही. त्यामुळं मी मधेच आगाऊपणा करीत म्हादाला टोकरलं,-

''तू स्वत: कधी गेला आहेस का तिकडे? स्वत: काही पाहिलं आहेस का?''

''नाही.''

''मग तू या असल्या भाकडकथांवर विश्वास ठेवतोस कसा?''

''अहो, अनेकांना अनुभव आलेला आहे.''

मनात शब्दांची झुळझुळ सुरु झाली, आणि काही कल्पना त्यांवर तरंगू लागल्या. पपांच्या मनातला तो गोराहात कोणता? कसलं बियाणं टाकायला ते सजणीला सांगत होते? एका प्रतिभेला नेमकी कोणती जोड हवी होती?

'पंचवटी'तल्या फार वत्सल, उदार आणि शालीन हाताची आता सय आली. ती दोन जीवनं इथं या निवान्त खेड्यात कशी एकरूप होऊन जात असतील? किती रम्य असतील ते निरागस हिरव्या वर्खाचे क्षण?...




'आमच्या माडगूळला बोरी, बाभळी आणि निवडुंग यांच्याशिवाय काऽऽही पिकत नाही; हा सगळा दुष्काळी मुलुख म्हणूनच प्रसिद्ध आहे.' असं पपा बऱ्याचदा गप्पांच्या ओघात विषादानं म्हणायचे. मग इथल्या या नापिक जमिनीत इतके अक्षरांचे मळे कसे पिकले गेले? इथल्या मातीचा अंतर्भाव झाला की झरणीमधल्या शाईला इतकं सुवर्णरुप कसं लाभतं? सोन्याची झरणी... तीत सोन्याची शाई... टोकाशी सोन्याचं नीब... आणि त्या निबातून निर्मिती अस्सल सुवर्णाक्षरांचीच! या काळ्या मातीच्या पोटातच काहीतरी अलौकिक तत्त्वं सामावलेली असावीत. प्रज्ञावंताच्या हाताला हिचा उत्कट स्पर्श झाला की तिच्या कणाकणांतले सारे रसगंध त्याच्या प्रतिभेमधे हिमालयावर विसावलेल्या चंद्रकिरणांसारखे मिसळून जात असावेत. अजब किमया आहे सारी!...

एकीकडे हुर्डा पोटात स्थिरावत होता; आणि त्याचबरोबर मनातही तृप्ती उतरत राहिली. शरीर चांगलंच जडावलं.

एरवी माडगूळला बघण्यासारखं काहीच नाही. पण संध्याकाळी पाय मोकळे करण्याच्या निमित्तानं बाहेर पडलो. वेशीवरचं मारुतीचं जीर्णशीर्ण देऊळ, खंडोबाचं देऊळ, गावची शाळा, लहानसं ग्रंथालय असं पाहातपाहात आलो. बोंबेवाडीच्या रस्त्याकडे जायची कल्पना निघाली. त्या रस्त्याला लागलो. हा सगळा रस्ता कच्चा नि धूळभरला.

दूरवरच्या शेतांपलिकडे सूर्याचा नारिंगी गोळा तेज हरपत अस्ताचलाला जात होता. काळ्या-हिरव्या बाभळीच्या रंगामागे तो फारच मनमोहक रंगसंगती धरून होता. कॅमेऱ्याच्या साथीनं त्याचं एका लयदार बाभळीशी चिरस्थायी नातं जोडून घेतलं. उत्तरसंध्येच्या नि:शब्द छायांमधून परतताना सर्वच बाभळींवर उदासी पसरलेली वाटली. उद्या आमचा माडगूळमधला मुक्काम हलणार होता. त्या घटनेतल्या हुरहुरीचं, खिन्नता पसरवणारं काहीतरी पार्श्वसंगीत मनात सुरु झालेलं असावं का? थरकत्या मनाबरोबर काही शब्द पावलं टाकू लागले होते.

*'ओळखीची तरिही नवखी आज दिसते का गडे?*
*वाट मज ती आवडे!*
*बाभळीला बहर पिवळा, वरुन बोले कावळा*
*आज कानां लागतो का साद त्याचा वेगळा?*
*लाल चाकोऱ्या कशाला वळति या माझ्याकडे?'*

**- आनंद अंतरकर**

**(सौजन्य : जळ-मृगजळ, विश्वमोहिनी प्रकाशन )**

****




कथा, चित्रकथा, नाटक, कादंबरी असे इतरही लेखन केलेले असले तरी माडगूळकर जनमानसात रुजले ते त्यांच्या गीतलेखनामुळे. गीतकार म्हणून तांब्यानंतर माडगूळकरांचेच नाव येते. प्राचीन मराठी गीतपरंपरेचा, संत-पंडित-शाहिरांच्या गीतगुणांचा समृद्ध वारसा पाठीशी घेऊन माडगूळकरांनी आपली गीतरचना केली आहे. चित्रपटातील पात्रांच्या भावनानुसार कथाविषयाला खुलावट आणणारी नाट्यगीते लिहिण्यात गदिमा सिद्धहस्त होते. 'उद्धवा अजब तुझे सरकार', 'एक धागा सुखाचा', 'शंभर धागे दु:खाचे', 'थकले रे नंदलाला', 'बाई मी विकत घेतला श्याम', 'विठ्ठला तू वेडा कुंभार' यांसारख्या त्यांच्या शेकडो सुंदर सोप्या गीतांच्या ध्वनिमुद्रिका महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग ठरल्या आहेत.

# दुर्गाबाई पंढरपूरकर



दुर्गाबाई भागवत

मराठी लघुनिबंधाचे साचेबंद रुप बदलून तो अधिकाधिक चैतन्यपूर्ण, वास्तव, अनुभवनिष्ठ आणि चिंतनात्मक करण्यात दुर्गाबाईंचे योगदान मोठे आहे.
जीवनाच्या अनेक अंगांमध्ये व ज्ञानविषयांमध्ये मनापासून रमणाऱ्या दुर्गाबाईंनी भरतकाम, विणकाम, पाककला, लोकसंस्कृती, वन्य-प्राणिजीवन, वनस्पती या विषयांतही भरपूर लेखन केले. भावोत्कटता, चिंतनशीलता आणि संवेदनाप्रधान भाषा यामुळे त्यांचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण ठरते.




पंढरीचा नि प्रत्येक मराठी माणसाचा आंतरिक दुवा कुठे ना कुठे तरी जुळलेला असतोच. कारण, पंढरी म्हटली की तिच्यावर सावळे-सगुण ब्रह्म सामावते. विश्वात असो अगर नसो, वारकरी पंथाच्या समत्वाबद्दल प्रत्येक माणसाला आतून मायाच नव्हे तर ओढ असते. प्रत्येक माणसाला आपल्या कुटुंबाबद्दल, पूर्वजांबद्दल जे उपजत आकर्षण असते तेच आकर्षण पंढरपुराबद्दल आढळते. विठोबा नुसता असूच शकत नाही. तो मूळचा दक्षिणेकडचा, पण पंढरपुरात येऊन जो विटेवर उभा राहिला तो कायमचाच. का आला तो पंढरपुरात? परंपरा म्हणते, पुंडलिकामुळे; पण धनगर म्हणतात की तो आला पदुबाईमुळे. कोण ही पदुबाई? पदुबाई ही विठोबाची मूळची राणी नि रुक्मिणी ही तिची छाया अशी त्यांची समजूत. तिची कथा ऐकली नि मला पंढरपुरला जायची ओढ लागली.

खरे म्हटले तर तेच आमचे मूळ गाव. घराण्याची शापित वास्तूदेखील त्याच्या परिसरात पडून आहे. कुणीला तिला वारस नाही. आजोबांनी लहानपणीच आपल्या आईचा मृत्यू आपल्या वडिलांच्या क्रूर, अन्यायी वागणुकीमुळे त्या वास्तूत घडून आलेला पाहिला नि त्या रक्तलांच्छित भूमीत परत पाय ठेवणार नाही, अशी शपथ घेऊन घर सोडले ते सोडलेच. वार्धक्यात ते ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामाची गाथा वगैरे ग्रंथ भक्तिभावाने वाचीत, एकादाशीही न चुकता करीत; पण देवळात कधी गेले नाहीत. जायचे तर विठोबाच्या दर्शनाला, पण पंढरपुराबद्दल अढी; तेव्हा मूर्तिरूप विठ्ठलाला ते कधीच सामोरे गेले नाहीत, अर्थातच आम्हा मुलाबाळांनाही पंढरीचा लळा लागला नाही. वास्तूबद्दल अभिमान वाटला नाही. कुळपरंपरा खंडित झाल्यामुळे जुनात स्थानाभिमानाला घरात अवसरच मिळाला नाही. आजोबांनी सर्व टाकले. घरदार, शेतीवाडी, सगेसोयरे, सारे काही सोडले. बापाचे नावदेखील पांडुरंग होते ते टाकून दिले. तेव्हा कुळाचाराबद्दल येणारा कुळदैवताचा जिव्हाळा आमच्यात कुठेच उमटला नाही. तरीपण विठोबाने आजोबांचा पाठपुरावा करायचा तो केलाच नि अखेर त्यांना आपलेसे केले. आजोबांनी देवळातला विठोबा सोडला होता, पण ज्ञानेश्वर-तुकारामांचा विठोबा त्यांनी त्यांच्या ग्रंथातून जणू चोरुनच बरोबर आणला. चंद्रभागेचे वाळवंट त्यांना सतत चाळवीत राही. खोलवर दडून राहिलेले कुळस्थानाचे सौहार्द रुपांतरीत झाले नि ग्रंथांच्या चवडीवर विठोबा त्यांच्यापुरता स्थायिक झाला.

आजोबांचे स्थित्यंतर बघून मला विस्मय वाटला. बुद्धिवादाचे खडतर व्रत घेतलेला हा माणूस आता या पारंपारिक भाविकतेने इतका मवाळ कसा झाला, हे कोडे मला नेहमी पडलेले असे.

पंढरपूर पाहायला ध्याय मात्र कुठेतरी होता. तिथला आमचा तो वाडा पाहायचा होता. कारण, एरवी आम्हाला आमची अशी म्हणायला वास्तूच नाही. जन्मभूमी नव्हे, मायभूमी नव्हहे, पण कुळभूमी तीच होती. माती मोठी चिवट व लाघवी असते.वाड्याची ती माती निरनिराळ्या हाका मारुन मला बोलावायची. स्थळे पाहाण्याचा छंद कुणाला नकोसा असतो? मी तर भटकीच. पण एवढ्या भ्रमंतीत पंढरपुरी जावे असे काही मनात आले नाही. कारण, पंढरपुरात जायचे तर त्या परित्यक्त, जीर्णशीर्ण वाड्यासाठी जाणे हास्यास्पदच होते. जायचे तर मंदिरात. मंदिरात जायचे तर त्या मूर्तीशी सख्य जोडण्याइतके संस्कार नव्हते नि मनाचा कलही नव्हता. तेव्हा भौतिक ओढ प्रबळ असली तरी अध्यात्माचा संपूर्ण अभाव असल्याने पंढरपुरी जाणे म्हणजे शुद्ध वंचना होती. पण पुढे ती मातीची हाक मंदावली, साफ निमाली आणि त्याच त्या ग्रंथांचे नवे वाचन केल्यावर, त्यांच्यातला आजोबांनी चोरुन आणलेला विठ्ठल कुठेतरी जाणवू लागला आणि पंढरपूर वेगळेच प्रतीत झाली. त्यात काही सुंदर लोककथा मला विठोबाबद्दल मिळाल्या. संपूर्ण मानव असातो देव मला मग विविध नाट्यरुपांत साकार झालेला भासू लागला. तिथून परंपरेचा निराळा अन्वय मला लागला.

आता माझ्या व्यक्तिगत भूमिकेत व

पारंपारिक सामाजिक भूमिकेत एक सुसंवाद निर्माण झाला. वारकऱ्यांची परंपरा निराळ्या अर्थाने पटू लागली. सारे वारकरी वाङ्मय, लोककथा आणि मी यांच्यात लय लागली. पंढरपूर स्थळ मात्र अजून वेगळेच होते. ते बघायचे होते पण न बघितले तरी बिघडत नव्हते. तरीही अभ्यासाच्या पाऊलवाटेवर श्रद्धाळूंची पावले अधूनमधून उमटलेली दिसू लागली. साऱ्या वाटा काय अखेर पंढरीलाच जातात? मन ही गोष्ट मानायला राजी नव्हते. ऐतिहासिक भूमिका सरावाने सोडता येत नव्हती; सोडणे इष्टही नव्हते. कारण, बौद्धिक जीवनाचा सांधाच इथे ढासळू पाहात होता. ऐतिहासिक दृष्टी हा एकच काल-आज-नि-उद्याला जोडणारा दुवा होता. खूप कवडसे, खूप रंग, खूप आकृती ती दृष्टी पाहू शकत होती. पण त्यात मुख्य सूत्र कधी सुटले नाही. ते सूत्र असे:

भीमेच्या तीरावर पंढरपूर नि पंढरपुरात विठोबाचे देऊळ आहे. महाराष्ट्राच्या अध्यात्माची ही सर्वश्रेष्ठ पेठ आहे. भीमा उर्फ भीमारथी नदी ही महाभारताच्या काळापासून एक पवित्र नदी म्हणून गणली गेली आहे. पण पंढरपूर नि तिथला पांडुरंग मात्र पुष्कळच नंतरचा आहे. पण नंतरचा आहे म्हणूनच आधीच्या दैवताच्या संप्रदायातला सारा गोडवा, सारे वैराग्य नि सारा भोळा भक्तिभाव इथल्या वारकरी संप्रदायात भरलेला आहे. इतका की, जे जे इतर कुठल्याही संप्रदायात आहे ते सारे काही पंढरीच्या संप्रदायात आहे. पण पंढरीत आहे ते मात्र इतर कुठे आढळेलच असा संभव नाही. मुख्य म्हणजे पंढरीच्या पूजेअर्चेत बडिवार नाही. राजारंक असा भेद नाही. जात नाही, पात नाही. स्त्री-पुरुष असा भेदभाव नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकीकरणाची उत्कृष्ट प्रथा जर कुठे अद्यापही उत्स्फूर्तपणे टिकून असेल तर ती या पंढरीतच. ज्ञानेश्वराने म्हटले आहे की, ''जळो वरचिल झळाळ''- त्याचा प्रत्यय या ठिकाणी डोळस माणसाला आल्यावाचून राहात नाही. बाहेरच्या भपक्याचा तिटकारा मराठी संतांना होता. साधेपणानेच भक्तीला त्यांनी अती शोभा आणली. तोच तो




मूर्तिमंत साध्या वत्सलतेचा अविष्कार म्हणजे पंढरीचा पांडुरंग. विठ्ठल हा लेकुरवाळा आहे, कुटुंबवत्सलतेच्या पाशांनी बांधलेला आहे. भक्ताला पूर्णपणे जखडलेला देव कुठे असेल तर हा पुंडलिकाच्या विटेवर, कमरेवर हात ठेवून युगानुयुगे भक्तांची वाट पाहाणारा विठ्ठलच, अशी भाविकांची श्रद्धा आहे. म्हणून विठ्ठल विठाबाई झाला, पांडुरंग झाला. दुसऱ्या पुरुष देवाला सहसा कुठेही माउलीच्या रुपाने हाक मारताना आढळत नाही. महादेव, बालाजी, कृष्ण- सारे बाप आहेत, प्रियकर आहेत, पती आहेत, भाऊ आहेत. पण विठ्ठल मात्र विठू होतो तसाच तो विठाबाई पण होतो.

**– दुर्गा भागवत**

**(सौजन्य : पंढरीचा विठोबा, पैस, मौज प्रकाशन)**



दुर्गाबाई यांचा जन्म इंदूर येथे झाला. शालेय शिक्षण नगर, धारवाड, नाशिक, पुणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी झाला. मुंबईच्या सेंट झेवियर्समध्ये बी.ए.ला संस्कृत घेऊन त्या अव्वल आल्या. तर 'अर्ली बुद्धिस्ट जुरिस्प्रूडन्स' हा प्रबंध लिहून त्यांनी एम.ए.ची पदवी संपादन केली. इंग्रजी, मराठी, संस्कृत, पाली, बंगाली, गुजराती अशा अनेक भाषा अवगत असणाऱ्या दुर्गाबाईंनी आपले लेखन मुख्यतः मराठी व इंग्रजीतून केले.

ऋतुचक्र (१९५६), भावमुद्रा (१९६०), व्यासपर्व (१९६२),डूब (१९७५) हे त्यांचे काही महत्त्वाचे ललित लेखसंग्रह. निसर्गसौंदर्याचा चित्रदर्शी प्रत्यय देत सृष्टिसातत्याचे, अविनाशी काळाचे भान व्यक्त करणारे 'ऋतुचक्र', महाभारतातील व्यक्तिरेखांकडे वेगळ्या दृष्टीने पाहणारे 'व्यासपर्व' आणि चिंतनशीलतेचा अनेकांगी आविष्कार करणारे, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'पैस' (१९७०) ही दुर्गाबाईंच्या ललित लेखनाची शिखरे होत.



# मद ओरसला दुःखाचा



विश्राम बेडेकर

विश्राम बेडेकर यांचा जन्म अमरावतीचा. त्यांचे खरे नाव विश्वनाथ. पण शाळेतील मित्र श्रीराम खरे याच्याबरोबरच्या घनिष्ट मैत्रीचे प्रतीक म्हणून त्यांनी विश-राम हे नाव घेतले व तेच पुढे रुढ झाले. बेडेकरांचे वडील वेदशास्त्रनिपुण, अमरावतीच्या राममंदिराचे पुजारी. घरच्या गरिबीमुळे नादारी मिळवून व मित्रांच्या सहकार्याने त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय जीवनात वाङ्मयाचे उत्तम संस्कार झाल्याने साहित्यनिर्मितीची उर्मी त्यांना मिळाली.

*मराठी साहित्यसृष्टीत आपला वेगळा ठसा उमटवणारी 'रणांगण' ही कादंबरी लिहूनही बेडेकरांनी ललितलेखन केले नाही. चरितार्थासाठी ते चित्रपटसृष्टीकडे वळले. 'प्रभात'साठी 'शेजारी'चे पटकथा संवाद त्यांनी लिहिले. पहिला पाळणा, लाखाराणी, पैसा बोलतो आहे, चूल आणि मूल, वासुदेव बळवंत अशा चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांनी केले. लोकमान्य टिळक व विनोबा भावे हे दोन लघुपटही त्यांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकर ही त्यांची अखेरची चित्रपटकथा.*

*१९६१ साली बेडेकर पुन्हा नाट्यक्षेत्राकडे वळले. नरो वा कुंजरो वा, वाजे पाऊल आपुले, टिळक आणि आगरकर ही नाटके त्यांनी लिहिली. १९८२-८३च्या काळात त्यांनी एक झाड आणि दोन पक्षी या नावाने आत्मकथन लिहिले. त्याला १९८५मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.*

*विश्राम बेडेकरांच्या एकूण जीवनाविषयी मराठी माणसाला वाटत राहिलेले गूढ त्यांच्या 'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मकथनामुळे अंशत: का होईना निवले. त्यातील 'रणांगण'ची ही कूळकथा त्यांच्याच शब्दांत...*

****

''बोलणं सोपं असतं. आधी करुन दाखवावं, मग बोलावं!''

आपली सहचारिणी विभावरी शिरुरकर उर्फ बाळूताई खरे उर्फ मालतीबाई बेडेकर यांचे ते शब्द याला डिवचून गेले. वेळ सांगून येत नाही. तसे काही वेळचे शब्दही सांगून येत नाहीत. येतात आणि कशाचे तरी निमित्त होऊन जातात. याने ठरवले, बाळूताईंना कादंबरी लिहून दाखवायचीच. आपल्याला हे जमेल की नाही अशी शंकासुद्धा याला शिवली नाही. दुसऱ्या दिवशी याने कागद पेन्सिली गोळा केल्या. खोलीचे दार लावायला गेल. तेवढ्यात रेक्सने दारात तोंड घातले. याने त्याला आत घेतले आणि कादंबरी लिहायची म्हणून रेक्सला थोपटीत हा समोरच्या कागदांकडे बघत बसला.

माणसाचे जीवन म्हणजे अनेक आव्हानांचे रणांगण! जन्मापासून मृत्यूपर्यंत. सगळ्यात कठीण आव्हान लेखकापुढच्या कोऱ्या कागदाचे! हातात लेखणीचे हत्यार असते, पण कशावर तुटून पडावे ते दिसत नाही! याचे सुदैव, याला ते लगेच दिसले. कादंबरी लिहिण्याचा याला अनुभव नव्हता. एवढे ठाऊक होते, लिहायचे म्हणजे भ्यायचे नाही. याने सुचले तिथून लिहायला सुरुवात केली. बोटीवरच्या अनुभवांनी मन खदखदत होते. याने ते मन कागदावर उपडे केले. त्या वेदनेच्या उकळत्या रसायनाला लेखणीने पाट काढून दिले. आणि ओळीओळीतून ते वाहू लागले. हा लिहीत राहिला, लिहीत गेला... भान विसरून आणि मी बघत राहिलो. थोडे चकित होऊन. विचार आला, याच्या या वेदनेच्या वीणेच्या तारेला इतक्या असीम ताणाची कळ शेवटपर्यंत कशी सोसेल? यालाही हे जाणवले. मग थोडा वेळ याने तृतीय पुरुषी निवेदनाचा आसरा घेतला.

पानामागून पाने नुसता आक्रोश. पण आक्रोश म्हणजे कादंबरी नव्हे. तिला हवे कथानक. पुढे ही 'हॅर्टा'ची कथा झाली. जेमतेम सव्वाशे पानांची. पण पहिली दोनचार पाने सोडली तर पुढच्या पंचवीस पानांत तिच्या पावलांची चाहूलसुद्धा नाही. नायक दिसतो. पण तो काही करीत नाही. प्रवास करतो. बघतो. ऐकतो. नायकिणीचे तत्त्वज्ञान. प्रेम रणांगणांवर नाही जगत! भेटतो युद्धे घडवून आणणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या दलालांना जागजागी आगामी महायुद्धाच्या सावटाच्या सूचना. क्रमाक्रमाने अधिकाधिक गडद आशयाने भरलेल्या. सगळीकडे ध्वनि-प्रतिध्वनि खणखणत खड्ग ये, डमडमत डमरू ये, येई रूद्रा! रूद्रा नव्हे युद्धा! महारूद्रा नव्हे महायुद्धा ! म्हणजे कादंबरीचे कथानक महायुद्ध?

पण त्याचा या सुरवातीच्या ऐय्याषी, विलासी, युरोपच्या रणांगणातून भारताकडे पळत सुटलेल्या नायकाशी काय संबंध येणार? मग मला दिसले. सुवेजच्या कालव्यात इटॅलियन आणि फ्रेंच बोटींमध्ये दंगल झाली. ते युद्धाचे

प्रतीक नायकाच्या आयुष्याला येऊन भिडले. आणि शेवटी तर कादंबरीच्या कळसाला महायुद्धाच्या विशाल घुमटानेच आकाशात उंच उभे धरले.

युद्ध सुरु झाले म्हणूनच नायक नायिकेची ताटातूट झाली आणि कादंबरीला शोकांतिकेचे परिमाण लाभले. म्हणजे महायुद्ध ही या कादंबरीची नुसती पार्श्वभूमी नव्हे. तिचे महत्त्वाचे उपकथानक आहे. कादंबरीच्या या शक्तिकेन्द्रावर अनेक वर्षांनंतर फक्त एकाच हिंदी समीक्षकाने बोट ठेवले. तेव्हा याने त्याच्या मार्मिकतेला खुषीने मनातून दाद दिली.

पण हा हे सगळे मनात केव्हा आणि कसे जुळवीत होता? लिहिण्याला अजिबात उसंत नव्हती. बाळूताई सकाळीच कामावर जात. त्यांची यायची वेळ झाली की हा कागद लपवून ठेवी. त्या पुन्हा दुपारी जात. लगेच याचे लिहिणे पुन्हा सुरु होई. याला जाणीवच नव्हती. पण नेणीव वेदनेचे सोने करुन सोडीत होती. निर्मितीची ही काय किमया असेल? इतस्तत: विखुरलेली, एकमेकांशी संबंध नसलेली स्मृतिचित्रे. ती जवळ आली. एकमेकांत मिसळली. त्यांनी नवाच आकार घेतला. त्यामुळे त्यात नवे रंग भरले. मग अर्थाने शब्दांचे शरीर पांघरले. आणि तो त्या रंगाच्या डोहात हौसेने डुंबू लागला.

पण सगळे घडत होते नकळत. हलुवारपणे. क्रमाक्रमाने. लहान लहान गोष्टीसुद्धा मनात ठसलेल्या होत्या. बोटीतले जिने, खोल्या, स्नानगृहे, पानगृहे, पोर्ट होल, लुई खेळत असे ती उघडी आडवी मोठी खिडकी, दोरांचे ढीग, पोहण्याचा तलाव आणि डेकवरची घाट. सगळ्या गोष्टी विलग, स्वतंत्र, एकमेकींशी ताळमेळ नसलेल्या. पण योग्य वेळ आली तेव्हा त्या मोठ्या खिडकीच्या बाहेरच्या लाटा निळसर घोड्यांच्या तोंडचा फेस झाल्या! घाटेने हॅर्टाच्या लग्नाची द्वाही फिरवली. आणि तलावातले पाणी नायक-नायिकेची जलशय्या होऊन गेले!

पण ते सुद्धा निरनिराळ्या जागच्या सुट्या वस्तूंवर कुंचल्याने मारलेले सुटे सुटे रंग. या पाहिलेल्या वस्तूंत, बघितलेल्या माणसांत, भोगलेल्या प्रसंगांत जोवर नाते नाही, तोवर कथानक नाही. निर्मिती म्हणजे हे नाते जोडणे. पत्ते खेळणारी मुले पाहिली होती. सुएझ कालव्यामधल्या भांडणाऱ्या दोन बोटी बघितल्या होत्या. दोहोंमध्ये अर्थाअर्थी संबंध नव्हता. पण पत्यातल्या चारदोन साथीदारांमध्ये धर्मावरुन, जातीवरुन, राजकीय मतभेदावरुन भांडण पेटले. विकोपाला गेले. त्याची शीग लागली दोन राष्ट्रांच्या दोन बोटींमधल्या मारामारीत! आणि हॅर्टासकट युरोपातले लोक आधणात असले तर नायकासकट भारतीय सुपात आहेत हे नाते निर्माण झाले. संविधानकाच्या साखळीचा तुकडा तयार झाला. दोन खऱ्या गोष्टींमध्ये एक कल्पित भांडण जोडल्यामुळे.

आता माझ्या ध्यानात येऊ लागले. निर्मिती म्हणजे दोन किंवा अधिक प्रत्यक्ष घडलेल्या घटना खुंट म्हणून धरायच्या आणि त्यांच्यामधले अंतर कल्पनेच्या वारुवर स्वार होऊन तोडीत जायचे. पण जाताना कथेच्या सूत्राचा, मंगळसूत्रासाठी वापरतात तसा वाखासारखा एक चिवट धागा बरोबर घ्यायचा आणि पुढच्या खुंटाला त्याचा वेढा द्यायचा! एक दिवस कादंबरीत एक नवीन पात्र शिरले. डॉ. शिंदे, बुद्धिमान, निर्व्यसनी, सडेतोड पण कनवाळू. मी एकदम ओळखले हे तर जवळजवळ मुंबईचे डॉक्टर गिंडे! पुढे जगविख्यात न्यूरोसर्जन म्हणून गाजलेले. डॉ. गिंडे बोटीवर होते. दुसऱ्यांना दोन वर्षे लागतात ती एफ.आर.सी.एस.ची परीक्षा दहा महिन्यांत उरकून स्वदेशी परतत होते. बोटीवरच्या निकट सहवासामुळे त्यांची याची बरीच गट्टी जमली होती. कादंबरीत ज्याचे लुई नाव आहे ते बालकही बोटीवर होते. लुई ज्या उघड्या खिडकीशी समुद्राकडे बघत खेळे, तिथे हा रमत असे. डॉ. गिंडे कधी तिथे आले नाहीत. लुईच्या आईशी त्यांची फारशी ओळखही नव्हती. लुईला कडेवर घेऊन फिरण्याचे राहोच, पण ते त्याच्याशी बोललेलेही आठवत नव्हते. लुई आजारी पडला, तेव्हा डॉ. गिंड्यांचा त्याचा काही संबंध आला नव्हता. याच्यामुळे लुईची डॉक्टरांना थोडी माहिती. एकदा लुईच्या खोलीजवळच्या जिन्यावर चढताना त्यांनी तो आजारी आहे हे ऐकले. ते क्षणभर थांबले व म्हणाले, ''अरे, त्याच्यासाठी काहीतरी करायला हवं.'' पण लगेच बोटीवरच्या डॉक्टरांच्या उपाययोजनेत आपण मध्ये पडणे बरे नव्हे हे त्यांच्या ध्यानात आले. याने मात्र डॉक्टर शिंदे




किती लिहिले यापेक्षा 'काय लिहिलं' हे महत्त्वाचे. हा धडा मराठीच्या विद्यार्थ्यांना देण्यासाठी जणू विश्राम बेडेकर यांनी रणांगण नावाची एकमेव कादंबरी लिहिली आणि कादंबरी क्षेत्राकडे पाठ फिरवली. नाटक, चित्रपट आदि क्षेत्रात हा पक्षी अधिक रमला असेल पण तिथेही त्याचे अस्तित्त्व मोजके आणि लक्षात राहण्यासारखेच होते.






आठ-दहा दिवस याचा लिहिण्याचा धोशा सुरु होता. लिहायचे कागद लपवायचे, नामानिराळे असल्याचा आव आणायचा! शंभरावर कागद झाले. ते सुटे कागद गौप्यस्फोट न होऊ देता सांभाळणे कठीण जाऊ लागले. मग याने आता उमरावतीला जायला हवे म्हणून सोलापूर सोडले. बोटीवरच्या मित्रांना मुंबईचा पत्ता दिला होता. हा मुंबईला गेला तेव्हा त्यांची कोलंबोहून टाकलेली एक दोन पत्रे मिळाली. आणि याने उमरावतीला जाऊन शेवटी हॅर्टाची तीन पत्रे घातली व कादंबरीचा शेवट केला. मग ध्यानात आले. आतापर्यंत आपल्या गंडस्थळातून सारखा स्त्रवत असलेला दु:खाचा मद ओसरला आहे! आपण वेदनामुक्त झालो आहो! कला म्हणजे मुक्तीची साधना म्हणतात ते यामुळेच तर नसेल?

या पात्राचा पहिला प्रत्यक्ष खुंट बळकट रोवला. लुईचा आजार आणि गिंड्यांचा शब्दांतली सहानुभूती यांचे मिश्रण करुन दुसरा, अर्धा खरा अर्धा कल्पित खुंट मानला. मधे लहान लहान गोष्टींची पेरणी केली. शेवटी एक जिव्हाळ्याचे नाते जोडले आणि संविधानकाच्या गोफात आणखी एक रंगीत पदर विणून टाकला.

एकटे डॉक्टर गिंडेच नव्हते. खरे आणि कल्पित यांच्या मिश्रणाने घडविलेली अनेक पात्रे, अनेक घटना, खुणेचे खुंट म्हणून याने वापरले आहेत. कादंबरीतला खुद्द 'मी'च तसा आहे. 'मी'चा आणि याचा मागचा इतिहास अगदी वेगळा. वर्तन, स्वभाव, जगाकडे बघण्याची दृष्टी निराळी. याला कधी प्रेमभंगाचा अनुभव नाही. 'मी'च्या बोलण्याला याच्यासारखी विनोदाची हौस नाही. पण एरवी बोलणे मात्र याच्यासारखेच तिरकस. आणि हॅर्टाने नाव विचारले तेव्हा याने बिनदिक्कत स्वत:चे घरचे 'बाबू' हे नाव 'मी'ला देऊन टाकले!

मी वाचत असे तेव्हा मला एखादे वेळी वाटे, हा कादंबरी लिहितो आहे की आत्मचरित्र? आणि आता हे मी याच्याविषयी इथे बरेचसे सांगू पहातो आहे, तेव्हा माझ्या मनात एक विचित्र विचार येतो. या माझ्या सांगण्यातसुद्धा अनेक खऱ्या आठवणींचे, खुणांचे खुंटच आहेत. त्यातले अंतर जोडायला मलाही थोडी कल्पनेची कास धरावी लागते. निर्मितीच्या किमयेची आराधना करावी लागते. मग माझे हे निवेदन चरित्र आहे की कादंबरी?

आठ-दहा दिवस याचा लिहिण्याचा धोशा सुरु होता. लिहायचे कागद लपवायचे, नामानिराळे असल्याचा आव आणायचा! शंभरावर कागद झाले. ते सुटे कागद गौप्यस्फोट न होऊ देता सांभाळणे कठीण जाऊ लागले. मग याने आता उमरावतीला जायला हवे म्हणून सोलापूर सोडले. बोटीवरच्या मित्रांना मुंबईचा पत्ता दिला होता. हा मुंबईला गेला तेव्हा त्यांची कोलंबोहून टाकलेली एक दोन पत्रे मिळाली. आणि याने उमरावतीला जाऊन शेवटी हॅर्टाची तीन पत्रे घातली व कादंबरीचा शेवट केला. मग ध्यानात आले. आतापर्यंत आपल्या गंडस्थळातून सारखा स्त्रवत असलेला दु:खाचा मद ओसरला आहे! आपण वेदनामुक्त झालो आहो! कला म्हणजे मुक्तीची साधना म्हणतात ते यामुळेच तर नसेल?

१९३९च्या जुलैअखेर हा इंग्लंडहून आला. ऑगस्टमध्ये कादंबरीचे काम पुरे झाले. सप्टेंबरच्या सुरवातीलाच युरोपात दुसरे महायुद्ध सुरु झाले. हस्तलिखित घेऊन हा मुंबईला गेला. लगेच हरीला भेटला. हरीची दिवसभर पैशांच्या व्यवहाराची धांदल. पण त्यातही त्याने लॅमिंग्टन रोडच्या एका गल्लीत ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितले आणि याला म्हणाला, ''हं, वाच बघू काय लिहिलं आहेस.'' याने दहा पंधरा मिनिटे मधली मधली काही पाने वाचली. हरीने म्हटले, ''ठीक आहे. छापून टाकू.'' मग पुस्तकाच्या नावाची, लेखकाच्या नावाची चर्चा सुरु झाली. 'ब्रह्मकुमारी' वर नाव होते वि.चिं.बेडेकर. याच्यावर विश्राम बेडेकर दिले तर? एकदम काहीतरी विचार याच्या मनात आला. याने सांगितले, ''असं करु या. पुस्तकावर नावच नको लेखकाचं!''

''नावच नको? म्हणजे?''

''माझ्या नावाला साला नाट असलेला दिसतो. 'ब्रह्मकुमारी', बेडेकर प्रॉडक्शन नाव लावलं की निकाल! हो. या अपशकुनी पायगुणामुळे आपल्या देशाचा मात्र फायदा झाला आहे.''

''आं? तो कसला?''

''नाही का? सातच महिने इंग्लंडात राहिलो आणि गेल्या दोनशे वर्षात नाही असं महायुद्धाचं प्राणसंकट इंग्लंडवर ओढवून आणलं!''

हरी विचार करीत होता. नंतर म्हणाला, ''नाव नको ही कल्पना काही वाईट नाही. विभावरी शिरुरकर या बुरख्यामुळे त्या पुस्तकांकडे लक्ष गेलं. तसं कदाचित या विचित्रपणामुळेच या पुस्तकाकडे जायचं.''

याने आपली चोपडी त्याच्या हवाली केली आणि म्हटले, ''आता एक कर. याचं पुढचं सगळं बाळंतपण तू करायचंस. मी लिहिलेलं पुस्तक तुझ्या हाती दिलं.''

**– विश्राम बेडेकर**

**(सौजन्य : एक झाड आणि दोन पक्षी, पॉप्युलर प्रकाशन)**

****

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके !

**नवी प्रकाशने**




## फुले वेचिता...

**-लता मंगेशकर**

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या लेखणीतून शब्दरूप ल्यायलेली ही त्यांच्या आठवणींची सुंदर फुले...लतादीदींच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त नव्या सुधारित रूपात रसिकांच्या भेटीला.

**(पृष्ठे- १५२) (₹ १६०)**

## थँक्स फॉर रुजुला

**-माधव जोशी**

**अनुवाद - सुहास अंजनकर**

'ती'च्या इवल्याशा पावलांची चाहूल लागली आणि त्याच्यातला 'पुरूष'बदलत गेला. एका पुरुषाने कथन केलेली ही पित्याच्या जन्माची कथा!




**(पृष्ठे- २०८) (₹ २२०)**

## व्यासांच्या लेकी

**-मधुवंती सप्रे**

व्यासांच्या प्रतिभेतून साकारलेल्या माधवी, दमयंती, शर्मिष्ठा, द्रौपदी, कुंती यांसारख्या महाभारतातील अनेक तेजस्विनींच्या जीवनसंघर्षाचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि तेजाचा परिचय करून देणारा लेखसंग्रह.



**(पृष्ठे- १२८) (₹ १४०)**

## मांसाहारी मेन्यू डायरी

**-प्रख्यात शेफ विष्णू मनोहर**

शाकाहारी मेन्यू डायरीनंतर लोकाग्रहास्तव मांसाहारींच्या जिभेचे चोचले पुरविणारी ही मांसाहारी मेन्यू डायरी!




**(पृष्ठे- ३४४) (₹ ३००)**

**आगामी**



## बखर गीतकारांची

**-विजय पाडळकर**

आपल्या सदाबहार गीतरत्नांनी हिंदी सिनेसंगीताला अमरत्व देणाऱ्या शंभरहून अधिक दिग्गज गीतकारांच्या प्रतिभेचा, त्यांच्या अनोख्या कारकिर्दीचा मागोवा घेणारी ही बखर.




## खेळिया

**कथा नरेंद्र मोदी नामक झंझावाताची!**

**लेखक - सुदेश वर्मा**

**अनुवाद- सुधीर जोगळेकर**

नरेंद्र मोदींनी दुष्काळग्रस्त, दंगलग्रस्त, भ्रष्टाचारग्रस्त गुजरातचा कसा कायापालट घडवून दाखवला, हे 'मॅजिक' कसं जन्माला आलं याचं साधार, सुंदर विवेचन.

मैत्रेय प्रकाशन

**आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती**

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.

फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८. चेतन मोहकर (अमरावती) - ८३९०३३८६०८

E-mail : prakashanmkg@maitreyagroup.com | Website : www.maitreyaprakashan.com

**टोल फ्री क्र.: १८०० २२२ ६१३**

**एम.ओ. करा / डी.डी. पाठवा. पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

**ऑन लाईन खरेदीसाठी:- www.granthdwar.com / www.majesticonthenet.com / www.infibeam.com**

# ‘माणूस’ वाचणारा बखरकार



त्र्यं.वि.सरदेशमुख

‘डांगोरा एका नगरीचा’ या कादंबरीसाठी सरदेशमुख यांना १९९७ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. तेव्हा ‘हा माझ्या वाचकांचा सन्मान आहे. त्यांनी माझ्या साहित्यावर जे प्रेम केलं, त्याची ही पावती आहे’ अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली होती.

हे एका अर्थाने खरे होते. कारण हा पुरस्कार वरकरणी ‘डांगोरा’ला असला तरी त्याआधी ‘बखर’ ही त्यांची पहिली कादंबरी वाचून मराठी वाचक त्यांच्या प्रेमात पडले होते. त्याच प्रेमाची ही पावती होती - फक्त ती २५ वर्षांनी दिली गेली होती.

*अक्कलकोट-सोलापूरसारख्या महाराष्ट्राच्या ‘काठावरच्या’ या सारस्वताचा अक्षर-प्रवास त्याच्याच शब्दात-*

माझे वडील राजाचे खाजगी सचिव. राजधानीतली कामे उरकून लवकरच पुण्यास जाणार होते. इतक्यात हे असे झाले. राजाचे शवच आगगाडीतून गावाकडे परतले.

मागल्या गोष्टी निघाल्या म्हणजे वडील राजाविषयी जे सांगत, ज्या भावनेने सांगत, ते माझ्या मनात रुतून बसले. राजाची प्रतिमा एखाद्या मोझेकससारखी आकारत गेली.

कचेरीतील कामे संपली की राजाबरोबरची वडिलांची भूमिका वेगळी असायची. अर्थात राजाला ती तशी हवी होती. मागितले तरच सख्य देण्यात स्वारस्य असते; नाही तर अव्हेराची जखम सोसावी लागते. वतनदार घराण्यातल्या एकाला प्रसंगाप्रसंगांतून पारखून राजाने आपला सखा मानले. माझ्या वडिलांना यांचा साहजिक असा आनंद आणि अभिमान होता.

राजाने मला पाहिलेले असले तरी त्याला मी पाहिले म्हणण्याइतक्या वयाचा मी नव्हतो. त्याच्या ‘ग्लोरिफिकेशन’चा उमाळा मला यावा याला साक्षात कारण काहीच नव्हते. राजाच्या मृत्यूनंतर राजधानीतले न् राजवाड्यातले वातावरण दिवसेंदिवस अधिकच विषारी होत गेले. त्यात वडिलांची करिअर धुळीस मिळाली. जबर मानखंडना झाली. घरदार टाकून आम्ही गाव सोडले. संस्थान, तिथले राजकुटुंब व त्याचा परिवार यांची लेशभरही माया मला नव्हती. पण दिवंगत राजाच्या ओल्या आठवणी वडिलांकडून ऐकताना तो माझा कोणी पूर्वजच, ही संभावना माझ्यात दृढ होत गेली.

नोकरचाकर, अधिकारीवर्ग, गावातली प्रतिष्ठिते, गरीब, रयत यांच्याशी राजा कसा वागे, बिलिअर्ड टेबल, टेनिस कोर्ट, क्रिकेटचे मैदान येथपासून शिकारीच्या जंगलापर्यंत सोबतीच्या गुणवंतांची तो किती चहा करी, विश्वासातल्या माणसाची पात्रता वाढावी यासाठी नाजूक कामे त्याच्यावर कसा सोपवी, ग्रंथवाचनात कसा दंग होई, ब्रिटीशांच्या कळपात वावरताना तो किती चलाख आणि दक्ष असे, मुलाबाळांचा संसार असूनही अंतरंगसुखाच्या अभावी तो उद्विग्न कसा होता, संस्थान लहान असले तरी ते क्षुद्र राहू नये यासाठी विश्वेश्वरअय्यासारख्या प्रतिभावंत एंजिनिअरकडून संस्थानचे सर्वेक्षण त्याने कसे करुन घेतले होते... यांविषयी वेळोवेळी मी ऐकले होते. टेलेस्कोप, शस्त्रागार, जलमंदिर, नवा राजवाडा, समृद्ध रायबागा यांनी राजधानीला खासेपण कसे आणले, ते तर मी पाहिलेही होते. जवळपास पंचवीस वर्षे या आशयाचे बीज माझ्यात फुटत होते.

मला कादंबरी लिहायची होती. एका विशिष्ट राजाच्या चरित्रावर ती मुळीच आधारायची नव्हती. घटिते व त्यांचे सबळ पुरावे यांनी चरित्र सिद्ध होते. माझ्यापाशी तो मालमसालाही नव्हता. होता तो जसाच्या तसा मला वापरायचा नव्हता. कोण्या ऐतिहासिक पुरुषाचे यथावास्तव जीवनचित्र मला रंगवायचे नव्हते. तर काल्पनिक संविधानकाच्या रूपांगांत इतिहासाचा आभास मुरवायचा होता. भविष्यात इतिहासाचा आभास तेवढा उरतो. हे रहस्य उरी धरूनच कलाकृती वाढतात.

मराठ्यांचा इतिहास ‘इतिहास’ जसा असाा तसाच आहे. मुळापासून पेशवाईच्या शेवटच्या कांडापर्यंत सगळा प्रशंसनीय आणि अभिमानास्पद थोडाच आहे ! पण मराठा राज्यकर्त्यांच्या हेळणेची उतरंड रचण्याचा खोळसाळपणा ब्रिटीशांनी भरपूर केला व त्याला एतद्देशीयांनीही कुवतीनुसार हातभार लावला, हे कसे विसरावे? ‘माणूस’ या एंटिटीची दुश्मनी केल्याशिवाय असले अपकृत्य साधत नाही. कलेच्याद्वारे ते विस्कटावे आणि त्यामागचा खोटेपणा उघडा करावा असे मला फार वाटत होते.

माझ्या मनात एक गुणवान पण कमनशिबी राजाची जी तस्वीर घमघमत होती तिचा उपयोग करायचे मी ठरवले. त्या वेळी वडील हयात असते तर त्यांच्याशी बोलून काही घटितांचे संदर्भ-नकाशे यथाप्रमाणे रेखाटण्याचा मोह मला

झाला असता. मग कादंबरी चढली असती की उतरली असती, सांगवत नाही. पण मी जे लिहिले ते वाचायला वडील हयात नव्हते याचे मला मनापासून दुःख झाले. पहिले न्यायदानी वाचक म्हणून त्यांची जागा कोणीच घेऊ शकले नसते. 'बखर... ' च्या सर्रास वाचकांनी जे प्रेम व्यक्त केले त्याची मनोमन पोच मी वडिलांच्या स्मृतीस मिळवली.

**(सौजन्य : बखर : एका राजाची , दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना, मौज प्रकाशन)**

****

१९४०च्या आत, माझ्या कॉलेज शिक्षणकाळात वडिलांनी घरात आणलेल्या काही पुस्तकांची आठवण आणि नोंद करतो तेव्हा ध्यानी येते की, माझ्या पुढील वाचनाला आणि अभ्यासाला पोषक पार्श्वभूमी माझ्या नकळत वडिलांनी करुन ठेवली होती..., निवडपूर्वक उत्तम दर्जाची पुस्तके खरेदी करुन श्री.म.माटे यांनी संपादित केलेल्या 'विज्ञानबोध' : ज्ञानोपासूना आणि भारतीयांचे कर्तव्य' याने आरंभ झालेली नागपूरच्या 'नवभारत ग्रंथमालेची' बारा पुस्तके : 'सुविचार प्रकाशन मंडळा'चा 'तर मग आम्ही काय करावे?' हा टॉलस्टॉयच्या कृतीचा अनुवाद : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'हू वेअर द शूद्राज?' हे ग्रंथ घरात होते याचा सानंद अभिमान वाटतो.

१९३५मध्ये मी तेव्हाच्या इंग्रजी सहाव्या इयत्तेत होतो. मॅट्रिक्युलेशनच्या आधीचे वर्ष. वाढदिवसाची भेट म्हणून वडिलांनी मला सॅम्युअल स्माइल्सचे 'सेल्फ हेल्प' हे इंग्रजी पुस्तक आणून दिले. त्या वेळी तितक्या गतीने मी ते वाचू शकलो नाही. पण पुढे कॉलेजच्या वर्षात त्याची गोडी लागली आणि त्याचे मोठेपण कळत गेले. 'विथ इलेस्ट्रेशन्स ऑफ कॅरॅक्टर अँड कॉंडक्ट' असे या पुस्तकाच्या शिर्षकाखाली विवरण आहे. प्राधान्याने ब्रिटीश इतिहासाचा आणि संस्कृतीचा आधार घेऊन भरपूर समर्पक उदाहरणांनी लेखकाने विषय मांडला आहे. कोण्याही बुद्धिमान आत्मप्रतिष्ठ समाजात अशी उदाहरणे खचितच असतात. स्माइल्सने ज्या साक्षेपाने उदाहरणे जमवली आहेत आणि विषयपरत्वे सुसूत्र, मार्मिक रीतीने सांगितली आहेत, ती वाचून आजही मनाला लेखकाचा आदर वाटतो. कोठलेही पान कधीही उघडून वाचले, त्याने धीर दिला, आनंद दिला, शिकवणही.

पुण्यात एस.पी.कॉलेजात होतो त्या चार वर्षांत ग्रंथात भरपूर सहवास घडला. कॉलेजचे ग्रंथालय समृद्ध होते. नाट्यछटाकार 'दिवाकर' गर्गे यांची स्वाक्षरी असलेले, वाचून पूर्ण झाला या आनंदाची नोंद असलेले त्यांचे कित्येक ग्रंथ मी तिथे पाहिले. १९३८च्या नाताळ सुट्टीत सोलापुरास आलो असता वडिलांबरोबर 'ल मिझराब्ल' हा इंग्रजी चित्रपट पाहिला. फ्रेड्रिक मार्च आणि चार्ल्स लॉटन् या श्रेष्ठ नटांचा – नामावली संपल्यावर कादंबरीला ह्यूगोने लिहिलेली प्रस्तावना पडद्यावर वाचायला मिळाली. तिचा शेवटला अंश, चित्रपट पाहून झाल्यावरही मनात घरच करुन राहिला. 'So long as ignorance and misery remain on earth book like this cannot be useless.'

मनाला कादंबरीचा वेध लागला. पुण्यात गेल्यावर वाचनालयात बसून मी सलग वाचली. तीन खंडातून. काही महिने गेले. 'ज्योत्स्ना' मासिकातील एका लघुकथेला मिळालेल्या पारितोषिकातून बाराशे पृष्ठांची 'ल मिझराब्ल' मी विकत घेतली. त्या दिवसात सहा आण्याला पेंग्विनची छान छान पुस्तके मिळायची. नंतर ह्यूमोच्या इतर कादंबऱ्या, नाटके आणि मिळतील त्या कविता वाचून काढल्या. त्या वर्षात रवीन्द्रनाथ ठाकुरांची 'साधना' 'पोएटस् रिलिजन', 'पर्सनॅलिटी', 'साहित्यविचार' हे ग्रंथ वाचले. त्यांनी व लेगुई–कइतामिएँ या फ्रेंच लेखकद्वयांनी लिहिलेल्या इंग्लिश वाङ्मयाच्या इतिहासाने माझ्या साहित्यविचारांना मोठी चालना दिली हे जाणवते. प्राध्यापकांनी आपल्या व्याख्यानात उल्लेखिलेल्या टीकाग्रंथांचा अभ्यासापुरता पण कसून परामर्श घेत होतो तेव्हा डॉ. (गुरुदेव) रामभाऊ रानडे यांचा 'मिस्टीसिझम् इन महाराष्ट्र' हा ग्रंथ अवलोकनात आला आणि तत्कालीन मराठी कवितेतील तथोक्त गूढगुंजनाचे फोलपण ध्यानी आले. संतकविचे गांभीर्य आणि जीवनव्यापकत्व उलगडत गेले.

'गीतांजली'पेक्षाही 'स्ट्रे बर्डज्' आणि 'फ्रूट गॅदरिंग' हे रवींद्रनाथांचे कवितासंग्रह आणि त्यांचे साहित्य समाज–शिक्षणविषयक निबंध मला अधिक मनोरम झाले.












'बखर एका राजाची', 'उच्छाद' आणि 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबरीत्रयीच्या रुपात मराठी रसिकांच्या मनात घर करुन राहिलेले सोलापूरचे प्रा. त्र्यं.वि.सरदेशमुख आपल्या जडणघडणीचे श्रेय पुस्तकांना देत. 'ग्रंथातून मी माणसे वाचली. त्यांचा सहवास घेतला. ग्रंथकर्त्यांशी (साक्षात परिचयाविनाही) सख्य जमविले. देशाटन, सभासंचार वाट्यास न आलेल्या माझ्यासारख्याला पुस्तकांनी माणसे मिळवून दिली. माझ्याभवतीच्या अरुंद जगात ज्यांची कमी-अधिक जवळीक घडली, त्यांच्याच ग्रंथांनी विशद केलेल्या जीवनसूत्रांचे पडताळे मी घेतले.' असे 'सरदेशमुख सरां'नी लिहून ठेवले आहे.

पुढे १९६०-६५च्या सुमारास तसा अनुभव आल्बेर कामूसंबंधात मी घेतला. त्याच्या 'द आउटसाइडर' पेक्षा 'द फॅाल' मला विशेष रोचक वाटली. आणि त्यांचे वैचारिक लेखन ललित साहित्यातून गहन आणि विचारक्षोभक वाटले. 'द रेबेल', 'द मिथ् ऑफ सिसिफस्' आणि त्याच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेले 'रेझिस्टन्स, रिबेलियन अँड डेथ' ही पुस्तके विसाव्या शतकाच्या मध्यावरची थोर मानवहितधर्मी ग्रंथसंपदा आहे. शेवटचे पुस्तक पुण्याच्या 'मॅनीज'ने साधे कार्ड टाकताच तत्परतेने पाठवून दिले. सोलापुरात मला ते उपलब्ध होणे शक्य नव्हते. कँपात 'मॅनीज' आणि जिमखान्यावर दीक्षितांचे 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' या संस्थांनी अद्ययावत उत्तमोत्तम विदेशी पुस्तकांचे मुक्तद्वार प्रदर्शन घडवले. सतरा-अठरा वर्षांच्या वयापासून आजतागायत या ग्रंथमंदिरात वेळोवेळी पुस्तके बघत-चघळत कित्येक प्रहर घालवले त्याचे आभारपूर्वक स्मरण नोंदवावे वाटते.

मॉडर्न मॅन इन सर्च ऑफ अ सोल' या युगाच्या ग्रंथाने तर मला साहित्यसर्जन आणि समीक्षा यासंबंधात एक अपूर्व दृष्टी दिली.

वैयक्तिक जीवनात आकस्मिक उत्पातासारखे प्रसंग १९४४-५० या अवधीत मी अनुभवले. तशात, वडिलांनी वाढदिवसाची भेट म्हणून जे तीन ग्रंथ मला दिले, ते व्यक्तिगत दु:खे पायदळी घालून एकूण जीवनाच्या सन्मुख उभे राहायला मी सबळ व्हावे, याच हेतूने हे मला कळून आले. जी.एन.आचार्य यांचे 'फ्रीडम फर्स्ट', 'गांधीजी हिज लाइफ ॲण्ड वर्क' आणि 'इम्पॉर्टण्ट स्पीचेस ॲण्ड रायटिंग्ज ऑफ सुभाष बोस'!

'सेल्फ हेल्प'ने आरंभ झालेल्या संस्काराची सांगता झाली.

**– त्र्यं.वि. सरदेशमुख**
**(सौजन्य : ग्रंथांच्या सहवासात, मॅजेस्टिक प्रकाशन )**

****

## 'ग्रंथाली'च्या तीन पुस्तकांना यंदाचा राज्य पुरस्कार




**श्रीकांत देशमुख**
**बोलावें ते आम्ही…**
कवितासंग्रह



**राजा पटवर्धन**
**जैतापूरचे अणुमंथन**
जैतापूर प्रकल्पाचा सर्वांगीण आढावा









**मयूर देवल**
**कालिदास**
**एका गुराख्याचे महाकाव्य**
नाटक




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

बाह्य आक्रमणापासून बचाव होण्यासाठी आपल्या शरीरात प्रतिद्रव्ये निर्माण केली जातात. ती बाहेरून आलेल्या जंतूना नष्ट करायला मदत करतात. बाह्य प्रतिकारासाठी तयार झालेली प्रतिद्रव्ये स्वादुपिंडातील बीटापेशींना आक्रमक समजून नष्ट करतात.व इन्सुलिन उत्पादन ठप्प होते. इन्सुलिनअभावी रक्तातील साखर पेशींच्या आत वापरासाठी न पोहोचता, रक्तात साचून राहते व रक्ताचा प्रसरण दाब वाढवते. रक्तातील वाढलेल्या साखरेचा थर सूक्ष्म रक्तवाहिन्यांवर साचून , त्या कमजोर होतात. नसांच्यावरही परिणाम होऊन संवेदना कमी होतात व विपरीत होतात... लघवीचे प्रमाण वाढते... डोळे, मूत्रपिंड, पाय, यात विकृती निर्माण होतात. ही सर्वसाधारणपणे शरीरशास्त्रीय कारणे व परिणाम बहुतेकांना 'मधुमेह' या आजाराच्या निमित्ताने ठाऊक झालेले आहेत. यावर जे काही उपाय अलीकडील काळात योजण्यात येतात, त्यात इन्सुलिनचा वापर बऱ्याच प्रमाणात अधिक आहे. या इन्सुलिनचा शोध कसा लागला याची माहिती देणारे पुस्तक म्हणजे 'कथा इन्सुलिनच्या शोधाची' होय. त्याचे लेखक आहेत डॉ. विजय श्री. आजगांवकर.




कुठलाही शोध हा प्राथमिक पातळीवर असतो, तेव्हा त्यातील यशापेक्षा अपयशाची मालिका मोठी असते. लागणारे साहित्य, भांडवल, जागा, सहकारी यांच्या समस्या असतील तर ही मालिका दीर्घकालीन ठरू शकते. तरीही निष्कर्षाला गवसणी घालता येते. हवी फक्त चिंकाटी, जिद्द आणि समर्पणवृत्ती. ती वृत्ती ज्याच्याकडे होती त्याचे नाव आहे, फ्रेडेरिक बँटिंग. वैद्यकीय मासिकात मधुमेह या विषयावरील प्रा.बॅरन यांचा लेख त्याच्या वाचनात आला. स्वादुपिंड आणि मधुमेह यांचा संबंध लक्षात आला. त्यातूनच स्वादुपिंडापासून अर्क काढण्याच्या विचाराने त्याला पछाडले. त्यासाठी तो टोरोंटो विद्यापीठातील प्रा. मॅक्लिऑडना भेटला. त्यांच्यामुळे जागा, साहित्य आणि सहकारी यांची मदत झाली. मार्गदर्शन मिळाले. अनेक अडचणींतून मार्ग काढत निष्कर्षापर्यंत हात पोहचले. शरीरात असलेला स्वादुपिंड संपूर्ण काढल्यास मधुमेह होतो. स्वादुपिंडाचा अर्क शरीरात टोचला तर मधुमेहावर नियंत्रण ठेवता येते. या अर्काला नाव ठेवले इन्सुलिन!

या शोधासाठी प्रा.जॉन जे. आर. मॅक्लिऑड, प्रा. जेम्स बर्ट्राम कॉलिप आणि चार्ल्स बेस्ट यांचे लाभलेले साहाय्य मोठेच होते. त्यामुळेच फ्रेडरिक बँटिंगला संशोधनाच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचता आले. नोबेल पारितोषिकाचा सन्मान प्राप्त झाला. वरवर पाहता ही एका संशोधनाची कथा वाटेल. परंतु ती नेहमीच्या पद्धतीने लिहिण्याचा मोह लेखकाने टाळला आहे. लेखनासाठी कथेचे तंत्र वापरले आहे. प्रत्येक पात्राची माहिती, त्याचा स्वभाव, त्याचे निवेदन, त्याला जाणवणारा एकमेकाविषयीचा गुणदोष, संशोधनाच्या प्रत्येक टप्प्यावरील मानसिकता, स्वतःच्या निर्णयाचा वाटणारा ठामपणा, यामुळे ही चार पात्रे ठळकपणे सजीवस्वरुपात वाचकांच्या समोर उभी राहतात. स्वगतासारखी मनोगते व्यक्त करत संशोधनाचे कथानक पुढे नेतात. बँटिंगची आर्थिक ओढाताण, उद्‌वस्त झालेली कौटुंबिक स्वप्ने, त्याच्या बोलण्यातला सडेतोडपणा, प्रा. मॅक्लिऑड विषयी वाटणारा द्वेष, चार्ल्स बेस्टविषयी वाटणारी कृतज्ञता, यामुळे बँटिंगचे व्यक्तिमत्त्व नाटकातल्या पात्राप्रमाणे ठळकपणे उभे राहते. प्रा. मॅक्लिऑडचा अधिकार, वेगवेगळ्या टप्प्यावर त्याने घेतलेली भूमिका, बेस्ट आणि कॉलिपने दाखवलेली चिकाटी आणि मनाचा निर्भेळपणा, यामुळे ही सगळीच संशोधकमंडळी आपापल्या परीने उजवी ठरली आहेत. त्यांचे वेगळेपण लेखकाने जपले आहे. त्यामुळेच या शोधाला कथेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

शोधाचा पूर्वभाग, टोरोंटो संघाचे चार शिलेदार, मनोगते अशी विषयाची विभागणी केली आहे. सुरुवातीचे प्रयोग का फसले याची परिशिष्टात कारणे दिलेली आहेत. इन्सुलिनच्या शोधातील शुद्धता, तीव्रता, मापदंड, स्रोत, कल्प, मूलभूत संशोधन आणि इन्सुलिन देण्याच्या पद्धती व प्रभाव यांची माहिती दुसऱ्या परिशिष्टात दिलेली आहे. विषय संशोधनाचा असल्याने इंग्रजी शब्दांची सूची लांबलचक नाही. आवश्यक तेथेच कंसात दिलेले आहेत. लेखकाचे विषयावर असलेले प्रभुत्व लेखनात आलेल्या सफाईदारपणातून लक्षात येते. प्रयोगशाळेचे चित्र असलेले मुखपृष्ठ आकर्षक झाले आहे.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# एसटी स्टँडवरची वेडी बाभळ




आपल्या लिखाणाने वाचकाला अस्वस्थ करणारा, मनस्वी वृत्तीचा कलंदर, अवलिया असा हा विलक्षण कवी जन्मला गुलबर्ग्यात आणि वाढला महाराष्ट्रात. पण याचे 'गाव' कोणते? एस.टी.स्टँड?

सायंकाळ ते रात्र, रात्र ते उत्तररात्र जागोजागी भटकत राहिलेल्या या माणसाने फुटाणे खाऊन भूक भागवली, उद्ध्वस्त संसार पाठीवर घेऊन बेवारशासारखा तो फिरला, कुठे पेपर विकून उदरनिर्वाह केला, पण त्याच्या आयुष्यात खरी सकाळ केली ती त्याच्या कवितांनी !

*रघुनाथ रामचंद्र उर्फ रॉय किणीकर यांची कविता मराठी भाषेतील आणि ते महाराष्ट्रातील, म्हणून ते मराठी कवी, महाराष्ट्राचे सारस्वत. मंगळसूत्र, देव्हारा, झाशीच्या राणीचे नाटक, येग येग विठाबाई, खजिन्याची विहीर या नाटकांमुळे त्यांना नाटककार म्हणून ओळखले गेले. त्यांच्या कथेवर आधारित 'पन्ना' नावाचा 'नवयुग' निर्मित चित्रपट गाजला, तेव्हा किणीकरांना कथाकार म्हटले गेले. शिरडीचे साईबाबा, इथे जगण्याची सक्ती आहे, रम्य ते बालपण, एकदाच अशी रात्र येते या कादंबऱ्यांमुळे त्यांच्यातील कादंबरीकारही दिसला.*

*'टॉप टेन'पैकी एक म्हणून नावाजला जाणारा 'दीपावली' हा दिवाळी अंक ही रॉय किणीकर यांची देणगी आहे. दीनानाथ दलाल यांच्या साहाय्याने त्यांनी या वार्षिकांकाची मुहूर्तमेढ उभारुन दहा वर्षे त्याचे संपादनही केले. पण रसिकांच्या मनावर किणीकरांनी राज्य केले ते त्यांच्या 'रात्र' आणि 'उत्तररात्र' या कवितासंग्रहांनी.*

*त्यांचे चिरंजीव **अनिल किणीकर** यांनी 'उत्तररात्र' पुर्नप्रकाशित करताना लिहिलेल्या प्रस्तावनेतून दिसणारे या कवीचे हे धूसर चित्र-*

मोठेपणाची कुठलीही खूण किणीकरांनी जवळ बाळगली नव्हती. एका फार निराळ्या आणि चांगल्या अर्थाने नामानिराळे राहणे हे त्यांच्या स्वभावातच होते. व्यवहारात यालाच 'विक्षिप्तपणाही' म्हणतात. ते निराळे होते यात शंका नाही. पण स्वत:च निराळेपणा मिरवण्याची संधी त्यांनी कधीही साधली नाही. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यासपीठांपासून ते नेहमीच दूर राहिले. खरं म्हणजे सगळ्यांच्या जवळजवळ असण्याचा भास निर्माण करीत किणीकर सर्वांपासून दूरदूरच राहिले.

बहरलेल्या प्राजक्ताची फुले जशी अनासायास अलगद गळून पडतात तसं किणीकरांचं बोलणं होतं. त्या बोलण्यात प्रसन्नता होती. ताजेपणा होता, मिस्किलपणा होता. जीवनाच्या अटळपणाचं एक व्याकुळ भान होतं. तत्त्वचिंतन होतं पण विद्वत्तेचं, पांडित्याचं ओझं मात्र मुळीच नव्हतं. करुन सवरुन नामानिराळा अशी त्यांची दृष्टी होती. आणि एक विचित्र सिनिसिझिमही त्यांच्या बोलण्यात होता.

किणीकरांना फिरायला जाणं आवडायचं ते प्रामुख्याने एस.टी.स्टँडवरच. रात्री-अपरात्री एस.टी.स्टँडवरच्या झकास वातावरणात बाकड्यावर बसून सिगरेट ओढताना ते पुस्तकं वाचीत असत. कित्येक वेळा ते स्टँडवर बसून गप्पा मारीत असत. बहुतेक वेळा गप्पा मारताना काहीतरी शोधत असल्यासारखे ते भिरीभिरी बघत असायचे. एस.टी.स्टँडबाबत ते म्हणायचे, एस.टी.स्टँडसारखी सुंदर जागा नसते. कुठली कुठली किती प्रकारची माणसं येत असतात. आणि कशाकशासाठी कुठंकुठं जात असतात. किती असंख्य प्रकारचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर असतात. आपण आपले कुठल्यातरी एखाद्या बाकड्यावर बसून बघत राहावं. फार काही बघायला मिळतं.

असेच एकदा आजच्या साहित्यावर आणि अपरिहार्यपणे संतप्त साहित्यिकांवर गप्पा चालल्या होत्या. किणीकरांनी परखडपणाने सांगितले, 'नुसत्या दाढ्या वाढवून फिरलं म्हणजे लेखनात संतप्तता आली का? संतप्तता वरवरची काय कामाची? आत संतप्त असली तर हे असले बाह्य देखावे करावे लागत नाहीत. खरं सांगू? अहो ह्या बहुतेकांची संतप्तता ही आर्थिक कारणाबद्दलची आहे. कमी पैसे मिळतात म्हणून हे संतप्त असतात! जास्त पैसे मिळायला लागले की यांची संतप्तता संपून जाते नि ते मग टापटिपीत राह्यला लागतात. खरे संतप्त कवी फार थोडे. फारच थोडे. ज्ञानेश्वर खरे संतप्त कवी, तुकाराम खरे संतप्त कवी. त्यांचा संताप आतला होता. वरवरचा नव्हता.

किणीकरांना आर्थिक कर्ज होते. दारिद्र्याशी ते शेवटपर्यंत झगडत राहिले. त्यावर मात करण्यासाठी त्यांनी आपल्या डोक्यातून अनेक युक्त्या आणि कल्पना काढल्या. घरी मुलं उपाशी आहेत. त्यांच्या शाळेच्या फिया भरायच्या आहेत. कपडे करायचे आहेत एवढ्यासाठीच फसवेगिरीचा मिस्किलपणा त्यांनी केला. त्यातून संपत्ती गोळा केली नाही किंवा

वैभव निर्माण केले नाही. 'दहा पंधरा रुपये द्या– गोष्ट लिहून देतो' असे म्हणून संपूर्ण कथा ते सांगत असत. आणि ती कथा कागदावर उतरवून देणे मग त्यांना जमत नसे. कला आणि व्यवहार याची अशी सांगड त्यांना जमली नाही.

किणीकर कधीकधी वेड्या बाभळीच्या ठेंगण्या झाडासारखे वाटायचे. धुळीने भरलेल्या तापलेल्या रस्त्याकडेला दुर्लक्षित झालेली. केस पिंजारलेली वेडी बाभळ असते. तिला सावलीचा पत्ताच नसतो. तापलेला फुफाटा अंगावर घेत ती उभीच असते. पाणी टाकून तिला कोणी जोपासत नाही. आसपासच्या देखण्या झाडातही तिचं कौतुक नाही. काळ रापलेलं शरीराचं खोड जमिनीत रुतवून ती उभीच असते. बकऱ्या सोडल्या तर विशेष जवळ कोणी येत नाही. आलंच तर एखादं अडचणीत सापडलेलं कुत्रं तंगडी वर करुन निघून जातं. येड्या बाभळीचं रूप घेऊन किणीकर उभे राहिले. जमिनीत मुळं पक्की रोऊन जमिनीतल्या विश्वात ते शोध घेत फिरले. गर्दी नाही. पराभव नाही. चिंतन करायला एक शांत जागा त्यांनी शोधली. तिथे देणी मागणाऱ्यांना ठोठावण्यासाठी दारं माहिती नव्हती. शरीर वर ठेवून ते आत फिरले. आपले घर, आप्त त्यांनी तिथे शोधले. त्यांच्या डोक्यात कोणतेही गचपण जाणवलं नाही. आवश्यक तेवढंच त्यांनी ठेवलं आणि बाकी रद्दीच्या भावात विकून ते मोकळे झाले.

किणीकरांची जीवनयात्रा ही अशी अजब झाली. ह्या जीवनयात्रेच्या साधनेमध्ये खंड पडू नये म्हणून त्यांनी अनेक सोंगं घेतली. चित्रविचित्र मुखवटे घातले. ह्या यात्रेत ते अनेकांना अनेक प्रकारांनी भेटले. भंगड, विचारवंत, मित्र, बाप, नवरा, संपादक, लेखक आणि कलंदर – अशी त्यांची अनेक रुपं होती. मात्र ह्या साऱ्या भूमिका करताना ते त्यांच्या सूत्राशी पक्के होते. तसे नसते तर रस्त्याने जाता जाता फकिराने मोरपिसांनी उधळलेल्या धूपाच्या फटकाऱ्यासारख्या त्यांच्या ह्या कविता आपल्यासमोर आल्या नसत्या. त्यांच्या कवितेचा आलेख बघितला तरी हेच जाणवते की हा जगावेगळा बहुरुपी होता.

**(सौजन्य : 'उत्तररात्र' या रॉय किणीकर यांच्या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेतून, डायमंड पब्लिकेशन)**








# कवितांचे विणले शेले...



शान्ता ज. शेळके

कवयित्री, गीतकार, कथालेखिका, कादंबरीकार, अनुवाद, ललित लेखिका, बालवाङ्मयकार, समीक्षा, स्तंभ लेखिका, पत्रकार अशा वेगवेगळ्या भूमिकांवर हुकूमत गाजवणाऱ्या एक प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणजे शान्ता जनार्दन शेळके. कोष्टी समाजातील पहिली एम.ए.महिला ही शान्ताबाईंची आणखी एक वेगळी ओळख.

श्री.म.माटे, रा.श्री.जोग, प्र.के.अत्रे यांसारख्या शिक्षकांनी शान्ताबाईंवर साहित्याचे सखोल संस्कार केले. निरनिराळे वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले असे असले तरी त्या जनमानसात घर करुन राहिल्या त्या त्यांच्या कविता व गीतांमुळे. वर्षा (१९४७) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर आलेल्या रूपसी, गोंदण, अनोळख, जन्मजान्हवी, पूर्वसंध्या व इत्यर्थ या कवितासंग्रहातून त्यांच्या कविता अधिकाधिक अंतर्मुख, चिंतनशील व प्रगल्भ होत गेल्या. किनारे मनाचे हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह प्रसिद्ध आहे.

### शेळक्यांचा वाडा

**चा**कण रस्त्यावरुन सर्व्हिस मोटार पुढे आली की डाव्या हाताला मंचरची वेस लागे. वेशीजवळच मोटारस्टँड होता. तिथे मोटारीतून उतरुन वेशीमधून आत पाऊल टाकले की डाव्या हाताला एक पांढरीफक्क मशीद उभी असलेली दिसायची. मी लहानपणी गावोगावी जेवढ्या मशिदी पाहिल्या त्या साऱ्यांमध्ये दोन गोष्टी हमखास असायच्याच. एक, मशिदीबाहेरचा जाईचा वेल अन् दुसरी मशिदीच्या छताला टांगलेली शहामृगाची अंडी. या दोन्ही गोष्टींना मशिदीच्या संदर्भात काय महत्त्व होते ते मला कळत नसे. अजूनही कळलेले नाही. मशिदीवरुन सरळ पुढे जाणारा रस्ता काटकोनात गावाच्या बाजारपेठेला जाऊन मिळत असे. पण तो रस्ता सोडायचा आणि मशिदीवरुनच पण डाव्या हाताला जाणाऱ्या छोट्या बोळवजा रस्त्याने वळणेवाकणे घेत पुढे जायचे. हा रस्ता जिथे संपे तिथेच उजव्या बाजूला समोर, आमच्या शेळक्यांचा वाडा उभा होता. वाड्याचा दरवाजा या बोळात उघडत असे. वाड्याची दुसरी बाजू बाजारपेठेत येई. इथेच जवळपास कुठेतरी चौंडाईचे एक लहानसे देऊळ होते. चौंडाई ही खास आम्हा कोष्ट्यांची देवी होती. म्हातारे, बेवारशी कोष्टी कधी कधी या देवळात निवाऱ्याला येऊन राहायचे. भोवतालची चार कोष्टी घरे त्यांना दोन्ही वेळचे भाकरी–कालवण, पाणी पोहोचवीत. माझ्या आठवणीत एक म्हातारा कोष्टी या देवळात पडून राहिलेला असायचा. तो तिथे असल्यामुळे आम्हा मुलांना देवळात जायची भीती वाटे. त्या म्हाताऱ्याला आमच्या वाड्यातून नियमाने दोन्ही वेळा जेवण पोहोचते व्हायचे.

या शेळक्यांच्या वाड्यात माझे राहणे फार थोडे दिवस तेही अधून–मधून झाले असेल. माझे आजोबा अण्णा हे माझ्या वडलांचे वडील. ते शाळामास्तर होते, आणि नोकरीनिमित्त कधी चांडोली, कधी राजुरी अशा जवळपासच्या गावी ते राहत असत. ते कधीतरी शेळक्यांच्या वाड्यातल्या आपल्या वडिलार्जित वास्तूत मुक्कामाला यायचे. माझे वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. तेही अशा वेळी नोकरीतून सवड काढून घरी यायचे. तेव्हा आई–वडिलांबरोबर मीही या वाड्यात आलेली. माझे वय असेल सात–आठ वर्षांचे. या वयातल्या आठवणींत वास्तव आणि कल्पित यांचे रंग मजेदारपणे एकमेकात मिसळलेले असतात. माझ्याही बाबतीत तसे झालेले असणे स्वाभाविक आहे. पण त्यातूनही काही गोष्टी मला अगदी लख्खपणे आठवतात. जशा काही त्या माझ्यासमोर चित्रात रेखाटलेल्या आहेत.

अशी मला स्पष्ट आठवणारी पहिली गोष्ट म्हणजे वाड्याचा भूगोल. तो आजही मला अगदी डोळ्यांसमोर दिसतो. वाड्याचा दरवाजा लाकडी पण भला भक्कम होता. रात्री दरवाजा बंद करताना त्याला आतून एक जाड लाकडी अडसर आडवा लावीत.

ताईच्या घरात कोष्टीकाम होते. पडवीच्या पायऱ्या चढून वर गेले की मोठे दालन लागे. या दालनात माग होता. मागात बसण्यासाठी जमिनीत खोल खड्डा केलेला होता. त्यात पाय सोडून दत्ताकाका बसे, आणि माग चालवी. मागाचा साचा, फणी, मागावर विणायला घातलेल्या लुगड्याचे उभे धागे, रंगीत काठ आणि डावीउजवीकडे खटाखट घोटा फेकणाऱ्या ‘सटेल’ म्हणजे शटल मागाची नाकासमोर येणारी, हाताळून हाताळून मऊ झालेली टांगती लाकडी मूठ हे बघताना मला फार गंमत वाटे. गावातल्या बऱ्याच कोष्ट्यांकडे माग होते. या मागांवर धोटा हातानेच इकडून तिकडे फेकावा लागे. शटल मागावर मात्र दोऱ्याने टांगलेली लाकडी मूठ डावीउजवीकडे खेचली की घोटा आपोआप इकडून तिकडे वेगाने जाई. हे ‘सटेल’ माग म्हणजे त्या काळात एक अपूर्वाईची चीज होती. दत्ताकाकाकडे सटेल मागच होता.

ताईच्या घरात सारा वेळ कोष्टीकाम चालायचे. घरात सुताचे गठ्ठे येत. हे सूत उकलणे, तणणे, कांड्या भरणे ही कामे पुढल्या पडवीत मोठ्याई आणि यमुनाकाकी करीत. आसारा, फाळका ही अवजारे तिथे सतत चालू असायची. घरात कोऱ्या सुताचा, पांजणीसाठी शिजवल्या जाणाऱ्या खळीचा वास सर्वत्र

घुमायचा. तो वासही मला विचित्रपणे आवडे. खळ लावायचे कामही मोठ्याई किंवा यमुनाकाकी करीत. वाड्यासमोरच्या बोळामध्ये दोन्ही बाजूला कळकाची दोन फुल्या केलेली तिकाटणी त्या लहान वयात दोन पुरुष आणि तीन बायका हा हिशेब मला कळत नसे. पुढचे दालन ओलांडले की, आत मोठी पडवी, मध्ये चौक, मागे स्वयंपाकघर, जेवणाची खोली, देवघर, त्याच्यामागे पुन्हा मोठा चौक, तिथे सोपे, त्यात बांधलेल्या गायीम्हशी, घरभर असलेली भांडीकुंडी, सामान, वैभवाच्या इतस्ततः विखुरलेल्या खुणा या साऱ्यांचेच मला फार अप्रूप वाटे. आमचा शेळक्यांचा वाडा जुनाट, मातीच्या भिंतीचा, आणि शेणाने सारवलेल्या जमिनीचा, अंधेऱ्या जिन्यांच्या आणि ठेंगण्या माळ्यांचा होता. त्यांच्या तुलनेने मुंबईकरांचे प्रशस्त घर किती तलेजदार, लखलखीत दिसे.

एरव्ही अशा बड्या घरात जायला मला अवघड वाटले असते. पण मुंबईकरांच्या घरातील माणसे फार प्रेमळ होती. बायका हसतमुख बोलक्या होत्या. माझ्या आईच्या माहेरकडून मुंबईकरांशी आमचे काही नातेही होते. त्यामुळे आईबरोबर पुष्कळदा मी त्यांच्या घरी जात असे. पण मला आकर्षून घेणारी तिथली गोष्ट वेगळीच होती. मुंबईकरांच्या घराच्या मागल्या माडीत दोन भलीमोठी कपाटे पुस्तकांनी गच्च भरलेली होती. त्यांत नाटके, कादंबऱ्या, धार्मिक पुस्तके असत. आईबरोबर मी मुंबईकरांच्या घरी गेले की जरा वेळाने सरळ माडीचा रस्ता धरी. मागल्या माडीत एक झोपाळा टांगलेला होता. माडीवर गेल्यानंतर मी कपाटातले कोणतेही पुस्तक काढून घ्यावे आणि झोपाळ्यावर पालथे पडून दोन्ही हातांच्या तळव्यांत मस्तक धरुन वाचण्यास रंगून जावे. खाली बायकांच्या गप्पा चालत आणि मी माडीवर पानांमागून पाने वाचीत राही. आई घरी जायला निघाली की, ती मला हाक मारी. मला तर हातातले पुस्तक सोडवत नसे. मग मुंबईकर शेठजी हसून मला ते पुस्तक घरी न्यायची परवानगी देत.

शाळा सुरू झाल्यावर मी पुण्याला निघून गेले आणि पंधरवड्यातच माझी चुलती देवाघरी गेल्याचे आम्हाला पत्र आले. त्यानंतर मी पुन्हा शेळक्यांच्या वाड्यात कधी पाऊल ठेवले नाही.

शेळक्यांच्या वाड्याने मला काय दिले याचा मी जेव्हा आज विचार करते तेव्हा माझ्या ध्यानात येते की, त्या वाड्याने मला जातीची जाणीव दिली. आपण कोष्टी जातीत जन्मलो आहोत हे त्या वाड्यात मला जेवढे समजले तेवढे ते इतरत्र कुठेच कधी जाणवले नाही. आपल्याला जसे आईवडील असतात, भावंडे असतात, आपले राहते घर असते, तशी आपली एक विशिष्ट जात असते हे शेळक्यांच्या वाड्याने मला सांगितले. त्यातून कुठेतरी मला माझी पाळेमुळे समजली. त्या वयात कदाचित या गोष्टीची एक गरजही असेल. ती गरज त्या वाड्याने भागवली. तिथले खाणेपिणे, तिथली पूर्ण गावंढळ भाषा, तिथले माग, सुताचे आणि खळीचे वास, तिथल्या बायकांचे नेसणेसवरणे– या साऱ्यांचा माझ्या व्यक्तिमत्त्वाशी, माझ्या घडणीशी कुठेतरी खोल संबंध होता. आज तो संबंध अजिबात राहिलेला नाही. वाड्याशी असलेले माझे रक्ताचे नातेही आज मला जाणवत नाही. गतजन्मातल्या गोष्टी जशा विसरल्या जातात तसाच तो वाडाही मी जवळजवळ विसरले आहे; पण माझ्या अबोध मनात, माझ्या रक्तात, माझ्या व्यक्तित्त्वात ते सारे कुठेतरी भिनलेले असेलच.

खेड माझे आजोळ. 'खेड' नाव ऐकल्यावर इथे मुंबई–पुण्यात राहणारा विचारतो 'रत्नागिरीकडचं खेड का?' पण माझे खेड ते नाही. हे खेड पुणे जिल्ह्यातले एक तालुक्याचे गाव आहे. आजवरच्या आयुष्यात पुणे आणि मुंबई या दोन शहरांचे माझ्यावर खूप संस्कार झाले. पुण्याने विद्या दिली. मुंबईने चाकरी दिली. पोटाला भाकरी दिली. तसे खेडने मला काय दिले? या प्रश्नाचा स्वतःशी विचार करु लागले म्हणजे माझ्या ध्यानात येते की खेडने मला खऱ्या अर्थाने वात्सल्य दिले. बाळवयात जे कोडकौतुक हवे असते, ज्या गोड आठवणी मनात गोळा व्हायला हव्या असतात त्या साऱ्यांचाच लाभ मला खेडला झाला. त्यामुळे खेडला माझ्या भावविश्वात एक वेगळे स्थान लाभलेले आहे. आजही खेडची आठवण झाली की मन भरुन येते. खोल कुठेतरी एक खिन्न हुरहूर जागी होते. अनेक दृश्ये नजरेसमोरुन फिरु लागतात. काळाची गती क्षणभर थांबल्यासारखी वाटते.

**– शान्ता ज. शेळके**

**(सौजन्य : धूळपाटी, सुरेश एजन्सी)**

****

ग.दि.माडगूळकरांप्रमाणेच उत्कृष्ट व भावानुकूल भावगीते व चित्रपटगीते लिहिणारी गीतलेखिका म्हणून शान्ताबाईंना चांगली प्रसिद्धि लाभली. डॉ. वसंत अवसरे या टोपणनावाने देखील त्यांनी गीते लिहिली. त्यांच्या ऋतु हिरवा, ऋतु बरवा, गणराज रंगी नाचतो, तोच चंद्रमा नभात, मी डोलकर डोलकर, मागे उभा मंगेश, रेशमाच्या रेघांनी, वादळ वारं सुटलं ग, ही वाट दूर जाते अशा कितीतरी अविस्मरणीय गाण्यांनी मराठी मनाला मंत्रमुग्ध केले.

चिमणचारा, गोंदण या त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले. काव्यलेखनासाठी ग.दि.मा.गीतलेखन पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

मराठी सारस्वताची अखंड सेवा करीत असतानाच २००२ साली त्यांची प्राणज्योत मालवली. त्यावेळी 'असेन मी, नसेन मी...' ही त्यांची कविता उभ्या महाराष्ट्राला चटका लावणारी ठरली.



# गोदाकाठचा शब्दसम्राट

मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार आणि समीक्षक म्हणजे विष्णु वामन शिरवाडकर. तात्यासाहेब म्हणून अवघ्या महाराष्ट्राला सुपरिचित असणाऱ्या शिरवाडकरांनी आपले काव्यलेखन 'कुसुमाग्रज' याच टोपणनावाने केले. १९७४ साली 'नटसम्राट'ला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. याशिवाय १९८८ साली साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा 'ज्ञानपीठ' पुरस्कार आणि १९९१ साली 'पद्मभूषण' देऊन कुसुमाग्रजांचा गौरव करण्यात आला.

**वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज**



*अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला (कोलंबसाचे गर्वगीत) किंवा गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार असे ओजस्वी, तेजस्वी शब्द वापरून त्यांनी मनामनात जसा क्रांती-जोष भरला, तसाच पृथ्वीचे प्रेमगीत, काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्यांचे हात... अशी विलक्षण हळुवार, तरल कविता लिहून प्रेमाचा संदेश मराठी मनामनापर्यंत पोहोचवला. वेडात मराठे वीर दौडले सात...ह्या कवितेतून त्यांनी अक्षरश: इतिहास जिवंत केला.*

*कुसुमाग्रजांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे झाला. वडील रंगनाथ नागेश शिरवाडकर हे नाशिक जिल्ह्यात पिंपळगाव, बसवंत येथे वकिली करायचे. त्यामुळे कुसुमाग्रजांचे प्राथमिक शिक्षण पिंपळगाव येथे तर माध्यमिक शिक्षण नाशिक येथील न्यू इंग्लिश स्कूल (आजचे जे.जु.स.रुंगठा विद्यालय)मध्ये झाले. शालेय वयापासूनच त्यांना कविता लिहिण्याचा छंद जडला. जीवनलहरी (१९३३), विशाखा (१९४२), किनारा (१९५२), मराठी माती (१९६०), स्वगत (१९६२), हिमरेषा (१९६४) व वादळवेल (१९७०) हे कुसुमाग्रजांचे काही प्रकाशित काव्यसंग्रह. यातील 'विशाखा' हा काव्यसंग्रह म्हणजे मराठी वाङ्मयातील उच्च कोटीचे वैभवच; जे आजही मराठी साहित्यप्रेमींना भुरळ घालते. या संग्रहातील कविता त्यांनी ऐन स्वातंत्र्यलढ्यात (१९३०-१९४०) लिहिल्या.*

****

वामनराव शिरवाडकर निधन पावले तेव्हा त्यांच्या विधवा पत्नीने दादांच्या मुलांपैकी एकाला दत्तक घेण्याचा प्रस्ताव मांडला. वडील मुलाला दत्तक न देण्याचा प्रघात असल्याने गजाननचे नाव पुढे आले. पण आपल्या सर्व मुलामुलींना भरपूर शिकविण्याचा दादांचा संकल्प असल्याने मुलगा वडिलांकडेच राहिल आणि शिक्षण घेईल या अटीवर दत्तक विधी पार पडला आणि गजानन रंगनाथ शिरवाडकर नाममात्र विष्णू वामान (वि.वा.) शिरवाडकर झाले. दादांनी तात्यांना शिक्षणासाठी आपल्याच कुटुंबात ठेवण्याचा आग्रह धरला नसता तर...? तर, तात्या शिरवाडचे एक छोटे जमीनदार झाले असते, ज्यांना आपली जमीन कोणती याचाही धड पत्ता लागला नसता आणि तिचे काय करायचे असते हेही धड कळले नसते !

नाशिक-मालेगाव रस्त्यावर नाशिकपासून साधारण २० मैलांवर पिंपळगाव बसवंत लागते आणि आणखी ५ मैल पुढे गेल्यास शिवडी नदीच्या काठी वसलेले शिरवाडे (वणी) हे खेडे लागते. नदी फारच छोटी, पण तिचे छोटेसे कुंड सर्व गावाला पाणी पुरवीत असे. हवा सामान्यपणे सुखदायक. केंद्रस्थानी शिरवाडकरांचा मोठा वाडा, जवळ विठ्ठल मंदिर आणि त्या समोर चावडी, खरे तर धर्मशाळा. पिंपळगाव बसवंत हे तुलनेने मोठे गाव; पण गावाला मोठेपण दिले तेथील कोर्टाने. ''वस्ती थोडी असली तरी गाव नमुनेदार होते. थोड्या पानांच्या पण जोड मोहरेदार कागदावर छापलेल्या एखाद्या सुबक पुस्तकासारखे...'' द्राक्षाच्या लागवडीसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव त्या काळात कोर्टासाठी अधिक महत्त्वाचे गणले जात होते... दूरवरच्या शहरात उमलणाऱ्या नव्या जीवनाचा आणि संस्कृतीचा स्पर्श गावाला झालेला होता... डाकेतून केसरी, मनोरंजन यासारखी मराठी आणि टाईम्स, क्रॉनिकल सारखी इंग्रजी नियतकालिके अनेकांच्या घरी येऊन पडत. केळकरांच्य अग्रलेखावर आणि नायडू-देवधरांच्या फलंदाजीवर गावात जागोजाग चर्चा होत असे. ह.ना.आपटे, नाथमाधव, दातारशास्त्री, गडकरी

इत्यादींची पुस्तके स्त्रीपुरुषांच्या हातातून प्रवास करताना दिसत होती.'' असे पिंपळगावचे वर्णन तात्यांनी आपल्या 'वाटेवरच्या सावल्या' या पुस्तकात केले आहे. पिंपळगावची नदी पाराशरी. ''बालपणातील सौंदर्यशोधाला आणि आनंदबोधालाही या नदीचे खूपच साथ दिली.'' असे तात्यांनीच म्हटले आहे. नदीपासून जवळ रस्त्याला लागून आठ काळकठोर बलाढ्य वढ, पिंपळ होते. समोरच रस्त्यापलिकडे एक प्रचंड उंच वड होता; त्याला गावकरी 'ईश्वरीवड' म्हणत. 'विराटवड' ('किनारा') या कवितेतील तो नायक आहे.

गावाच्या सीमेस – नदीच्या तीरा
पारंब्या फांद्यांच्या – घालून डेरा
विषण्ण दृष्टीने – देखत नभा
विराट वड हा – राहिला उभा

पाराशरीतील दाट वडाखाली एक डोह होता.(सुप्त संज्ञेचे दरवाजे उघडून तो अनेकदा माझ्या काव्यादी लेखनात शिरलेला आहे.') नदीच्या जवळपास 'द्राक्षांचे बहरत बाग मनोहर जेथे' असा शेती प्रदेश– असे हे पिंपळगाव. शिरवाडच्या एका बाजूस पिंपळगाव (बसवंत) आणि दुसऱ्या बाजूस सप्तशृंगाची वणी. एखाद्या घरात अनेक समवयस्कर, रुबाबदार, जरबदार पुरुष असावेत त्याप्रमाणे सह्याद्रीच्या या डोंगरमालेत सप्तश्रृंग, मार्कंडेय, आवळ्याजावळ्या, धोडप इ. डोंगर उभे आहेत. कातीव आणि रेखीव. ''माथ्यावरील पठारांवर उत्तुंग पहाड घेऊन बसलेले हे डोंगर दुरून पाहिले म्हणजे अंबाऱ्या लावून सिद्ध असलेले काही हत्तीच एका रांगेत उभे राहिलेले आहेत असा भास होतो. सप्तश्रृंगावर तात्यांनी कविताही केल्या आहेत.

तात्यांचे प्राथमिक शिक्षण पिंपळगावच्या मराठी शाळेत सुरु झाले. अभ्यासात लक्ष बेताचेच. शाळेतील वातावरण कडक आणि कठोर. आपल्या 'वाटेवरच्या सावल्या' या संग्रहात तात्या वर्णन करतात, ''हेडमास्तरांच्या हातातील लांबलचक रूळ कोणाच्या पाठीत बसतो ही उगवणाऱ्या दिवसाची चिंता होती आणि तो आपल्या पाठीत बसला नाही हे मावळत्या दिवसाचे समाधान होते! त्या काळातील शिक्षक शिकवण्यापेक्षा मारण्यामध्ये अधिक पटाईत असत... थोडक्यात, शाळा म्हणजे एक प्रकारचे एकतर्फी समरांगण होते.'' (पृ.१०) शाळा सुटली की घरी दप्तर फेकून, थोडेफार खाऊन मुलं गावभर हुंदडायला निघत. तात्यांचा दैनिक कार्यक्रम हाच असे.

****

मराठी चौथी संपल्यानंतर शिरवाडकर मुले पुढील शिक्षणासाठी नाशिकला जात असत. त्यासाठी वडिलांनी नाशिकला खास बिऱ्हाड केले होते. पण तात्यांना पिंपळगावचा मोह सुटेना. एक वर्ष नाशिकला राहून ते परत पिंपळगावी आले कारण त्या वर्षीच ए.डी.नाईक नावाच्या शिक्षकाने पिंपळगावी इंग्रजी शिक्षणासाठी जोडशाळा काढली. ''एक वर्षाचा कालावधी. पण नाईक सरांच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. निर्वातातील मेणबत्ती जितक्या सहजतेने, नि:शब्दपणे जळते, तितक्याच सहजतेने ते जळत होते... आम्हाला त्यांचा प्रकाश कळत होता. जळणं कळत नव्हतं.''(वा.सा.३३). नाईक मास्तरांची सही अनेक वर्षे तात्यांच्या स्मृतीत शिल्लक होती; मनावर उठली होती. शालेय जीवनक्रमात सुटी म्हणजे अपूर्व आनंदोत्सव. सुट्यांमध्ये तात्या भावंडांबरोबर नाशिकला मामांकडे अथवा वणीला आत्याकडे जात असत. आत्यांचे यजमान अमृतराव तथा भैय्यासाहेब देशपांडे वणीचे मोठे जमीनदार, भल्यामोठ्या वाड्यात राहत असत. वरच्या माडीवरील एका खोलीत मोठा ग्रंथसंग्रह होता. भैय्यासाहेबांनी स्वत:ला वाचनापासून दूर ठेवले होते; पण पुस्तकसंग्रहाची त्यांना मोठी आवड होती. संग्रहात संपूर्ण रामायण, महाभारत, सरदेसायांच्या रियासती, आपट्यांच्या कादंबऱ्या, गडकऱ्यांची नाटके इ. समाविष्ट होती. सर्व शिरवाडकरांच्या साहित्यप्रेमाचे हे मूळ स्रोत होते.

**– के.रं. शिरवाडकर**
**(सौजन्य : तो प्रवास सुंदर होता, राजहंस प्रकाशन)**

****

**कवितेच्या उगमाशी**

शिरवाड गाव एका लहानशा नदीच्या काठावर वसलेले आहे. नदी इतकी छोटी आहे की, गाव त्या प्रवाहाला एखाद्या मुलाप्रमाणे कुशीत घेऊन बसले आहे असे वाटावे. महाराष्ट्रातील नद्या सामान्यत: लहानच. ओढा या












कवितांशिवाय शिरवाडकरांनी दुसरा पेशवा (१९४७), कौंतेय (१९५३), आमचं नाव बाबुराव (१९६६), ययाति आणि देवयानी (१९६६), वीज म्हणाली धरतीला (१९७०) ही नाटके लिहिली. 'नटसम्राट' (१९७१) ही त्यांच्या लेखणीतून उतरलेली सर्वोत्कृष्ट कलाकृती. मराठी साहित्याचा आणि संस्कृतीचा मानदंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुसुमाग्रजांचा जन्मदिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या स्मरणार्थ नाशिक येथे 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' नावाची संस्था कार्यरत आहे.




संज्ञेतून जेमतेम बाहेर पडलेल्या. एखाद्या डोंगरावरुन उतरायचे आणि घाईगर्दीने जवळपास भेटलेल्या एखाद्या मोठ्या नदीच्या मिळून जायचे हा त्यांचा स्वभाव. बाळाजी बाजीराव प्रथमत: उत्तर हिंदुस्थानात गेला तेव्हा तिकडील रुंद, ऐसपैस पात्रे असलेल्या नद्या पाहून त्याची मराठी नजर स्तिमित झाली होती, आपल्या मुलखात अशा नद्या नाहीत, ही खंत त्याने एका पत्रात प्रगट केली आहे. स्तिमित होण्याचा हा अनुभव आजही आपल्याला येतो. मथुरेमधील यमुनेचे आणि महाबळेश्वरजवळील नर्मदेचे विशाल पात्र पाहून माझी दृष्टीच नव्हे तरम नही भारावून गेले होते. महाराष्ट्रीय संदर्भातील 'नदी' हा शब्द त्यांच्यासाठी वापरण्यास संकोचच वाटला. वाहत्या पाण्याचे अफाट, अवाढव्य जलाशय होते ते. कालेलकरांची लोकमाता ही संज्ञा त्या ठिकाणी सार्थ वाटत होती. माताच नव्हे तर मातोश्री म्हणून, त्यांच्या वत्सल, तुडुंब स्वरुपाला नमस्कार करावासा वाटतो. परंतु मोठ्या नद्यांची ही पुण्यप्रद महती मान्य करुनसुद्धा छोट्या नद्याच मला अधिक प्रिय आणि आल्हाददायक वाटतात. पात्रात डोकावून पाहाणाऱ्या लहानमोठ्या झाडांनी किनारलेली, अरुंद प्रवाहात जागोजाग वाळूचे लखलखते तळ दर्शविणारी, हिरव्यागार लव्हाळ्याच्या बेटांनी शृंगारलेली, काळ्या-जांभळ्या डोहात पाण्याप्रमाणे सावल्याही साठवून ठेवणारी, लांबलचक रेताडात कोठे स्मिताप्रमाणे मुलायमपणे प्रगट होणारी, कोठे हास्याप्रमाणे खळखळणारी, तर कोठे अश्रूच्या थेंबाप्रमाणे एकाकी होऊन बसलेली नदी दिसली की, दृष्टीला जहागीर मिळाल्यासारखे वाटते. या मातोश्री नसतात. फार तर बहिणाबाई, पण खरे तर मैत्रिणीच असतात. बालकवींसारख्यांच्या काव्यातून असल्याच नद्यांची आपल्याला भेट होते.

गोदावरीच्या पाषाणवृद्ध किनाऱ्याने कमलावराप्रमाणे मला अनंत दिले आहे. म.गांधीसारख्या नेत्यांची आणि खाडिलकरांसारख्या साहित्यिकांची संस्कारशाली भाषणे येथे ऐकली आहेत. साऱ्या देशातून येणाऱ्या माणसांची भाविकता येथे जाणवली आहे, कार्तिकी पोर्णिमेला होणाऱ्या दीपदानाचे सांस्कृतिक सौंदर्य येथे बघितलेले आहे आणि राममंदिर सत्याग्रहाच्या वेळी आमच्या संस्कृतीतील भयानक अमंगलाचे दर्शनही येथे घडले आहे. या घाटांनी हवी तेव्हा स ोबत दिली, शोधले तेव्हा सांत्वन दिले, पाठीवरुन प्रोत्साहनाचा हात फिरविला. सुखदु:खाच्या कितीतरी घटका गवताप्रमाणे या नदीच्या तीरावर उगवल्या आणि कोमेजल्या.

कवितेसाठी जगणे हे 'विशुद्ध कविते'प्रमाणे एक सशाचे शिंग आहे. नसलेले आणि असले तर असायला नको असलेले. कदाचित कोणी कवितेसाठी जगला तर तो चांगली तर नव्हेच, पण साधारण बरी कविताही लिहू शकणार नाही. स्वत:च्या शरीरापासून भोवतालच्या मानुष आणि विमानुष विश्वापर्यंत माणसाचे जीवन पसरलेले असते. त्याच्याशी आपल्या प्रकृतीचे किंवा विकृतीचे संबंध जोडणे, त्यातील सत्त्वे आपल्या व्यक्तित्वात शोषून घेणे, त्यातील सुंदरता, कुरुपता, न्याय, अन्याय यांना प्रतिसंवाद देणे, हाच जर 'जगण्या'चा अर्थ असेल तर कवी नुसता जगतच नाही, तर ठराविक कालावधीमध्ये इतरांपेक्षा अधिक जगत असतो. विकृत आसक्तीपासून अविकृत भावविचारापर्यंतचे एक अनुभवविश्व त्याच्या सभोवार उमलते आणि त्याची भावात्मक प्रतिक्रिया झपाटलेल्या लयबद्ध शब्दांत ओतल्याशिवाय त्याला समाधान लाभत नाही.

कोणीएक याच मार्गाने चालला होता. मराठी-इंग्रजीतील काही श्रेष्ठ कवींना आपले प्रकाशदाते करुन. त्याची कविता चाचपडत होती, ठेचाळत होती आणि स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व शोधीत होती. काहीशा एकटेपणातच.

प्रथमावस्थेत लिहिलेल्या किमान शेदीडशे कविता तरी त्याने पुढे आपल्या संग्रहात घातल्या नाहीत अथवा शिल्लकही ठेवल्या नाहीत. पुढे म्हणजे कॉलेजच्या दुसऱ्या-तिसऱ्या वर्षापर्यंत हा जमाना संपला आणि प्रकाशन हवे तसे होऊ लागले. या प्रवासात संस्मरणीय प्रोत्साहन लाभले ते बालबोधमेवाकार देवदत्त टिळकांचे. परतफेडीचा मार्ग नसलेले एक ऋण होते ते.

**– वि.वा. शिरवाडकर**

**(सौजन्य : वाटेवरच्या सावल्या, वि.वा.शिरवाडकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन)**

****

# बालकवींची माता



लक्ष्मीबाई टिळक

लक्ष्मीबाईंचे शिक्षण लिहिण्या-वाचण्यापुरतेच झाले होते. ११०७ सालच्या जळगावच्या कविसंमेलनासाठी उपस्थित असलेल्या कविबंधूंना उद्देशून 'कवि तुम्ही- भिकारीण मी हो तुमच्या दारीं' असा काव्यमय निरोप त्यांनी पाठवला आणि त्यांच्या कवित्वाचे दर्शन काव्यरसिकांना झाले. मनोरंजनच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'करंज्यातला मोदक' या त्यांच्या कवितेने त्यांचे नाव महाराष्ट्रभर पोचवले. 'भरली घागर' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कवयित्री म्हणून त्या सुपरिचित असल्या तरी त्यांचे नाव चिरस्मरणीय झाले ते त्यांच्या 'स्मृतिचित्रे' या अजोड आत्मवृत्ताने.

**टि**ळकांचे एक कविमित्र होते. त्यांचे नाव कर्नल कीर्तिकर. जळगावच्या कविसंमेलनाचे तेच अध्यक्ष होते. हे डॉक्टर असून पुष्कळदा लढायांवर जाऊन आलेले होते. कर्नल कीर्तिकर माझ्याबद्दल 'एव्हर डाइंग वाईफ ऑफ युअर्स' असा टिळकांच्या पत्रांत नेहमी उल्लेख करायचे. कारण, मला काही ना काही तरी नेहमी होत असे व नेहमी मी अंथरुण धरलेले असे. अंथरुण म्हणण्यापेक्षा जमीन म्हटले तर अधिक शोभेल. कारण माझी लोळणफुगडी जमिनीवरच चाले. मात्र भूमि शय्या असली तरी नुसता भुजच तेवढा केवळ उशाला पुरत नसे. उशाला मी काय घेईल ह्याचा कधी नियम नसे. आठवा जात्याचा खुंटा, तपकिरीची डबी- थोडक्यात म्हणजे जे काही हाताला लागेल ते माझ्या उशाखाली जायचे. असो.

१५ मार्च १९०७ च्या ख्रिस्ती नागरिकांत टिळकांनी ह्या २६ कवींच्या कवि-संमेलनाविषयी एक मोठा बातमीवजा लेख लिहिला आहे त्यावरुन दिसून येईल, की ठोंबऱ्यांना 'बालकवि' म्हणून प्रथम टिळकांनीच संबोधिले. ते ठोंबऱ्यांविषयी लिहितात, की -

''त्यातच कुमार त्र्यंबक बापुजी ठोंबरे नावाच्या केवळ तेरा वर्षाच्या बालकवीचे शीघ्र कवित्व जमलेल्या मंडळीस पहावयास मिळाले. ह्याची शुद्ध, सुगम, रसाळ कविता ऐकून कवित्वशक्ति ही ईश्वरी देणगी आहे असे कोणाला वाटले नसेल? हिंदुस्थानात असे किती बालकवि, किती बालसाधु, किती बालवीर उत्पन्न होत असतील आणि पुढे फुकट जात असतील ! ह्याचा शोध करुन ह्यांना प्रगल्भदशेला आणण्याचे काम कोणी करावयाचे? आम्हीच हिंदुपुत्रांनी ना? असो; ईश्वर ह्या मुलाकडून आमच्या देशाची पूर्णपणे सेवा करुन घेवो ! आम्ही तर तोंडपाटिलकी आणि कलमबहादुरी करण्यात गुंतलो आहों!''

ह्या संमेलनाचे काम येथेच आटोपले. परंतु ह्या संमेलनाने महाराष्ट्र सारस्वतांसाठी फार मोठाल्या गोष्टी केल्या. एक बालकवि ठोंबरे ह्यांना उदयाला आणले व दुसरे अभिनव काव्यमालेची कल्पना येथूनच जन्माला आली. पुढे पुण्यास टिळक गेले व रा.न.चिं.केळर वगैरे मंडळींच्या सहकार्याने अभिनव काव्यमाला सुरु करण्यात आली.

ठोंबऱ्यांबद्दल टिळकांना चैन पडेना. ह्या मुलगा कोठेतरी शाळेत गेला पाहिजे व ह्याचे काही शिक्षण झाले पाहिजे, ह्याच्या काव्यशक्तीला आहोटी लागेल असे काही होता कामा नये, म्हणून त्यांनी कर्नल कीर्तिकरांशी जोराचा पत्रव्यवहार सुरु केला. कर्नल कीर्तिकर श्रीमंत होते व टिळकांचे मित्रही होते. त्यांनी ठोंबऱ्यांना दरमहा दहा रुपये देण्याचे कबूल केले. मात्र एक अट घातली, की ठोंबऱ्यांनी नगरास येऊन टिळकांच्या देखरेखीखाली रहावे. त्याप्रमाणे झाले व ठोंबरे नगरास आले.

ठोंबरे एकटेच आले, आदल्याच दिवशी नेहमीच्या रिवाजाप्रमाणे टिळक बाहेरगावी गेले होते. मी वर सांगितल्याप्रमाणे आजारी होते. जाताना टिळकांनी मला सांगून ठेवले होते, की बालकवि येणार आहेत त्यांची नीट व्यवस्था ठेवा.

नाताळचा दिवस होता. दहाचा सुमार, मी निजलेली, मुले देवळाला (चर्चला) गेलेली, घरात कोणाचा पत्ता नाही, चाकर, नोकर, शेजारी-पाजारी झाडून सगळे देवळात गेलेले होते. इतक्यात ठोंबरे आले. मी विचारले,

''तुम्हीच का ठोंबरे?''

''हो.'' त्यांनी म्हटले.

''बसा.मुले बाहेर गेली आहेत. ती आल्यावर तुम्हाला खाणावळीत घेऊन जातील. दूध, केळी वगैरे आमच्या घरचं तुम्हाला चालत असेल तर देते.'' ठोंबऱ्यांनी काही आढेवेढे न घेता दूध व केळी घेतली.

थोड्या वेळाने दत्तू आला. त्याच्याबरोबर त्याचे काही मित्र आले. त्यांनी ठोंबऱ्यांना खाणावळीत नेले. तेथे ते पुढे जाऊ लागले. राहाणे आमच्याकडेच होते.




**– लक्ष्मीबाई टिळक**

**(सौजन्य : बालकवींच्या आठवणी, स्मृतिचित्रे, पॉप्युलकर प्रकाशन)**

# एक अधुरा औदुंबर



त्र्यंबक बापूजी ठोमरे ऊर्फ बालकवी

बालकवींची विशेष ख्याती आहे ती निसर्गकवी म्हणून. त्यांच्या बहुतेक कवितांत निसर्ग हा मध्यवर्ती आहे. निसर्गातील विविध दृश्यांत त्यांना मानवी भावना दिसतात. बालकवींनी काही बालगीतेही लिहिली; त्यांतील गीतगुण सहजसुंदर आहे आणि बालवृत्तीही. त्यांतील पक्ष्यांविषयीची गीते विशेष सुंदर आहेत. बालकवींच्या सर्वच कवितांच्या रचनेतील नादमग्नता आणि चित्रगुण अकृत्रिम आणि असामान्य आहेत.

रेव्हरँड टिळक आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांचे घर म्हणजे बालकवींचे स्वत:चे आणखी एक घरच होते. त्यांच्या स्वत:च्या घरी रमले नसतील, इतके ते रेव्ह. टिळकांच्या घरी रमलेले दिसतात. रेव्ह. टिळकांची 'सृष्टीची भाऊबीज' ही कविता वाचून आपली कवित्त्वशक्ती जागृत झाली, असे बालकवी म्हणत असत. रेव्ह. टिळकांचे संपूर्ण घरच कवितामय होते. बालकवींची कवित्त्वशक्ती विकसित होण्यासाठी अशा वातावरणाचा चांगलाच उपयोग झाला असणार. रेव्ह. टिळकांचेही बालकवींवर अत्यंत प्रेम होते. या मुलाच्या कवित्त्वशक्तीला खतपाणी घालण्यासाठी त्यांनी बालकवींना आपल्या घरी आणले. बालकवींची कवितालेखनातील प्रगती पाहून त्यांना खरोखरच समाधान वाटले असणार. बालकवींच्या सहवासाची त्यांना इतकी ओढ होती की बालकवी त्यांना सोडून पुण्याला गेल्यावर त्यांना चैन पडेनासे झाले. त्यांनी लिहिलेली 'पांखरा येशिल कधी परतून' ही कविता बालकवींना उद्देशून लिहिली, असे म्हटले जाते ते खरेच असावे. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतीचित्रां'मधून बालकवींच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय चित्र रेखाटलेले आपल्याला दिसते.

कदाचित, ख्रिस्ती कुटुंबात राहून बालकवी ख्रिस्ती होतील अशी भीती वाटूनही असेल, त्यांनी नगर सोडून पुण्याला यावे असा आग्रह धरला गेला आणि बालकवी सन १९११ मध्ये पुण्याला आले. तेथे काही काळ त्यांनी 'केसरी' पत्रात काम केले. नव्या मराठी कवितेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने त्यांनी 'काव्यकलाप' हे सदर 'केसरी'त सुरु करून सहा एक महिने चालविले. 'कलापी' या नावाने 'केसरी'त त्यांनी 'कवी' व 'संक्रांत' अशा दोन कविताही लिहिल्या. 'केसरी'तूनच त्यांनी कवी अनंततनय उर्फ द.अ.आपटे यांच्याशी आधुनिक मराठी कवितेवर वादही घातला.

बालकवींनी पुन्हा नगरला परत यावे, म्हणून रेव्ह. टिळकांचा आग्रह सुरु होता. त्यानुसार सन १९११ मध्ये बालकवी पुन्हा नगरला रेव्ह. टिळकांबरोबर राहू लागले. तेथे त्यांनी मिशन हायस्कूलमध्ये मराठी आणि संस्कृत शिक्षकाचे काम केले. शिवाय, ख्रिस्ती मिशनऱ्यांना मराठी शिकविण्याचेही काम त्यांनी केले.

दोन टोकांमधील आंदोलनांमुळेच एक तर अतिशय प्रसन्न आनंदी मनोवृत्तीतील, नाही तर एकदम निराश मनोवृत्तीच्या कविता त्यांनी अधिक प्रमाणात लिहिलेल्या दिसतात. त्यांच्या एकूण कवितेमधील मोठा भाग अपूर्ण कवितांचा आहे. अशा मानसिक आंदोलनामुळेच त्यांच्या अशा कविता अपूर्ण राहिल्या असाव्यात. तरीही २८ वर्षे इतक्या अल्पायुष्यात त्यांनी निर्माण केलेल्या कवितांमधील बऱ्याच कविता म्हणजे मराठी कवितेच्या खजिन्यातील अनमोल रत्नेच म्हणावी लागतील.

पोटाच्या भटकंतीसाठी त्यांना अनेक ठिकाणी फिरावे लागले असले, तरी त्यांच्या कवितालेखनासाठी ते फायदेशीर झाले, असे म्हटले पाहिजे. सुंदर निसर्गाच्या सान्निध्यात राहिल्याने चांगल्या निसर्गकविता लिहिता येतात, हे खरे नसले तरी बालकवींसारख्या संवेदनशील, सौंदर्यासक्त मनाच्या कवीला असे वातावरण पोषकच ठरले असले पाहिजे. सन १९११पासून पुढे काही वर्षे बालकवी हे नगर, पुणे, महाबळेश्वर अशा फेऱ्या करीत होते. सुट्टीमध्ये महाबळेश्वरच्या मिशनरींना मराठी शिकविण्यासाठी त्यांचा मुक्काम बरेचदा महाबळेश्वरच्या असे. त्या मुक्कामात देवदत्त टिळक यांच्या सहवासात महाबळेश्वरच्या दऱ्याखोऱ्यांतून त्यांनी केलेली भटकंती आणि त्यातून त्यांच्या मनाने टिपलेली विविधांगी, मनोहारी निसर्गदृश्ये यांच्या परिणामातून त्यांच्या हातून त्यांची अलौकिक निसर्गकविता निर्माण झाली. एका पाठोपाठ या कविता प्रामुख्याने मासिक 'मनोरंजनातून' प्रसिद्ध होत राहिल्या. 'अरुण', 'संध्या-रजनी', 'फुलराणी', 'तारकांचे गाणे', 'निर्झरास', 'संध्यातारक', फुलपाखरु फुलवेली' अशा बहुसंख्य कविता सन १९११ पासून पुढच्या तीन चार वर्षांच्या काळात त्यांनी लिहिलेल्या दिसतात.

पूर्व समुद्री छटा पसरली रम्य सुवर्णाची,

कुणी उधळिली मूठ नभी ही लाल गुलालाची?
(अरुण)

उदयगिरीवर नव तेजाची शांत पताका ही !
की गंगेच्या शुभ्रजलाचा झोत वरी येई !
(संध्या-रजनी)

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालिचे
त्या सुंदर मखमालीवरती
फुलराणी ती खेळत होती
(फुलराणी)

घे लोळण खडकांवरतीं
फिर गरगर अंगाभंवतीं
जा हळुंहळुं वळसे घेत
लपत छपत हिरवाळीत
(निर्झर)

अशी कोणतीही रचना त्यांनी महाबळेश्वरसारख्या ठिकाणी हिंडताना टिपलेल्या निसर्गदृश्यांची साक्ष देणारी आहे.

बालकवींच्या ज्या कवितेने प्रथम प्रकाश पाहिला ती कविता होती, बालांसाठी लिहिलेली कविता. तिचे नाव 'आनंदी प्रवास' आणि ती 'आनंद' मासिकाच्या १९०७ सालच्या मे महिन्याच्या अंकात प्रसिद्ध झाली. या कवितेत आणि त्यांची अगदी पहिला कविता (१९०३) 'वनमुकुंद'मध्ये, (मात्र ही कविता पुढे बऱ्याच काळानंतर म्हणजे १९२३ मध्ये प्रकाशित झाली.) बालकवींची निसर्गात रमण्याची वृत्ती दिसून येते. पुढील काळातील त्यांच्या कवितांची ही जाणू नांदीच होती.







त्यांच्या बालकविता सन १९१० पर्यंत प्रकाशित होत राहिल्या. त्यानंतरच्या काळात त्यांचे अशा प्रकारचे लेखन थंडावलेले दिसते.

**निराश मनोवृत्ती**

सन १९१६ च्या सुमारास बालकवींचे काव्यलेखन थंडावलेले दिसते. 'आपली कविता आपल्याला सोडून गेली' अशी हुरहूर त्यांना याच काळापासून लागून राहिलेली दिसते. 'बालविहग'मध्ये या मनोवृत्तीचे पडसाद उमटलेले दिसतात.

काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज।
काळ लोटला हाय किती ! मन वरिताहे लाज।।

असे उद्‌गार त्यांनी काढले आहेत.

सामान्यत: याच काळात त्यांनी कवितालेखनाचा पुन: प्रयत्न केलेला आणि वेळोवेळी तो अपुरा राहिलेला दिसतो. दीर्घ कवितेचा बाज असणाऱ्या ऐतिहासिक वा तत्सदृश वातावरणातील कविता बहुधा याच काळात लिहिल्या गेल्या असाव्यात, 'ताराराणी', 'थडग्यांतील रमणी', 'शाहीर', 'प्रतापसिंह', 'वीर मराठा','वीर गडी', 'दौलतरावांची मंजुळा', 'मूढ मालती', अशा बऱ्याच कविता या प्रकारच्या आहेत.

**– नंदा आपटे**

**(सौजन्य : प्रास्ताविक, समग्र बालकवी, पॉप्युलर प्रकाशन )**

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे १३ ऑगस्ट १८९० साली बालकवींचा जन्म झाला. बालकवींच्या वडिलांची पोलिस खात्यातील नोकरी फिरतीची असल्याने सततच्या बदल्यांमुळे त्यांच्या शिक्षणाची आबाळ झाली. बालकवींची वडिल बहीण जिजी हिच्यामुळे बालकवींना कवितेची गोडी लागली. वयाच्या तेराव्या वर्षी नवापूर येथे असताना बालकवींनी आपली पहिली कविता लिहिली. पुढच्या ३-४ वर्षांत त्यांची कविता अधिक विकसित झाली. जळगाव येथे भरलेल्या पहिल्या कविता संमेलनात (१९०७) त्यांनी केलेल्या काव्यवाचनामुळे प्रभावित होऊन संमेलनाध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ह्यांनी त्यांना 'बालकवी' हे नाव देऊन त्यांचा गौरव केला. त्यानंतर दोन वर्षांनी रेव्ह. टिळकांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी अहमदनगरच्या अमेरिकन मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. पण शिक्षकात त्यांचे मन फार रमले नाही.

१९१८ च्या मे महिन्यात भादली स्टेशनापाशी रुळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून बालकवींचा अंत झाला. अवघ्या २८ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. पण या अल्पायुष्यात अलौकिक प्रतिभेचे देणे लाभलेला हा कवी मराठी कवितेवर स्वत:ची अशी नाममुद्रा उमटवून गेला.

# चांगदेव सांगवीकर



भालचंद्र नेमाडे

मराठी कादंबरीच्या परंपरेत एक मजबूत मैलाचा दगड भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीमुळे रोवला गेला. काहीशा विस्कळीत, तऱ्हेवाईक शैलीत लिहिलेली ही कादंबरी आशय आणि अविष्कार या दोन्ही बाबतींत वेगळी आहे. या कादंबरीत नेमाड्यांनी उभा केलेला नायक पांडुरंग सांगवीकर आपली उभी-आडवी भारदस्त सावली पुढच्या पिढ्यांवर पाडून अजूनही खंबीरपणे उभा आहे.

*__भा__लचंद्र नेमाडे यांचा जन्म २७ मे १९३८ रोजी जळगाव जिल्ह्यातील सांगवी येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण खानदेशात झालं. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्यात आले. १९५९ मध्ये त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी घेतली. बी.ए.च्या काळातील आपल्या अनुभवांवर नेमाड्यांनी पुढे जाऊन 'कोसला' ही कादंबरी लिहिली.*

*१९६१ साली नेमाड्यांनी पुण्यातच डेक्कन कॉलेजातून भाषाशास्त्रातील एम.ए.ची पदवी घेतली, तर १९६४ साली मुंबई विद्यापीठातून इंग्रजी साहित्यात एम.ए.ची पदवी संपादन केली. त्यानंतर दीर्घकाळ ते महाराष्ट्रातल्या विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी प्राध्यापकाची नोकरी करत होते. या काळातले त्यांचे अनुभव चांगदेव पाटील या नायकाच्या रूपाने त्यांनी कागदावर उतरवले आणि त्यातून बिढार, हूल, जरीला, झूल या कादंबऱ्यांचा जन्म झाला. प्रकाशनापूर्वी जवळपास ३० वर्षे चर्चेत असलेली त्यांची 'हिंदू: जगण्याची समृद्ध अडगळ' ही कादंबरी २०१० मध्ये प्रसिद्ध झाली. १९८०च्या दशकात नेमाड्यांनी मांडलेल्या देशीवादाच्या संकल्पनेला खांद्यावर वागवणारा खंडेराव हा या कादंबरीचा नायक.*

*कादंबरीशिवाय कवितेच्या प्रांतातही नेमाड्यांनी आपल्या 'मेलडी' आणि 'देखणी' या कवितासंग्रहातून स्वत:चा ठसा उमटवला. त्यांच्या 'टीकास्वयंवर' या समीक्षाग्रंथाला १९९० साली साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. २०११ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने गौरवण्यात आलं. याशिवाय महाराष्ट्र फाउंडेशनचाही पुरस्कार त्यांना मिळाला.*

*कोसलाकार भालचंद्र नेमाडे यांच्यातील कादंबरीकाराच्या जडणघडणीचा वेध घेण्यासाठी 'उदाहरणार्थ' 'चंद्रकांत पाटील यांनी त्यांची 'उदाहरणार्थ' एक मुलाखत घेतली होती. ती वाचण्यासारखी आहे -*

****

**कोसला लिहायच्या आधी तुम्ही एकूण मराठी गद्याचा जाणीवपूर्वक विचार केला होता काय?**

: मराठीचा विद्यार्थी म्हणून मी मराठी गद्याचा चांगलाच अभ्यास केला होता. विद्यार्थीदशेत मला जुन्या मराठीचं अतिशय वेड होतं. आम्ही बी.ए.चे मराठीचे विद्यार्थी त्या वेळी जुन्या गद्यात नेहमी बोलायचो. महानुभवांसारखं गद्य नंतर कोणाला लिहिता आलं नाही, हे आमच्या लक्षात आलं होतं. जुनी पत्रं, बखरी, भारुडं, लावण्या मी चिकाटीनं जमवायचो. त्यांच्या वाक्यरचनेत मला विलक्षण शैलीचे नमुने आढळायचे. ते नव्या मराठीत दिसतच नव्हते. मराठी गद्याची परंपरा तुटक असल्यानं खास मराठी गद्यशैली वेगवेगळ्या काळात अधूनमधून उगवल्यासारखी, गोडसे भटजी, लोकहितवादी, लक्ष्मीबाई टिळक, सानेगुरुजी, विनोबा भावे, भाऊ पाध्ये, अशोक शहाणे, राजा ढाले, श्याम मनोहर अशी इतस्तत: दिसून येते. गद्यशैलीबद्दल जाणीवपूर्वक विचार मला करावाच लागला नाही. कारण माझ्या नेहमीच्या जगण्यात हा सर्व भाग होताच. वर्तमानपत्रांनी भाषा बिघडते असं माझं विद्यार्थीदशेपासूनच मत आहे.

उपहासाकरता मी काही टीकालेखांतून चिपळूनकरी शैलीही वापरली होती. सध्याचं मराठी गद्य किती नि:सत्त्व आहे, हेही आपोआपच लक्षात आलं होतं. नंतर मी एम.ए.ला भाषाशास्त्र हा विषय घेतल्यामुळं भाषेचा शास्त्रीच अभ्यासही होऊन गेला. भाषाशैली ही नेहमी बदलत राहणारी प्रवाही वस्तू आहे. विविध जाती-जमातींची, विविध

व्यवसायांमधली, थरांतली, उद्योगांतली माणसं, स्त्री-पुरुष सर्वांनी सतत लिहून भाषा वापरली तरच शैली समृद्ध होतं. मराठीत ठरलेला शहरी वर्गच लिहीत असल्यामुळं हे शक्य झालं नाही. त्यामुळे शैलीचा तोकडेपणा अपरिहार्य आहे. अजूनही विविध सामाजिक स्तरांतून, प्रसंगातून वापरलेली भाषा मराठीत कमीच आहे. बोलीभाषा व लेखीभाषा यांच्यातलं अंतर आणखी कमी झालं पाहिजे. सर्व प्रकारच्या लिहिणाऱ्यांना आत्मविश्वास आवश्यक आहे. मराठीत हे अजून शक्य होत नाही. त्याच त्याच शब्दप्रयोगांचा वैताग चालूच आहे. विशिष्ट जातींच्या, उद्योगांच्या आवर्तनातून सुटलेले, विशाल समाजाचे नागरिक झालेले किंवा आपल्या समाजाची संकुचितता लक्षात आलेले साहित्यिकच अशा आशयाला अनुसरुन चांगले गद्य लिहू शकतात. उदाहरणार्थ, भटकणारे गोडसे गुरुजी, ब्राह्मणांवर संतापलेले लोकहितवादी, ख्रिस्ती झालेल्या लक्ष्मीबाई, सर्व जगाला कवटाळून पाहणारे सानेगुरुजी, उपहासवृत्तीचे चिं.वि.जोशी, सहृदय श्री.म.माटे, तटस्थ निरिक्षक व्यंकटेश माडगूळकर, 'शिळान्'पुरते-दारिद्र्याचं चित्रण करणारे उद्धव शेळके, महानगरातील वर्गकलहापासून मुक्त भाऊ पाध्ये, जातिसंस्थेबद्दल स्फोटक बाबूराव बागूल, पुण्याच्या ब्राह्मणी संस्कृतीपासून मुक्त श्याम मनोहर.

**तुम्ही 'कोसला'त फॅार्मची जी मोडतोड केली आहे, त्याची कारणं कोणती?**

याची कारणं बरीचशी वैयक्तिक ठरतील. फॅार्मची मोडतोड करण्याचं लिहितांना मनाशी ठरवलं असं वाटत नाही. आशय, भाषा आणि तंत्र बदलले की फॅार्ममध्ये आपोआपच बदल होतो. भाषेचं मी मघाशी सांगितलंच. आशयाच्या बाबतीत सांगायचं तर माझ्या दीर्घकालीन विद्यार्थीदशेमुळं माझं मराठी, इंग्रजी, भाषाशास्त्र, समाजशास्त्र आणि त्याशिवायही बऱ्याचशा संबंधित विषयांचं वेडंवाकडं वाचन होत गेलं. माझ्या अभ्यासाला शिस्त नव्हती. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा एकाच बाजूनं विचार करण्याची मला कधीच सवय जडली नाही. अर्थात ह्यामुळे माझ्या परीक्षांचे निकाल मला आणि माझ्या आवडत्या गुरुजनांना नेहमीच असमाधानकारक वाटत राहिले हे सोडा. म्हणून ही परीक्षापद्धती हटवण्यासाठी माझ्या विद्यापीठात मी आटोकाट प्रयत्न केले, हेही सोडा. परंतु मुख्य म्हणजे मी बेकार म्हणून घरी गेलो तेव्हा, मी बरोबर असूनही, गावातल्या लोकांनी मला वेड्यात काढलं. वडिलांनी तर अक्षरश: घराबाहेरच काढलं. ही उद्विग्नता फॅार्मची मोडतोड करणार नाही कर काय करील? हे एक कारण, दुसरं, मी कुठंही बहुधा बुद्धिमान लोकांच्या सान्निध्यात राहणं पसंत करतो. म्हणून माझ्या विचार करण्याच्या कक्षा मित्रांच्या सान्निध्यामुळं नेहमीच रुंदावत जातात. उदाहरणार्थ, वसंत पळशीकरसारख्या माणसाजवळ एक तास गेला की तुम्हाला जगण्याची वेगळीच दिशा प्रतीत होते. असे माझे सगळेच मित्र मला पारंपारिक विचार मोडणारेच वाटतात. त्यांचा माझ्यावरील परिणाम साधासुधा नाही. तिसरं कारण, मला कुठंही स्थिरतेची भावना येत नाही. चौथं कारण, माझी मूळ बोली भाषा खानदेशी असल्यामुळं प्रमाण ग्रांथिक मराठीकडं तिरकसपणे पाहणं, हे माझ्या स्वभावातच आहे. शिवाय मला आवडणारे शैलीचे आदर्श पारंपारिक आदर्शांशी जुळणारे नव्हते. विशेषत: माझ्या नायकाला हे सर्व संदर्भ जसेच्या तसे, कुठंही तडजोड न करता, प्रामाणिकपणानं दिल्यामुळं हे शक्य झालं असावं.

**ही वैयक्तिक कारणं कलात्मक ठरली हा योगायोग आहे की त्यांचा संबंध आपोआपच १९६३च्या आसपास वाङ्मयीन पार्श्वभूमीशी लागला हा योगायोग आहे?**

१९६३च्या पार्श्वभूमीशी त्याचा काही संबंध आहे असं मला वाटत नाही. ही कारणं निव्वळ वैयक्तिकच आहेत, कलात्मक नाहीत असं मला वाटतं. ती कलात्मकच आहेत असा तुमचा आग्रह असला तर माझ्या दुसऱ्या एका सिद्धांताला त्यामुळे बळकटीच येईल की जीवन आणि साहित्य ह्यात फारसं अंतर असू नये. जीवनालाही कलात्मक परिमाणं असू शकतात.

**कोसला एका संपूर्ण पिढीचं प्रतिनिधित्व करते असं तुम्ही मानता काय?**

ती सबंध पिढीचं प्रतिनिधित्व करते असं वाटत नाही. ती एका वयोमर्यादेपर्यंतच्या मुलांचंच प्रतिनिधित्व करते आणि ह्या वयोमर्यादेपर्यंतच्या मनोदशेतून बहुधा प्रत्येक जण












बिढारच्या वेळी अशा पद्धतीचं लिहू नये असं मला मनापासून वाटलं. अतिपुरोगामी लिहिल्यानं बुद्धिमान वाचकच फक्त तुमच्याबरोबर येतात. समाजाचा संबंध तुटतो. समूहमानसही महत्त्वाचं असतं, ह्या गोष्टीचं मला जबरदस्त भान निर्माण झालं. विशेषत: कादंबरीची अनेकविध प्रयोजनं असतात – त्यात समूहसापेक्षता हेही एक आहे, हे मला कोसला च्या वाचकांच्या कुठून कुठून येणाऱ्या पत्रांनी जाणवून दिलं. कोसला वाचून आत्महत्या करणाऱ्या दोघातिघा संवेदनक्षम तरुण मुलांनी पांडुरंग सांगवीकरचं भूत मला जाणवून दिलं. ही एक नवीनच जबाबदारी निर्माण झाली. दुर्देवानं पांडुरंग सांगवीकर आणि चांगदेव पाटील ह्यांच्यात नको तितकं म्हणजे बारा-तेरा वर्षांचं अंतर पडलं.

गेलेलाच असतो. पिढीचं प्रतिनिधित्व करणं हे अशा एखाद्या कादंबरीतून साध्य होत नाही. लिहिणं ही एक कंटीन्युअस प्रोसेस आहे आणि त्याससाठी सबंध आयुष्यभर लिहीत राहणं आवश्यक आहे. ते आपल्याला जुळेल असं वाटत नाही.

**कोसला मधील पांडुरंग सांगवीकरची नकारात्मक वृत्ती आणि बिढार मधील व जरीला मधील चांगदेव पाटलाची सर्व गोष्टी स्वीकारत जगण्याची वृत्ती, ह्या स्पष्टचअ ाहेत. जर तुम्ही लिहिणं ही कंटीन्युअस प्रोसेस मानता तर मग ह्या दोन्ही वृत्तीचं समर्थन तुम्ही कसं करता ?**

कोसला आता अनेकांना आपलीच वाटते. काहींना तर ती माझ्यापेक्षाही जास्त आपली वाटते. आता मला ती 'माझी' अशी वाटत नाही. म्हणून आता मी कोसला बद्दल वस्तुनिष्ठ विचार करु शकतो. शिवाय झूल या माझ्या जरीला नंतरच्या कादंबरीत चांगदेव पाटीलही दूर झाल्यामुळं त्याबद्दलही मी वस्तुनिष्ठ विचार करु शकतो. सांगवीकरबद्दल म्हणायचं तर आपल्या पिढीला काही विशेष क्रांती करता येईल असं मला कोसला लिहितांना वाटत नव्हतं. क्रांती करणारी पिढी आपल्या आधीची किंवा आपल्यानंतरची हे मला आणि आपल्या पिढीतल्या सर्वांनाच वाटत होतं. कारण आपल्यात ते कॉम्पिटीटिव स्पिरिट, कृतीनं झगडण्याचं सामर्थ्य नाही. तशी परिस्थितीही आपल्याला कधी मिळाली नाही. आपल्या विचारानं झगडण्याचं मात्र सामर्थ्य आहे, हे कोसला वाचणाऱ्या सगळ्यांना फारच पटून गेलेलं दिसतंय. पांडुरंग सांगवीकराची भूमिका एकत्रितपणे पाह्यली तर खोलवरच्या नकाराची होती. खोलवरचा नकार हा उथळ, फॅशनेबल होकारापेक्षा जास्त आशावादी असतो असं मला त्यावेळी वाटत होतं. सांगवीकर वास्तवावर अत्यंत प्रेम करणारा प्राणी आहे; तो स्वत:पुरता एक रस्ता काढून त्या मार्गानं आनंद शोधत, विनोदानं जगत जातो. पुढे त्याला हा रस्ता आणि वास्तव ह्यातलं अंतर वाढतं आहे हे लक्षात आल्यावर त्याच रस्त्यानं पुढे जाऊन आपल्या प्रिय वास्तवापासून कायम तुटणं त्याला सहन होणारं नसतं. म्हणून तो घाबरून पुन्हा मागं येऊन वास्तवाशी समांतर जाणारा दुसरा एक मार्ग शोधून जगत राहतो. आपल्या समाजातल्या अमर्याद, पितृसत्तेचा धिक्कार करणं, पंचवीस वर्षापर्यंतच्या मुलांचे अनेक प्रश्न, त्यांच्या मनावर पडणारे सामाजिक दाब वगैरे गोष्टींमागे एक इंप्लाइड आयडिअलिझम् होता. ही माझी नैतिकता सगळ्या त्या वयाच्या तरुण मुलांची होती. बिढारच्या वेळी अशा पद्धतीचं लिहू नये असं मला मनापासून वाटलं. अतिपुरोगामी लिहिल्यानं बुद्धिमान वाचकच फक्त तुमच्याबरोबर येतात. समाजाचा संबंध तुटतो. समूहमानसही महत्त्वाचं असतं, ह्या गोष्टीचं मला जबरदस्त भान निर्माण झालं. विशेषत: कादंबरीची अनेकविध प्रयोजनं असतात – त्यात समूहसापेक्षता हेही एक आहे, हे मला कोसला च्या वाचकांच्या कुठून कुठून येणाऱ्या पत्रांनी जाणवून दिलं. कोसला वाचून आत्महत्या करणाऱ्या दोघातिघा संवेदनक्षम तरुण मुलांनी पांडुरंग सांगवीकरचं भूत मला जाणवून दिलं. ही एक नवीनच जबाबदारी निर्माण झाली. दुर्देवानं पांडुरंग सांगवीकर आणि चांगदेव पाटील ह्यांच्यात नको तितकं म्हणजे बारा-तेरा वर्षांचं अंतर पडलं.

मराठीत पुस्तक प्रकाशित व्हायला, वाचकांपर्यंत पोचायला किती वर्षं लागतात ही बाबही मला शॉकिंग वाटते. आपल्या पिढीला बरंच काही करता येईल असं मला माझ्या स्वत:च्या मधल्या काळातल्या – विशेषत: गेल्या पाच-सहा वर्षांतल्या – कामाच्या स्वरुपावरुन वाटत आहे. जगण्याच्या सर्वोच्च मूल्याखाली इतर सर्व मूल्यं ठेवणारा चांगदेव पाटल आणि सडलेल्या समाजातही जगणं अर्थपूर्ण करू पाहणारा नामदेव भोळे ह्या माझ्या दोन नायकांमुळं कोसला तला इंप्लाइड आयडिअलिझम् बराच स्पष्ट होईल असं मला वाटतं.

**(सौजन्य : भालचंद्र नेमाडे यांची चंद्रकांत पाटील यांनी घेतलेली मुलाखत, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन)**

# ग्रंथपान

## एक दिवस जीवनातला
नीला सत्यनारायण




जंगलांचे सौंदर्य आणि ऐश्वर्याचा अनुभव घ्यायचा तर जंगलात जायला हवे. जगण्याची अनुभूती घ्यायची तरी जंगलात जायला हवे. आणि 'स्व'चा शोध घ्यायचा तरी जंगलातच जायला हवे. जंगल म्हणजे नुसते झाडाझुडपांनी वेढलेले रान नाही. जंगल म्हणजे नुसते प्राणी, पक्षी यांचे आश्रयस्थान नाही. जंगल मनाची समृद्धी दाखवणारा कुबेराचा वारसदार आहे. जंगल आपल्यालाच आपली ओळख करून देणारा आदिम पुरुष आहे. अधात्म शोधण्यासाठी हिमालयात जाण्याची गरज नाही. साक्षात अध्यात्माचा साक्षात्कार आणि आत्मिक शोधाचे स्थान कुठे असेल तर ते आहे जंगलात. या जंगलाचा अनुभव घेतला आहे नीला सत्यनारायण यांनी. त्यांचे अनुभवाचे बोल शब्दरूपाने उतरले आहेत, 'एक दिवस 'जी'वनातला या पुस्तकात.

हे पुस्तक म्हणजे नुसते प्रवासवर्णन नाही किंवा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचा पाहणी अहवाल नाही. हे आहेत एका हळुवार मनाच्या कवयित्रीचे लोभस काव्यमय शैलीत लिहिलेले अनुभवाचे बोल. पाहा; पानगळीच्या मोसमातील झाडे दिसतात तेव्हा ती भासू लागतात, विरक्त झालेली. समर्पणाची भावना असलेली. विश्वाच्या नियंत्यापुढे झुकलेली. ते जणू त्यांचे वार्धक्य होते, सहज तरी सुंदर. त्यांच्या निर्वस्त्रपणात नव्हती अश्लीलता, होते परिपक्व वैराग्य. सागाच्या झाडाच्या खालून जाताना वाटत राहते, आपला प्रवास सुखकर व्हावा यासाठी त्यांनी उन्हाला वर आपल्या शिरावर पेलून धरले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची झाडे आपल्या फांद्या ताणून एकमेकीना आलिंगन देत आहेत. त्यांच्या कमानीखालून जाताना आपण राजघराण्यातले आहोत असा भास होत राहावा. रस्ताभर चवऱ्या ढाळत असलेले भालदार-चोपदार पानांच्या पायघड्या घालतात आणि हिरव्या रंगांची चौफेर उधळण करतात.

या सफरीत एखादे हरिणी भेटते, गर्भातच पाडस मृत झालेली. जिची वनरक्षकानी सिझेरीयन करून सुटका केली आहे. तिच्या डोळ्यात असलेला पाडसाचा शोध लेखिकेला हेलावून सोडतो. एका डोळ्यात मोतीबिंदू झालेली बिबट्याची मादी विहिरीत पडली. तिला वाचवण्यात यश आले. परंतु पुन्हा तसे होऊ नये म्हणून तिच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करता येईल का, ही वाटणारी काळजी लेखिकेला अस्वस्थ करते. जंगलात अनेक पशु-पक्षी भेटतात परंतु वाघाचे दर्शन होत नाही, हे शल्य अनेक जंगलं पायी घालूनही कायम राहते. तेव्हा वाटणारी हूरहूर आणि ध्यानीमनी नसताना डरकाळी फोडीत एक देखणा वाघ हजर होतो, तेव्हाचा गगनात न मावणारा आनंद, हे दोन्ही भाव लेखिका मनापासून व्यक्त करतात. हत्तींना गूळ- भात भरवण्याच्या प्रसंगी उडालेली गाळण, साडेतेरा फूट लांबीचा नाग पाहून मनातून दचकणे, त्या मनमोकळेपणे कबूल करतात. वारूळ दिसताच, त्यात तपस्वी असेल का, असा विचार त्यांच्या मनात डोकावतो.

लेखिका या प्रशासकीय सेवेतील अधिकारी होत्या. वनविभागाचे खाते त्यांच्या कक्षेत होते. तेव्हा नुसते कार्यालयात बसून निर्णय न घेता, प्रत्यक्ष भेट देऊन या विभागात काही करता येईल का, या उद्देशाने त्यानी जंगलांना भेटी दिल्या. संपूर्ण महाराष्ट्रातील जंगले, डोंगर यांची पाहणी केली. मुंबईचे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, शिवडी, पारसिक, चंद्रपूर, ताडोबा, नागाव, कर्नाळा, महाबळेश्वर, नागझिरा, नवेगाव, पेंच, सिंधुदुर्ग, कान्हा ही काही ठिकाणे. त्याशिवाय त्यांनी हैदराबाद, आल्पस् , सिंगापूर, आफ्रिकन सॅव्हाना, दक्षिण आफ्रिका या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ठिकाणांचीही सफर केली आणि अनुपम सौंदर्याचा खजिना लुटला. आपले तरल अनुभवांचे भांडार समृद्ध केले. प्राणी, पक्षी, झाडे, डोंगर, ऋतू, माणसे, घरे, प्रवास, जे जे दिसले, जसे भावले, ते अलगद आणि अचूक टिपले. त्या अनुभवांचे संचित म्हणजे हे पुस्तक होय. अगदी मोजक्या शब्दांत, परंतु शब्द असे, दवात न्हालेले, चांदण्यात विसावलेले आणि प्रतिभेचा साज ल्यालेले.

लेखिका उत्तम कवयित्री आहेत. मराठी, हिंदी अशा दोन्ही भाषांत त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. मातीची मने, अग्निपुष्प, आषाढमेघ, आकाश पेलताना, अमृत वर्षा हे त्यांचे काही कवितासंग्रह. या कवितासंग्रहाइतकेच संवेदनशील मनाने लिहिलेले हे पुस्तक म्हणजे गद्यमय कविताच होय.

पुस्तकाची निर्मिती हा स्वतंत्र विषय म्हणावा लागेल. विषयाला साजेशी ही निर्मिती आहे. वापरलेला कागद हा आर्टपेपर आहे. वाघ, हत्ती, कांचनमृग, बाराशिंगा, गेंडा यासारखे अनेक प्राणी; मोर, रोहित पक्षी, मत्स्य गरूड यासारखे अनेक पक्षी; जंगल, डोंगर, कारवीचे फूल, वाघांच्या पावलांचे ठसे, तलाव अशी अनेक फोटोंची भुरळ घालणारी मालिका या पुस्तकात गुंफलेली आहे. या प्रवासात कवितांना साद न घातली गेली तर जंगलाचे थोरपण ते काय? तर अशा कविताही आपल्या भेटीला येतात. मुखपृष्ठाला डायरीचा साज चढवलेला आहे, तर मलपृष्ठावर आहेत ऐटीत उभे असलेले वाघोबा. त्यामुळे पुस्तक हातात घेताच त्याच्या कुळाची कल्पना येते.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# मराठवाड्यातील मंदिर-शिल्पे



डॉ. माया पाटील (शहापूरकर)

केवळ लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर अखिल महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये सगळ्यात आधीची ठरतील अशी मंदिरे तेर (गोरोबाकाकांचे) येथे आहेत. त्रिविक्रम, कालेश्वर आणि उत्तरेश्वर या नावांची, विटात बांधलेली ही मंदिरे होत.




**म**राठवाड्याकडे गेल्या काही दशकांत संशोधकांचे, अभ्यासकांचे आणि जिज्ञासूंचे लक्ष प्रकर्षाने जाते आहे असे दिसते. पूर्वी महाराष्ट्राचा हा भाग निजामाच्या संस्थानात होता, त्यामुळे तो अस्वस्थ होता. आपली भाषिक भावंडे विदर्भात व उर्वरीत महाराष्ट्रात थोड्याफार प्रमाणात मोकळेपणाने श्वास घेत होती हे तो पाहत होता. स्वातंत्र्याची आस त्यालाही होती. निजामाच्या गळचेप्या जोखडाखालून सुटका करून घेण्यासाठी मराठवाड्याने पुढाकार घेतला, प्रखर संघर्ष केला आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी त्याच्या मनासारखे झाले. संयुक्त महाराष्ट्रात त्याचा समावेश झाला.

प्रारंभी औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड आणि उस्मानाबाद या पाच जिल्ह्यांचा समावेश मराठवाड्यात होत असे. त्यातून आता जालना, हिंगोली आणि लातूर या जिल्ह्यांची निर्मिती झाली. ती राजकीय व प्रशासकीय दृष्टीने झालेली असली तरी सांस्कृतिक दृष्टीने तो होता तसाच आहे.

तो होता कसा हे मात्र साऱ्यांच्या विस्मरणात गेले होते. मराठवाड्यातील संशोधकांनी नंतर असे दाखवून दिले की प्राचीन काळी महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या उगमस्थानी तो होता; म्हणजेच सांस्कृतिकदृष्ट्या प्राचीन महाराष्ट्र बृहन्मराठवाडा होय. मग या संस्कृतीच्या अनेक पैलूंचा विचार करण्यासाठी पुढे सरसावली संशोधक मंडळी. कोणी प्राचीन साहित्याचा मागोवा घेऊ लागले, कोणी प्राचीन मंदिरे, मूर्तींच्या तर कोणी प्राचीन इतिहास या संबंधीच्या अभ्यासाकडे वळले. संशोधकांच्या या नामावलीत आता डॉ. माया पाटील यांच्या नावाचा समावेश करावा लागेल.

मानवाची मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृतीचे आध्यात्मिक अंग आणि भौतिक सृष्टी वा वास्तूरूप सृष्टी म्हणजे आधिभौतिक अंग. पहिल्यात धर्म, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजनीती, साहित्य आणि कला यांचा समावेश होतो तर दुसऱ्यात ऐहिक स्वास्थासाठी निर्माण केलेल्या वस्तूंचा समावेश होतो. समाजपुरुषाचा देह आणि त्याचा आत्मा याचे यथार्थ ज्ञान व्हावयाचे तर त्याची आधिभौतिक आणि आध्यात्मिक संरचना कशी आहे, जडणघडण कशी आहे याचे ज्ञान असावयास हवे. आत्म्याशिवाय देह जसा सचेतन असू शकत नाही तसेच आध्यात्मिक अंगाशिवाय केवळ आधिभौतिक समृद्धीमुळे संस्कृती संपन्न ठरत नाही. संस्कृतीचा सर्वार्थाने विचार करावयाचा असेल तर या दोन्ही घटकांचा/अंगांचा विचार आवश्यक ठरतो.

प्राचीन भारतीय स्थापत्याचा, शिल्पांचा आणि चित्रांचा उपयोग आधिभौतिक संस्कृती समजण्यासाठी होत असला तरी त्यामुळे संस्कृतीची सांगोपांग तसेच अंतर्बाह्य माहिती होत नसते. कारण त्यातून आध्यात्मिक बाजू प्रकट होतेच असे नाही. मात्र मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे याला अपवाद ठरतात. सामान्य स्थापत्य वा शिल्पे यांच्या तुलनेत मंदिर आणि मूर्ती या दोहोंचे विशेष स्थान आहे.

डॉ. माया पाटील यांच्या प्रस्तुत ग्रंथातून मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या आधारे हेच सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील विविध ३५ मंदिरांचा आणि मूर्तिशिल्पांचा सांगोपांग विचार केलेला आहे, विश्लेषण केलेले आहे. त्या म्हणतात की केवळ दगड-विटांतील रचना असा ढोबळ विचार मंदिरांच्या संबंधात करून चालणार नाही. धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म यांचे दर्शन सर्वांगपरिपूर्ण अशा मंदिराद्वारे व्हायचे असते. मूर्तीचा विचारही अशाच पद्धतीने करावा लागतो. भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्म यांचे साकार रूप म्हणजे मूर्ती. आरंभीच्या सामान्य प्रकारच्या मूर्तींची पुढे परिणती झाली ती तत्त्वज्ञान साकारणाऱ्या मूर्तींत.

मराठवाड्यातील मंदिरांचा आढावा घेताना त्यांना असे आढळले की केवळ लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर अखिल महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये सगळ्यात आधीची ठरतील अशी मंदिरे तेर (गोरोबाकाकांचे) येथे आहेत. त्रिविक्रम, कालेश्वर आणि उत्तरेश्वर या नावांची, विटात बांधलेली ही मंदिरे होत. नंतरची मंदिरे म्हणजे उत्तरचालुक्य काळातील म्हणजे

इसवीसनाच्या ११-१२ व्या शतकातील. नंतरचे शिलाहार हे स्वत:ला तगरपुरवराधीश्वर (म्हणजे तेरचे) म्हणवून घेत होते तरी त्यांच्या कारकिर्दीतील मंदिरे मराठवाड्यात म्हणजे पर्यायाने लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यातही नाहीत. बहुसंख्येने येथे आहेत ती यादवकालीन मंदिरे. या संबंधीचे वर्णन त्यांनी फार चपखल व मोजक्या शब्दांत केले आहे ते असे- 'यादवकालीन बऱ्याच मंदिरांची गणना नगरशैलीतील मंदिरे म्हणूनच करावी लागेल. पारिभाषिक शब्दात यालाच भूमिज मंदिरे म्हणायचे आणि लोकभाषेत म्हणायचे हेमाडपंती मंदिरे.' यापैकी काहीचे देखणेपण अजूनही प्रत्ययास येते, तर काहीची गलितगात्र स्थिती पडझडीमुळे कणव उत्पन्न करते. ही देवळे मुख्यत: निरंधार पद्धतीची आहेत. म्हणजेच गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणापथ नसलेली (कोल्हापूर महालक्ष्मीच्या गाभाऱ्याभोवती आहे तसा). शिवाय जिल्ह्यातील एकही मंदिर सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिर जसे पंचायतन पद्धतीचे आहे, तसे नाही. लेखिकेने लेखनक्षेत्रातील मंदिरांचा स्थापत्यदृष्ट्या 'नखशिखान्त' आढावा घेतला आहे. म्हणजेच मंदिरांचे अधिष्ठान, त्याचे भट, पद्म, उपान, कणी, कुमुद इत्यादी भाग, त्यावर असल्यास कीर्तिमुखथर, गजथर याचे उल्लेख, मंदिराची बाह्य भिंत म्हणजे मण्डोवर, त्यावरील शिल्पावलीचा जंघाभाग, देवकोष्ठ आणि शिखर (जागजीच्या मंदिराच्या विटांच्या शिखरासह) इत्यादींचा यथोचित विचार जसा केला तसाच तो मुखमंडप, मंडप, अंतराळ आणि गाभारा यांचाही केला आहे. त्यातील स्तंभांचेही वर्णन केले आहे. मंडप नवरंग प्रकारचे असून मध्यभागी रंगशिला असल्याचा आवर्जून उल्लेख केला आहे. मंडपाचे वितान (सिलिंग) समतल की क्षिप्तोक्षिप्त वा करोटक प्रकारचे आहे हे सांगण्यास लेखिका विसरली नाही. याशिवाय आणखी एका मुद्याचा येथे उल्लेख केलाच पाहिजे, की येथील मंदिरांचा विचार करताना त्यांच्या अंगोपांगावरील मूर्तींचा विसर तिला पडलेला नाही.

या काळातील मंदिररचनेत झालेली प्रगती आणि अंतर्गत रचनेतील बदल यावरून समाजाच्या वाढलेल्या गरजांची कल्पना येते. गर्भगृह आणि मंडप यांना जोडणाऱ्या अंतराळाची आता भर पडली. मंडपाला तीन दिशेस तीन द्वारे आली. शैवासाठी शिवलिंगाची एका गाभाऱ्यात स्थापना, तर वैष्णवासाठी विष्णुमूर्तीची आणि ब्रह्मा वा शाक्तासाठी देवीची अन्य गाभाऱ्यात स्थापना करणे सुकर झाले. अशा प्रकारच्या रचनेवरून समाजात वाढीस लागलेली मंदिर-संस्थेची लोकप्रियता लक्षात येते, तसेच शक्तिसंप्रदायाची महती कळते. तसेच मंडपाच्या मधोमध असलेल्या रंगशीलेवरून देवतापूजाविधीमध्ये पडलेली भर लक्षात येते. देवतेला अंगभोग आणि रंगभोग अशा दोन प्रकारचे उपचार असतात. अभिषेक, नैवेद्य, आरती म्हणजे अंगभोग आणि गायन, नर्तन, कीर्तन म्हणजे रंगभोग. या दुसऱ्या प्रकारावरून कळते की महाराष्ट्राला या कलांचे ज्ञान होते आणि यांचा वापर सत्कार्यार्थ केला जात असे. समाजाला या कला अवगत होत्या हे तर साहित्य नि त्या काळच्या इतिहासावरूनही कळते. पण तत्कालीन समाज या कलांचा उपयोग देवतांचे नि पर्यायाने भक्तगणांचे मनोरंजन व प्रबोधन करण्याइतका सुसंस्कृत होता, हे मात्र रंगशिलेद्वारेच कळते. संस्कृतीच्या पोताचा परिचय कलाविष्काराच्या प्रयोजनावरून आणि पद्धतीवरून होत असेल तर या ग्रंथनिविष्ट प्रदेशाच्या संस्कृतीचा पक्का पोत या प्रकारच्या वास्तुरचनेद्वारे परिचित होतो असे मानावे लागेल. मंदिरांच्या केवळ अवयवांचा विचार न करता लेखिकेने त्यांच्या सांस्कृतिक प्रयोजनांचा विचार येथे केल्याचे आढळते आणि समाधान वाटते.

मंदिरांचा आणि मूर्तींचा विश्लेषणात्मक विचार करताना येथीलांच्या समन्वयाच्या धोरणावर लेखिकेने चांगला प्रकाश पाडलेला आहे. संस्कृती ज्या ज्या अंगाने फुलारते, बहरते त्या त्या अंगांना आत्मसात करण्याचे सामंजस्य येथीलांनी अंगीकारलेले होते, हे स्पष्ट होते. त्यासाठी अगदी प्रारंभीच्या तेर येथील देवळापासून कल्याणी चालुक्य नि यादवकालीन वेगळाल्या स्थापत्यशैलीतील मंदिरांचा विचार करून द्राविडशैली, नागरशैली येथे कशी एकत्र नांदत होती याचा मनोरम विचार मांडण्यात लेखिकेने प्रगल्भता दाखवलेली आहे.

**- डॉ. गो.बं. देगूलकर**

**(सौजन्य : मंदिर-शिल्पे, डॉ. माया पाटील (शहापूरकर), ग्रंथाली प्रकाशन)**

शिलाहार हे स्वत:ला तगरपुरवराधीश्वर (म्हणजे तेरचे) म्हणवून घेत होते तरी त्यांच्या कारकिर्दीतील मंदिरे मराठवाड्यात म्हणजे पर्यायाने लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यातही नाहीत. बहुसंख्येने येथे आहेत ती यादवकालीन मंदिरे. यादवकालीन बऱ्याच मंदिरांची गणना नगरशैलीतील मंदिरे म्हणूनच करावी लागेल. पारिभाषिक शब्दात यालाच भूमिज मंदिरे म्हणायचे आणि लोकभाषेत म्हणायचे हेमाडपंती मंदिरे.' यापैकी काहीचे देखणेपण अजूनही प्रत्ययास येते, तर काहीची गलितगात्र स्थिती पडझडीमुळे कणव उत्पन्न करते. ही देवळे मुख्यत: निरंधार पद्धतीची आहेत. म्हणजेच गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणापथ नसलेली (कोल्हापूर महालक्ष्मीच्या गाभाऱ्याभोवती आहे तसा). लेखिकेने लेखनक्षेत्रातील मंदिरांचा स्थापत्यदृष्ट्या 'नखशिखान्त' आढावा घेतला आहे.

# हवेत विरलेली शीळ

ना.घ.देशपांडे नावाची मराठी काव्यपरंपरेत एक स्वतंत्र अशी मुद्रा आहे. या कवीने मर्मज्ञ रसिकांच्या अभिरुचीची संपन्नता वाढवली आहे आणि मराठी भावकवितेच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून एकूण मराठी कवितेच्या संदर्भातही तिने एक लक्षणीय स्थान प्राप्त केले आहे.

विदर्भातल्या जुन्या मेहेकर तालुक्यात, सेंदूरजन या लहानशा गावात आपल्या आजोळ घरी ना.घ. देशपांडे यांचा जन्म झाला. आपल्या जन्मकुंडलीतच कवित्वाची देणगी देणारे ग्रह आहेत अशी त्यांची भावना होती. 'खूणगाठी' ह्या त्यांच्या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत त्यांनी आपली कुंडली देत म्हटले आहे की, 'शुक्र लग्नांशात असल्याने कवित्वाची जन्मजात प्रवृत्ती असावी. तो नवमेशाही असल्याने पित्याकडून ती उत्पन्न झाली असे दिसते.'

कवी काय किंवा कोणीही कलावंत काय, तो आभाळातून पडत नाही. त्याच्या अनुवंशातून, परिसरातून आणि त्याच्या भोवतीच्या वास्तवातून त्याच्या व्यक्तित्वाची मळणी होत असते. ना.घं.च्या श्रद्धा-विश्वासांचे जग काहीही असो, त्यांच्या कवी म्हणून जगण्याच्या आदिबंधाशी काहीशी कल्पना त्यांच्या आत्मपर लेखनातून आणि त्यांच्या काही कवितांमधून आपल्याला येऊ शकते.

**म**राठी कवितेच्या एका शतकाच्या वाटचालीत जवळजवळ साठ-सत्तर वर्षांइतका दीर्घ काळ ना.घ.कविता लिहीत राहिले. पण मराठी कवितांमध्ये येत गेलेले नवनवे प्रवाह, तिच्यात होणारी महत्त्वाची स्थित्यंतरे आणि परिवर्तनानंतर खुल्या झालेल्या नव्या वाटा, नव्या दिशा, नवे कवी यांचा कोणताच विशेष परिणाम ना.घं.च्या कवितेवर नाही. ना मर्ढेकरांचा, ना पु.शि.रेग्यांचा, ना खानोलकरांचा, ना सुर्वे-चित्रे-कोलटकरांचा. ना महानगरी कवितेचा आणि ना दलित कवितेचा. अतिशय एकाग्रपणे ना.घ. स्वत:चीच कविता लिहीत राहिले.

त्यांची कविता एकाग्र होती ती दोन अर्थांनी. एक तर कवीने कवितेखेरीज इतर काहीही लिहू नये असे त्यांना वाटत होते. आयुष्याच्या उतारावर त्यांनी 'फुले आणि काटे' या नावाचे जे थोडे आत्मपर स्मरणरंजन केले ते सोडले तर खरोखरच ते एकाग्रपणे फक्त कविताच करत राहिले. साहित्याच्या इतर रुपांचा मोह त्यांनी कधी बाळगला नाही.

****

खेर्डा, सेंदूरजन आणि मेहेकर ही विदर्भातील तीन गावे ना.घं.च्या कवितेला नेपथ्यासारखी आहेत. खेर्डा हे देशपांडे कुळाचे वतनाचे गाव. सेंदूरजन हे आजोळ. आजोळी चौथीपर्यंतचे शिक्षण झाल्यावर ना.घ.मेहेकरला माध्यमिक शिक्षणासाठी आले. मेहेकर येथे वकिलीचा व्यवसाय सुरु करुन तेथेच ते स्थायिक झाले. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते मेहेकरलाच राहिले. या तीनही गावांच्या भूगोलाचा अमिट असा ठसा ना.घं.च्या कवितेवर उमटला आहे.

सेंदूरजनची प्रचंड ओसाड गढी, गावालगतची पातळगंगा नदी आणि तिच्या पात्राजवळचे पाताळकुंड, शिवाची आणि योगेश्वरीची मंदिरे, आजोळचा प्रचंड वाडा, वाड्यालगत नवीन बगीच्यातली मोट, आजोबांच्या घराजवळच्या मामांच्या वाड्याच्या ओट्यावरुन दिसणारे गढीच्या टोकावरचे वाळके-खुरटलेले झाड, सीतान्हाणी, नदीकाठची आंब्याची झाडे, मधेच दिसणारे हिरवे मैदान, तिथे कधी दिसणारे मोर, कधी हरणे, कधी वाघ, बेलटेकडी आणि तिच्यावरचा मोकळा माळ... हा सगळा निसर्गसमृद्ध परिसर त्यांच्या कवितेत अधूनमधून जिवंतपणे दिसत राहिला आहे.

ही मोट भरे भराभरा
चढे करकरा जी
विहिरीत बघा वाकुनी
जरा धाकुनी जी
पाण्यात लई भोवरे
फेस गरगरे जी ('मोटकरी') किंवा
काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे
आलीस तू एकटी बांधून सारे चुडे ('काळ्या गढीच्या जुन्या...) अशी रात्रीच्या अंधारात गढीजवळ प्रियकराला भेटणारी अभिसारिका, किंवा

हरिणीस सखूचा लळा
कि पडते गळा, जी (सखू)

अशी परस्परांना लळा लागलेली सखूची आणि हरिणीची जोडी किंवा

या झाकळलेल्या सबंध खोऱ्या मधी
कुजबुजते गाणे धुंद एकली नदी
....
या निजल्या मेंढ्या उभ्या उभ्यानं जणू
हळुवार लावणी हळूहळू गुणगुणू (धनगरी गाणे)

असा रात्रीच्या चांदण्यात मेंढरांनी भरलेल्या शेतशिवाराचा परिसर. ना.घं.च्या कवितेत अशी कितीतरी चित्रे उमटली आहेत. चित्रे त्यांच्या स्मरणातल्या गावांची, माणसांची, परिसराची.

****

सेंदूरजन गावाच्या पश्चिमेच्या सटवाई नावाच्या शेतात प्लेगच्या साथीत सगळे राहायला गेले. साथीच्या भीतीने शाळा बंद झाली आणि गढीच्या चिरेबंद एकांतातून मोकळ्यावर रानात राहायला मिळाले. झोपडीबाहेर क्षितीजापर्यंत रंगांची आरास दिसायची. ना.घं.नी लिहिले आहेत. ना.घं.नी लिहिले आहे, 'जमिनीचा काळा रंग, त्यावरील पाणभऱ्या गव्हाचे मनोरम हिरवे चौकोन, करडीच्या फुलांनी नटलेली सोनेरी वनश्री, पलीकडे कापणी झालेल्या ज्वारीच्या खुंटांची समांतर सुंदर रेषांची रांगोळी, मान उंच करुन डोकावून पाहणारे ठिकठिकाणचे वृक्ष, लांब अंतरावर कोणाची तरी वाट पहात कधीची

उभी असलेली सर्वात उंच काटेशेवरी, पिवळसर टेकड्या, सर्वांना कवेत धरणारे दूरचे गोल क्षितीज हे सर्व पाहून मन तृप्त झाले.'

या आणि अशा दृश्यांच्या छाया 'गिरिजेचा संसार'सारख्या दीर्घ कवितेत तरळतात. 'काळीत दिसे हीवरा, गहू हरबरा जी' अशा ओळीओळींमधून हलतात आणि 'ही झुडपे, झाडे, रानवेल साजरे, चांदणे हिवाळी मंद धुंद झांजरे' अशा वर्णनामधूनही दाटलेल्या दिसतात.

ना.घं.च्या मेहेकरच्या घराजवळ कुणी एक गोरी मुलगी राहत होती. तिच्याकडे त्यांची दृष्टी सारखी वळत असे. ती दृष्टिआड झाली तरी मनात तिची रंगीत चित्रे उमटत राहत. एकदा, मामांबरोबर त्यांच्या शेताची पाहणी करायला ते निघाले असताना दोघेही पैनगंगा नदीच्या काठाशी आले. आभाळात सांजेचे ढग होते. बगळ्यांचा एक थवा दिसत होता आणि नदीवर काही बायका कपडे धूत होत्या. बऱ्याच जणी काम आटोपून परत फिरल्या, पण एक प्रौढ तरुण मुलगी मात्र पाठमोरी धुणे धूत राहिली. नदी ओलांडताना ना.घं.ना ती सन्मुख झाली तरी तीच ती होती. शेजारघरातली, मनाला ओढ लावणारी. पुढे कित्येक दिवस तीच ध्यानीमनी दिसत राहिली आणि एक दिवस त्या चित्रदर्शनाची कविता कल्पनेचा हात धरुन आली – 'नदीकिनारी'.

नदीकिनारी, नदीकिनारी, नदीकिनारी गऽ
जरा निळ्या अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगली
ढवळी ढवळी वर बगळ्यांची संथ भरारी गऽ

लग्नाच्या अनुभवातून जाताना वयाच्या तेरा वर्षांपासून अगदी पदवी परीक्षेपर्यंतच्या वर्षांमधले मुली पाहण्याचे प्रसंग ना.घं.नी लिहून ठेवले आहेत. त्यातल्या एका प्रसंगात मुलीला होकार द्यावा की नकार हेही कळेना. त्या अस्वस्थ दोलायमान स्थितीचे, मनातल्या खळबळीचे चित्र त्यांच्या एका कवितेत उमटून आले – 'कोण कुठे आहेस तरी'

पुरे तुझी अव्यक्त तऱ्हा
तुलाच भुलला जीव पुरा
कधी, सांग, येशीला घरा
तुझेच ललिते, अधीरतेने
चित्र चिंतितो परोपरी



– कोण कुठे आहेस तरी!

'यौवनामध्ये कधीचा धुंडतो मी, आवडीचे फूल कोठेही फुलेना' ही 'शोध' नावाची कविताही बहुधा त्याच काळातली असावी.

एका मध्यरात्री जाग आली आणि गॅलरीच्या कठड्याशी येऊन ना.घ. बराच वेळ उभे राहिले. एक प्रकारची तंद्रीच लागली. पत्नी शांता जागी झाली आणि जवळ येऊन उभी राहिली. ती रात्रीची शांतता, निळेकाळे आभाळ, पावसाच्या सरी, अंगणात फुललेला निशिगंध आणि प्रिय पत्नीची जवळीक– 'तुझ्या माझ्यात, गऽ' या कवितेचा जन्म तिथे झाला.

आज आहे सखे
निशिगंधात गंध
श्वसनाचा प्रबंध
तुझ्यामाझ्यात गऽ
आज आल्यात गऽ
पावसाच्या सरी
भावनेच्या भरी
तुझ्यामाझ्यात गऽ

'अजून' नावाच्या आणखी एका कवितामागे त्यांच्या आणि पत्नीच्या अतिगाढ सुखद सहवासाची एक कोवळी आणि मधुर आठवण आहे. 'अपुरी झोप' नावाच्या एका कवितेतही चाफ्याने सुगंधित केलेल्या अशाच रात्रींची ओवणी आहे. ना.घं.च्या अशा अनेक कवितांमधून त्यांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या व्यक्तिगत दृश्यांची, प्रसंगांची कधी स्पष्ट तर कधी अर्धस्फुट चित्रे उमटलेली आहेत. पण लौकिक आयुष्यातल्या अशा संदर्भांचा कवितेशी असलेला धागा उलगडला तरी कवितेचा आशय त्यापलिकडे उरतो. त्याचे धागे गुंतलेले आहेत ते ना.घं.च्या कल्पनेने पाहिलेल्या अनेक भास–आभासांशी, त्यांच्या स्वभावाशी, प्रवृत्तिधर्माशी, त्यांच्या जीवनधारणांशी आणि काव्यदृष्टीशी. त्यांच्या कवितेची पृथगात्मता या साऱ्यामधून सिद्ध झाली आहे.

**– अरुणा ढेरे**

**(सौजन्य : प्रस्तावना, सुगंध उरले, सुगंध उरले– ना.घ.देशपांडे यांच्या निवडक कविता, ग्रंथाली प्रकाशन)**




ना.घं.देशपांडे यांनी काव्यलेखनाचा श्रीगणेशा १९२९च्या सुमारास केला असला तरी १९३२ साली 'रानावनात गेली बाई शीळ' या कवितेची ध्वनिमुद्रिका घरोघरी ऐकू येऊ लागली आणि ना.घ.प्रसिद्धिच्या उजेडात आले. व्यावसायिक गायकाने कवितेला चाल लावून तिची ध्वनिमुद्रिका होण्याचा हा पहिलाच प्रयोग होता. तो यशस्वी झाल्याने तांबे, यशवंत, माधव जूलियन इत्यादींच्या कविताही पुढे ध्वनिमुद्रित झाल्या. खूणगाठी (१९८५) या संग्रहाला तर साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ना.घं.ची १९८५ नंतरची कविता गुंफण (१९९६) या संग्रहात ग्रंथित झाली आहे. त्यांचा कंचनीचा महाल (१९९६) हा चार दीर्घकवितांचा संग्रह तसेच फुले आणि काटे (२०००) हे आत्मचरित्रात्मक लेखनही प्रसिद्ध आहे.



भग्नावस्थेत असलेला कंचनीचा महल

मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकानं ना.घ. यांच्या कवितेसोबतच त्यांच्या कंचनीच्या महालावर प्रेम केलं. ना.घ. देशपांडे यांची कंचनीच्या महालावरची विरुपिका त्या काळात कवीमनाच्या प्रत्येकाला त्याचीही नितांत आणि आर्त गरज वाटली. कंचनी ही एक वीरांगना. मेहेकरच्या त्या माळरानावर एक महाल बांधून त्याच्या वरच्या गवाक्षातून लोणारच्या कमळाईदेवीच्या देवळातला दिवा पाहण्याची तिची कामना होती. तो दिवा पाहिला आणि तिची शिळा झाली, अशी ती दंतकथा. मराठी काव्यप्रांतात कंचनीला ना.घ. देशपांडे यांनी 'शीळ'इतकंच अमर केलं. आता तो महाल तर सोडाच पण बुरुजही राहिलेला नाही. आमच्या असांस्कृतिक कोडगेपणा आणि बेफिकीर वृत्तीनं कंचनीच्या दंतकथेची अक्षरशः माती केली.

**ना.घ.चं मेहेकर**

**मराठी** भावगीत रानावनात पोचवणाऱ्या 'शीळ'कर्त्या ना.घ. देशपांडे यांच्या मेहेकर गावावरून आजवर असंख्य वेळा गेलो. काही प्रसंगी गावातही गेलो. बालाजी मंदिरामागे असलेल्या ना.घ. देशपांडे यांच्या घरीही भक्तिभावानं जाऊन आलो. सुरुवातीच्या काळात एसटी महामंडळाच्या बसनं आणि नंतर कारनं मेहेकर अनेकदा ओलांडलं. साडेतीन-चार दशकांपूर्वी औरंगाबादहून सकाळी सहा पन्नासला निघालेली नागपूर बस दुपारी अडीचच्या सुमारास मेहेकरबाहेर निघत असे तेव्हा 'ना.घ. आता काय करत असतील', असा प्रश्न पडत असे. ना.घ. देशपांडे या कवीनं शीळ घातल्यावर प्रसिद्धीच्या झोतात आलेलं मेहेकर नावाचं हे गाव लहान रस्त्यावर, टुमदार आणि शांत होतं. निवडणुकीच्या वृत्तसंकलनाच्या निमित्तानं फिरत असताना अचानक तातडीची गरज म्हणून ८०च्या दशकात एकदा एका रात्री मेहेकरच्या विश्रामगृहात मुक्काम करावा लागला. तर लक्षात आलं, क्वचित जाणा-येणाऱ्या बसेस आणि ट्रक्सच्या आवाजानं वातावरणावर चरे उमटताहेत आणि या गावाची झोपमोड होतेय, इतकं शांत होतं मेहेकर त्या काळात! आता हे गाव हाय-वेवर आलं आहे. नागरीकरणाच्या वेगाचे वारे या गावावरही वाहू लागले आहेत. त्यामुळे येणाऱ्या सोयींनी म्हणजे अवैध प्रवासी वाहतूक बेशिस्तपणे करणाऱ्या काळ्या-पिवळ्या गाड्या, ट्रक्स आणि वेगवेगळी अजस्त्र वाहनं, कार यांची झालेली गर्दी, मद्याचे बार, 'शीला की जवानी', 'लुंगी' किंचाळणारे आणि अन्य अलयबद्ध गाणे नावाचे आवाज.. असे व्रण या गावावरही जागोजागी आढळू लागले आहेत. अखंड वाढतच असलेल्या आणि २४ तास चालणाऱ्या वाहतुकीनं गावात एकेकाळी नांदणारा शांतपणा पार हरवला आहे. विविध वाहनं, हॉटेल्स, पानटपऱ्या वाढल्या, तिथली गिऱ्हाईकांची गर्दी आणि कलकलाट वाढला आहे. विविध प्रकारची वाहनं, माणसं आणि अन्य अनेक आवाज यांचं मिश्रण होऊन एक अपरिचित बेसूर जसा अन्य गावावर पसरलेला आहे; अगदी तसंच मेहेकर गावाचं झालंय. वाढत्या नागरीकरणानं मेहेकरचा टुमदारपण उद्ध्वस्त केलंय. गावातल्या प्रत्येक वास्तू, हॉटेलातील खाद्यपदार्थ आणि प्रत्येक दुकानातील प्रत्येक वस्तू.. एवढंच नाही तर वर्दळीत वावरणाऱ्या प्रत्येक माणसावर धुळीची पुटं चढली आहेत.

मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकानं ना.घ. यांच्या कवितेसोबतच त्यांच्या कंचनीच्या महालावर प्रेम केलं. ना.घ. देशपांडे यांची कंचनीच्या महालावरची विरुपिका त्या काळात कवीमनाच्या प्रत्येकाला त्याचीही नितांत आणि आर्त गरज वाटली. कंचनी ही एक वीरांगना. मेहेकरच्या त्या माळरानावर एक महाल बांधून त्याच्या वरच्या गवाक्षातून लोणारच्या कमळाईदेवीच्या देवळातला दिवा पाहण्याची तिची कामना होती. तो दिवा पाहिला आणि तिची शिळा झाली, अशी ती दंतकथा. मराठी काव्यप्रांतात कंचनीला ना.घ. देशपांडे यांनी 'शीळ'इतकंच अमर केलं. आता तो महाल तर सोडाच पण बुरुजही राहिलेला नाही. आमच्या असांस्कृतिक कोडगेपणा आणि बेफिकीर वृत्तीनं कंचनीच्या दंतकथेची अक्षरशः माती केली. ना.घ. यांचं स्मारक व्हावं आणि कंचनीच्या महालाचं जतन व्हावं ही कविवर्य ना.धों. महानोरांची मनोमन इच्छा होती. सरकारदरबारी इतकी सेवा बजावूनही महानोर यांना मेहेकरात ना.घ. देशपांडे यांचं ना स्मारक उभारता आलं ना कंचनीचा महाल टिकवून ठेवता आला. विदर्भ साहित्य संघानं त्यांना त्यांच्या गावात जाऊन जीवनव्रती हा सन्मान दिला. मराठी साहित्यप्रांती जितक्या अलिप्तपणे आयुष्यभर ना.घ. वावरले तितक्याच अलिप्तपणे तो सन्मान त्यांनी स्वीकारला. ज्या कंचनीच्या महालाची मोहिनी मराठी मनाला पडली त्या महालाची नीट देखभाल तर झाली नाहीच पण, मध्यंतरी शेजारी भरणाऱ्या यात्रेच्या वेळी त्या कथित महाल (म्हणजे उरलेले अवशेष) आणि शिळेवर काही पोस्टर्स लावली गेली आणि वातावरण बिघडलं.. वाद झाला. पोलीस आले. वगैरे वगैरे. एकदा बोलताना मेहेकरच्या अमर जाधव या युवकानं सांगितलं, अचानक उदासी दाटून आली. मन खूपच विषण्ण झालं.



**– प्रविण बर्दापूरकर**

# ग्रंथपान

## माझं जन्मघर

संपादन : अरुण शेवते




'प्रत्येक घरात आपल्या मनात एक संस्काराचे बीज पडत असते. त्या बीजाचे झाड करणे आपल्या हातात असते. '

'समईत वात जशी भिजते तशी मी संसारात भिजलेच नाही. म्हणजे संसारात होते, पण तरीही माझ्याच भोवऱ्यात गरगरत होते.'

'संगीतात जशी आवर्तनं असतात तसेच पॉजेस देखील असतात. घरातलं फर्निचर ह्या पॉजेससारखं असावं असं मला वाटतं.'

'आमचे घर हे संपूर्ण गावाचे. सारा गाव आमच्या घराशी जोडला गेलेला. घर आणि गाव असे सारे एकच होते. मग का जाळल असावे आमचे घर?'

'कोणाच्याही घरात प्रवेश केल्याबरोबर ते घर आपल्याशी बोलते. घराचा पसारा किंवा होणारे दर्शन ही त्या घराची भाषा असते.'

'उन्हाळा आणि पावसाळा या दोन्ही ऋतूंत प्रत्येक वेळी घराने नवा उत्सव मांडलेला असायचा. पाऊस आला की, घरभर भांडी ठेवावी लागत. गडू, पातेली, बादली ठेवताना जणू बुद्धिबळाचा पटच मांडावा लागे. रात्रभर पावसाने भांडी वाजत. त्यांचा स्वर आणि लय सतत बदलत असे. संगीताच्या व्याकरणात ते बसत नसले तरी त्याला स्वतःची रीत आणि गती होती.'

'कौलारू घरातील स्ट्रगलिंग पीरियडने मला अनेक गोष्टी शिकवल्या. भविष्याची स्वप्ने डोळ्यात पेरली. ती साकारण्याची ताकद दिली. जीवनाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन दिला. एकंदरीत मला घडवण्याच्या प्रक्रियेत 'गावाकडच्या घरानं' महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.'

'उरातल्या स्वप्नांमुळे या घरात गुंतून पडताच आलं नाही. तुला तुझी स्वप्नं पूर्ण करायचीत की या घरात गुंतून पडायचं, असे दोन टोकाचे पर्याय माझ्यासमोर होते. अर्थातच त्यातला पहिला पर्याय मला अधिक जवळचा, आतल्या गरजेचा वाटत होता.'

'आई नाही – वडील नाहीत – नुसता चिरेबंदी वाडा. त्यातले प्राणतत्त्व हरवलेले आहे. हरवल्या नाहीत त्या स्मृती. आणि माझं घर म्हणजे ह्या समृतींचा कल्लोळ. एक उत्सवचना स्मरणांचा!'

'माझं जन्मघर' या लेख संग्रहातील हा उत्सव आहे, स्मरणाचा, मनाचा, भावनेचा, नात्याचा, आपुलकीचा, मनातल्या साजरा करायच्या स्मृतिदीपांचा. आपल्या जन्मघराबाबत ओढ नाही असा माणूस विरळाच. घर म्हणजे केवळ चार भिंती आणि वर एक छप्पर, इतकीच त्याची व्याख्या होऊ शकत नाही. किंवा दगड, विटा, माती, चुना यांनी उभारलेली वास्तू म्हणजे घर, इतकाही मर्यादेचा बांध घालता येणार नाही. तर या वास्तूशी जडलेले ऋणानुबंध, घरातल्या माणसांशी जोडलेली नात्याची आणि जिव्हाळ्याची नाळ, अभ्यासाचा झालेला श्रीगणेशा, आणि कुटुंब नावाच्या संस्थेचा कधीही पुसून न टाकता येणारा संस्कार म्हणजे घर. या घराविषयीच्या स्मृतींना उजाळा देताना अनेक मान्यवरांनी वरीलप्रमाणे आपले मन मोकळे केले.

मुळात शीर्षक हाच या लेखसंग्रहाचा विषय आहे. संपादकांनी त्याची तीन भागांत विभागणी केलेली आहे. माझं जन्मघर, गावाकडचं घर आणि घराघरांचे रूप आगळे, अशी. यात सहभाग दिला तीही मान्यवर मंडळी आहेत. गुलजार, सुशीलकुमार शिंदे, आरती अंकलीकर– टिकेकर, दिनकर रायकर, किशोर कदम, यशवंतराव गडाख, राजन खान, अनंत दीक्षित, हेमंत टकले, वसंत आबाजी डहाके, अरुण जाखडे, किशोर मेढे, रवींद्र शोभणे आणि स्वतः संपादक अरुण शेवते. प्रत्येकाच्या आठवणीतल्या घरा–विषयीच्या भावना आपुलकीच्या, जिव्हाळ्याच्या. घरातील नात्याविषयीची आत्मियता आणि हळवेपण या लेखांमधून उलगडत जाताना अनुभवास येते. वय आणि गरजा, प्रगती आणि संसार यामुळे आपला बंध मूळच्या घरापासून सैल होतो. नवे गाव, नवे घर येथे तो निवारा शोधत राहतो. तिथेच स्थिरावत जातो. तरी मूळचे घर मनातल्या अवकाशातून आपले अढळ स्थान जराही विचलीत होऊ देत नाही. स्मृती सतत त्याच्या परिघात रमत राहते, त्याच्याभोवती भ्रमण करत राहते. त्याचा अनुभव या संग्रहातील लेख देतात. मुळात हे लेख 'ऋतुरंग' या दिवाळी अंकात आपण वाचले असणारच. तरीही पुन्हा वाचताना ते तोच आनंद देतात, जो दिवाळीत मिळाला होता.

संपादकांनी त्यांच्या मनोगतात तरल लेखांची रेखाटने साकारलेल्या बाळ ठाकूरांचा आदराने उल्लेख केला आहे. वयाच्या ८० व्या वर्षीही त्यांनी संपादकांबद्दल दाखवलेला स्नेह हा व्रतस्थ वृतीचा उत्तम नमुना म्हणावा लागेल. त्यांची रेखाचित्रे या संग्रहातील लेखनाला लाभली आहेत. मुखपृष्ठही साजेसे झाले आहे. स्मृतीच्या उबदार दुलईच्या काठावर विसावलेला मनाचा पक्षी शीर्षकाशी नाते सांगताना दिसतो.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

# चिरेबंदी नाटककार



**महेश एलकुंचवार**

त्रिधारा या नाट्यप्रकाराने मराठी नाटकाला जागतिक पातळीवर एक वेगळा आयाम मिळवून देणारे एक प्रयोगशील नाटककार म्हणून महेश एलकुंचवार सुपरिचित आहेत. त्यांच्या 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' आणि 'युगान्त' यांचा मिळून केलेला एक सलग आठ तासांचा नाट्यप्रयोग 'त्रिनाट्य'धारेचा वैशिष्ट्यपूर्ण आणि अपूर्व असा प्रयोग मानला जातो. युगान्तला २००२ चा साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. सरस्वती सन्मान (२००३) तसेच पुलोत्सव सन्मान (२००८) देऊन त्यांना गौरवण्यात आले. 'मौनराग' या त्यांच्या ललित लेखसंग्रहाने मराठी ललित लेखनाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली आणि प्रतिभावंत साहित्यिक म्हणून एलकुंचवार यांना मान्यता मिळाली.

**म**हेश एलकुंचवार यांचा जन्म (९ ऑक्टो.१९३९) वऱ्हाडातील. 'पारवा' या गावी, वाडा संस्कृतीत जमीनदार वाड्यात झाला.त्यांचे वडील जमीनदार होते. अतिशय लहानपणीच वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षीच त्यांना शिक्षणासाठी 'पारवा' सोडून दुसरीकडे नेण्यात आले. त्यांच्या इच्छा-अनिच्छांचा विचार न करता 'पारवा' या गावातून, दुसऱ्या गावात, नातेवाईकांच्या घरी त्यांना रुजवण्याचा जाणूनबुजून प्रयत्न झाला. त्यानंतर 'घर' नावाच्या इमारतीत त्यांनी अनेक ठिकाणी वास्तव्य केले. पण त्यांचे मन कुठे रमले नाही, की गुंतले नाही पण घर म्हटले, की एलकुंचवारांना 'पारवा' येथील घर हेच सदैव आपले घर वाटले. मुळातच कुशाग्र बुद्धिमत्ता असल्यामुळे इतर भावंडात फक्त त्यांनाच वडिलांकडून संस्कृत-गीता पठनाचा आग्रह होई. घरातील इंग्रजी-संस्कृत ग्रंथ, निरनिराळे मराठी ग्रंथ व मासिके (या मासिकातून प्रसिद्ध होणाऱ्या पु.भा.भावे, वि.वा.शिरवाडकर यांच्या कथा-कविता) यातून त्यांची अभिरुची विकसित झालेली दिसते. 'पारवा' या गावातून दुसऱ्या गावात, नातेवाईकांच्या घरी त्यांना जबरदस्तीने रुजवण्याचा प्रयत्न झाल्यामुळे 'पारव्या'चेच घर, नैसर्गिक बालपण, आई-वडिल, भावंडे यांपासून (चहूबाजूंनी) वाट्याला आलेला तुटलेपणा, त्या निरागस-आकारक्षम वयात नको ते पाहिलेले वा ऐकलेले प्रसंग, या आणि या सारख्या घटकांनी त्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या व्यक्तिमत्त्वाचा कंद व कोपरा ग्रासलेला दिसतो. एलकुंचवारांनी एके ठिकाणी म्हटलंय, की 'माझं बालपण माझ्या आईवडिलांपासून दूर गेलं. वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षीच मी त्यांच्यापासून दूर गेलो. तेव्हापासून घराबाहेर दूरच होतो सतत. अशा घरापासून तुटलेल्या माणसाला नैसर्गिक बालपण मिळणं फार कठीण आहे. त्यामुळे घर, आईवडिलांचे प्रेम-वात्सल्य या उबदार सुरक्षिततेपासून एलकुंचवार केवळ शरीरानेच नव्हे तर मनानेही तुटतच गेले. त्या विशिष्ट वयात मनाची मोडतोड झाल्यामुळे एलकुंचवारांचे संपूर्ण आयुष्यच आणि पर्यायाने त्यांचे संपूर्ण लेखन, त्या बालपणातील घटनांनी-अनुभवांनी ग्रासलेले दिसते. 'एलकुंचवारी' नाट्यसृष्टीकडे बारकाईने, काळजीपूर्वक पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही, की 'वाडा चिरेबंदी'पर्यंतचे एलकुंचवारांचे साहित्य हे त्यांच्या बालपणातील अनुभवांनी नियंत्रित केलेले आहे. सर्व स्तरांवरचे रिजेक्शन, अतीव दु:खाच्या क्षणी स्वत:ची स्वत:ला लावून घेतलेली सोबत, होस्टेल मधील पर्यावरण, 'पेईंगगेस्ट', नेणिवेत दडलेली मृत्यूची आसक्ती यांचे अस्तित्त्व त्यांच्या नाट्यसृष्टीत प्रत्यक्ष आढळते. एकूणच विलक्षण एकलेपण, चहुबाजूंनी येणारे तुटलेपण, बालपणातील मनावर आघात करणारे बरे-वाईट प्रसंग व बिनसलेले बालपण, सत्त्वाचा शोध, भूतकाळाचे जोखड, अंधारमय भविष्यकाळ, वाड्याचे-यातनामय घरांचे चित्रण, कोंडलेपण, जखडलेपण, यातनामय जगण्याची शिक्षा, पौगंडावस्थेतील पात्रांचे अधिक्य आणि जैविक, मानसिक व अध्यात्मिक पातळ्यांवरील गमावलेल्या सर्जनाच्या शक्यता व त्यातून वाट्याला येणारी रिक्तता, आत्मनाशाची ओढ या आणि या सारख्या गोष्टींचे अस्तित्व एलकुंचवार यांच्या नाट्यसृष्टीत वारंवार दिसते. त्याची पुसटशी उत्तरे इथे मिळावीत. बालपणात मनाची झालेली मोडतोड व आलेल्या अनुभवांतून उद्भवलेली (दबलेली) बंडखोरी यांनी ग्रासलेली एलकुंचवारांच्या पौगंडावस्थेतील आकारक्षम मानला, स्वत:शी संवाद साधण्याची तसेच प्रचंड वाचन व इंग्रजी चित्रपट दर्शन यात सुरक्षितता शोधण्याची किंवा त्यातच आपले व्यक्तिमत्त्व विसर्जित करण्याची सवय जडली असावी. याचमुळे चिंतनशीलता व अंतर्विश्वात गुरफटून राहण्याची वृत्ती एलकुंचवार यांच्या व्यक्तिमत्त्वात विकसित झाली असावी. अर्थात या दोन्ही गोष्टी नकारात्मक विचारांचे जास्त पोषण करीत असल्यामुळे या नकाराचेच प्राबल्य त्यांच्या सुरुवातीच्या एकांकिकांमधून-नाटकांतून आढळते. कॉलेज जीवनातील, होस्टेलमधील

वास्तव्यात, तेथील पर्यावरणाबरोबरच जवळ जवळ पाचशे-सहाशे इंग्रजी चित्रपट (१९५७ ते १९६३ या काळात) आणि अभिजात इंग्रजी साहित्य याचा त्यांनी अनुभव घेतला. याचमुळे दृश्यमाध्यमाची आवड, लेखन-वाचनाची आवड, अभिनयाची आवड व स्वत:ला जीवनात पडलेले प्रश्न - या सर्व घटकांचा संघात, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात रुजला असताना एके क्षणी (१९६५) सहजपणे पाहिलेल्या 'नाटक' या घटनेचा परिणाम होऊन एलकुंचवार 'नाटक' या माध्यमाकडे वळले. या संपूर्ण घटनेचेच वर्णन एलकुंचवारांनी एके ठिकाणी केले आहे. ते असे- ''१९६५ च्या सुमारची गोष्ट आहे. मी आणि माझा मित्र चित्रपट बघायला म्हणून गेलो. तिकिटं मिळाली नाहीत म्हणून परतलो. परत येताना धनवटे रंगमंदिरापाशी आल्यावर मित्र म्हणाला, 'नवीन नाटक आलंय. बघू या?' मी अगदी ठाम नकार दिला. मला स्पष्ट आठवतंय. कारण ह्या आधी मी जी काय दोन-तीन मराठी नाटकं पाहिली होती त्यामुळे मराठी नाटक ह्या प्रकाराचा धसकाच मी घेतला होता. पण मित्र अगदी भरीलाच पडला. 'चल रे, मुंबईचा ग्रुप आहे. डॉक्टर लागू, विजया खोटे, वगैरे मंडळी आहेत.' मी ढिम्म. कोण ही माणसं? मी ऐकली नव्हती त्यांची नावं. 'अरे चल, तेंडुलकरांचं नाटक आहे.' मी एकदम कान टवकारले. 'कोण तेंडुलकर? विजय? मित्रानं होकारार्थी मान हलवली. तेंडुलकरांचं काही मी वाचलं नव्हतं तेव्हा. पण त्यांचं नाव पहिल्यापासून वादग्रस्त- ऐकून होतो. माझी उत्सुकता जागी झाली. आम्ही तिकिटं काढून आत शिरलो. नाटक होतं 'मी जिंकलो... मी हरलो'. पुढचे अडीच-तीन तास कसे गेले हे मला आजही सांगता येणार नाही. मी अक्षरश: भारला गेलो होतो. ज्याला 'इलेक्ट्रिफाईंग एक्स्पेरियन्स' म्हणतात असा तो अनुभव होता.

**- डॉ. कमलेश**

**(सौजन्य : नाटककार महेश एलकुंचवार, संदर्भ प्रकाशन)**









# साठोत्तरी कोकीळ



वसंत आबाजी डहाके

काव्यलेखनापासून आपल्या वाङ्मयीन कारकीर्दीला सुरुवात करणारे वसंत आबाजी डहाके यांची पहिली कविता १९६० साली प्रसिद्ध झाली. मात्र डहाके यांच्या काव्यलेखनाकडे लक्ष वेधले गेले ते 'योगभ्रष्ट' या सत्यकथेत १९६६ साली प्रसिद्ध झालेल्या दीर्घकवितेमुळे. याच नावाचा त्यांचा कवितासंग्रह १९७२ साली प्रकाशित झाला. पुढे 'शुभवर्तमान', 'शुन:शेप' हे कविता संग्रह आणि 'अधोलोक', 'प्रतिबद्ध' आणि 'मर्त्य' या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. १९६० नंतरच्या काळात समाजाच्या सर्वच क्षेत्रांत, विशेषत: राजकारणात निर्माण झालेले मरगळीचे वातावरण, चळवळींचा झालेला ऱ्हास, सर्वदूर पसरलेले औदासीन्य या गोष्टींना डहाक्यांच्या कादंबरीत मूर्त स्वरुप मिळाल्याचे दिसते.

**चं**द्रपूरचा, चंद्रपूरच्या घराचा माझ्या घडणीत बराच वाटा आहे. कळत्या वयात तेथे आलो. रोजचे वर्तमानपत्र, वाचायला भरपूर पुस्तके या नित्याच्या गोष्टी झाल्या. शाळेतून परतल्यावर तितक्याच अंतरावर असलेल्या जिल्हा ग्रंथालयात जाण्याचा उत्साह असे.

चंद्रपूरचे हे आमचे घर जुनेच होते. त्या घरात संत निकालस महाराज यांचे वास्तव्य होते असे म्हटले जात असे. या घराची रचनाही विशिष्ट अशी होती. अगदी दर्शनी खोलीला एक भिंत नव्हती. ही घरातली मोठी खोली. डाव्या बाजूला छोटी खोली. उजव्या बाजूला माडीवर जाण्याचा जिना. छोट्या खोलीच्या पुढे स्वयंपाकघर. त्यानंतर स्नानघर. मध्ये मोठे अंगण. पलीकडे आणखीएक घर. ते घर वडलांनी भाड्याने दिले. माडीवर दोन खोल्या होत्या. त्यामुळे आम्ही सगळे पहिल्या घरात सामावलो. दुपारच्या वेळी समोरच्या खोलीत वडील आणि तिला लागून असलेल्या छोट्या खोलीत आई. रात्री सगळेच समोरच्या मोठ्या खोलीत खाटा टाकून झोपायचो. बाबू पर माडीवर असायचा. समोरच्या या खोलीत एक पाळणाही होता. बेलोऱ्याच्या घरातही होता. आमचा काका गाणी म्हणत त्या पाळण्यावर आम्हांला झोपवत असे. चंद्रपूरच्या घरातल्या पाळण्यावर झोपण्याइतके लहान राहिलो नव्हतो. पाळणा हा आयुष्यातला महत्त्वाचा भाग असल्याप्रमाणे आजच्या अमरावतीच्या घरातही तो आहे. निवृत्तीनंतर परत गेल्यावर तेथे बसून बरेचदा संगीत ऐकले आहे. आमचा नातू बिल्व त्यावर झोपला आहे. मुंबईच्या सरकारी घरात खूप वर्षे राहिलो. तेथे पाळणा नव्हता. मुले लहान होती तरीही नव्हता. पाळणा हे गर्भाशयाचेच एक रुप आहे की काय असे वाटते. पाळण्यावर पडून बाबूराव अर्नाळकरांची रहस्यकथा वाचणे हा एक आनंददायक अनुभव होता. बेलोऱ्याच्या घरात जसे खिन्न, एकाकी, उदास वाटायचे तसे या घरात वाटत नव्हते. ते खेड्यात जाणवणारे एकाकीपण असावे. बरेच दिवस एखाद्या ठिकाणी राहिल्यानंतर ते सोडून आल्यावर वाटणारी हुरहुर मात्र वाटायची. शिवाय काका आणि ताईआत्या हे लोक चंद्रपूरच्या घरात नव्हते. आपल्या जवळची सगळी माणसे आपल्या जवळच आसपास असावीत असे लहानपणी वाटते. ती नसली की किंवा त्यातले कोणी नसले तरी हुरहुर दाटून येते. आपले काहीतरी तिकडे राहून गेले आहे असे वाटत राहते.

बेलोऱ्यात होतो तेव्हा काही दिवस बाबू होता, पुनवटच्या शाळेत जायचा. मग तो चंद्रपूरला गेला. आम्ही चंद्रपूरला गेल्यानंतर काही काळातच तो नागपूरला शिकायला गेला. त्यानंतर तो नोकरीक रायला राऊरकेला (झारखंड), कोलकाता (बंगाल), आमलाई (मध्यप्रदेश) येथे गेला. या सगळ्या काळात घरापासून तो दूरच होता. आमची शिक्षणे झाली, नोकऱ्या करु लागलो. तो निवृत्त झाल्यावर अकोला येथे आला. आम्हीही निवृत्त होऊन अमरावतीला गेलो. पण त्यानंतर तो फार काळ राहिला नाही. आईवडलांचा, भावंडांचा सहवास त्याला कित्येक वर्षे लाभला नाही. बेलोऱ्याचे घर सुटून– बरीच वर्षे झाली, चंद्रपूरच्या घरातही फार काळ राहिला नाही. महाराष्ट्राबाहेर बरीच वर्षे काढून तो परतला तर कॅन्सरच्या विळख्यात सापडला. त्यावेळी आम्ही मुंबईला असणे आणि या विनाशक व्याधीमुळे त्याला येथे यावे लागणे आणि सहवास लाभणे हाही एक अनुबंधाचाच भाग होता. कुणाचा किती काळ सहवास लाभावा याचे काही शास्त्र नाही, याचा काही नियम नाही.

घर म्हणजे घरातली माणसे, आपल्या मनात घर करुन राहणारी माणसे. त्यांच्याच आठवणी असतात. आमच्या बेलोऱ्याच्या घरात पूर्वजांचा दृश्यरुपात अथवा स्मृतिरुपात वावर नव्हता. आमचे आजोबा कुठे रहायचे, काय करायचे, वडलांचे मोठे बंधू अकाली वारले ते कसे, याविषयी काहीही, कधीही कळले नाही. वडलांनी भूतकाळ बहुधा कापूनच काढला असावा. आमचे, मी न पाहिलेले मोठे काका वारल्यानंतर काही वर्षांनी माझा जन्म झाला. मला पाहिल्यावर गावातल्या लोकांना त्यांची

आठवण यायची. कोणी काही असे म्हटल्यावरम ला चमत्कारिक वाटायचे. ज्यांना मी पाहिलेलेच नाही, फोटो नाही, त्यांच्याशी माझे काय आणि कसे साम्य आहे हे मला कळत नव्हते.

वंशबंध म्हणून काहीतरी असेलच.

घर म्हटले की संयोग. सर्वप्रकारच्या वियोगाचा अंत. पण घरातच किंवा त्यातल्या माणसांतच असे काही असते, की वियोग ही एक अपरिहार्य अवस्था तयार होते. घराचा वियोग होतो, घरातल्या माणसांचा वियोग होतो. एकत्र येणे, यावेसे वाटणे जेवढे खरे आहे, तेवढ्याच ताटातुटीही खऱ्या आहेत. माझे तर असे मत आहे की, मनुष्य एकाकीच आहे आणि तो सर्व प्रकारच्या ताटातुटी, अनेक स्तरांवर अनुभवत असतो. काही नैसर्गिक असतात. काही आपापल्या स्वभावानुसार असतात.

चंद्रपूरचे आमचे घर सर्वांनाच आवडलेले हाते. परंतु या घरात असतानाच वडलांची अवस्था, काही काळ, सैरभैर झाली होती. त्यामुळे की कशामुळे, माहीत नाही, आईला हे घर सोडावे आणि गावाबाहेर नवे घर घ्यावे असे वाटू लागले. नवे घर झाले. ते तिच्या स्वप्नातल्यासारखे झाले नाही. मला तर ते अनपेक्षित होते. मी नागपूरला शिकायला होतो आणि इकडे असे काही चाललेले आहे याची कल्पना नव्हती. कळले तेव्हा उशीरच झालेला होता. कोतवाली वॉर्डातले, मधूनच उदबत्तीचा गंध देणारे, ते जुने घर मला अजूनही आठवते. त्या घराच्या समोरच्या उघड्या मैदानात खाटा टाकून झोपलेलो असताना पलीकडच्या इमारतीमधून येणारे बिनाका गीतमालातले स्वर अजूनही आठवतात. शेजारच्या बुरुडांच्या गल्लीतल्या कुणाचे तरी सैगल, पंकल मलिक यांच्या गाण्यांचे स्वर आठवतात. त्या घरातले, श्रावणमासातले वडलांचे पुराणवाचन आठवते. तेथेच मला वेगवेगळ्या जाणिवा होऊ लागल्या आणि कविता सुचायला लागल्या, हे आठवते. याच घरात 'सत्यकथे'त माझी पहिली कविता आली, ते आठवते.

घरे सुटत जातात. घरांपासून आपण वेगळे होतो. चंद्रपूरचे आमचे नवे घर रेल्वे रुळांजवळ होते. पलीकडे ख्रिस्तधर्मीयांचे स्मशान होते. रात्रीच्या वेळी तेथे मेणबत्त्या पेटलेल्या असायच्या. माझ्या एम.ए.नंतरच्या बेकारीच्या दिवसांत मनोहर सप्रे आणि वि.वा.जोशी यांच्यासोबत फिरायला जायचो. त्या स्मशानात बसायचो. गावाबाहेर काही घरे होत गेली त्यातले आमचे एक होते. नंतर गावाबाहेरची वाढत गेली.

चंद्रपूर हे एक ऐतिहासिक शहर आहे. गोंड राजांचे ते राजधानीचे शहर होते. एका राजाने शहराभोवती परकोट बांधला. त्याला चार दरवाजे आणि चार खिडक्या होत्या. अचलेश्वर दरवाजाबाहेर अचलेश्वराचे मंदिर, गोंड राजांच्या समाध्या, पलीकडे महाकालीचे मंदिर आणि त्या पलीकडे गोंड राजांच्या कारकिर्दीत तयार झालेल्या, नंतर तशाच टाकून दिलेल्या अवाढव्य दगडी मूर्ती.

गावातल्या मुख्य चौकाच्या जवळच आमचे जुने घर होते. त्या चौकात त्यावेळी राजकीय सभा होत. यशवंतराव चव्हाण, आचार्य अत्रे यांची भाषणे तेथे ऐकली होती. संत तुकडोजी महाराज यांचे खंजिरी भजनही एकदा ऐकले होते. जयप्रकाश नारायण, आचार्य विनोबा भावे यांची भाषणे आमच्या शाळेत झाली होती. या जुन्या घरापासून आमचे महाविद्यालय गावाबाहेर बरेच दूर होते. दोन वर्षे चालत जायचो. तिसऱ्या वर्षी वडलांनी सायकल घेऊन दिली. नवे घर या महाविद्यालयाला जवळ होते. पण तोपर्यंत माझे बी.ए.पर्यंतचे शिक्षण आटोपले होते आणि मी एम.ए.करुन आलो होतो.



**– वसंत आबाजी डहाके**

**(सौजन्य : माझं जन्मघर, ग्रंथाली प्रकाशन)**




वसंत अबाजी डहाके यांच्या कवितेतील 'मी' भोवतीच्या समाजव्यवस्थेने मानवी जगण्याला ज्या पातळीवर आणून सोडले आहे त्याबद्दल अस्वस्थ आहे. डहाक्यांची कविता एकाचवेळी आत्माविष्कार आणि युगबोध व्यक्त करते. त्यांच्या कवितेतून व्यापक पातळीवर व्यक्त झालेले सामाजिक भान 'प्रतिबद्ध' आणि 'अधोलोक' या कादंबऱ्यांतूनही प्रकटते. आपल्या साहित्यकृतींतून समकालीन पिढीची जीवनजाणीव आणि मूल्यभाव मांडणाऱ्या डहाक्यांनी भरपूर समीक्षालेखनही केले आहे.

मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या डहाक्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार व सन्मान मिळाले आहेत. त्यांच्या 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहाला २००१ सालच्या साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवण्यात आले.

# अनाथांचा नाथ



विलास मनोहर

**डॉ.** प्रकाश आमटे यांच्याबरोबर काम करण्यासाठी हेमलकसा येथे मी १९७५ साली प्रथम आलो. हेमलकसा हे आदिवासी गाव भामरागड या चंद्रपूर जिल्ह्याच्या घनदाट जंगलातील एका तालुक्यात होते. आज हा भाग गडचिरोली जिल्ह्यात येतो. त्यावेळी माझा वन्यप्राण्यांशी संबंध फक्त त्यांच्या केलेल्या शिकारीपुरता होता. मी हेमलकसा येथे आलो तेव्हा प्रकाशजवळ चौशिंगा जातीचे एक हरीण, एक माकड, एक देवखार, चिक्कू नावाचा लॅब्रोडर जातीची कुत्री, कालू नावाचा एक गावठी कुत्रा एवढे प्राणी होते. प्रकल्प सुरु होऊन एक वर्ष झाले होते. प्राण्यांची जिवंत पिल्ले आदिवासी आणून देऊ लागले होते. सर्व प्राणी मोकळे होते. हरीण नेहमी प्रकाशची पत्नी मंदावहिनीच्या मागे मागे फिरत असे. पहिले चार-पाच दिवस मी नुसता पहात होतो. पूर्वी पुण्याला असताना केलेल्या निर्दय शिकारींची आठवण येत होती व चीडही येत होती. त्यात आश्चर्य ह्या लॅब्रोडर जातीच्या कुत्रीबद्दल वाटत होते. ह्या जातीची कुत्री शिकारी लोक मुद्दाम पाळतात. पुण्याला आमचा रेंजर नावाचा ह्याच जातीचा कुत्रा होता. त्याला घेऊन आम्ही शिकारीला जात असू. बंदुकीच्या गोळीचा आवाज झाला की रेंजर उडी मारुन पळत जाऊन प्राणी मेलेला पाहून किंवा तो जखमी झाला असेल तर त्याला पूर्ण मारुन परत जीपमध्ये येत असे. आणि येथे तर चिक्कू कुत्री, त्याची जातिवंत बहीण असून हरणाला मारण्याऐवजी चक्क त्याच्याशी खेळत होती येथे आलो तेव्हा माझे विचार शहरी होते. वाटत असे की, आमचा रेंजर कुत्रा रंगाने गोरा होता, व ही चिक्कू कुत्री काळी आहे. म्हणून असे असेल कदाचित. पण मग जसजसे दिवस जाऊ लागले तेव्हा समजले की हा फरक रंगाचा नाही, तर येथील वातावरणाचा आहे. वन्यप्राण्यांचे वागणे आजुबाजूच्या वातावरणाने व व्यक्तीच्या सहवासाने बदलू शकते. प्रकाश-मंदावहिनी यांच्या सहवासात वन्यप्राणीसुद्धा इतरांवर प्रेम करण्यास शिकले होते.

गेल्या काही वर्षांत निसर्गप्रेमी लोकांचे प्रमाण वाढले आहे. त्यातील साठ टक्के लोक पूर्वी सर्रास शिकार करत होते. ह्यात अभ्यासू व खरे निसर्गप्रेमी फार थोडे आहेत. इतर निसर्गप्रेमी लोकांची, प्राणी पिंजऱ्यात ठेवण्यावर नाराजी आहे. जंगली प्राणी जंगलात चांगले हे का आम्हाला पटत नाही? पण आज त्यांनी जंगलात राहण्यासारखी परिस्थिती आहे का? जंगलावर सर्व बाजूंनही आक्रमण चालू आहे. माणूस जंगलात खोलवर जाऊन बेकायदेशीर जंगलतोडीने व शिकारीने त्यांचे जीवन विस्कळीत करत आहे. पूर्वी जेथे जंगल होते. त्यावर वसलेल्या नवीन गावांतील गुरे-ढोरे व माणसांवर जनावरे अपघाताने हल्ला करत आहेत. आमच्याइकडील घनदाट जंगलात प्राण्यांची संख्या एवढी रोडावत चालली आहे की, प्राणी पाहण्यासाठी लोकांना आमच्या प्रकल्पावर यावे लागते. आता काही प्राणी भारतीय चित्त्याप्रमाणे नष्ट होतील. त्याचवेळी काही प्राणी पिंजऱ्यात ठेवले व वाढवले तर ते जिवंत स्थितीत पुढच्या पिढीला पहावयास तरी मिळतील. नाहीतर एकविसाव्या शतकात ह्या प्राण्यांची केवळ चित्रेच त्या पिढीला दाखवावी लागतील, हा विचार कोणीच करत नाही.

आमच्याकडे असलेले प्राणी आम्ही जंगलात जाऊन पकडलेले नाहीत. ते अगदी लहान असताना आदिवासींनी आमच्याकडे आणून दिलेले आहेत. त्यावेळी ते आम्ही नाकारले असते तर ते परत जंगलात जाऊन जिवंत राहिले नसते. ही प्राण्यांची लहान पिल्ले त्यांचे आई-बाप मारल्यावर आपल्याकडे आलेली आहेत. आम्ही त्यांना काळजीने वाढवून मोठे केले आहे. आता त्यांची पिल्ले येथे होत आहेत व वाढत आहेत.

आमच्याकडे असलेले प्राणी आम्ही जंगलात जाऊन पकडलेले नाहीत. ते अगदी लहान असताना आदिवासींनी आमच्याकडे आणून दिलेले आहेत. त्यावेळी ते आम्ही नाकारले असते तर ते परत जंगलात जाऊन जिवंत राहिले नसते. ही प्राण्यांची लहान पिल्ले त्यांचे आई-बाप मारल्यावर आपल्याकडे आलेली आहेत. आम्ही त्यांना काळजीने वाढवून मोठे केले आहे. आता त्यांची पिल्ले येथे होत आहेत व वाढत आहेत.

काही प्राणी, उदाहरणार्थ सिंह ह्या जंगलात नाहीत. त्याचवेळी माऊसडीयर, देवखार यासारखे प्राणी शहरातील 'झू'मधून देखील नाहीत. ह्या प्राण्यांची अदलाबदल केली तर सर्वांना सर्व प्राणी पाहण्यास मिळतील. पण नेमका येथेच वनसंवर्धनाचा कायदा आड येतो. तसे करण्यास वनखाते परवानगी देत नाही.

ह्याविरुद्ध निसर्गप्रेमी आवाज उठवून बरेच काही करु शकतील. असे प्राणी जवळ ठेवणे, त्यांना वाढविणे यांस वनखाते आम्हाला परवानगी देत नाही. पण त्याचवेळी जागतिक वन्यप्राणी निधीसारख्या संस्थेचे अधिकारी येथ येऊन, राहून आमच्या प्रकल्पाला 'वन्यप्राण्यांचे अनाथालय' ह्या सदराखाली त्या निधीतून काही आर्थिक मदत करत आहे. कायद्याची ही विचित्र टांगती तलवार डोक्यावर असताना आमच्याकडे असलेल्या सर्व साधनांची व अपुऱ्या आर्थिक परिस्थितीत हे प्राणी कसे वाढतील व निरनिराळ्या ठिकाणी देता येतील, ह्या धडपडीत आम्ही आहोत.

गेल्या तेरा वर्षांत ह्या प्राण्यांच्या संगतीत काढताना इतर बऱ्याच गोष्टींनी लक्ष वेधून घेतले आहे. वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्यास वनखात्याचे अधिकारी उत्सुक नाहीत; तर काही वेळा त्यांना अपुरी साधनसामुग्री, विचित्र कायदे व नोकरशाही यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे शिकार कायद्याने बुंद आहे. पण प्रत्यक्षात मात्र ती सर्रास चालू आहे. आमच्या इथले आदिवासी इतके दुर्लक्षित आहेत की, शिकार केली तरच त्यांना चवीपुरते मांस मिळते. नाहीतर इतरवेळी पोटभर अन्नपण मिळत नाही. त्यांच्या शिकारीच्या अनेक पद्धती आहेत. आदिवासी हौसेसाठी, चैनीसाठी शिकार नक्कीच करत नाहीत. त्यांच्या धार्मिक सणात त्यांना काही ठराविक जातीच्या प्राण्यांचा बळी द्यावा लागतो. त्यासाठी सर्व गाव मिळून शिकार करतात. पण ज्याचे मांस ते खात नाहीत अशा प्राण्यांची शिकार केवळ कातड्यासाठी करत नाहीत.

तेरा वर्षांच्या प्राण्याच्या प्रेमळ सहवासाचा इतिहास लोकांना कळावा म्हणून हा लेखनाचा प्रयत्न केला आहे. मी लेखक नाही. पण जसे घडत गेले तसे लिहीत गेलो. प्रकाशकडे सर्वांची तारीखवार नोंद आहे. तिचा उपयोग झाला. प्रकाशचा अनुभव जास्त आहेख सहवास जास्त निकटचा आहे. तो प्राण्यांबद्दल आणखी अनेक गोष्टी सांगू शकेल. मला जमला तेवढा मी मनापासून प्रयत्न केला आहे. वन्यप्राण्यांना आपल्याइतकाच जगण्याचा हक्क आहे, ते प्रेमाने राहू शकतात. जंगलात ते क्रूर असतात हे खोटे आहे. शिकार करणे हा त्यांचा धर्म आहे व त्यावरच ते जगतात. तरीपण भूक नसताना कोणताही वन्यप्राणी उगाच कोणाला मारत नाही व कोणाच्या वाटेला सहसा जात नाही. माणसासारखा साठा तो करत नाही. दिवसेंदिवस आपण आपल्या लोभापायी जंगलात शिरत आहोत व जर त्यांनी विरोध केला तर त्यांना आक्रमक ठरवत आहोत. कारण त्यांना बोलता येत नाही, त्यांच्याकडे शस्त्रे नाहीत व प्रसारमाध्यमेही नाहीत. डॉ. प्रकाश यांनी या पिल्लांना मुलाप्रमाणे पाळले व मी त्यांना मदत केली. त्यांच्या प्रेमळ सहवासाचे, आनंदाचे क्षण जे आम्हाला लाभले ते कधीही विसरता येणार नाहीत.

लोक-बिरादरी हा प्रकल्प हेमलकसा येथे बाबा आमटे ह्यांनी आदिवासींना दवाखाना, शिक्षण व शेतीकाम देण्यासाठी १९७३ साली सुरु केला. डॉ. प्रकाश आमटे ह्यांच्यासोबत इतर अनेकांच्या सहाय्याने आम्ही ते काम आजपर्यंत करत आलो आहोत. हे काम करताना मोकळ्या वेळात हे प्राणीजीवन वाढविले आहे. अर्थात प्रकल्पांची आम्हाला मदत असली तरी आदिवासींसाठी असलेल्या गोष्टींचा उपयोग प्राण्यांसाठी आम्ही कधी केलेला नाही. सुरुवातीपासून श्री. कमलाकर कुळकर्णी, श्री. मुडुकर व इतर अनेकांनी आर्थिक सहाय्य केले आहे. स्वत:ची काही रक्कम त्यांच्यावर खर्च केली आहे. जागतिक संस्थेची आर्थिक मदत आहे. तरी रोजचा त्यांचा खर्च, पिंजऱ्याची दुरुस्ती, नवीन पिंजरे ह्यासाठी आर्थिक सहाय्य कोणी देऊ केले तर आनंदच होईल. पँथर-सिंहाचा एक महिन्याचा मटणाचा खर्च तीनशे रुपये आहे. पिंजऱ्यातील प्राण्यांना पुरेशी मोकळी जागा व स्वच्छता असावी याची आम्ही आमच्याकडून होईल तेवढी काळजी घेत असतो. डॉ. प्रकाशच्या अनुभवाचा, ज्ञानाचा उपयोग सरकारने करुन घेतला तर शहरातील अनेक प्राणीसंग्रहालयाने सुधारु शकतील. काही वन्यप्राणी परत जंगलातही सोडता येतील. त्यासाठीही आम्ही प्रयत्न करु शकतो. पण कायद्याची बंधने आहेत. लोकांनीही ह्यासाठी सामुदायिक आवाज उठवावयास हवा.

**– विलास मनोहर**

**(सौजन्य : नेगल, ग्रंथाली प्रकाशन)**

****








# निसर्गवाचक



मारुती चितमपल्ली

ललित लेखांतून अरण्ये, अरण्यातील अनुभव यावर प्रकाश टाकणारे आणि त्यात स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करणारे लेखक म्हणून मारुती चितमपल्ली मराठी साहित्यविश्वाला सुपरिचित आहेत. त्यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९३२ रोजी सोलापूर येथे झाला. १९५५ साली सोलापूरच्या महर्षी दयानंद महाविद्यालयातून इंटरसायन्स करुन पुढे कोईमतूरच्या सदर्न फॉरेस्ट रेंजर्स कॉलेजमध्ये त्यांनी वानिकीचे शिक्षण घेतले. त्यानंतर भारतीय विज्ञान संस्थेत वन्यजीव व्यवस्थापनाचे उच्च शिक्षण त्यांनी पूर्ण केले.




**अनुभवांची शब्दचित्रे**

वनाधिकारी म्हणून वनात प्रवेश केल्यापासून गेली दोन तपं मी वनात राहतोय. कोईमतूर येथील वन महाविद्यालयात माझं वनविद्येचं शिक्षण झालं. आमचे प्राचार्य भोजशेट्टी आनंद व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे थोर वनाधिकारी होते. जंगलात अभ्यासदौऱ्यावर असताना ते सहजपणे मार्मिक बोलायचे. एकदा वनाधिकारी व वन्यजीवव्यवस्थापक यांतील फरक सांगताना ते म्हणाले, ''वनाधिकाऱ्यांचे लक्ष झाडाकडे असतं तर वन्यजीवव्यवस्थापकाचं सारं लक्ष धरतीकडे असते.'' आम्ही अभ्यासदौऱ्यावर असलो म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांना या दोन्हीही दृष्टींनी ते अचूक मार्गदर्शन करीत. माझ्या सुदैवानं या दोन्हीही जबाबदाऱ्या पार पाडण्याचा योग मला आला.

वनातून भ्रमंती करताना वृक्ष-वनांचं, त्यातून दिसणाऱ्या आकाशाचं, तसंच धरतीवरील उदकांचं सौंदर्य मला पाहता आलं. पशुपक्षी, कीटक आणि सरपटणारे प्राणी यांचंही सूक्ष्म निरीक्षण करता आलं. पाखरांनी तर माझं सारं भावविश्वच व्यापून टाकलं आहे आणि त्यातूनच हळूहळू अनुभव संचित होत गेला.

पुढे थोर चित्रकार आलमेलकरांचा परिचय झाला. परिचयाचं रुपांतर स्नेहात झालं. त्यांच्याबरोबर जंगलात भटकणं मोठं ज्ञानदायही असे. वाटेनं चालता चालता ते ॲरिस्टॉटलप्रमाणे निसर्ग व आदिवासी यांच्याविषयी अद्‌भुतरम्य गोष्टी सांगत. पशुपक्ष्यांची आणि आदिवासींची उभ्याउभ्याच सहजसुंदर आणि अप्रतिम रेखाटनं काढीत. त्यातून संचित अनुभवाला एक विशिष्ट आकार आला. त्या अबोल, अबोध अनुभवांना शब्दकळा कधी आणि कशी फुटली हे ध्यानातही आलं नाही. मला लाभलेले हेच 'जंगलाचं देणं.'

शहरातील रूक्ष नि नीरस जीवनामुळं अरण्यातील आनंददायी आणि प्रसन्न वातावरणाची, त्यातील सौंदर्याची माहिती फार थोड्यांना असते. अरण्यातील वास्तव्यानं मन विचारी बनतं. भावना अधिक पवित्र होतात. माझ्या लिखाणातून हेच सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**(सौजन्य : जंगलाचं देणंच्या प्रस्तावनेतून)**

****

**गांधारी तळं**

भंडारा जिल्हा हा सरोवरांचा प्रदेश. सरोवरे व पर्वतमाला प्रदेशात जन्माला यायला भाग्य लागत असल्याचं एका चिनी तत्त्ववेत्त्यानं आदर्श जीवनाची चार असं सांगताना म्हटलं आहे. ह्या जिल्ह्याच्या परिसरात महाकवी कालिदास व भवभूतीची काव्यप्रतिभा फुलली आहे. महाकवी भवभूतीचं मूळ गाव भंडारा जिल्ह्यातील आमगावजवळचे, तर भंडाऱ्याच्या सीमेवर असणाऱ्या रामटेकहून कालिदासांच्या 'मेघदूता'चा प्रवास सुरु होतो. तो भंडारा जिल्ह्यातील निसर्गरम्य टापतून बाला (बलाक-समुद्रपक्षी) घाटाकडे जातो. इथली सरोवरं त्यांचा इतिहास न आठवण्याइतकी पुरातन आहेत. सरोवरांना शोभणारी नावं मला इथंच आढळली. देवतळं, गंगाझरी, जलकन्या, तारुबंद ही गंधर्व नगरीशी नातं सांगणारी तळी. कोहमारा, चोरखमारा ही जपानी नावांशी सादृश्य असलेली सरोवरं. परंतु मला 'गांधारी तळं' हे नाव अपूर्व व अर्थपूर्ण वाटलं. शंभर पुत्रांना प्रसवणाऱ्या गांधारीचं नाव ह्या तळ्याला दिलं ते यथोचितच आहे. लोक म्हणतात, गांधारी हे त्या जिल्ह्यातील पहिलं तळं. हजारो तळ्यांना जन्म देणारं 'गांधारी तळं' निसर्गातील अद्‌भुत किमया आहे.

आता 'गांधारी तळ्या'च्या वरच्या अंगाला थोड्या अंतरावर इटिया डोहासारखा विस्तीर्ण जलाशय आहे. त्याच्यापेक्षा हजार पटीनं मोठा. ह्या दोन अद्‌भुत सरोवरांकडे पर्वतावर उभं राहून पाहिल्यावर वाटतं -

तरुवर बीजा पोटी ।<br>
बीज तरुवरा सेवटी ।।

गिधाडपहाडाच्या उतरणीवर एक गहन अरण्य आहे. या वनाच्या पायथ्याला गांधारी सरोवर आहे. तिचं उदक स्फटिकवत स्वच्छ आहे. ते प्रकाशाचं ज्योतिर्मय सरोवर आहे. शरदऋतूत तिथं गेलं तर तांबड्या व पांढऱ्या कमळांनी आच्छादिलेलं ते तळं अतिशय सुंदर दिसतं. देवढोकरी-बगळे तर तिथल्या कमळांच्या पाना-

पानागणिक बसलेले आढळतात. तळ्यातील उदकाचे दोन रंग दिसतात. पाण्यातील विविध प्रकारच्या चीला-जलाशयाम वाढणारी वनस्पती-मुळे त्यात हिरवी गहराई डोकावते तर पृष्ठभाग गगनसदृश सुंदर नीलवर्ण दिसतो. ह्या चीलांत खूप झिंगामच्छी प्रसवते. त्यांचा पाठलाग करीत आहार-विहार करणाऱ्या टिबुकल्या-डॅक चिक दिसतात. तिच्या सराणीतल्या चिखलात विहार करीत चरणारे चिखले बाड्डे व आकाशात झेप घेत थव्याने उडणारे सरगे बाड्डे यांच्या गोड कलरवाने सरोवर गंधर्वनगरीतल्या अद्‌भुत स्वराने निनादीत होते. पहाडाच्या बिकट कड्याच्या आश्रयानं गिधाडं इथं प्रसवतात. इथल्या परिसरात चामढोक-पेंटेठ स्टोर्क सारख्या सुंदर करकोच्यांची वीण होते. मोरघार- क्रेस्टेड हॉक इगल- तळ्यावरुन कि-कि-कि-कि-कि-कि-कि-कि-कि-कि-कि ऽऽ करीत आकाशात घिरट्या घालते. तिच्या चाहुलीने चकित झालेली जंगलातील मोराची पिलं व तळ्याकाठच्या पाणलाव्या जागच्या जागी थिजतात. पहाटेपूर्वीच्या काळोखात इथल्या सारस पक्ष्यांच्या जोडीचा विभ्रांत स्वर पहाडातून प्रतिध्वनित होताना ऐकण्यासारखा असतो. असा मंत्रमुग्ध करुन सोडणारा अन्य ध्वनी निसर्गात विरळा.

भारतातील भावनगरचे जगद्‌विख्यात पक्षिशास्त्रज्ञ श्री. धर्मकुमार सिंहजी यांनी जेव्हा गिधाडपहाडाच्या सावलीतलं गांधारी तळं पाहिलं तेव्हा ते आनंदानं नाचले. तळ्याचं गांधारी हे नाव ऐकून ते म्हणाले,

''इथं जवळच असणाऱ्या इटिया डोहाला आणि इथल्या राष्ट्रीय उद्यानाला गांधारी हे नाव का दिलं नाही? पिटर स्कॉट ह्या जगत्‌प्रसिद्ध पक्षिचिताऱ्यानं जर हा स्वर्गसदृश्य प्रदेश पाहिला असता तर त्यानं अद्‌भुत-रम्य पाणपाखरं रंगविली असती!''

दूर गिधाडपहाडाकडं नजर लावीत ते ज्ञानवृद्ध पक्षिशास्त्रज्ञ मला उद्देशून म्हणाले -

''चितमपल्ली, तुम्हाला एक सांगू?'' आणि मी काय म्हणून विचारायच्या आत ते म्हणाले,

''अरुण बाड्डे- पिंक हेडेड डक- व धावी - जरडान्स कोर्सर - ह्या नामशेष झालेल्या पक्ष्यांचे अणू इथंच असावेत. पुन: ते कुठं सापडतील तर ते इथंच! दुसरीकडं नाही.''

हे सुंदर-गूढ सरोवर पाहून मला पूर्वजन्मीच्या अनामिक स्मृती होऊ लागतील की काय असं वाटतं. हिवाळ्याच्या सुरुवातीला सैबेरियाहून रानबदकं येऊ लागली की, मी रोज पहाटे तळ्याच्या पाळीवर जाऊन बसे.

गारवी नदीच्या डोहातून पहाटेच्या काळोखात परत गांधारी तळ्याकडे असलेल्या हुदाळ्याची मंत्रमुग्ध शिशुली कानावर येई.

गिधाडपहाडातील प्रकाश, गांधारी तळ्यातील पाण्याच्या तरंगांचा आवाज, तिथल्या आल्हाददायक चांदण्या रात्री, कमलपुष्पांचा सुगंध व सुंदर गांधारी गोंड कन्यकांचे मुग्ध हावभाव हे सारंसारं मोहक व अवर्णनीय आहे.

एके दिवशी सुप्रभाती इटिया डोहातून गिधाड-पहाडावरुन मोठ्या अडई सारखे दिसणारे गुलाबी डोक्याचे, तपकिरी रंगाचे तीन अरुण बाड्डे स्वच्छ आकाशातून पंख फडफडवीत गांधारी तळ्यात उतरले. अरुण बाड्डे साऱ्या वन्य बदकांत सुंदर दिसतात. सम्राट अशोकाच्या नंदनघर येथील पाचव्या स्तंभावरील अवध्य पशु-पक्ष्यांच्या नामावलीत अरुण बाड्ड्यांचा उल्लेख आहे. हजारो वर्षांपासून त्यांना संरक्षण देऊनही ते गेल्या पावणे दोनशे वर्षांपासून नामशेष झाल्याचे पक्षिशास्त्रज्ञ सांगतात. आणि पुन: शेकडो वर्षांनंतर ते इथं ह्या गांधारी तळ्यात दिसले. केवढा योगायोग हा!

मुंबईत वास्तव्य असलेले ख्यातनाम चित्रकार श्री. ए.ए. आलमेलकर मध्यंतरी इथं आले असता गिधाडपहाड व गांधारी तळ्याचा परिसर पाहून दिङ्‌मूढ झाले. अशा अवस्थेत ते गांधारी गावाकडे निघाले. आपल्या प्रतिभेला आव्हान देणारी कितीतरी नवनवीन विषय घेऊन आठवडाभराच्या इथल्या मुक्कामात त्यांनी शेकडो रेखाटने केली. अनेक विषयांवर त्यांनी आपल्या खास शैलीत रंगवलेल्या थोर-थोर चित्रकृतींपैकी काही वेचक कलाकृती आता नवेगाव राष्ट्रीय उद्यानातील विश्रामगृहाचे वैभव वाढवीत आहेत.

**- मारुती चितमपल्ली**
**(सौजन्य : जंगलाचं देणं,**
**साहित्य प्रसार केंद्र, नागपूर)**




महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात अनेक महत्त्वाच्या पदांवर कार्य करीत असताना आलेल्या अनुभवजन्य ज्ञानातून वने, अरण्ये, वनस्पती व पक्षी यांच्यासंबंधीचे विपुल लेखन चितमपल्लींनी केले. हे लेखन केवळ माहितीपर नाही. तर त्यांविषयीचे अनुभव व निरीक्षण ललित पद्धतीने प्रकट करणारे आहे.

त्यांची पक्षी जाय दिगंतरा, जंगलाचं देणं, रानावाटा, शब्दाचं धन, रातवा, घरट्यापलिकडे, पाखरमाया, निसर्गवाचन ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. जंगलाचं देणं, रानवाटा, रातवा याला महाराष्ट्र शासनाचे साहित्य पुरस्कारही मिळाले आहेत.

# ब्रह्मदेश, बर्लिन आणि महाराष्ट्र !



इरावती कर्वे

परिपूर्ती, भोवरा, गंगाजल अशा लेखसंग्रहामुळे इरावती कर्वे यांच्यातील ललित लेखक आजही मराठी वाचकाला भावतो, पण त्यापेक्षा त्या अधिक लक्षात राहतात, ते महाभारतातील कर्ण या उपेक्षित नायकाला 'अक्षर-न्याय' मिळवून देणाऱ्या 'युगान्त' या त्यांच्या अविस्मरणीय ग्रंथामुळे.




*ब्रह्मदेशात मिन्जान येथे जन्मलेल्या इरावती करमरकरांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. तत्त्वज्ञान विषय घेऊन बी.ए.केलेल्या इरावतीबाईंनी 'चित्पावन ब्रॅह्मिन्स असोशियो एथनिक स्टडी' हा प्रबंध लिहून एम.ए.पदवी संपादन केली आणि जर्मनीतील हम्बोल्ट (बर्लिन) विद्यापीठात त्यांनी केलेल्या मानववंशशास्त्राच्या अभ्यासाबद्दल त्यांना डॉक्टरेट मिळाली.*

*इरावती कर्वे यांचा संचार असा विविध क्षेत्रांतला. पण जगन्मान्य विदुषी म्हणून त्यांना लौकिक लाभला, तो त्यांनी करुन ठेवलेल्या मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांतील संशोधनामुळे. भारतातील विविध जाती-जमातींचे मानववंशशास्त्राच्या आणि लोकसंस्कृतीच्या दृष्टिकोनातून सखोल अध्ययन आणि संशोधन करण्यासाठी इरावतीबाईंनी 'महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जातींची समाजदृष्ट्या पाहणी' हे काम हाती घेतले. मानवाच्या शारीरिक वर्गीकरणाचा आणि आप्तरक्तवंश संबंधाचाही त्यांनी अभ्यास केला. त्यासाठी अफाट भटकंती करताना त्यांच्या हाती लागलेला 'महाराष्ट्र' त्यांच्याच शब्दांत -*

गोंदिया-भंडाऱ्याच्या बाजूला देशी बिड्या प्रचंड प्रमाणात करतात. त्यासाठी जी टेंभुर्णीची पाने लागतात ती गोळा करणाऱ्या हंगामाला अजून नीटशी सुरुवात झाली नव्हती. पण लवकरच काम सुरु व्हावयाचे होते. हिवाळा संपून नवी पात फुटली की, जास्तीत जास्त पाने गोळा करुन आणण्याची धांदल सबंध जंगल प्रदेशात उडालेली असते. विडी कारखान्यातील कामे- पाने गोळा करणे, ती निवडणे, कातरुन त्यांना आकार देणे, ती वाळवून पुडे बांधणे, विड्या वळणे वगैरे सर्व महारच करतात. घरातील पुरुष उजाडण्याच्या आतच कारखानदारांच्या रिंग्या घेऊन रानात जातात. तेथे सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंत पाने ओरबाडण्याचे काम चालते. जसजशा गाड्या भरतात तशतशा त्या मालक सांगेल त्या त्या ठिकाणी रवाना होतात. तेथे म्हातारे-कोतारे, बायका-पोरे दिवसभर पाने कातरीत असतात. दिवसाचा वेळ फुकट जाऊ नये म्हणून बायका रात्रीचीच दळणे करुन भाकरी भाजून ठेवतात. मी कार्यकर्त्यास - विडी कारखानदाराच्या आश्रितास- विचारले, ''महारांना दिवसाचे किती तास काम पडते हो?'' तो उत्तरला, ''तास कसचे विचारता? हंगामात दिवसाचे बारा तासही कामाला पुरत नाहीत. पाने आणणे, कातरणे, पुडे बांधणे वगैरे निरनिराळ्या कामाप्रमाणे दाम मिळतो त्यांना. आजकाल फारच शेफारले आहेत ते.'' दुसरा एकजण म्हणाला, ''आणि एकेकाचा पोशाक तरी पाहा. कोशा, सिल्कचा शर्ट व सोन्याच्या रिस्टवॉच! दिसतात का तरी तुम्हाआम्हाला?'' तिसरा बोलला, ''अहो, त्यांचं सगळं कुटुंबच्या कुटुंब पैसे मिळवतं ह्या दिवसांत.'' मत्सराचा एक सामुदायिक ध्वनी गाडीत उमटला.

मला माझ्या प्रवासातली एक सकाळ आठवली. रानातून प्रवास करीत असता मी महारांच्या वस्तीला आले होते. घराच्या पुढेच एक अशक्त व फिक्कट दिसणारा मुलगा पानांची रास पुढे घालून बसला होता. त्याच्या आईने सांगितले, ''बाई, तो अशक्त आहे, त्याचे पाय लुळे आहेत, चालता येत नाही. पण बसून पानं कातरली म्हएजे दिवसाचे आठ-बारा आणे मिळतात. तेवढंच त्याचं पोट बाहेर पडतं.'' त्या मुलाचे केविलवाणे डोळे, त्याच्या आईचे कित्यक दिवसांत वणी न घातलेले डोके, कित्येक दिवसात न धुतलेले लुगडे व माझ्याशी बोलताना सुद्धा चाललेला पाने कातरण्याचा उद्योग ही सर्व माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली. खरेच, महाराच्या घरी तान्ह्या मुलाखेरीज सगळे कुटुंबच्या कुटुंब पैसे मिळवीत असते. चार पैसे मिळाले की, खर्च होण्यासही वेळ लागत नाही. शेजारच्या मोठ्या शहरी जयचे, बाजारात छानछोकीची जी वस्तू दिसेल ती दुप्पट पैसे देऊन विकत घ्यायची, चार दिवस निरनिराळ्या उपहारगृहात जाऊन मन मानेल तसे चरायचे. यथेच्छ दारु प्यायची, तमाशाला जायचे आणि खिसे मोकळे झाले की घरी येऊन घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे कामाला लागायचे. गाडीतल्या पांढरपेशा माणसांना ह्या

आयुष्यक्रमाचा का बरे एवढा हेवा वाटावा?

भंडाऱ्याच्या पुढे हाळबी लोकांच्या प्रदेशात माझे ह्यापुढील काम होते. तेथे अर्जुनीला दोन-तीन दिवसांचा मुक्काम होता. शेजारच्या दोन-चार गावांतून महारांना बोलावले होते. तेथेही नागपूरचाच अनुभव मला आला. गोंड, हाळबी, कुणबी मापे देऊन रक्त देऊन जात होते. पण मी हे काय चालवले आहे हे काही कुणी विचारले नाही. महार आले ते सगळे मिळवून चार-पाच मैल चालून आले. त्यांनी मापे घेताना मी डोके का मोजते हे विचारले, माझे काम रिक्रूट भरतीसाठी नाही ह्याची खात्री पटल्यावर दोन क्षण मोजणीचे काम पूर्ण शांततेत झाले. मला वाटले, संपली ह्यांची प्रश्नावली. पण छे! रिक्रूट भरतीसाठी तर नाही, पण मग ही मोजणी कशासाठी चालवली आहे ते समजावून सांगण्याची भुणभुण सुरु झाली. शेवटी अगदी निरक्षर माणसांना मानवशास्त्राचे धडे देण्याइतपत माझी तयारी आहे का नाही ह्याची परीक्षा मला देण्याची वेळ आली. रक्त काढल्यावर मला जेवायचे होते. ते रक्त मीच तपासणार हे कळल्यावर तर मंडळी तेथून हलच ना. ''तुम्ही काय करता ते आम्ही पाहू न मग जाऊ'' असे त्यांनी निक्षून सांगितले, व मग माझ्याभोवती कोंडाळे करुन कोणाचे रक्त 'अ' आहे, कोणाचे 'ब' आहे, ते कसे ओळखायचे, ह्याची समजूत करुन घेतली. ''काय रे मग बामणाचं रक्त न आपलं रक्त सारखं असलं तर काय होईल?'' ''मग म्हणून काय झालं? आम्ही काय माणसं नाहीत?'' ''अरे, पण निराळं असलं तर रे?'' ह्याला उत्तर न सुचल्यामुळे सर्वांनी माझ्याकडे वळून ''मग बाई...''अशी सुरुवात केली. पण माझ्या सुदैवाने गावाचा पोलीसपाटील तेवढ्यात येऊन सर्वांना काही कामाला घेऊन गेला, व मी त्यांच्या प्रश्न-राक्षसांच्या तावडीतून सुटले.

ह्यापुढचा मुक्काम खजरी येथील हाळबी जमीनदाराकडे होता. तेथला पटवारी एक हुशार, मध्यम वयाचा व अर्थातच लिहिता-वाचता येणारा महार होता. नेहमीप्रमाणे त्याने माझी सर्व व्यवस्था केली.

माझ्या मनात सारखे येई... त्याच्या मुलांना खाऊसाठी म्हणून काही द्यावे. पण ज्या माणसाबरोबर बरोबरीच्या नात्याने दोन दिवस काढले त्याला अशा प्रकारे उचलून पैसे द्यावे हेही मनाला प्रशस्त वाटेना. दुपारी रक्ततपासणीचे काम चालले होते. माझ्याजवळ दोन-चार काचेच्या नळ्या मागे रबराचा फुगा लावलेल्या अशा रक्त घेण्यासाठी होत्या. पटवारी म्हणाला, ''बाई, तुमचं अडणार नसेल तर एक नळी द्या. फाऊंटन पेन भरायची भारी पंचाईत पडते.'' त्यांच्याबरोबरच साकोरीपासून वाटाड्या म्हणून पाठवलेला एक ब्राह्मण होता, तोही आमच्यात गेले चार दिवस होता. तो म्हणाला, ''अहो, असं मागता काय... मला पण फाऊंटनची अडचण पडते, पण मी मागितलं का?'' पटवारी म्हणाला, ''त्यांत काय झालं? बऱ्याचशा नळ्या दिसल्या. एक मागितली; अडणार नसेल तर घेतली, नाही तर नाही.'' पटवाऱ्याने क्षुल्लक वस्तू आपण होऊन अगदी सहजगत्या मागण्यात कोणतेच दैन्य दाखवले नव्हते. उलट, दोन दिवसांच्या सहवासात उत्पन्न झालेल्या खेळीमेळीच्या, बरोबरीच्या भावनेचे ते द्योतक होते. मागणी ऐकून मला पण आनंद झाला. देणगी इतकी क्षुल्लक की, देणाऱ्याला व घेणाऱ्याला आनंदाखेरीज कसलीच देवाणघेवाण करण्याची तसदी नव्हती. महारांना माणसा-माणसांच्या संबंधाचे ज्ञान उपजत असते असे मी म्हणते ते ह्यामुळेच. ज्या गोष्टी आम्हाला शिकाव्या लागतात त्या त्यांना आधीच माहीत असतात आणि त्या बोलून जाण्याची त्यांची पद्धत इतकी सहज, सरळ व बिनतोड असते की, त्याच्यापुढे उत्तरच नसते. माझ्या प्रवासात मी जवळजवळ मराठी मुलुखाची सीमा गाठली होती. पुढे जावे का नाही हे अजून ठरले नव्हते. रम्य वनप्रदेश, साधे-भोळे, निरक्षर, मला पूर्वी माहीत नसलेले मराठी बोलणाऱ्यांचे समाज ह्यात मन रमले होते. पण घर सोडून फार दिवस झाल्यामुळे घरची ओढ लागली होती. महाराष्ट्राची सीमा कोणती ह्याबद्दल आमचे बोलणे चालले होते. कोणी म्हणत होता, ''ह्या नदीच्या पलीकडे हिंदी बोली सुरु झाली;' कोणी म्हणत, ''त्या गावातले लोक निम्मे मराठी, निम्मे हिंदी आहेत.'' महार पटवारी म्हणाला, ''जेथपर्यंत महार पोचले तिथपर्यंत महाराष्ट्र!''

**– इरावती कर्वे**

**(सौजन्य : परिपूर्ती,**
**देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.)**











# ग्रंथपान

'घटनास्थळ आरोपींच्या प्रतिमांचा आरसा असते. त्याचे बारकाईने निरीक्षण करून आरोपीची घटनास्थळी हरवलेली प्रतिमा शोधणे, हे गुन्हे अन्वेषण करणाऱ्या प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. तपासाची सत्यता अन्वेषण अधिकाऱ्याच्या अंगी असलेल्या गुण, जिद्द,आणि आत्मविश्वासामुळे सिद्ध होते.'

हा मंत्र ज्यांनी जोपासला, ज्यामुळे अपेक्षित यशाला गवसणी घालता आली आणि एक कर्तव्यदक्ष अधिकारी अशा लौकिकाचे धनी झाले, ते आहेत डॉ. बी. जी. शेखर, आयपीएस अधिकारी. उच्च विद्याविभूषित, व्यासंगी, उत्कृष्ट अन्वेषणासाठी पोलीस महासंचालकांचे सुवर्णपद आणि राष्ट्रपती पारितोषिकाचे मानकरी. त्यानी त्यांच्या कारकिर्दीत उकल केलेल्या गुन्ह्यांची संख्या फार मोठी आहे. त्यापैकी काही घटना त्यानी वाचकांच्या समोर ठेवल्या आहेत, 'शोध' या पुस्तकाच्या रूपात.

गुन्हा हा शब्दच मुळात अंगावर काटा आणणारा. त्याचे स्वरूपही विचित्र, मस्तकात तिडीक आणणारे. अवघड आणि गंभीर. त्याचा तपास करायचा, तो तडीस न्यायचा, यासाठी घड्याळाच्या काट्यांना विसरून करावी लागणारी मेहनत, सारेच अचाट. कधी पुरावा आहे, तर कधी कुठलाच धागादोरा नाही. चांदणीच्या आशेवर भर समुद्रात सापडलेल्या नौकेसारखी अवस्था. परंतु जिद्दी आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला कठीण काहीच नसते. त्याची चौकस आणि कुशाग्र बुद्धी चौफेर झेप घेत असते. सुतावरून स्वर्ग गाठण्याची किमया साधत असते. त्याचा अनुभव देणाऱ्या सत्यघटना या पुस्तकात समाविष्ट केलेल्या आहेत. क्लृप्त्या, खबरे, निर्णयक्षमता आणि स्वतःचा स्वतःवरील विश्वास, यामुळे शोध कसे लागले यांची प्रचिती देणाऱ्या, उत्कंठा वाढवणाऱ्या, काही क्षणी श्वास रोखायला लावणाऱ्या कथा या पुस्तकात वाचावयास मिळतात.

'ॲक्शन शूज' या कथेतील गुन्हेगार शोधण्यासाठी हेच शूज मुख्य पुरावा म्हणून उपयोगी ठरतात. 'प्यास मँगोला' कथेत बँकेच्या दरोडा प्रकरणात दरोडेखोरांनी विकत घेतलेली प्लास्टिकची कॅरीबॅग, हीच माग काढण्याची मुख्य खूण ठरते. तिच्यावर असलेला 'प्यास मँगोला' हा मार्क आणि तिचा रंग महत्त्वाची भूमिका बजावतात. 'सुखदेव' या कथेत त्याने चोरांना दिलेली रेक्झिनची पिशवीच चोरांची काळ ठरते. 'मीराचे लग्न' या कथेत तर कुठलाच पुरावा नाही. लग्नाचा सगळा ऐवज गेला. आता लग्न होणार नाही अशी परिस्थिती. परंतु खबऱ्याचा अंदाज कामी येतो. खाण्यापिण्याचे हाल असलेला निवृत्ती बर्डे नावाचा माणूस केपानगर भागात फार चंगळ करताना दिसतो. एवढाच अंदाज! पाणी तिथेच मुरलेले आहे हे नंतर स्पष्ट होते. 'टायर मार्क्स' ही कथा तशीच. खुनाच्या ठिकाणी केवळ कारच्या टायरच्या खुणा, प्लास्टिक कॅनचे बूच आणि राजदूतची चावी एकढाच पुरावा. त्यावरून खुन्याचा शोध लावला जातो.

'बलिदानाचा दोर' या कथेत फक्त नायलॉन दोरीचा तुकडा सापडतो. त्यावरून शोधाची चक्रे फिरत राहतात. आणि शेवटी बरोबर गुन्हेगाराजवळ पोचतात. 'मनातला मांत्रिक' या कथेत सुरा वापरण्याच्या पद्धतीवर लक्ष केंद्रीत करून शोध लावला जातो. तर 'सुतावरून स्वर्ग' या कथेत, वापरण्यात आलेली बोरीची ओली काठी, एवढाच पुरावा आहे. या काठीसाठी बोरीचे झाड शोधून काढले. ते ३–४ कि.मी. अंतरावर सापडले. काठी त्याच झाडाची आहे याची खात्री झाली. परंतु त्या झाडाखाली देशी दारूच्या बाटल्या, रुमाल, कंगवा व बसच्या तिकिटाचे तुकडे सापडले. त्यावरून माग काढत पोलीस खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोहचले. ही कथा म्हणजे सुतावरून स्वर्ग गाठण्याचाच प्रकार म्हणायला हवा.

या संग्रहात एकूण अकरा कथा आहेत. त्या चोरी, दरोडा, खून या गुन्ह्यांशी संबंधित आहेत. गुन्हा करणाऱ्यांची मानसिकता पाहता, पोलीस आपल्यापर्यंत पोहचणार नाहीत याची ते काळजी घेतात. पोलिसांच्या चातुर्याची कसोटी पाहण्यासाठीच जणू ती घटना त्यांनी घडवलेली असते. पोलिसांसाठीच हेच आव्हान असते. ते आव्हान कशा रीतीने पेलले याचा उलगडा या कथांमधून होतो. कथा सत्यघटनेवर आधारित आहेत. परंतु त्या काही पोलिसी तपास अहवालाच्या स्वरूपात मांडलेल्या नाहीत. कथेला आवश्यक असलेला आकृतिबंध, सुरुवात, मध्य, शेवट, ताणतणाव, संघर्ष, व्यक्तिसापेक्षता, वातावरणनिर्मिती यांचे भान उत्तमरीतीने सांभाळलेले आहे. कथेची उत्कंठा कायम राहावी म्हणून त्यातले रहस्य अंतिम टप्प्यापर्यंत सांभाळावे लागते, तसे ते सांभाळले आहे. या कथालेखकाच्या कारकिर्दीला झळाळी देणाऱ्या घटना आहेत. तरीही लेखकाने त्यात 'मी, मला, माझा' असा गौरवाचा उदोउदो कटाक्षाने टाळलेला आहे. त्यामुळेच कथांमधील कथानक मूळ घटनेशीच घट्ट बिलगून राहिले आहे, कथेची वीण बांधेसूद झाली आहे. हेच या कथांचे यश म्हणावे लागेल. कथेच्या शेवटी सारांश रूपातली अवतरणे चौकटीत दिली आहेत. कथेला आकार देण्यासाठी रेखाचित्रे दिली आहेत. तपासाचे भिंग आणि 'लक्ष्य' चा गोल खाकी रंगाच्या पार्श्वभूमीवर चितारले आहेत. मुखपृष्ठाची कल्पनाही सुंदरच.

**शोध**

डॉ. बी.जी. शेखर (I.P.S.)




- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# महाराष्ट्र शेतकरी शुगर लि.

**श्रीउत्तमनगर, सायखेडा, ता. सोनपेठ, जि. परभणी**

**वैद्यनाथ प्रसन्न**



**चेअरमन, कार्यकारी संचालक**



**मा.श्री. अभिजित देशमुख**

## ❀ ठळक वैशिष्टे ❀

१) सोनपेठ तालुक्यातील पहिला नामांकित साखर उद्योग.
२) प्र. दिनी ३५०० मे. टन गाळप क्षमता प्रकल्प.
३) २१ मे. वॅटचा को.जन.प्रकल्प कार्यान्वित.
४) ३०००० ब.लि. क्षमता असलेल्या डिस्टीलरी प्रकल्प कार्यान्वित.
५) जिल्ह्यातील इतर साखर कारखान्याबरोबर ऊस दर देण्याची परंपरा

## ❀ शुभेच्छुक ❀

**मा. संचालक मंडळ**

**१) मा. श्री. उत्तमराव देशमुख–सचांलक**
**२) मा. श्री. विशाल देशमुख–संचालक**
**३) मा. श्री. जयसिंह देशमुख–संचालक**
**मा. श्री. अरविंद कुलकर्णी–जनरल मॅनेजर (युनिट हेड)**
**सर्व ऊस उत्पादक सभासद, अधिकारी, कर्मचारी वर्ग,**
**महाराष्ट्र शेतकरी शुगर लि, श्री उत्तमनगर, सायखेडा, ता. सोनपेठ, जि. परभणी**

**संपर्कासाठी :– चिफ अकाउटंट श्री. खाडप आर.आर. मो. नं. ९८५०३०५७८१**

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.

केवळ एक सच्चा मित्रच
तुमचा हात धरून ठेवू शकतो
50 वर्षे.

तुमची IDBI बँक झाली आहे 50 वर्षांची.
50 वर्षे जवळिकीची
50 वर्षे परस्पर सामंजस्याची
50 वर्षे एकमेकांना सहाय्य करण्याची
50 वर्षे मैत्रीची आणि भारताच्या प्रगतीतील भागीदारीची
तेव्हा अवश्य या, आपण आपल्या वाटचालीची 50 वर्षे साजरी करूया.
आणि जोडीने आपल्या ध्येयाकडे आगेकूच करूया.

IDBI
IDBI BANK
1964 - 2014
साजरी आहेत 50 संस्मरणीय वर्षे

Bank Aisa Dost Jaisa



आयडीबीआय बँक लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय: आयडीबीआय टॉवर, डब्ल्यूटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई-400 005.
कॉल करा 022 66937000. कॉल करा टोल फ्री नं. 1800 22 1070/1800 200 1947.
CIN: L65190MH2004GOI148838
www.idbi.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.